NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 51 ) 15th July 2026 ( No. of Pages 40 ) ( No : 07

# प्रा.बी.टी.देशमुख स्मृती विशेषांक

# संघर्ष यात्रेतील दीपस्तंभ !

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| (१) | भाऊ : एका युगाचा दीपस्तंभ | डॉ.प्रवीण रघुवंशी | ८३ |
| (२) | महाराष्ट्रातील शिक्षण चळवळीतील आधारस्तंभ : आ.प्रा.बी.टी.देशमुख | डॉ.महेंद्र वि.मेटे | ८६ |
| (३) | विदर्भाचा अभ्यासू आवाज, शिक्षक चळवळीचे वैचारिक अध्वर्यू : आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख | डॉ.काशीनाथ बऱ्हाटे | ८८ |
| (४) | बी.टी.देशमुख : एका युगाचा, एका वैचारिक परंपरेचा अंत | श्री.मिलिंद चिमोटे | ८९ |
| (५) | प्रा.बी.टी.देशमुख : एक निःस्वार्थ, निर्भीड आणि झुंजार नेतृत्व | खा.अशोक चव्हाण | ९० |
| (६) | आमच्या देव्हाऱ्यातील दत्तात्रय गेला!.... आता डोकं ठेवायला पाय कुठून आणावेत? | डॉ.किशोर फुले | ९१ |
| (7) | A life dedicated to education, public service, and the betterment of society | Dr. Dipali Shelke /Chinchole | 92 |
| (८) | विद्यापीठाच्या सुशासनात बी.टी.भाऊंचे योगदान | डॉ.सुभाष गवई | ९३ |
| (९) | प्रेरणेचे स्त्रोतः गुरुवर्य 'बी.टी.' सर! | न.मा.जोशी | ९४ |
| (१०) | सूर्यास्तः ------ आणि आमचा सूर्य क्षितिजापलीकडे कायमस्वरूपी विसाव्यासाठी निघून गेला | डॉ.एन.जी.बेलसरे | ९५ |
| (११) | बी.टी.देशमुख हे अमरावतीचेच नव्हे तर महाराष्ट्राचे भूषण | मा.श्री.नितीन गडकरी | ९६ |
| (१२) | प्रा.बी.टी.देशमुख : विचार, संघर्ष आणि परिवर्तनाचा तपस्वी | अजय बळवंत देशमुख | ९७ |
| (१३) | शिक्षक व शिक्षण क्षेत्राचे तारणहार बी.टी.भाऊ | अरविंद देशमुख | ९८ |
| (१४) | शिक्षणक्षेत्र, सामाजिक समस्यांचा जाणकार व राजकीय नैतिकतेचा अभेद्य चिरा काळाच्या पडद्याआड....... | डॉ.दिपक तुकाराम तायडे | ९९ |
| (१५) | ज्ञानयोगी, शिक्षकांचे भीष्मपितामह आणि विदर्भ विकासाचे दीपस्तंभ : मा.प्रा.बी.टी.देशमुख | प्रा.डॉ.प्रशांत विघे | १०२ |
| (१६) | बी.टी. नावाची दंतकथा | अविनाश दुधे | १०३ |
| (१७) | दंतकथा वाटावी अशी ६८ वर्षांची गुरु-शिष्य परंपराः प्रा.प.सी.काणे आणि 'भाऊराव' बी.टी.देशमुख | डॉ.मंजुषा वाठ-झगडे | १०४ |
| (१८) | बी.टीं.च्या सहवासात | किशोर देशपांडे | १०५ |
| (१९) | एका युगप्रवर्तक कर्माचा प्रवास | प्रा.डॉ.जागृती व्यास त्रिवेदी | १०६ |
| (२०) | जोवर 'पाणी' तोवर 'बी.टी.' | रघुनाथ पांडे | १०७ |
| (२१) | आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली | डॉ.शशांक हेडा | १०८ |
| (२२) | आदरणीय प्रा.बी.टी.भाऊ... विधानपरिषदेतील दृढनिश्चयी भगीरथ ! | निलेश मदाने | १०९ |
| (२३) | पुन्हा बी टी.होणे फार कठीण !!! | डॉ.अरविंद देशमुख | ११० |
| (२४) | शिक्षण क्षेत्रातील भीष्मपितामह, शिक्षक चळवळीचे आधारस्तंभ, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि जननेते आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सर यांना विनम्र अभिवादन | प्रा.डी.एस.चव्हाण | १११ |
| (२५) | मूल्यनिष्ठ व तात्त्विक विचाराचे अधिष्ठान आदरणीय बी.टी.देशमुख सर | डॉ.राजेश मिरगे | ११२ |
| (२६) | 'दिव्यत्वाची जेथं प्रचिती....' (भाग १ ते ११) | डॉ.किशोर फुले | ११३ |
| (२७) | आपल्यातून चालते बोलते भाऊ कायमचे दूर गेले | प्रा.डॉ.किशोर बुटले | ११५ |

# भाऊ : एका युगाचा दीपस्तंभ

- डॉ.प्रवीण रघुवंशी, *अध्यक्ष नुटा व एमफुक्टो*

आज लेखणी हातात घेताना मन अक्षरशः थरथरत आहे. आयुष्यभर ज्यांच्या विचारांचा, कृतींचा आणि तत्त्वांचा आधार लाभला, त्या आपल्या सर्वांच्या आदरणीय भाऊंवर श्रद्धांजली लेख लिहिण्याची वेळ माझ्यावर येईल, असा मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता. हा लेख लिहणे माझ्यासाठी अत्यंत वेदनादायी आणि व्याकूळ करणारे आहे.

**भाऊंबद्दल काय लिहावे?**

भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणते पैलू शब्दांत मांडावेत? तासांना वेळेवर जाऊन आपल्या ज्ञानामृताने विद्यार्थ्यांना चिंब करणारे प्राध्यापक? शिक्षक चळवळीचे नेतृत्व करणारे ध्येयवेडे नेते? पाच वेळा पदवीधर मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी? नुटा संघटनेला आयुष्य अर्पण करणारे संघटक? पन्नास वर्षे नुटा बुलेटीनचे अविरत संपादन करणारे अभ्यासू संपादक? शिक्षक, शिक्षणव्यवस्था, विद्यापीठे, कायदे आणि शासननिर्णय यांचा विलक्षण अभ्यास असलेले विचारवंत? हजारो शिक्षकांच्या आयुष्यात आशेचा दीप प्रज्वलित करणारे कर्मयोगी?की अमरावतीकरांचे साक्षात भगीरथ?

भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाची व्याप्ती एवढी विशाल होती की, कोणत्याही एका विशेषणात त्यांना बांधणे अशक्य आहे. त्यांनी आपल्या पदांचा उपयोग प्रतिष्ठेसाठी कधीही केला नाही; सत्तेपेक्षा सत्यावर, लोकप्रियतेपेक्षा तत्त्वांवर आणि तडजोडीपेक्षा मूल्यांवर त्यांनी निष्ठा ठेवली. म्हणूनच त्यांच्या कार्याचा विचार केला की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची तुलना एखाद्या दीपस्तंभाशीच करता येते. स्वतः वादळे झेलत इतरांना दिशा दाखवणारा दीपस्तंभ म्हणजे भाऊ, असेच ते होते.

शिक्षक चळवळीच्या इतिहासात त्यांचे नाव केवळ एका नेत्याचे नाही, तर ते एका विचारपद्धतीचे आणि एका मूल्यपरंपरेचे आहे. नुटा संघटनेला त्यांनी केवळ संघटनात्मक बळ दिले नाही, तर तिला वैचारिक अधिष्ठान दिले. शिक्षकांच्या प्रश्नांकडे त्यांनी कधीही केवळ भावनिक दृष्टीने पाहिले नाही. प्रत्येक प्रश्नामागील कायदेशीर, प्रशासकीय आणि संविधानिक पैलूंचा सखोल अभ्यास करून त्यांनी संघर्षाची दिशा ठरवली.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या जडणघडणीत त्यांचे योगदान असो, शिक्षकांच्या हक्कांसाठीचा संघर्ष असो, विद्यापीठीय प्रशासनातील प्रश्न असोत किंवा विदर्भाच्या विकासाचा मुद्दा असो , या सर्वांमध्ये भाऊंची भूमिका नेहमी अभ्यासपूर्ण, निस्पृह आणि लोकहिताचीच राहिली. म्हणूनच शिक्षकांमध्ये त्यांच्याविषयी केवळ आदर नव्हता; तर अढळ विश्वास होता.

माझ्यासाठी मात्र भाऊंची ओळख एवढ्यावर संपत नाही.

**माझ्या आयुष्यातील भाऊ : गुरू, मार्गदर्शक आणि पितृतुल्य व्यक्तिमत्त्व**

माझ्यासाठी ते केवळ आमदार नव्हते. ते केवळ संघटनेचे नेतेही नव्हते. ते माझे गुरू होते. माझ्यावर पित्याच्या मायेने प्रेम करणारे, चुका दाखवून देणारे, योग्य वेळी कठोर होणारे आणि यश मिळाल्यावर मनापासून कौतुक करणारे ते माझ्या आयुष्याचे शिल्पकार होते.

त्यांच्या शिस्तीत काम करताना , त्यांच्या अपेक्षांनुसार वागताना मला वेगळंच समाधान लाभत होतं. त्यांच्या हाकेला प्रतिसाद देण्याचा मी सातत्याने प्रयत्न करत होतो.

भाऊंशी माझा प्रत्यक्ष परिचय १९९९ साली झाला. त्यापूर्वी मी नुटाचा एक सामान्य सदस्य म्हणून संघटनेच्या सभा आणि विविध कार्यक्रमांना नियमित उपस्थित राहत असे. भाऊंचे विचार ऐकण्याची एकही संधी मी सोडत नव्हतो; मात्र त्यांच्याशी वैयक्तिक संबंध आला नव्हता. तो योग आला, श्री.मिलिंदभाऊ चिमोटे यांनी माझा त्यांच्याशी परिचय करून दिला, त्या दिवशी. तो केवळ परिचय नव्हता; माझ्या आयुष्याला नवी दिशा देणारा तो एक महत्त्वाचा टप्पा होता.

मिलिंदभाऊंनी माझ्याविषयी विश्वास व्यक्त केला आणि भाऊंनीही तितक्याच सहजपणे मला आपलेसे केले. त्या दिवसापासून माझ्या आयुष्यातील एक नवीन पर्व सुरू झाले. मी कोणत्याही पदावर नव्हतो, माझ्याकडे कोणताही अधिकार नव्हता. एक कार्यकर्ता म्हणून मी प्रा.डॉ.सुभाष गवई यांच्यासोबत भाऊंच्या सानिध्यात वावरत होतो आणि इथूनच माझी जडणघडण सुरू झाली.

भाऊंच्या सहवासात एक गोष्ट लवकरच लक्षात आली ती म्हणजे त्यांचा विश्वास सहजासहजी मिळवता येत नसे. माणसाची पात्रता ते विविधांगाने तपासत. जबाबदारी स्वीकारण्याची तयारी, वेळेचे काटेकोर पालन, प्रामाणिकपणा, आर्थिक शिस्त, गोपनीयता आणि कामाबद्दलची निष्ठा, या कसोट्यांवर ते प्रत्येकाला जोखत असत. मीही त्या कसोट्यांमधून गेलो. अनेकदा मला न सांगता ते माझी परीक्षा घेत असत; आणि त्यांच्या प्रत्येक परीक्षेत यशस्वी होण्याचा मी जीवापाड प्रयत्न करीत असे.

कधी कधी तर भाऊ पहाटे पाच वाजता घरी बोलवायचे. त्यांना बाहेरगावी निघायचे असे. नुटा बुलेटीनची प्रलंबित कामे मला समजावून सांगायची असत. ते शांतपणे प्रत्येक सूचना देत आणि पूर्ण विश्वासाने म्हणत, “हे काम तू पूर्ण कर.” त्या विश्वासाचे ओझे मला नेहमी जाणवत असे. कारण भाऊंनी दिलेले काम म्हणजे केवळ जबाबदारी नसायची तर ती माझ्या प्रामाणिकतेची परीक्षा असायची.

माझी महाविद्यालयाची वेळ संपायची ते वाट बघत आणि कधी कधी तर महाविद्यालयातून थेट घरी बोलावत. महाविद्यालयीन कर्तव्याबाबत मी दक्ष राहावं, असंच त्यांना वाटे. पण कधी एखादं काम अत्यंत महत्त्वाचं असेल, तर ते हक्कानं म्हणत, “आज महाविद्यालयात रजा टाक. हे काम आधी पूर्ण करू या.” त्यांच्यासोबत संघटनेचं काम करणंही माझी नोकरीसोबतची बांधिलकी होती.

**विश्वासाची वीण : अविस्मरणीय सहवास**

भाऊंनी माझ्यावर विश्वास कधी आणि कसा ठेवायला सुरुवात केली, हे नेमकं सांगणे कठीण आहे. तो एका दिवसात मिळालेला नव्हता; तर अनेक छोट्या-छोट्या प्रसंगांतून, सातत्याने केलेल्या कामातून आणि प्रामाणिकपणाच्या कसोटीवर उतरल्यामुळे निर्माण झालेला होता. त्यांच्या सहवासात मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे विश्वास हा मागून मिळत नसतो; तो आपल्या वर्तनातून कमवावा लागतो. भाऊंनी मला हाच अमूल्य धडा दिला.

भाऊंची काम करण्याची पद्धत अत्यंत शिस्तबद्ध होती. प्रत्येक कामाचं नियोजन, प्रत्येक निर्णयामागील अभ्यास आणि प्रत्येक क्षणाचा काटेकोर उपयोग, हे त्यांच्या स्वभावाचे अविभाज्य गुण होते. त्यांनी दिलेलं काम म्हणजे ते वेळेत, अचूक आणि जबाबदारीने पूर्ण होईल, अशी त्यांची अपेक्षा असे. त्यांनी दिलेल्या कोणत्याही कामाला मी कधीही नकार दिला नाही. अनेकदा माझ्या अडचणी आल्या. पण त्या बाजूला सारून भाऊंना दिलेला शब्द पाळण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीत असे.

एक प्रसंग आजही डोळ्यांसमोर तसाच उभा राहतो.माझी मुलगी सलोनी दहावीची परीक्षा देत होती. परीक्षेच्या दिवसांत तिला परीक्षा केंद्रावर नेणे आणि परत आणणे, ही माझी जबाबदारी होती. तिच्या परीक्षेच्या पहिल्याच दिवशी भाऊंना अप्परवर्धा प्रकल्पावर जाऊन अभियंत्यांशी महत्त्वाची चर्चा करायची होती. त्यांनी मला सोबत येण्यास सांगितले.

मी त्यांना माझी अडचण सांगितली. ते क्षणभरही न थांबता म्हणाले, “सलोनीला परीक्षा केंद्रावर नेण्या-आणण्याचे काम नीता सहज करेल. आपण अप्परवर्ध्याला जाऊ.” मी त्यांच्यासोबत गेलो.

आज त्या प्रसंगाचा विचार करताना मला जाणवते की, तो केवळ एका प्रवासाचा निर्णय नव्हता; तो माझ्यावरील त्यांच्या विश्वासाचा आणि माझ्या बांधिलकीचा एक मूक करार होता. संघटनेचे काम, समाजाचे काम आणि वैयक्तिक आयुष्य यांच्यात समतोल कसा साधायचा, हेही मी त्या प्रसंगातून शिकलो.

भाऊंच्या सहवासातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी माझ्यावर ठेवलेला आर्थिक विश्वास. अनेकदा ते त्यांचे वैयक्तिक आर्थिक व्यवहार व संघटनेचे आर्थिक व्यवहार माझ्याकडे सोपवत असत. बँकेची कामे, विविध देयके, आर्थिक देवाणघेवाणीची सर्व कामे मी करत असे. प्रत्येक पैशाचा हिशोब मी त्यांच्यासमोर अत्यंत पारदर्शकपणे मांडत असे. माझ्या या प्रामाणिकपणामुळे त्यांचा माझ्यावरील विश्वास अधिक दृढ होत गेला. पुढे त्यांनी त्यांचे अनेक आर्थिक व्यवहार निश्चिंतपणे माझ्याकडे सोपवले.आजच्या काळात पैसा माणसांमधील नाती कमकुवत करतो; पण भाऊंनी माझ्यावर दाखविलेला विश्वास हे माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठे नैतिक प्रमाणपत्र आहे. त्यांनी मला धनाची

जबाबदारी दिली; पण त्यापेक्षाही मोठी गोष्ट म्हणजे त्यांनी मला विश्वासाची जबाबदारी दिली.

आज मागे वळून पाहताना वाटते, भाऊंनी माझ्यावर ठेवलेला विश्वास हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान होता. त्या विश्वासामुळेच मी अधिक जबाबदार होत गेलो, अधिक सजग होत गेलो आणि संघटनेशी माझे नाते अधिकाधिक दृढ होत गेले.

**भाऊंकडून मिळणारे नकळत प्रशिक्षण : माझी संविधानिक जडणघडण-**

भाऊ नेहमी म्हणत, "कोणताही प्रश्न केवळ भावनेने सुटत नाही; त्यामागे अभ्यास, कायदा आणि संविधानाची ताकद उभी असली पाहिजे." हे वाक्य मी त्यांच्याकडून असंख्य वेळा ऐकले आहे. शिक्षकांच्या एखाद्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली की, ते केवळ सहानुभूती व्यक्त करून थांबत नसत. त्या प्रश्नाशी संबंधित कायदे, शासननिर्णय, विद्यापीठ अधिनियम, न्यायालयीन निर्णय आणि घटनात्मक तरतुदी यांचा ते सखोल अभ्यास करत. म्हणूनच त्यांची प्रत्येक भूमिका ठाम, अभ्यासपूर्ण आणि निर्विवाद असे.

त्यांच्या टेबलावर नेहमी शासननिर्णयांचे संच, कायद्याची पुस्तके, विद्यापीठ अधिनियम, न्यायालयीन निर्णय, नुटा बुलेटीनचे पुस्तके आणि संदर्भग्रंथांचा खच पडलेला असायचा. एखाद्या प्रश्नावर बोलताना ते नेहमी मूळ कागदपत्रं समोर ठेवीत. "ऐकीव माहितीवर मत बनवू नका; मूळ संदर्भ वाचा," हा त्यांचा आग्रह आयुष्यभर कायम राहिला.

त्यांच्या सहवासात मी एक महत्त्वाची गोष्ट शिकलो ती म्हणजे संघर्ष म्हणजे केवळ आंदोलन नव्हे. संघर्ष म्हणजे योग्य मुद्द्यांचा अभ्यास, योग्य पुरावे, कायदेशीर तयारी आणि सत्याच्या बाजूने न डगमगता उभे राहण्याची मानसिक ताकद. शिक्षकांच्या प्रश्नांकडे पाहण्याची ही संविधानिक दृष्टी माझ्यासाठी भाऊंची सर्वात मोठी देणगी आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना अनेकदा मी त्यांना शासननिर्णयांचे बारकाईने विश्लेषण करताना पाहिले आहे. एखाद्या शब्दाचा अर्थ, एखाद्या कलमातील सूक्ष्म बदल किंवा एखाद्या आदेशामागील प्रशासनाची भूमिका या सर्वांचा ते अत्यंत बारकाईने वेध घेत. त्यामुळे त्यांच्यासमोर अधिकारीही तयारीनिशी येत. कारण त्यांना ठाऊक असे की, भाऊंच्या नजरेतून कोणतीही त्रुटी सुटणार नाही.

माझ्या संघटनात्मक प्रवासात भाऊंचे मार्गदर्शन प्रत्येक टप्प्यावर लाभले. २००६ मध्ये त्यांनी मला नुटा व एमफुक्टोच्या कार्यकारिणीत काम करण्याची संधी दिली. त्यानंतर कार्यकारिणी सदस्य, सहसचिव, उपाध्यक्ष, महासचिव आणि पुढे अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. या प्रत्येक टप्प्यावर भाऊंची प्रेरणा आणि मार्गदर्शन माझ्या पाठीशी होते. त्यांची आश्वासक साथ माझ्या सोबत होती.

२०१२ मध्ये नुटाचा अध्यक्ष म्हणून निवडून येण्याची संधी मला लाभली. त्या क्षणी सर्वप्रथम माझ्या डोळ्यांसमोर भाऊंचा चेहरा उभा राहिला. कारण त्या पदामागे माझी योग्यता जितकी होती, त्याहून अधिक त्यांच्या संस्कारांची ताकद होती. त्यांनी मला लोकांसमोर उभे केले, काम करण्याची संधी दिली आणि प्रत्येक पावलावर धीर दिला.

या निमित्ताने माझा महाराष्ट्रभरातील शिक्षक नेत्यांशी परिचय झाला. एमफुक्टोच्या सदस्यांपर्यंत मला पोहचता आलं. असंख्य प्राध्यापकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. माझ्या आयुष्यातील हे सर्वात मोठे संचित आहे, असं मी मानतो.

**भाऊंची रसिकता : संगीत, नाटक, प्रवास आणि संवेदनशील मन**

सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या अनेक व्यक्तींबद्दल समाजाच्या मनात एक विशिष्ट प्रतिमा तयार झालेली असते. भाऊंच्याही बाबतीत असेच होते. अभ्यासू, तत्त्वनिष्ठ, शिस्तप्रिय आणि कामाबाबत अत्यंत कठोर ही त्यांची प्रतिमा सर्वपरिचित होती. त्यांच्याशी प्रथमच भेटणाऱ्या व्यक्तीला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दरारा अधिकच जाणवत असे. ठरलेल्या वेळेशिवाय भेट नाही, अपुरी माहिती चालत नाही, ऐकीव गोष्टींना स्थान नाही आणि प्रत्येक प्रश्नाला संदर्भासह उत्तर ही त्यांची कार्यशैली होती.परंतु, या कठोर शिस्तीच्या आवरणामागे एक अत्यंत रसिक, संवेदनशील आणि हळवा माणूस दडलेला होता. हा भाऊंचा चेहरा फार थोड्या लोकांना जवळून पाहता आला. तो पाहण्याचे भाग्य मला लाभले!

नुटा आणि एमफुक्टोच्या कामानिमित्त आम्ही अनेकदा एकत्र प्रवास केला. भाऊंना रेल्वेचा प्रवास विशेष आवडायचा. त्यांच्या दृष्टीने हा प्रवास म्हणजे कामासह चिंतनाचा एक अवकाश असे .

भाऊंच्या व्यक्तिमत्त्वातील या प्रवासादरम्यान मला एक सुंदर पैलू बघावयास मिळाला आणि तो म्हणजे त्यांचे संगीत आणि नाटकावरील प्रेम! शास्त्रीय संगीत, संगीत नाटकं आणि दर्जेदार रंगभूमी यांच्याबद्दल त्यांना विलक्षण ओढ होती. मला या क्षेत्राचे विशेष ज्ञान नव्हतं. तरीही पुणे किंवा मुंबईला मुक्काम असला की ते आग्रहानं मला सोबत घेऊन नाटक पाहायला जात. नाटक संपल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद हा एखाद्या लहान मुलाच्या निरागस आनंदासारखा असायचा.

एकदा आम्ही पुण्यात राहुल देशपांडे आणि महेश काळे यांचा शास्त्रीय संगीताचा थेट कार्यक्रम एकत्र ऐकला. कार्यक्रमभर ते तल्लीन होऊन संगीताचा आस्वाद घेत होते. कलाकारांच्या सादरीकरणातील सूक्ष्म बारकावे, रागदारीची वैशिष्ट्ये , जुगलबंदीतील सौंदर्य हे सर्व ते इतक्या उत्कटतेने अनुभवत होते की, मला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक नवाच पैलू दिसला.

मला त्यांच्या या आवडीची कल्पना आली होती. त्यामुळे मोबाईलवर शास्त्रीय संगीताच्या मैफिली, संगीत नाटकांचे अंश किंवा उत्कृष्ट गायनाच्या ध्वनिचित्रफिती मिळाल्या की, मी त्यांना पाठवत असे. खरं सांगायचं तर त्या संगीताची जाण मला नसतानाही मी केवळ त्यांच्या आनंदासाठी हे करत असे. दुसऱ्या दिवशी ते मला बोलावून घेत. "काल तू पाठवलेली जुगलबंदी ऐकलीस का?" असं विचारत. तासन्तास त्या सादरीकरणावर बोलत. त्यांच्या बोलण्यातून संगीताविषयीची त्यांची अभिजात अभिरुची आणि रसिकता सहज जाणवत असे.

पर्यटनाची त्यांना खूप हौस होती; शिमला, दार्जिलिंग, लोणावळा आणि नाशिकजवळील हातगड ही काही ठिकाणे त्यांच्या विशेष आवडीची होती. वेळ मिळाला की ते या ठिकाणी जात. अनेकदा या प्रवासात मलाही त्यांच्यासोबत राहण्याची संधी मिळाली.

कालका-शिमला आणि न्यू जयपालगुडी (NJP)- दार्जिलिंग या छोट्या ट्रॉय ट्रेनचा प्रवास त्यांना विशेष प्रिय होता. सुंदर डोंगररांगा, धुक्याने नटलेली सकाळ, अशा निसर्गरम्य प्रसन्न वातावरणातही आमच्यासमोर नुटा बुलेटीनचे कागद उघडे असत. विश्रांतीच्या क्षणांतही त्यांचं लक्ष कामकडेच असायचं.

भाऊ आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यातही पुढे होते. अनेकांना वाटू शकतं की, एवढे ज्येष्ठ नेते तंत्रज्ञानापासून दूर असतील; पण प्रत्यक्षात चित्र अगदी उलट होतं. ते अत्याधुनिक लॅपटॉप वापरीत, त्यांनी ऑनलाइन बँकिंग शिकून घेतले होते. स्वतःचे ऑनलाइन आर्थिक व्यवहार ते स्वतःच करीत आणि

*भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाची व्याप्ती एवढी विशाल होती की, कोणत्याही एका विशेषणात त्यांना बांधणे अशक्य आहे. त्यांनी आपल्या पदांचा उपयोग प्रतिष्ठेसाठी कधीही केला नाही; सत्तेपेक्षा सत्यावर, लोकप्रियतेपेक्षा तत्त्वांवर आणि तडजोडीपेक्षा मूल्यांवर त्यांनी निष्ठा ठेवली. म्हणूनच त्यांच्या कार्याचा विचार केला की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची तुलना एखाद्या दीपस्तंभाशीच करता येते. स्वतः वादळे झेलत इतरांना दिशा दाखवणारा दीपस्तंभ म्हणजे भाऊ, असेच ते होते.*

दरवर्षी आयकर विवरणपत्रही स्वतः भरत असत. नवीन तंत्रज्ञान शिकण्याची त्यांची तयारी आणि आत्मविश्वास पाहून मला नेहमीच आश्चर्य वाटे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात परंपरा आणि आधुनिकता यांचा विलक्षण संगम होता. एकीकडे भारतीय शास्त्रीय संगीताची प्रचंड आवड, तर दुसरीकडे आधुनिक तंत्रज्ञानाचा सहज स्वीकार; एकीकडे संविधान आणि कायद्याचा अभ्यास, तर दुसरीकडे साहित्य, नाटक आणि कलांविषयीची अभिरुची या सर्वांमुळे त्यांचं व्यक्तिमत्त्व अत्यंत समृद्ध होतं. त्यांच्या सहवासात मी देखील बहरत गेलो.

**भाऊंचे कठोर शिस्तीआडचे हळवे मन**

भाऊंचा अत्यंत निकटचा सहवास मला लाभला. त्यांच्या कठोर शिस्तीआड दडलेलं अत्यंत कोमल आणि संवेदनशील मन मला अनुभवता आलं. त्यांचा बाह्य कठोरपणा हा व्यक्तिमत्त्वाचा आविर्भाव होता; अंतःकरण मात्र मायेनं, कृतज्ञतेनं आणि जिव्हाळ्यानं ओथंबलेलं होतं.

भाऊंच्या आयुष्यात गुरूंचं स्थान अत्यंत उच्च होतं. ते नेहमी सांगत की, "माणसाला घडवणारे त्याचे गुरू असतात; त्यांचे ऋण कधीही फेडता येत नाही." आपल्या गुरूंबद्दल बोलताना त्यांच्या आवाजातील आदर आणि डोळ्यांतील कृतज्ञता मी अनेकदा अनुभवली आहे.

प्रा.प.सि.काणे यांचा उल्लेख आला की त्यांचा स्वरच बदलून जायचा. त्यांच्याबद्दल बोलताना ते भावूक होत. त्याचप्रमाणे कोल्हापूरचे प्रा. संभाजी जाधव व मुंबईचे प्रा.किशोर ठेकेदत्त, प्रा.सदाशिवन यांच्याशी भेट झाली की, त्यांच्या नात्यातील जिव्हाळा शब्दांपलीकडे जात असे. त्या भेटींमध्ये मी भाऊंच्या डोळ्यांत दाटलेले अश्रू बघितले आहेत. सार्वजनिक जीवनात खंबीरपणे उभा राहणारा हा माणूस आपल्या गुरूंसमोर मात्र अत्यंत विनम्र शिष्य बनून जात असे.

भाऊंच्या सार्वजनिक जीवनातील सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःच्या फायद्याचा विचार केला नाही. शिक्षकांचे प्रश्न सोडविणे, शिक्षणव्यवस्थेला न्याय मिळवून देणे आणि समाजहितासाठी लढणे, हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय होतं . त्यांनी सत्ता उपभोगली नाही; तर जबाबदारी म्हणून जगली.

त्यांच्या या तत्त्वनिष्ठ भूमिकेची किंमतही त्यांना अनेकदा मोजावी लागली. सहाव्यांदा पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढविताना विविध राजकीय शक्ती त्यांच्या विरोधात एकवटल्या. त्यांचा पराभव झाला; परंतु त्यांच्या विचारांचा, त्यांच्या कार्याचा आणि त्यांच्या नैतिक उंचीचा पराभव कोणालाही करता आला नाही. निवडणूक हरली म्हणून ते कधी खचले नाहीत. त्यांच्या चेहऱ्यावर निराशेपेक्षा चिंतन अधिक दिसायचे. कारण त्यांच्यासाठी विजय किंवा पराभव हे अंतिम ध्येय नव्हते; सत्यासाठीचा संघर्ष हाच त्यांचा जीवनधर्म होता.

मी त्यांना अगदी जवळून पाहिले आहे. संकटे आली, टीका झाली, गैरसमज झाले; पण त्यांनी कधी कटुता मनात ठेवली नाही. एखाद्या व्यक्तीचे वर्तन आवडले नाही, तर ते स्पष्टपणे सांगत; परंतु सूडबुद्धीने वागणे हा त्यांच्या स्वभावाचा भाग नव्हता. तत्त्वांवर ठाम राहणे आणि व्यक्तीविषयी द्वेष न बाळगणे, ही त्यांची मोठी ताकद होती.

याच कारणामुळे ते आमच्यासाठी केवळ संघटनेचे नेते नव्हते. ते मूल्यांचे विद्यापीठ होते. त्यांच्या सहवासात आम्ही केवळ संघटनात्मक कार्यकर्ते घडलो नाही; तर माणूस म्हणूनही समृद्ध झालो.

**अखेरचा सहवास : कर्मयोग्याच्या जीवनातील शेवटचे पर्व**

जीवनात काही प्रसंग असे असतात की, ते त्या क्षणी साधे, नेहमीसारखे वाटतात; परंतु काळ पुढे सरकल्यावर लक्षात येतं की, तेच आपल्या आयुष्यातील अखेरचे सहप्रवास, अखेरचे संवाद आणि अखेरच्या आठवणी ठरल्या आहेत. भाऊंच्या बाबतीतही असंच झालं.

अलिकडच्या काळात भाऊंना प्रकृतीची साथ पूर्वीसारखी मिळत नव्हती. वयोमानामुळे काही शारीरिक अडचणी निर्माण झाल्या होत्या; पण मन मात्र पूर्वीइतकेच जागृत आणि कार्यरत होते. आजारपणातही त्यांचे चिंतन संघटनेभोवतीच फिरत होते. नुटा बुलेटीनचा पुढील अंक, शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, शासन निर्णयांचा परिणाम आणि पुढील लढ्याची दिशा यांशिवाय त्यांना दुसरे काही सुचत नसे.

एकदा प्रकृती अस्वस्थ झाल्याने त्यांना अमरावतीतील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीनंतर डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी नागपूर येथील विवेका हॉस्पिटलमध्ये जाण्याचा सल्ला दिला. घरातील सर्वांचा आग्रह होता की, त्यांनी रुग्णवाहिकेने जावे. पण भाऊंना ते मान्य नव्हते. त्यांच्या स्वभावात अनावश्यक औपचारिकतेला कधीच स्थान नव्हते.

त्यांनी मला नागपूरला सोबत चलण्यास सांगितले. त्यांच्या या विश्वासामुळे मी भारावून गेलो; परंतु त्यांच्या वैद्यकीय कागदपत्रांची पूर्ण माहिती घरच्यांनाच अधिक असल्याने मी नम्रपणे सुचविले की, कुटुंबातील एखादी व्यक्ती सोबत असणे अधिक योग्य ठरेल. त्यांनी मात्र ठामपणे नकार दिला.

त्या क्षणी मी मिलिंदभाऊंना फोन केला आणि परिस्थिती सांगितली. ते तत्काळ सोबत येण्यास तयार झाले. मिलिंदभाऊ आमच्यासोबत येणार आहेत, हे कळताच भाऊंनीही समाधानाने होकार दिला. वैशुताईही सोबत आल्या आणि आम्ही नागपूरकडे निघालो.

रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी दोन दिवस निरीक्षणाखाली ठेवण्याचा सल्ला दिला. त्यामुळे भाऊ आणि वैशुताई नागपूरलाच थांबलेत. मी आणि मिलिंदभाऊ त्यांना परत आणण्यासाठी पुन्हा नागपूरला जाणार होतो. आम्ही त्यांच्या फोनची वाट पाहत होतो; पण फोन आला नाही. शेवटी वैशुताईंशी संपर्क साधला, तेव्हा समजलं की नुटाचे सचिव श्री. नितीन कोंगरे यांच्या सोबत भाऊ अमरावतीला परत यायला निघाले होते .

ते घरी पोचल्यावर मी त्यांना भेटायला गेलो. प्रकृती थकलेली होती; पण चेहऱ्यावरचे तेच प्रसन्न हास्य कायम होते. मला पाहताच ते हसून म्हणाले "प्रवीण, मी किती भाग्यवान आहे बघ! नुटाच्या अध्यक्षांच्या गाडीत नागपूरला गेलो आणि नुटाच्या सचिवांच्या गाडीत परत आलो!" हे वाक्य ऐकताना मीही हसलो; पण आज त्या आठवणीकडे पाहताना डोळे नकळत पाणावतात. नुटा ही त्यांच्यासाठी केवळ संघटना नव्हती; ते त्यांचे कुटुंब होते. त्या कुटुंबातील कार्यकर्त्यांबरोबरचा प्रवास त्यांना सर्वात मोठे भाग्य वाटे.

प्रकृती खालावत असतानाही त्यांच्या मनातील संघटनेवरील प्रेम किंचितही कमी झाले नाही. शेवटच्या दिवसांतही नुटा बुलेटीनच्या सुवर्णमहोत्सवी अंकाविषयी ते अत्यंत जागरूक होते. प्रत्येक लेख, प्रत्येक संदर्भ, प्रत्येक तपशील ते बारकाईने पाहत होते.

पण नियतीच्या मनात काही वेगळंच होतं. नुटा बुलेटीनच्या सुवर्णमहोत्सवी अंकावर अंतिम हात फिरवून त्यांनी जणू आपलं आयुष्याचं कर्तव्य पूर्ण केलं आणि शांतपणे या जगाचा निरोप घेतला. भाऊ खरे कर्मयोगी ठरले.

अजून काही वर्षे भाऊ आपल्यात असायला हवे होते, असं आपल्यातील प्रत्येकालाच वाटतं आहे. भाऊ आपल्यात नाहीत, हे स्वीकारायला मन तयार नाही. अजूनही क्षणाक्षणाला असं वाटत राहतं की, आत्ता भाऊंचा फोन येईल आणि ते म्हणतील, "प्रवीण, घरी ये! काम आहे." पण तो फोन आता कधीच येणार नाही, भाऊंना दिलेली वेळ पाळण्यासाठी जिवाच्या आकांताने धडपड आता करावी लागणार नाही, ही जाणीवच मनाला असह्य वेदना देऊन जाते.

भाऊंची उंची गाठणं कुणालाच शक्य नाही. पण त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणं, हे आपल्या प्रत्येकाच्या हातात आहे. जो मार्ग सत्याचा आहे, हक्कांचा आहे, विश्वासाचा आहे आणि संविधानिक मूल्यांचा आहे. त्या मार्गनं जाणं अत्यंत अवघड आहे.

आज त्यांच्या पवित्र स्मृतींना मी एकच अभिवचन देतो की, जोपर्यंत माझ्यात शक्ती आहे, तोपर्यंत प्राध्यापक बंधू-भगिनींच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे, निःस्वार्थपणे आणि संविधानिक मार्गाने संघर्ष करत राहीन. हीच माझ्याकडून त्यांच्या चरणी खरी श्रद्धांजली असेल.

अशा या ऋषितुल्य कर्मयोग्याला विनम्र अभिवादन करताना कवी बा.भ.बोरकर यांच्या 'लावण्यरेखा' या कवितेतील काही ओळी नकळत स्मरणात येतात -

देखणे ते चेहरे जे प्रांजळाचे आरसे

गोरटे वा सावळे या मोल नाही फारसे

तेच डोळे देखणे जे कोंडिते साऱ्या नभा

वोळती दुःख जगाच्या सांडिती चंद्रप्रभा

देखणी ती जीवने जी तृप्तीची तीर्थोदके

चांदणे ज्यातून फाके शुभ्र पाऱ्यासारखे.

देखणा देहान्त तो जो सागरी सूर्यास्तसा

अग्नीचा पेरून जातो रात्रगर्भी वारसा.

भाऊंचे जीवन म्हणजे या ओळींचेच मूर्त रूप होते. त्यांनी स्वतः जळत इतरांच्या आयुष्यात प्रकाश पेरला. त्यांचा देह जरी काळाच्या पडद्याआड गेला असला तरी त्यांनी पेरलेला विचारांचा अग्नी, तत्त्वांची ज्योत आणि संघर्षाचा वारसा आमच्या पिढ्यांना कायम प्रेरणा देत राहील.

आदरणीय भाऊंना विनम्र अभिवादन! भावपूर्ण श्रद्धांजली!

# महाराष्ट्रातील शिक्षण चळवळीतील आधारस्तंभ : आ.प्रा.बी.टी.देशमुख

- डॉ.महेंद्र वि.मेटे, संपादक नुटा बुलेटीन

महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी ज्येष्ठ सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक चळवळीला एक तात्त्विक अधिष्ठान दिले. महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने महत्त्वपूर्ण कार्य केले व त्याचे नेतृत्व प्रा.बी.टी.देशमुख उर्फ भाऊ यांनी केले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा इतिहास हा शैक्षणिक आदर्श व संघर्षाचा इतिहास आहे. यामध्ये कोल्हापूरचे प्रा.संभाजीराव जाधव, मुंबईचे प्रा.केणी, प्रा.किशोर ठेकीदत्त, प्रा.मांजरे, डॉ.ताप्ती मुखोपाध्याय, डॉ.क्रांती जेजुरीकर, डॉ.सदाशिवन, डॉ.लवांडे, डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी प्रा.बी.टी.देशमुख यांना भक्कम साथ दिली. आणीबाणीच्या काळात तर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष व सचिव दोघांनाही अटक झालेली होती. अशा काळात प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्राध्यापक महासंघाची धुरा सांभाळली.

प्रा.बी.टी.देशमुख यांनी २० जुलै १९६४ साली अमरावतीच्या श्री शिवाजी महाविद्यालय येथे राज्यशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. भारताचे पहिले कृषिमंत्री शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी स्वतः प्रा.बी.टी.देशमुख यांना श्री शिवाजी महाविद्यालय मध्ये रुजू होण्यासाठी सांगितले. त्यामुळे डॉ.भाऊसाहेब देशमुख यांचा वैचारिक वारसा व पाठबळ प्रा.बी.टी.देशमुख सरांना लाभले. १९७४ मध्ये महाराष्ट्र प्राध्यापक संघाचे अध्यक्ष म्हणून प्रा.बी.टी देशमुख यांनी कार्य सुरू केले. नुटा संघटनेचे अध्यक्ष म्हणून १९७६ साली त्यांनी संघटनेचे मुखपत्र 'नुटा बुलेटीन' ची सुरुवात केली.

**तर्क आणि शक्ती दोन्हीचा वापरः**

प्रा.बी.टी.देशमुख हे महाराष्ट्र विधान परिषदेवर पदवीधर मतदार संघातून १९८० साली निवडून गेले. राजकीय विचारवंत हेरॉल्ड लास्की यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्या संघटनात्मक भूमिकांवर दिसून येतो. ते नेहमी म्हणत की 'जेव्हा तर्क हीच शक्ती असते, तेव्हा जनतेचे प्रश्न तर्काने सुटतात.' त्याकरिता त्यांनी तीस वर्ष विधान परिषदेमध्ये जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर सरकारला तर्काच्या आधारे प्रश्न सोडवण्यासाठी भाग पाडले. परंतु जेव्हा तर्क ही शक्ती म्हणून कामाला येत नाही, तेव्हा जनतेची शक्ती हाच तर्क असतो. या सूत्राने, मार्गाने प्रा.बी.टी.देशमुख सरांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ, व नुटाच्या द्वारे अनेक आंदोलन व चळवळीचे नेतृत्व केले व सरकारला उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडवण्यासाठी भाग पाडले.

**संसदीय आयुधांचा वापर :**

१९८० मध्ये अमरावती विभागामधून नुटाचे प्रा.बी.टी.देशमुख हे विधान परिषदेवर निवडून गेले. तेव्हापासून शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संसदीय आयुधांचा वापर करून विधानपरिषदेच्या माध्यमातून अनेक प्रश्न मार्गी लागले. त्याची क्रमशः माहिती आपल्याला 'नुटा बुलेटीन' मध्ये पाहायला मिळते. १९७६ पासून प्रकाशित होणारे 'नुटा बुलेटीन' हे संघटनेसाठी संघर्षाचे मुख्य शस्त्र ठरलेले आहेत. प्रा.बी.टी. देशमुख यांनी १९८० ते २०१० या ३० वर्षांच्या कालावधी मध्ये समाजाच्या शिक्षण, रोजगार, जलसिंचन अनुशेष, प्रादेशिक असमतोल, प्राथमिक ते उच्च शिक्षण, नागरी पाणी पुरवठा, विद्यापीठ निर्मिती व कायदा तसेच सेवानिवृत्ती व वेतन प्रणाली या बाबत विविध समस्यांवर ५ हजार पेक्षा जास्त प्रश्न सभागृहात मांडून त्याची सोडवणूक केली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तिसऱ्या ते सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणी साठी भाऊंनी सभागृहामध्ये संसदीय आयुधांचा वापर करून सरकारला वेतन आयोग 'जसा आहे तसा' लागू करण्यास भाग पाडले. महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील सर्व प्रश्नांना वाचा फोडण्याचे व विधिमंडळात सरकारला धारेवर धरणारे प्रा.बी.टी.देशमुख यांनी सभागृहातील त्या संदर्भात झालेली चर्चा व सरकारने घेतलेले निर्णय नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित केले. आज सुद्धा शिक्षण क्षेत्रामध्ये काही प्रश्न निर्माण झाले तर अनेक शिक्षक व कर्मचारी नुटा बुलेटीनचा आधार घेतात. न्यायालयीन लढ्यामध्ये तर देशभर नुटा बुलेटीन अधिकृत व विश्वसनीय संदर्भ म्हणून वापरले जाते. नुटा बुलेटीन मधील भाऊचे लेख तत्कालीन शैक्षणिक प्रश्नावर प्रकाशित झाले असून विद्यापीठ व्यवस्था ते विद्यापीठ अनुदान आयोग स्तरावरील संघर्ष व शिक्षकांचे कायदेशीर हक्क याचे विश्लेषण पाहायला मिळते.

१९९६ साली राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र तर्फे महाराष्ट्र विधान परिषदेतील पहिला "उत्कृष्ट संसदपट" पुरस्काराने प्रा.बी.टी.देशमुख यांना सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सवी वर्षाचा उद्घाटन सोहळा भारताच्या मा.राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई देवीसिंह पाटील यांचे शुभ हस्ते, श्री के शंकर नारायण, महाराष्ट्राचे मा.राज्यपाल यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८ ऑक्टोबर २०११ रोजी मुंबई येथील विधान भवन समोरील भव्य मंडपात संपन्न झाला. या समारंभात विधानसभेचे सदस्य श्री गणपतराव देशमुख व विधान परिषदेचे माजी सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना मा.राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांनी विधिमंडळात केलेल्या कामगिरीबद्दल सत्कार करून सन्मानित करण्यात आले. या समारंभात "**नोंदीः विधान मंडळातील निवडक भाषणे**" व स्मृतिगंध या दोन्ही ग्रंथाचे प्रकाशनही करण्यात आले. महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृत महोत्सवानिमित्त '**नोंदीः विधानमंडळातील निवडक भाषणे**' या ग्रंथामध्ये समाविष्ट करावयाच्या भाषणाची निवड करण्यासाठी सर्व श्री कुमार केतकर, दिलीप चावरे, वसंत देशपांडे, नागेश केसरी, शा.मा. गोठोसकर, प्रकाश जोशी या ज्येष्ठ पत्रकारांची एक समिती नेमण्यात आली होती. या ग्रंथात समाविष्ट करण्यासाठी विधान परिषदेतील २८, विधानसभेतील ४७ आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांचे एक अशी ७५ भाषणे निश्चित करण्यात आली असे समितीने प्रस्तावनेत नमूद केले आहे. या ग्रंथामध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांनी २० एप्रिल १९९९ रोजी विधान परिषदेत केलेले भाषण समाविष्ट करण्यात आले आहे. २० एप्रिल १९९१ रोजी प्रा.बी.टी. देशमुख यांनी "**शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करताना दिली जाणारी चातुर्वर्गीय वागणूक**" या शीर्षकाला खाली त्यांचे विधिमंडळामध्ये विधान परिषदेमध्ये भाषण झाले व शासनाच्या कार्यपद्धतीवर त्यांनी सडकून टीका केली. एक म्हणजे आयएएस अधिकाऱ्यांना पाचवा वेतन लागू करण्यात आला होता. दुसरे म्हणजे इतर शासकीय कर्मचाऱ्यांसाठीचा शासन निर्णय नुकताच निर्गमित झाला होता. तिसरे म्हणजे माध्यमिक शिक्षकांसाठीचा शासनाचा निर्णय झाल्याचे वृत्तपत्रात आले होते पण शासन निर्णय निर्गमित झालेला नव्हता. चौथा म्हणजे विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी शासनाचा निर्णय झाला नव्हता. त्यामुळे शासन निर्णय निघण्याचा प्रश्नच नव्हता व निर्णय केव्हा होईल हे कुणी सांगत नव्हते. या चातुर्वर्ग व्यवस्थेवर प्रा.बी.टी.देशमुख यांनी या भाषणात सडकून टीका केली होती, ते संपूर्ण भाषण या ग्रंथामध्ये प्रकाशित करण्यात आले आहे.

विधिमंडळातर्फे प्रकाशित झालेल्या ग्रंथामध्ये समितीने नवीन पिढीला या भाषणाचा संदर्भ स्पष्ट व्हावा म्हणून प्रत्येक भाषणाच्या आरंभी एक परिचयात्मक परिच्छेद जोडण्यात आलेला आहे असे प्रस्तावनेत नमूद करून प्रा.बी.टी. देशमुख यांचा भाषणाच्या सुरुवातीला परिचय दिला आहे. तो खालील प्रमाणे

***विषय कोणताही असो बी.टी. भाऊ उभे राहिले की ज्येष्ठ मंत्री ही त्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकत असत. अचूक तपशील आणि आकडेवारी या जोरावर प्रा. देशमुख आपला युक्तिवाद एवढा प्रभावी करत की शासनाला त्याकडे गंभीरपणे लक्ष देणे अनिवार्य होत असे. शिक्षकांची वेतन श्रेणी, विकासाचा अनुशेष आणि अमरावती विभागातील पायाभूत सुविधांची कामे याबाबत बोलताना प्रा. देशमुख यांची वाणी अधिक धारदार होत असे.***

आहे.

*प्रा.बी.टी. देशमुख १९८० ला विधानपरिषदेवर प्रथम निवडून आले आणि शिक्षकांचे प्रश्न किती आक्रमकपणे मांडता येतात याचे दर्शन सभागृहाला झाले. विषय कोणताही असो बी.टी. भाऊ उभे राहिले की ज्येष्ठ मंत्री ही त्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकत असत. अचूक तपशील आणि आकडेवारी या जोरावर प्रा. देशमुख आपला युक्तिवाद एवढा प्रभावी करत की शासनाला त्याकडे गंभीरपणे लक्ष देणे अनिवार्य होत असे. शिक्षकांची वेतन श्रेणी, विकासाचा अनुशेष आणि अमरावती विभागातील पायाभूत सुविधांची कामे याबाबत बोलताना प्रा. देशमुख यांची वाणी अधिक धारदार होत असे. अनेकदा आपल्याकडील तपशील सभागृहासमोर मांडताना प्रा.देशमुख कालमर्यादेकडे लक्ष ठेवू शकत नसत. अशावेळी इतर सदस्य आपल्या वाट्याचा वेळ त्यांना देऊन त्यांचे भाषण सुरू ठेवण्याची विनंती पिठासीन अधिकाऱ्यांना करीत. प्रा.देशमुख सतत तीस वर्षे सभागृहात असूनही त्यांनी एकदाही कोणाबद्दल वैयक्तिक कटू उल्लेख केला नाही. विधिमंडळाच्या बाबतीत त्यांचे वर्णन अजातशत्रू असे करता येईल. शिक्षकांच्या बाबतीत पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची जोरदार मागणी प्रा.देशमुख यांनी सभागृहात केली.*

**प्रादेशिक असमतोल व जलसिंचनाच्या अनुशेष :**

प्रादेशिक असमतोल व जलसिंचनाचा अनुशेष अभ्यासण्यासाठी अनेक संशोधक, राजकीय व चळवळीतील नेते व अभ्यासक नुटा बुलेटिनकडे एक अधिकृत व विश्वसनीय संदर्भ स्रोत म्हणून बघतात. याचे कारण १९८४ ला दांडेकर समितीचा अहवाल आल्यानंतर विदर्भ व मराठवाड्याच्या अनुशेषाचा प्रश्न भाऊंनी अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी करून विधिमंडळात मांडला व सरकारला अनुशेष निर्मूलनासाठी वंचित प्रदेशासाठी निधी देण्यासाठी बाध्य केले. त्यांचे सभागृहातील प्रश्न व भाषणे आजही नुटा बुलेटीनमध्ये विशेष विशेषांकासह प्रकाशित झाले आहेत. विदर्भ व मराठवाडा आजही अनुशेषाचा गर्तेत सापडला असून त्या भागातील जनतेसाठी प्रतिबद्ध असलेल्या जनप्रतिनिधी व अभ्यासकांना पुढील संघर्षासाठी नुटा बुलेटीन उपयुक्त ठरणार आहे. जलसिंचनाचा अनुशेष आजही संपला नाही. परंतु दुर्दैवाने ते आकलन असलेले लोकप्रतिनिधी सभागृहात नाही. प्रादेशिक असमतोलामुळे या भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढलेल्या आहेत. शेतकऱ्यांची दुरावस्था दूर करायची असेल तर भाऊंनी लढलेल्या मार्गावरच सरकार व समाजाला जावे लागेल.

प्रा.बी.टी.देशमुख यांच्या लढ्याचे मुख्य विषय शिक्षण, जलसिंचन, प्रादेशिक असमतोल, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न हे राहिले आहेत. 'अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना विशेषांक' विशेषांकाच्या प्रस्तावनेमध्ये भाऊ लिहितात 'सिंचनाचा महत्तम अनुशेष असल्यामुळे शेतकऱ्यांच्या महत्तम आत्महत्या एखाद्या व्यावसायिक संघटनेच्या भौगोलिक क्षेत्रामध्ये होत असेल तर त्या प्रश्नाच्या सोडवणुकीकडे कानाडोळा करण्याची भूमिका एखाद्या व्यावसायिक संघटनेने खचितच योग्य ठरत नाही. विशेषतः सिंचन अनुशेषाचे निर्मूलन हे नागरी पाणी पुरवठा व ग्रामीण पाणी पुरवठ्याशी संबंधित आहे, याची जाणीव निरक्षर माणसापेक्षा साक्षर माणसांना लवकर होते. तेव्हा अशा प्रश्नाच्या बाबतीत ते सोडविण्याच्या प्रयत्नांमध्ये सहभागी होणे हे व्यावसायिक संघटनांसाठी अग्रक्रमाने कर्तव्य बनते.'

अमरावती शहर पाण्याअभावी विस्थापित होण्याची स्थिती असताना भाई सुदाम काका देशमुख, रा.सु.गवई व प्रा.बी.टी.देशमुख यांनी अमरावती पाणी पुरवठ्याची योजना मंजूर करून त्याची अंमलबजाणी करण्यास सरकारला भाग पाडले. विदर्भ महाविद्यालयातील प्रांगणात 'अमरावती पाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन करताना तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण म्हणाले होते 'या दोन देशमुखांमुळे अमरावतीच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला. ते आम्हाला सभागृहात स्वस्थ बसू देत नाही. विधानसभेमध्ये सुदाम देशमुख आणि विधान परिषदेमध्ये बी.टी.देशमुख.'

**लेट द इरा ऑफ लव्ह लेटर्स कम्स टू एण्ड :**

देशातील उच्च शिक्षण संस्थेमध्ये दर्जेदार व गुणात्मक विकास करायचा असेल तर विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या केंद्रीय अधिकाराचा वापर करून आपली Determination and Coordination of Maintenance of Standards in Higher Education ही संवैधानिक जबाबदारी पार पाडली पाहिजे असे निवेदन "लेट द इरा ऑफ लव्ह लेटर्स कम्स टू एण्ड" या शीर्षकाखाली प्रा.बी.टी.देशमुख यांनी दि. २० ऑक्टोबर २०१६ ला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या प्रो.चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या पे रिव्ह कमेटी ला सादर केले. देशाच्या इतिहासामध्ये आतापर्यंत विद्यापीठ अनुदान आयोगाने पे रिव्ह कमिटीच्या शिफारशी कायद्याच्या आधारे राज्यांना बंधनकारक केल्या नव्हत्या. त्यामुळे देशातील राज्यामध्ये उच्च शिक्षणामध्ये विषमता निर्माण झाली. अनेक राज्यांनी यूजीसी रेग्युलेशनमध्ये बदल करून ते स्वीकारले. त्यामुळे देशभर अनेक आंदोलन झालीत, शिक्षकांना न्यायालयात लढावे लागले व त्याचा परिणाम उच्च शिक्षणाच्या दर्जावर झाला. त्यामुळे प्रा.बी.टी.देशमुख यांनी राष्ट्रीय स्तरावर यूजीसी रेग्युलेशनचे युनिफॉर्म अंमलबजावणी झाली पाहिजे व त्यामध्ये राज्य सरकारांचा हस्तक्षेप नको ही मागणी समितीकडे केली. त्याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने UGC Act 1956 च्या Section 26 मधील Sub Section I मधील Clause (e) आणि (g) चा वापर करून सदर रेग्युलेशन देशभर लागू करावे ही मागणी केली. आतापर्यंत लव्ह लेटर प्रमाणे UGC च्या शिफारशी राज्य सरकारकडे करण्यात येत होत्या आणि शिक्षक संघटना व राज्य सरकारांमध्ये संघर्ष निर्माण होत होता. तसेच केंद्र सरकारने यूजीसी रेगुलेशनच्या प्रभावी अंमलबजावणी साठी १० वर्ष पर्यंत १०० टक्के अनुदान राज्यांना द्यावे ही मागणी केली.

या निवेदनाचा व पे रिव्ह कमेटी समोरील चर्चेचा सकारात्मक परिणाम झाला. देशाच्या इतिहासामध्ये यूजीसी रेग्युलेशन सर्व राज्यांना बंधनकारक झाले. कुठल्या राज्य सरकारला या विपरीत बदल करण्याचा अधिकार राहिला नाहीत. गुजरात, केरळ या राज्यामध्ये या विपरीत बदल करून कुलगुरूंच्या नियुक्त्या झाल्या. त्यांना सर्वोच्च न्यायालयाने फटकारले व नियुक्त्या रद्द झाल्यात. देशाच्या इतिहासामध्ये उच्च शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल घडविण्याचे कार्य प्रा.बी.टी.देशमुख सरांनी केले.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ निर्मिती मध्ये भाऊंचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. नागपूर व अमरावती विद्यापीठामध्ये विविध प्राधिकरणांवर असताना त्यांनी शैक्षणिक कायदे, स्टॅटयूट, रेग्युलेशन तयार करून विद्यापीठ कामकाजाला शिस्तबद्ध केले. देशपातळीवरील तसेच राज्यामध्ये त्यांच्या अभ्यासू व दूरदृष्टीने शैक्षणिक व्यवस्था निकोप करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच विद्यापीठांना शैक्षणिक स्वायत्तता मिळाली व बाह्य हस्तक्षेपाशिवाय विद्यापीठ आपले कार्य करू शकली.

**भाऊंचे नेत्रदान आणि दृष्टी दान :**

भाऊंनी मरणोपरांत नेत्रदान केले व त्यामुळे दोन लोकांना नवीन जग पाहण्याची संधी प्राप्त करून दिली. तसेच भाऊंनी आपल्या कार्यांनी आणि विचारांनी जनतेला प्रगतिशील, विज्ञानवादी व मानवतावादी दृष्टीकोन दिला. आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहून समाजातील प्रश्नांकडे दुर्लक्ष न करता त्याची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे हे त्यांनी आपल्या कृतीवरून दाखवून दिले. त्यामुळे देशातील सर्व शिक्षकांना ते आदरणीय व मार्गदर्शक वाटतात.

एक जबाबदार दूरदृष्टीचे अभ्यासू नेतृत्व पुढील सात पिढ्यांच्या हक्काची व सुरक्षित जीवनाची व्यवस्था निर्माण करते. त्यांनाच आपण युगपुरुष म्हणतो. ही बाब आदरणीय भाऊंना लागू पडते. त्यांच्या विधानमंडळातील संघर्षामुळे विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांचे जीवन सुरक्षित झाले. त्यांच्यामुळे राज्यातील महत्तम अनुशेष असणारा अमरावती विभाग जलसिंचन अनुशेष व पिण्याच्या पाण्याचा प्रश्नापासून मोठ्या प्रमाणात सुटला.

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये तत्त्वनिष्ठ राजकारणाचे दिवस संपले आहेत. महात्मा गांधी यांनी सात सामाजिक अपराध सांगितले. त्यापैकी 'तत्त्वाविना राजकारण' हे एक सामाजिक पाप आहे, असे सांगितले. तेच पाप देशभर भारतीय लोकशाहीमध्ये दिसत आहेत. आता देशाच्या संसदेमध्ये किंवा राज्याच्या विधिमंडळामध्ये भाई गणपतराव देशमुख, मधू दंडवते, केशवराव धोंडगे, सोमनाथ चॅटर्जी, यशवंतराव चव्हाण, प्रा.बी.टी.देशमुख सारखे लोकप्रतिनिधी दिसणार नाही. कायदेमंडळात अशा तत्त्वनिष्ठ आणि अभ्यासू लोकप्रतिनिधीचा अभाव आहेत.

आदरणीय भाऊंना विनम्र श्रद्धांजली !

***भाऊंनी आपल्या कार्यांनी आणि विचारांनी जनतेला प्रगतिशील, विज्ञानवादी व मानवतावादी दृष्टीकोन दिला. आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहून समाजातील प्रश्नांकडे दुर्लक्ष न करता त्याची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे हे त्यांनी आपल्या कृतीवरुन दाखवून दिले.***

# विदर्भाचा अभ्यासू आवाज, शिक्षक चळवळीचे वैचारिक अध्वर्यू : आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख

- प्राचार्य डॉ.काशीनाथ बऱ्हाटे, परतवाडा

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की, त्यांचे मूल्यमापन केवळ त्यांनी भूषविलेल्या पदांवरून करता येत नाही. त्यांच्या विचारांचा प्रभाव, त्यांच्या संघर्षाची व्याप्ती आणि समाजजीवनावर उमटलेला त्यांचा ठसा यांमधून त्यांचे खरे व्यक्तिमत्त्व उलगडते. प्रा.बी.टी.देशमुख सर हे असेच एक असामान्य व्यक्तिमत्त्व होते. शिक्षक, संघटक, राज्यशास्त्राचे प्राध्यापक, संसदीय कार्यपद्धतीचे गाढे अभ्यासक, शिक्षक चळवळीचे वैचारिक अध्वर्यू आणि विदर्भाच्या विकासासाठी सातत्याने संघर्ष करणारे लोकप्रतिनिधी अशी त्यांची बहुआयामी ओळख होती.

त्यांच्या निधनाने केवळ शिक्षक चळवळीतील एक ज्येष्ठ नेता हरपला नाही, तर महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील अभ्यास, प्रामाणिकता आणि मूल्यनिष्ठेची एक परंपरा हरपली आहे.

राज्यशास्त्राचे व्यासंगी प्राध्यापक, लेखक म्हणून त्यांचे कार्य सर्वश्रुत आहे. राज्यशास्त्र हा त्यांचा केवळ अध्यापनाचा विषय नव्हता; तो त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा वैचारिक पाया होता. लोकशाही, संविधान, संसदीय संस्था, अधिकार आणि उत्तरदायित्व यांविषयीची त्यांची समज अत्यंत सखोल होती. पुढे विधान परिषदेतील त्यांच्या कार्यात आणि शिक्षक चळवळीतील नेतृत्वात या अभ्यासाचा प्रत्यय सतत येत राहिला.

महाविद्यालयीन शिक्षकांच्या संघटनात्मक इतिहासाचा विचार केला तर नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन (NUTA) हे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. या संघटनेच्या उभारणीत आणि तिच्या वैचारिक पायाभरणीत प्रा.बी.टी.देशमुख सर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी संघटनेला केवळ मागण्या मांडणारे विचारपीठ न बनवता शिक्षकांच्या प्रश्नांचा अभ्यास करणारी, कायदेशीर व धोरणात्मक बाजू मांडणारी आणि शिक्षणव्यवस्थेच्या व्यापक हिताचा विचार करणारी संस्था म्हणून विकसित केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक चळवळीला अभ्यासाचे अधिष्ठान लाभले. शिक्षकांचे वेतन, सेवाशर्ती, निवृत्तीवेतन, विद्यापीठीय स्वायत्तता, शैक्षणिक गुणवत्ता, अनुदान आणि उच्च शिक्षण धोरण यांसारख्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने भूमिका घेतली. त्यांच्या मते शिक्षकांचा प्रश्न हा केवळ कर्मचाऱ्यांचा प्रश्न नसून समाजाच्या बौद्धिक भवितव्याशी निगडित प्रश्न आहे. भाऊंनी सुरु केलेल्या नुटा बुलेटिनला यावर्षी पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. सलग ५० वर्ष शिक्षक संघटनेचे मुखपत्र अखंडितपणे प्रकाशित होणे हा भारताच्या इतिहासातील एकमेव सुवर्णक्षण आहे. नुटा बुलेटिनच्या या अभ्यासपूर्ण दस्तऐवजीकरणाचा फायदा देशातील अनेक शिक्षकांना, शिक्षक संघटनांना आणि न्यायालयातील निर्णयासाठी झालेला आहे.

प्रा.बी.टी.देशमुख सर यांनी महाराष्ट्र विधान परिषदेत दीर्घकाळ प्रतिनिधित्व केले. अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघातून ते सलग सहा वेळा निवडून आले आणि त्यांनी सभागृहात अभ्यासपूर्ण व प्रभावी भूमिका बजावली. त्यांच्या भाषणांमध्ये केवळ राजकीय भूमिका नसे; त्यामागे सखोल अभ्यास, तथ्याधारित विश्लेषण आणि लोकहिताची स्पष्ट भूमिका असे. विधिमंडळातील नियम, प्रक्रिया आणि संसदीय परंपरांवरील त्यांचे प्रभुत्व इतके प्रभावी होते की अनेकजण त्यांना सभागृहाचा 'चालता-बोलता ज्ञानकोश' म्हणत. ते विरोधासाठी विरोध करीत नसत. शासनाच्या चांगल्या निर्णयांचे स्वागत आणि चुकीच्या धोरणांवर कठोर टीका, हा त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा स्थायीभाव होता.

त्यांच्या सार्वजनिक जीवनातील सर्वात ठळक पैलू म्हणजे विदर्भाच्या विकासाच्या प्रश्नावरील त्यांची बांधिलकी. प्रादेशिक असमतोल, सिंचनाचा अनुशेष, औद्योगिक मागासलेपणा, पायाभूत सुविधांची कमतरता आणि विकासनिधीतील विषमता याविषयी त्यांनी सातत्याने आवाज उठवला. विदर्भाच्या प्रश्नांकडे त्यांनी भावनिकतेपेक्षा अभ्यासाच्या दृष्टीने पाहिले. विविध समित्यांचे अहवाल, आर्थिक आकडेवारी, विकास निर्देशांक आणि शासनाच्या धोरणांचा अभ्यास करून त्यांनी विदर्भावरील अन्यायाची वस्तुनिष्ठ मांडणी केली. विदर्भाचा प्रश्न हा केवळ प्रदेशाचा प्रश्न नसून संतुलित विकासाचा आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे, ही त्यांची भूमिका होती.

विदर्भातील शेतीचे भविष्य सिंचनाशी जोडलेले आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळे सिंचन प्रकल्पांच्या अनुशेषाचा प्रश्न त्यांनी सातत्याने सभागृहात मांडला. रखडलेले प्रकल्प, निधीअभावी थांबलेली कामे आणि त्याचे शेतकऱ्यांवर होणारे परिणाम यांचा त्यांनी अभ्यासपूर्वक पाठपुरावा केला. गोसेखुर्द प्रकल्प, अप्पर वर्धा प्रकल्प यासाठी आदरणीय भाऊंनी दिलेला लढा हा महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाची नोंद म्हणून केला जाईल. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येकडेही त्यांनी गंभीरतेने पाहिले. पाणी हा केवळ विकासाचा मुद्दा नाही, तर मानवी सन्मानाचा आणि जीवनाच्या मूलभूत अधिकाराचा प्रश्न आहे, असे ते मानत. त्यामुळे जलव्यवस्थापन, जलसंधारण आणि शाश्वत जलपुरवठा यांवर त्यांनी सातत्याने भर दिला.

सार्वजनिक जीवनातील त्यांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांचा साधेपणा. दीर्घकाळ लोकप्रतिनिधित्व करूनही त्यांनी सत्तेचे आकर्षण किंवा वैयक्तिक लाभ यांना कधीही महत्त्व दिले नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अभ्यासाची खोली जितकी होती, तितकीच नैतिकतेची उंची होती. त्यांनी लोकप्रतिनिधित्वाला सत्तेचे साधन न मानता समाजसेवेची जबाबदारी मानली. म्हणूनच विविध विचारधारांतील लोकांमध्येही त्यांच्याविषयी आदराची भावना होती.

आदरणीय भाऊ हे प्रभावी वक्ते तर होतेच; पण ते तितकेच सक्षम लेखक आणि संपादकही होते. नुटा बुलेटीनच्या माध्यमातून त्यांनी शिक्षकांमध्ये वैचारिक जागृती निर्माण केली. शिक्षक, शिक्षणव्यवस्था, कायदे, शासननिर्णय आणि संसदीय कार्यपद्धती यांची सुलभ व चिकित्सक मांडणी त्यांनी सातत्याने केली. त्यांचे लेखन हे केवळ माहितीपर नव्हते; त्यातून विचार, दिशा आणि परिवर्तनाची प्रेरणा मिळत असे.

प्रा.बी.टी.देशमुख सर यांचे जीवन हे अभ्यास, संघर्ष, लोकहित आणि मूल्यनिष्ठ सार्वजनिक जीवन यांचा अद्वितीय संगम होते. त्यांनी शिक्षक चळवळीला वैचारिक दिशा दिली, संसदीय लोकशाहीला बौद्धिक बळ दिले आणि विदर्भाच्या विकासाचा प्रश्न सातत्याने जिवंत ठेवला.

आज ते आपल्यात नसले, तरी त्यांनी उभी केलेली वैचारिक परंपरा, घडविलेली नेतृत्वे आणि लोकहितासाठीचा संघर्षाचा आदर्श पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात त्यांचे नाव एका अभ्यासू शिक्षकाचे, प्रामाणिक लोकप्रतिनिधीचे आणि विदर्भाच्या न्याय्य हक्कांसाठी अखंड झटणाऱ्या योद्ध्याचे म्हणून कायम स्मरणात राहील. काही व्यक्ती काळाच्या प्रवाहात विरून जात नाहीत; त्या विचार बनतात, परंपरा बनतात आणि पुढील पिढ्यांच्या वाटा उजळणारा दीपस्तंभ बनतात. प्रा.बी.टी.देशमुख सर हे शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय चळवळींसाठी असेच एक दीपस्तंभ आहेत. ते कधीही विस्मरणात जाणार नाहीत.

आदरणीय भाऊंना भावपूर्ण श्रद्धांजली !

**सार्वजनिक जीवनातील सर्वात ठळक पैलू म्हणजे विदर्भाच्या विकासाच्या प्रश्नावरील त्यांची बांधिलकी. प्रादेशिक असमतोल, सिंचनाचा अनुशेष, औद्योगिक मागासलेपणा, पायाभूत सुविधांची कमतरता आणि विकासनिधीतील विषमता याविषयी त्यांनी सातत्याने आवाज उठवला. विदर्भाच्या प्रश्नांकडे त्यांनी भावनिकतेपेक्षा अभ्यासाच्या दृष्टीने पाहिले.**

# बी.टी.देशमुख : एका युगाचा, एका वैचारिक परंपरेचा अंत

- श्री.मिलिंद चिमोटे, अमरावती

इतिहासात काही व्यक्ती अशा असतात, ज्यांचे मूल्यमापन केवळ त्यांच्या पदांवरून, कार्यकाळावरून किंवा कर्तृत्वावरून करता येत नाही. त्या स्वतःच एक विचार, एक नैतिक आदर्श असतात. त्यांचे जीवन एखाद्या राजकीय पक्षाच्या, निवडणुकीतील यशाच्या किंवा सरकारी पदाच्या मर्यादेत बंदिस्त करता येत नाही. त्यांचे अस्तित्व तत्कालीन सामूहिक चेतनेचा आणि प्रेरणेचा एक भाग असते. जेव्हा अशा व्यक्ती हे जग सोडून जातात, तेव्हा तो केवळ एका व्यक्तीचा मृत्यू नसतो, तर समाजाच्या नैतिक भांडवलाच्या एका महत्त्वपूर्ण भागाचे नुकसानही असते. बी.टी. देशमुख यांचे निधन हा असाच एक क्षण आहे. जो एका वैचारिक परंपरेचा अंत आहे.

आज महाराष्ट्राच्या आणि विशेषतः विदर्भाच्या राजकारणात निर्माण झालेली पोकळी नजीकच्या भविष्यात भरून निघण्याची शक्यता कमीच दिसते. हे केवळ एका आमदाराचे, एका शिक्षक नेत्याचे किंवा एका समाजसेवकाचे निधन नाही. हे एका अशा राजकीय संस्कृतीचा अंत आहे, जिथे राजकारण हे सत्ता मिळवण्याचे साधन नसून, सामाजिक न्यायाचे एक अधिष्ठान होते.

बी.टी.देशमुख यांचे संपूर्ण जीवन या गोष्टीचा पुरावा आहे की, लोकशाहीमध्ये ज्ञान, प्रामाणिकपणा आणि लोकनिष्ठा असलेली एक व्यक्तीसुद्धा संपूर्ण शासनव्यवस्थेवर प्रभाव टाकू शकते. ते कोणत्याही मोठ्या राजकीय पक्षाचा भाग नव्हते. त्यांनी कधीही कोणत्याही पक्षाचा आश्रय स्वीकारला नाही. ते अपक्ष राहिले, परंतु जनतेच्या पाठिंब्याच्या जोरावर त्यांनी सलग तीन दशके विधान परिषदेत आपले प्रभावी अस्तित्व टिकवून ठेवले.

आज, जेव्हा राजकारण हे सत्ता, पद, प्रसिद्धी आणि साधनसंपत्तीसाठीची स्पर्धा बनत चालले आहे, तेव्हा बी.टी.देशमुख यांचे जीवन आपल्याला शिकवते की, समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या जीवनात बदल घडवून आणणे, हे राजकारणाचे मूलभूत उद्दिष्ट असले पाहिजे.

त्यांचा संघर्ष हा वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठीचा संघर्ष नव्हता. तो पश्चिम विदर्भातील वंचित भागांसाठीचा संघर्ष होता. तो शेतकऱ्यांच्या हक्कांसाठीचा संघर्ष होता. तो शिक्षकांच्या अस्मितेसाठीचा संघर्ष होता. तो अमरावतीची तहान भागवण्यासाठीचा संघर्ष होता. तो अशा लाखो लोकांना न्याय मिळवून देण्यासाठीचा संघर्ष होता, ज्यांचा आवाज सत्तेच्या वर्तुळापर्यंत पोहोचू शकत नव्हता.

**बी.टी.देशमुख यांना समजून घेण्यासाठी, त्यांच्या जीवनाचे मूळ समजून घेणे आवश्यक आहे :-**

ते राजकीय कुटुंबातील नव्हते. ते एका सामान्य कुटुंबात जन्मलेले एक असामान्य व्यक्तिमत्व होते. त्यांनी आपले शिक्षण आर्थिक आणि सामाजिक अडचणींमध्ये घेतले. एक काळ असा होता की, शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना वर्ध्यात आपल्या मामांच्या घरी राहावे लागले. नंतर, त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सुरू केलेल्या अमरावतीतील श्रद्धानंद बोर्डिंग स्कूलमध्ये सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षण घेतले.

अनेक महान व्यक्तींचा त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर प्रभाव होता. डॉ. पंजाबराव देशमुख यांची शिक्षण आणि ग्रामीण विकासाची दूरदृष्टी, संत गाडगे बाबांची समाजसुधारणा चळवळ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केलेली जनजागृती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक समतेचे तत्त्वज्ञान या सर्व विचारप्रणालींचा एक विलक्षण संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात स्पष्टपणे दिसून येत होता.

ते अंधश्रद्धा टाळून वैज्ञानिक दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते होते. राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांचा सखोल अभ्यास होता. तोच पुढे त्यांच्या सार्वजनिक जीवनातील सर्वात महत्त्वाचे शस्त्र बनला.

**अनुशेषाचा प्रश्न :-**

अनुशेषाच्या प्रश्नावर त्यांनी तत्कालीन व्यवस्थेला आरसा दाखवला . त्यांनी विधान मंडळातील युक्तीवादात भूमिका मांडताना एकीकडे सांगलीसारख्या जिल्ह्यात ९० टक्क्यांहून अधिक शेतजमीन सिंचनाखाली आणली गेली, तर अमरावतीमध्ये हे प्रमाण केवळ एक अंकी आहे. ही केवळ विकासातील दरी नव्हती, तर संधींमधील असमानता होती, हे अत्यंत टोकदारपणे मांडले.

आजच्या पिढीला कदाचित हे ज्ञात नसेल की, काही दशकांपूर्वी विदर्भाच्या विकासाकडे किती दुर्लक्ष झाले होते. पश्चिम विदर्भाला सिंचन, रस्ते, उद्योग, शिक्षण आणि पायाभूत सुविधांसाठी जो निधी मिळायला हवा होता, तो राज्याच्या इतर भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर खर्च होत होता. ही विषमता सर्वांना दिसत होती, पण ती सिद्ध करण्याचे किंवा तिला आव्हान देण्याचे धाडस कोणामध्येच नव्हते.

बी.टी.देशमुख यांनी हे आव्हान स्वीकारले. त्यांनी अनेक वर्षांचा काळ हा सरकारी कागदपत्रांचे विश्लेषण करण्यात आणि अर्थसंकल्पांची तपासणी करण्यात व्यतित केला. त्यांनी हे सिद्ध केले की शासनाच्या निधीतून पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सिंचनाचा अभूतपूर्व विस्तार झाला होता, तर अमरावतीसह पश्चिम विदर्भ सातत्याने दुर्लक्षित राहिला होता.

**दांडेकर समिती आणि बी.टी.देशमुख :-**

राज्यातील असंतुलित विकासाचा अभ्यास करण्यासाठी सरकारने स्थापन केलेल्या दांडेकर समितीने जेव्हा अधिकृत अहवाल प्रसिद्ध केला, तेव्हा बी.टी.देशमुख यांनी त्या अहवालाच्या आधारे विदर्भ आणि विशेषतः पश्चिम विदर्भावर होणाऱ्या आर्थिक अन्यायासाठी सरकारला जबाबदार धरले. त्यांनी अहवालातील क्लिष्ट वाटणारी अत्यंत गुंतागुंतीची माहिती जनतेसमोर सोप्या पद्धतीने मांडली. समितीच्या अहवालातील भक्कम पुरावे वास्तव कागदपत्रांच्या आधारे त्यांनी सभागृहात सादर करून सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले.

दांडेकर समितीने आपल्या अहवालात विदर्भातील विकास क्षेत्रातील असमतोल मान्य केला होता. तथापि त्यानंतरच्या वर्षांमध्ये या अहवालाची अपेक्षित अंमलबजावणी झाली नव्हती. बी.टी. सरांच्या सभागृहातील अभ्यासपूर्ण मांडणीने शासनाचे वाभाडे निघाले. त्यांच्या अथक संघर्षामुळे आणि संसदीय लढ्यामुळे विदर्भाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या अहवालाला अखेरीस शासनस्तरावर अधिकृत मान्यता मिळाली.

दांडेकर समितीच्या भक्कम पायावर उभ्या केलेल्या असमतोल विकासाच्या संघर्षाला त्यांनी घटनात्मक चौकटीचा भक्कम आधार दिला.

बी.टी.देशमुख यांची राजकीय कारकीर्द ही भारतीय संविधानाच्या कलम ३७१(२) अंतर्गत विदर्भाच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठवणारी होती.

संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या वेळी विदर्भ आणि मराठवाड्यासारखे प्रदेश विकासाच्या शर्यतीत मागे पडतील अशी चिंता व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळेच संविधानात सुधारणा करून अनुच्छेद ३७१(२) ची विशेष योजना करण्यात आली होती. संविधानातील या घटनात्मक तरतुदीने राज्यपालांना विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्या विकास निधीचे समन्यायी वितरण करण्याचे, देखरेख ठेवण्याचे आणि प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे विशेष अधिकार दिले असल्याचे त्यांनी पटवून दिले.

बी.टी.देशमुख यांनी विधान परिषदेत राज्यपालांना प्रदान केलेल्या या घटनात्मक अधिकारांचा वापर त्यांनी करण्याचा मुद्दा वारंवार उपस्थित केला. त्यांनी सरकारला समन्यायी वाटपाच्या निधीस केवळ एक राजकीय मुद्दा न मानता, एक घटनात्मक कर्तव्याचा भाग म्हणून मान्यता देण्यास भाग पाडले.

याच संघर्षामुळे विदर्भाच्या विकासासाठी हजारो कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध झाला. त्यांच्या संविधानिक मांडणीमुळेच सरकारला विदर्भ वैधानिक विकास मंडळासारख्या संस्थात्मक यंत्रणा स्थापन करणे भाग पडले.

**सर्व पक्षांना एकत्र आणणारे नेते :-**

बी.टी.देशमुख यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन काम करण्याची त्यांची क्षमता! त्यांनी अनुशेषाच्या मुद्यावर एक संसदीय गट स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला, ज्याचे अध्यक्ष पद सर्वपक्षीय आमदारांनी एकमताने त्यांचेकडेच सोपविले. या गटामध्ये भाजप नेते मा.नितीन गडकरी आणि मा.देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांचा समावेश होता. त्यांनी विदर्भाच्या विकासाच्या मुद्यावर सर्व पक्षांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणले. तत्कालीन मंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी तर

स्वतःच्या सरकारला विरोध करून या मुद्यावर बी.टी.देशमुख यांना साथ दिली. त्यांचे नैतिक सामर्थ्य इतके प्रबळ होते की, जेव्हा ते विदर्भाच्या हक्कांचा प्रश्न सभागृहात मांडीत असत, तेव्हा राजकीय सीमा आपोआपच नाहीशा होत असत.

**अमरावतीची तहान भागविण्याचा संघर्ष :-**

अनुशेष हा जरी त्यांचा सर्वात मोठा वैचारिक संघर्ष होता तरी अमरावतीकरांची पाण्याची समस्या हा त्यांचा सर्वात मोठा जनसंघर्ष होता. आजच्या पिढीला कदाचित हे माहीत नसेल की, एकेकाळी अमरावतीचा पाणीपुरवठा पूर्णपणे बोअरवेलवर अवलंबून होता. शहराची लोकसंख्या वाढत होती आणि पाण्याची समस्या अधिक गंभीर होत होती. पाण्याच्या दुर्भिक्षाने शहराची वाढ खुंटली होती.

अशा वेळी, बी.टी.देशमुख यांनी इतर लोकप्रतिनिधींसोबत अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावतीला पाणीपुरवठा करण्याच्या योजनेला मंजूर करण्यासाठी एक मोठे जनआंदोलन सुरू केले.

ही बाब त्यावेळी वाटते तेवढी सोपी नव्हती. १० टक्के लोकवर्गणी माफ करण्यासाठी मोठा संघर्ष उभारायचा होता. राजकीय अडथळे होते. पण बी.टी.देशमुख मागे हटले नाहीत. अखेरीस लोकवर्गणी माफ होऊन अमरावतीला पाणी मिळाले. पुढे त्यांनी हे देखील सुनिश्चित केले की, पाण्यावर प्राथमिक हक्क हा पिण्याच्या पाण्यासाठी, त्यानंतर शेती सिंचनासाठी आणि मग उद्योगांसाठी ठेवावा लागेल.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यांचे दूरदर्शी विश्लेषण :-**

केंद्रात डॉ.मनमोहनसिंग यांच्या सरकारच्या काळात, जेव्हा नियोजन आयोगाचे एक पथक विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या कारणांची चौकशी करण्यासाठी आले, तेव्हा बी.टी.देशमुख यांनी एक वस्तुनिष्ठ अभ्यास सादर केला. त्यांनी मा.पंतप्रधान व समितीला स्पष्टपणे लिहिले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे मूळ कारण केवळ कर्ज नसून सिंचन सुविधांचा अभाव आहे. जेव्हा शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असते, तेव्हा शेतकरी आर्थिक अडचणीत वा धोक्यात येतात, असा युक्तिवाद त्यांनी केला. आत्महत्या थांबवण्यासाठी विदर्भातील कोरडवाहू शेतजमिनीचे सिंचन क्षेत्रात रूपांतर करावे लागेल. नियोजन आयोगाने त्यांचे हे महत्त्वपूर्ण विश्लेषण स्वीकारले. यानंतर विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी पंतप्रधान पॅकेज जाहीर करून केंद्र सरकारने शेकडो कोटी रुपये राज्याला दिले.

**साधेपणाः त्यांचे सर्वात मोठे प्रभावी वैशिष्ट्य :-**

आज राजकारणातील साधेपणा अनेकदा एक रंगमंचीय प्रदर्शन बनला आहे. बी.टी.देशमुख यांच्यासाठी साधेपणा हा जीवनाचा एक नैसर्गिक विस्तार होता. त्यांनी एकदा खादी परिधान केली आणि आयुष्यभर ती परिधान करीत राहिले. आमदार झाल्यावरही ते स्कूटर चालवत राहिले. आमदार म्हणून कोणताही विशेष लाभ मिळवण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. जेव्हा त्यांचे निधन झाले, तेव्हा त्यांनी कोणतेही राजकीय साम्राज्य, संपत्ती किंवा मोठी मालमत्ता मागे ठेवली नाही. त्यांनी मागे एक साधे चार खोल्यांचे घर ठेवले. विचारांचा महत्त्वपूर्ण ठेवा, संघर्षाची प्रखर परंपरा आणि अत्यंत मौल्यवान असा नैतिक वारसा मागे सोडून त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

**अखेरची मानवंदना :-**

बी.टी.देशमुख यांचे जीवन मला वारंवार कवी ग्रेस यांच्या अत्यंत विचारगर्भ ओळींची आठवण करून देतात.

**"अंधारात फार संयमानी दिवा ठेवावा लागतो.**

**एक दिवा जपायचा तर आयुष्य कमी पडतय मला.... संवेदना रक्तबंबाळ झाल्या तरी माझे इमान ढळू दिले नाही मी... माझ्या पुरते"**

खरोखरच, त्यांनी आयुष्यभर मानवी उत्थानाचा दिवा तेवत ठेवला... प्राणपणाने जपला!

आपल्या प्रदीर्घ राजकीय, सांसदीय जीवनात कधीही आपले इमान ढळू दिले नाही.

त्यांना विरोध, द्वेष आणि राजकीय पराभवालाही सामोरे जावे लागले. पण त्यांनी आपली सचोटी कधीच डगमगू दिली नाही. त्यांनी आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही. आज ते हे जग सोडून जात असताना अमरावती, विदर्भ आणि महाराष्ट्रातील सर्वच स्तरातील लोकांसमोर सर्वात मोठा प्रश्न आहे की, आपण त्यांचा वारसा कधी समजू शकू का?

बी.टी.देशमुख यांच्या प्रति खरी मानवंदना एखाद्या पुतळ्यात, चौकात किंवा स्मारकात सामावणार नाही. आपण सर्वांनी राजकारणापेक्षा विकासाला, घोषणांपेक्षा शिक्षणाला आणि वैयक्तिक स्वार्थापेक्षा जनहिताला प्राधान्य देणे, हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल, असे मला वाटते.

लोक कल्याणासाठी प्रज्वलित झालेला हा धगधगणारा अग्निकुंड आज शांत झाला. परंतु त्याच्या अग्नीतून निघणारा तेजाचा प्रकाश येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत राहील, असा मला विश्वास आहे.

आदरणीय बी.टी.देशमुख यांना विनम्र आदरांजली!

## *प्रा.बी.टी.देशमुख : एक निःस्वार्थ, निर्भीड आणि झुंजार नेतृत्व*

**- खा.अशोक चव्हाण, माजी मुख्यमंत्री**

विधानपरिषदेचे माजी आमदार प्रा.बी.टी.देशमुख यांच्या निधनाची बातमी अतिशय वेदनादायी आहे. महाराष्ट्राच्या विधिमंडळ इतिहासात आपल्या अभ्यासाच्या, वक्तृत्वाच्या आणि तत्त्वनिष्ठेच्या जोरावर एक वेगळा व अमिट ठसा उमटवणाऱ्या नेत्यांपैकी ते एक होते. त्यांच्या रूपात विदर्भाच्या, शिक्षकांच्या आणि पदवीधरांच्या हक्कांसाठी लढणारे एक निःस्वार्थ, निर्भीड आणि झुंजार नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

विधिमंडळ सदस्य आणि राज्य मंत्रिमंडळातील एक मंत्री म्हणून मला त्यांचे कार्य अगदी जवळून अनुभवता आले. १९९३ मध्ये राज्याचा नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. त्यानंतर अनेक वर्ष मी मंत्रिमंडळाचा सदस्य म्हणून सभागृहात प्रा.बी.टी.देशमुख यांच्या प्रश्नांना, त्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तरे दिलीत. ते केवळ प्रश्न विचारत नसत, तर त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन अचूक आकडेवारी आणि सखोल माहितीसह सरकारला धारेवर धरत. त्यांचा अभ्यास इतका दांडगा असायचा की, त्यांना उत्तर देण्यासाठी मंत्र्यांनाही कसून अभ्यास करावा लागे. सभागृहात त्यांच्यासमोर थातूरमातूर किंवा मोघम उत्तरे देऊन वेळ मारून नेणे केवळ अशक्य होते; कारण उत्तरात थोडी जरी विसंगती असली, तरी ती त्यांच्या तीक्ष्ण नजरेतून सुटत नसे.

संसदीय कामकाजाचे नियम त्यांच्या अगदी नखशिखांत भिनले होते. आपला मुद्दा अत्यंत आक्रमकपणे मांडून मंत्र्यांकडून ठोस आश्वासन पदरात पाडून घेण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. जयंतराव टिळक, ना.स.फरांदे, शिवाजीराव देशमुख यांसारख्या तत्कालीन दिग्गज सभापतींनीही त्यांच्या या अभ्यासू वृत्तीचा नेहमीच सन्मान केला व त्यांच्या मागण्यांना सभागृहात भरपूर वाव दिला. विधानपरिषदेच्या आश्वासन समितीचे प्रमुख म्हणून त्यांनी केवळ स्वतःच्याच नव्हे, तर इतर सदस्यांच्या प्रश्नांवर शासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करून घेण्यासाठी प्रशासनावर जो अंकुश ठेवला, तो आजही अनुकरणीय आहे.

प्रा.देशमुखांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा प्रखर बाणेदारपणा आणि स्वाभिमान. त्यांनी कधीही कुठल्याही वैयक्तिक कामाचा आग्रह धरला नाही. ते नेहमीच सार्वजनिक हिताच्या प्रश्नांसाठी झटले. शासकीय बैठकींचा अपवाद वगळता त्यांनी कधीही मंत्र्यांच्या दालनांचा उंबरठा ओलांडला नसेल. त्यांच्या या निःस्पृह वृत्तीमुळेच मंत्री असोत वा प्रशासकीय अधिकारी, सर्वांच्याच मनात त्यांच्याविषयी एक दबदबा आणि कमालीचा आदर होता.

विदर्भाच्या विकासाचा अनुशेष हा त्यांच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाचा श्वास होता. या विषयावर सभागृहात बोलताना ते आकडेवारी आणि पुराव्यांचा असा काही कीस पाडत की, त्यांच्या तर्कांपुढे शासनालाही नमते घ्यावे लागे. मागास भागांच्या विकासासाठी लढणाऱ्या प्रत्येक लोकप्रतिनिधीसाठी ते एक प्रेरणास्थान होते. विदर्भ, मराठवाड्यात अनुशेष निर्मूलनासाठी त्यांनी दिलेले योगदान अद्वितीयच म्हणावे लागेल. माझ्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात मला त्यांच्यासारख्या दिग्गजाकडून खूप काही शिकायला मिळाले.

त्यांची काम करण्याची पद्धत मी माझ्या आयुष्यात अनुसरण्याचा प्रयत्न केला. निःस्वार्थी वृत्ती, जनसामान्यांबद्दल तळमळ आणि आपल्या कर्तव्याप्रती असलेल्या अपार निष्ठेमुळे त्यांचे एक वेगळेच वलय होते. प्रा.बी.टी.देशमुख यांच्या रूपात महाराष्ट्राने पुढील अनेक पिढ्यांच्या स्मरणात राहील असा एक उत्तम संसदपटू आणि राज्याच्या मागास भागांसाठी प्राणपणाने लढणारा एक सच्चा योद्धा गमावला आहे. त्यांच्या स्मृतींना माझी विनम्र श्रद्धांजली!

# आमच्या देव्हाऱ्यातील दत्तात्रय गेला!.... आता डोकं ठेवायला पाय कुठून आणावेत?

- डॉ.किशोर फुले, अमरावती (९४२३१२४६०८)

लोकप्रतिनिधीत्वाचा मानदंड निर्माण करणारे प्रा.बी.टी.देशमुख (भाऊ) काल अचानक अनंताच्या प्रवासाला निघून गेले. आमच्या देव्हाऱ्यातील दत्तात्रयच गेला.... आता ज्या पायावर आदराने आणि विश्वासाने डोकं ठेवावं ते पाय कुठून आणावेत? अशी भावना माझ्यासह अनेकांच्या अंतःकरणात निर्माण झाली असेल. मूल्यनिष्ठा, समर्पण, अभ्यासूपणा, वैचारिकता, कर्तृत्व, वक्तृत्व, संसदपटुत्व या तत्त्वांचा प्रतिशब्द म्हणजे प्रा.बी.टी.देशमुख होते. त्यासाठी त्यांनी आयुष्य पणाला लावलं होतं. पाच वेळा ते विधान परिषदेवर निवडून आलेत. केवळ हा त्यांच्या मोठेपणाचा मानदंड नव्हता तर आयुष्य कसे असावे? ते कसे घडवावे? याचा वस्तुपाठ म्हणजे भाऊंचा जीवन प्रवास होता.

चांदूरबाजार तालुक्यातील बेलोरा या लहानशा गावात, सामान्य कुटुंबात जन्म घेतलेल्या भाऊंनी आपले आयुष्य बांधले. शिक्षणाचा, समाजकारणाचा आणि राजकारणाचा कोणताही वारसा नव्हता. उपजत बुद्धिमत्ता, चळवळ्या स्वभाव आणि आयुष्यात काहीतरी करून दाखवण्याची जिद्द या भरोवशावर त्यांनी आपली 'देशमुखी' निर्माण केली. ही देशमुखी आंदण मिळालेली नव्हती तर ती स्वकष्टाने निर्माण केलेली होती. नवव्या वर्गात असताना संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात ते सहभागी झाले. राजकमल चौकातील संयुक्त महाराष्ट्राच्या सभेत नवव्या वर्गातील भाऊराव तुळशीराम देशमुख या पोरसवदा वयाच्या मुलाने खणखणीत भाषण केले.

बापूसाहेब कारंजकर तेव्हा अमरावती जिल्हा संयुक्त महाराष्ट्र समितीचे समन्वयक होते. वीर वामनराव दादा जोशी. डॉ. अण्णासाहेब सोमण, डॉ.दाजीसाहेब पटवर्धन, नानासाहेब बामणगावकर, बाबासाहेब खापर्डे, बाळासाहेब मराठे हे चळवळीचे मार्गदर्शक होते. यशवंतराव खापर्डे, प्राचार्य अण्णासाहेब वैद्य, ॲड. यशवंतराव शेरेकर, बबनराव मेटकर, कविवर्य सुरेश भट हे तत्कालीन तरुणतुर्क स्थानिक चळवळीचे हिरो होते. आपल्या धारिष्ट्याने, चळवळ्या स्वभावाने आणि खणखणीत वक्तृत्वाने भाऊराव देशमुख या मुलाने त्यात सर्वांचे लक्ष वेधून घेतले. राहायची सोय नव्हती, जेवणाची भ्रांत होती. यशवंतराव खापर्डे भाऊरावांना बाळासाहेब मराठ्यांकडे (आप्पा) घेऊन गेले. आप्पा गुणग्राहक आणि दैनिक हिंदुस्थान परिवार म्हणजे सर्वांचे आश्रयस्थान. आप्पांनी भाऊरावांना दैनिक हिंदुस्थानमध्ये काम दिले आणि भाऊरावांनी आपल्या गुणवैशिष्ट्यांमुळे प्रचंड मेहनतीने दैनिक हिंदुस्थानचा केवळ कर्मचारीच नाही तर आप्पांच्या मानसपुत्राचे स्थान प्राप्त केले.

विदर्भ महाविद्यालयात भाऊंचे शिक्षण झाले. या महाविद्यालयाच्या विस्तीर्ण परिसरात आणि चिरेबंद वास्तूत प्राचार्य प.सि.काणेंसारख्या गुरूंच्या तालमीत ते घडले. भाऊ विदर्भ महाविद्यालयाच्या छात्रसंघाचे अध्यक्ष होते. विदर्भ महाविद्यालयाच्या छात्रसंघाचे अध्यक्ष असताना स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनासाठी त्यांनी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना आणले. भाऊराव देशमुख या छात्रसंघ अध्यक्षाने त्यावेळी केलेले भाषण युवा नेतृत्वासाठी एक आदर्श ठरले. यशवंतरावांनी या तरुण विद्यार्थी नेत्याच्या भाषणाची दखल घेतली. पुढे त्याचाच परिपाक म्हणून भाऊंच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पाठपुराव्याचे यश म्हणून विदर्भ महाविद्यालयात चार विषयात पदव्युत्तर वर्ग प्राप्त झाले. वऱ्हाडातील विद्यार्थ्यांसाठी ही फार मोठी उपलब्ध होती. भाऊंच्या नेतृत्वाची बीजं याकाळात अंकुरित झाली.

राज्यशास्त्रात गुणवत्तेसह पदव्युत्तर पदवी विदर्भ महाविद्यालयातून प्राप्त केल्यावर सरकारी सेवेची दारं त्यांना खुली होती. शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावतीला सुरू केले होते. बहुजन समाजाच्या विशेषतः ग्रामीण भागातील मुलांसाठी उच्च शिक्षणाचे दालन त्यांनी उघडले होते. या महाविद्यालयात शिक्षक म्हणून डॉ.ज्वालाप्रसादांसह अनेक गुणवंतांना त्यांनी आणले होते. डॉ.भाऊसाहेबांच्या या ज्ञानयज्ञात आपलीही समिधा अर्पण केली पाहिजे म्हणून भाऊराव देशमुखांनी शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून सेवा दिली. प्रा.बी.टी. देशमुख नावाचा व्यासंगी, वक्तशीर व समर्पित शिक्षक ज्ञानगंगेच्या प्रवाहात आला. भाऊंचे वर्गातील शिकवणे ही विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच ठरली. राज्यशास्त्राच्या अनेक पुस्तकांचे त्यांनी लेखन केले. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, प्रो.हेरॉल्ड लास्की त्यांनी केवळ क्रमिक अभ्यासक्रमातील विषय म्हणून मुलांना सांगितले नाहीत तर त्यांची जीवनदृष्टी आपल्या अंतःकरणातून त्यांच्या मनःपटलावर बिंबविली. त्यामुळेच "मी बी.टी. सरांचा विद्यार्थी आहे किंवा होतो" ही बिरुदावली मिरवणारी विद्यार्थ्यांची पिढी निर्माण झाली.

त्याकाळात नागपूर विद्यापीठ होते. भाऊ एक शिक्षक म्हणून विद्यापीठाच्या विविध उपक्रमात सक्रिय झाले. विशेषतः १९६३ साली स्थापन झालेल्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघात (नुटा) ते सक्रिय होऊन पुढे अध्यक्ष झाले. या संघटनेला भाऊंच्या नेतृत्वात उर्जितावस्था प्राप्त झाली. याशिवाय विद्यापीठ अभ्यास मंडळे, विद्या शाखा, विद्या परिषद, अधिसभा, कार्यकारी परिषद अशा प्राधिकरणांवर त्यांनी आपली अमीट छाप सोडली. प्रत्येक प्राधिकरणावर व्यवस्था परिवर्तन व सुधारण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान दिले. विद्यार्थी, शिक्षक हिताचे आणि विद्यापीठाची गरिमा वाढविणारे हे योगदान होते. हे करत असताना आपल्या कर्तव्याशी तसूभरी प्रतारणा त्यांनी कधी केली नाही. महाविद्यालयात सकाळी आपले अध्यापनकार्य पूर्ण करून एसटीने जाऊन ते विद्यापीठाच्या सभांना उपस्थित राहत. विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या भवितव्याच्या प्रश्नांबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थेच्या, विद्यापीठाच्या व्यवस्थापनासह शासनाशी कधी त्यांनी तडजोड केली नाही. आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला आणि स्वीकारलेल्या कर्तव्याला स्मरून त्यांचे वर्तन राहिले. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेत आणि उभारणीत भाऊंचा फार मोठा सहभाग आहे.

१९८० साली भाऊ पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेवर निर्वाचित झाले. त्यावेळी त्या मतदारसंघावर 'नागपूरची' मक्तेदारी होती. ही मक्तेदारी मोडून उपजत बुद्धिमत्ता, अंगभूत प्रतिभा, शालेय-महाविद्यालयीन जीवनात व्यक्तिमत्त्वात रुजलेले नेतृत्वगुण, मेधावी वक्तृत्व, संसदीय आयुधांचा सुयोग्य उपयोग करण्याचे कौशल्य आणि मतदारांनी ज्या विश्वासाने विधानमंडळात पाठविले त्यांच्या प्रति असलेली बांधिलकी हे सतीच वाणं घेऊन आपल्या विधिमंडळातील कारकिर्दीचे भाऊंनी सोने केले. ते खरे संसदपटू व संसदरत्न ठरले. शेतकऱ्यांपासून तो प्राध्यापकापर्यंत हजारो लोकांच्या इच्छा-आकांक्षांचे, त्यांच्या जीवन मरणाच्या प्रश्नांचे प्रतिबिंब भाऊंच्या संसदीय लढाईत उमटले.

याकाळात काही दबावाचे व मोहाचे क्षण आले नाहीत का? तर निश्चितच आले. पण या राजकीय दबावाला वा पदांच्या मोहाला प्रा.बी.टी.देशमुख हा लोकप्रतिनिधी कधीही बधला नाही. व्रतस्थवृत्तीने आणि बाणेदारपणे या सर्व क्षणांवर त्यांनी मात केली.

अमरावतीच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांसाठी, विदर्भाच्या अनुशेषासाठी, विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी, शैक्षणिक सुधारणांसाठी भाऊ राजकीय गणितांची पर्वा न करता सरकारवर तुटून पडत. विदर्भाच्या अनुशेषाच्या प्रश्नावर त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांना विधिमंडळाचे संस्थगित अधिवेशन घ्यायला भाग पाडले. यावरून त्यांची कर्तव्यकठोरता अधोरेखित होते. वास्तविक पाहता प्रत्येक निवडणुकीत भाऊ काँग्रेसच्या पाठिंब्याने निवडून यायचे. पण जनतेच्या प्रश्नांसाठी आणि विशेषतः विदर्भाच्या अनुशेषासाठी विधिमंडळात काँग्रेसच्या सरकारला त्यांनी जे धारेवर धरले ते विरोधी पक्ष नेत्यास साजेसे असेच होते. पण या प्रतिपादनात राजकीय विखार नव्हता, व्यक्तिगत द्वेष नव्हता की पडद्यामागची तडजोड नव्हती. जनतेच्या प्रश्नांसाठी अत्यंत प्रामाणिकपणे, पोटतिडकीने पुकारलेला तो एल्गार होता. आज राजकीय, सामाजिक क्षितिजावर अत्यंत काळेकुट्ट ढग दाटून आले असताना बखरकारांनी म्हटल्याप्रमाणे या सर्व लढाईत 'भाऊ कल्पांतीचा आदित्य भासला' असेच म्हणावे लागते.

२०१० साली भाऊ सहाव्यांदा विधानपरिषद निवडणुकीला सामोरे गेले. जनताही कशी विसरभोळी असते आणि तात्कालिक विषयात वाहून जाते. राजकारणातील भ्रष्ट गुंडपुंड धनशक्तीच्या जोरावर कसे मस्तवाल होतात त्याचे हे उदाहरण आहे. अमरावतीच्या पिण्याच्या पाण्यासाठी भाऊंनी संघर्ष केला. हे पिण्याचे पाणी आणि शेतकऱ्यांच्या शेतीचे पाणी रतन इंडिया कंपनीला (सोफिया) देऊ नये ही ठाम भूमिका त्यांनी घेतली. या लढाईत पद्मश्री प्रभाकरराव वैद्य त्यांच्यासोबत होते. आसपासची शेती उजाड होणार होती. लोकांच्या जीवन मरणाचा हा प्रश्न होता. दिल्लीतील काँग्रेसच्या एका बड्या नेत्याचा या सोफियात 'इंटरेस्ट' होता. स्थानिक नेते त्यांनी मॅनेज केले होते. विरोधकांसह त्यांच्या पोटापाण्याची सोय झाली होती. फक्त बी.टी. देशमुख यांचा अडसर होता. तोंडावर विधान परिषदेची निवडणूक होती.

महाराष्ट्राच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी भाऊंना बोलावून या प्रश्नाला विरोध करण्याची भूमिका सोडा, विधान परिषदेत आम्ही तुम्हाला ताकतीने मदत करू अन्यथा अडचणी येतील असे सुचवले. "निवडणुकीत पराभव झाला तरी बेहत्तर पण जनतेच्या प्रश्नांशी प्रतारणा करणार नाही", असे बाणेदार उत्तर भाऊंनी मुख्यमंत्र्यांना दिले. गावाच्या आणि शेतकऱ्यांच्या भवितव्यासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधीच्या मागे खरं म्हणजे एकसंध गाव आणि वऱ्हाड उभे राहायला हवे होते. पण स्वार्थाच्या तुकड्यांना भुलून, जनतेशी प्रतारणाकरून स्थानिक राजकारण्यांनी बी.टीं.ना धडा शिकवण्याची सुपारीच घेतली. बाणेदार भाऊंनी पराभव स्वीकारला. चारच दिवसात आमदार निवासातील खोली सोडली. त्यांचे काहीच बिघडले नाही, कारण ते घडले होते. बिघडले अमरावतीचे, विदर्भाचे. कारण विदर्भाच्या, वऱ्हाडच्या प्रश्नांवर प्राणांतिक बाजी लावणारा लोकप्रतिनिधी अडाणी लोकांनी नाही तर पदवीधर (?) म्हणवणाऱ्यांनी गमावला होता.

नुटा या प्राध्यापकांच्या संघटनेला भाऊंनी दमदार नेतृत्व दिले. महाविद्यालयीन प्राध्यापकांना सेवा शाश्वती नव्हती की नियमित वेतन नव्हते. उपदान, निवृत्ती वेतन ही तर दूरची गोष्ट. अशा काळात प्रा.बी.टी.देशमुखांनी प्राध्यापकांना हे सर्व मिळवून दिले. त्यासाठी प्रखर लढा दिला. संघटना बांधली. विधानमंडळात गेल्यावर प्राध्यापकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा पुरेपूर उपयोग करून घेतला. लोकांची दृष्ट लागावी इतके प्राध्यापकांना सर्व काही प्राप्त झाले. इतके होऊनही तात्कालिक लाभासाठी, विद्यापीठातील पदप्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी प्राध्यापकांच्या गटातटांनी भाऊंवर टीका केली. एकदा एका वरिष्ठ प्राचार्याने भाऊंवर टीका करणारा लेख दै. तरुण भारतात लिहिला होता. भाऊंची विधान परिषदेची निवडणूक तोंडावर होती. सुदाम काका देशमुख यांनी तो लेख वाचला. त्यांना वाईट वाटले. मी तेव्हा पत्रकारितेत होतो. योगायोगाने त्या दिवशी ॲड. ब्रह्म यांच्याकडे सुदाम काकांना भेटायला मी गेलो. माझ्या दुचाकीवर बसून सुदाम काका व मी त्या संबंधित व्यक्तीकडे गेलो. काकांनी या लेखाचा विषय काढला. त्यांना ते म्हणाले "बी.टीं.वर टिका करू नको. अरे तुम्ही प्राध्यापकांनी तुमच्या कातड्याचे जोडे जरी घातले तरी बी.टी.चे उपकार फिटणार नाहीत."

आपल्या व्यक्तिगत इच्छा-आकांक्षा जाळून, पद-प्रतिष्ठांवर मात करून भाऊ आयुष्यभर लढले. एखादी दंतकथा वाटावी असे त्यांचे व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवन होते. सात दशकांच्या सार्वजनिक जीवनात लांच्छनाचा एकही शिंतोडा त्यांच्या शूचिभूर्त आयुष्यावर कधी पडला नाही. मंत्रिपदासाठी, राजकीय लाभासाठी त्यांनी कधी कोणाचा उंबरठा झिजविला नाही. आपल्या तत्त्वांशी कधी तडजोड केली नाही. अशी देवस्वरूप माणसं समाजात आपोआप, दररोज निर्माण होत नाहीत. त्यासाठी आयुष्याचे मोल द्यावे लागते. तेव्हा मूल्य निर्माण होते.

तत्त्वांसाठी विषाचा प्याला प्राशन करणारा सॉक्रेटिस, राजपुत्राचे प्राण वाचविण्यासाठी आपल्या मुलाचे बलिदान देणारी पन्नादायी, स्वकीयांचे राज्य प्रस्थापित होईपर्यंत कंदमूळ खाऊन जगणारे आणि गवतावर झोपणारे महाराणा प्रताप, स्वतःच्या मनगटावर राज्य प्रस्थापित करूनही 'हे राज्य रयतेचं आहे' हे मूल्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज ही भारतीय समाज जीवनातील शाश्वत मूल्यं आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी, तडफडणाऱ्या गावासाठी, शेतकऱ्यांची शेती वाचली पाहिजे म्हणून त्यांच्या भवितव्यासाठी स्वतःच्या आमदारकीचीही बाजी लावणारे आणि सदसद्विवेक बुद्धीवर विश्वास ठेवणारे निष्कांचन बी.टी.भाऊ हे अलीकडच्या काळातील मूल्य आहे. ही मूल्यं जपणं, ती वाढविणं ही समाजाची जबाबदारी असते आणि त्यावरच समाजाचा पोतही अवलंबून असतो. बी.टी.भाऊ राजकारण, समाजकारणात एक दीपस्तंभ निर्माण करून गेले. आता वेळ समाजाची आहे. या महान व्यक्तिमत्त्वास श्रद्धांजली अर्पण करताना डोळे पाणावतात ते यासाठीच. भाऊंच्या शाश्वत कार्याला अंतःकरणपूर्वक सलाम!

## A LIFE DEDICATED TO EDUCATION, PUBLIC SERVICE, AND THE BETTERMENT OF SOCIETY

**- Dr. Dipali Shelke/Chinchole, Pune**

Attending Resp. B. T. Kaka's final journey on Saturday was a profoundly moving experience, and witnessing his funeral was an honour in itself. To be present at a farewell marked by such dignity, reverence, and full State Honours was a reminder of the extraordinary life he lived and the immense impact he had on society.

Witnessing the Tricolour embracing him for the final time was a poignant reminder that his contributions had transcended personal achievements and had earned the respect and gratitude of society. The entire ceremony carried an extraordinary sense of pride, reverence, and emotion, leaving an indelible impression on all who were privileged to be present. On that day, it felt as though the entire community had come together not merely to mourn a man, but to pay tribute to an institution in himself.

Amidst this collective tribute, what touched me equally was witnessing the extraordinary strength displayed by our dear Deepali and Vaishutai. In the midst of unimaginable grief, they carried themselves with remarkable grace, courage, and composure. Their decision to personally perform the last rites was deeply moving and profoundly inspiring. In choosing to do so, they honoured not only Resp. Kaka, but also the values of courage, conviction, equality, and progressive thinking that he himself embodied throughout his life. I am certain that Kaka would have been immensely proud of both of them.

Alongside their strength, it is important to acknowledge another pillar of quiet resilience—Resp. Kaku, whose unwavering presence throughout this journey deserves heartfelt recognition. The accolades and respect that Resp. B. T. Kaka earned over his lifetime are not his alone; they are a testament to a lifelong partnership. Kaku stood steadfastly beside him through every challenge and triumph, offering selfless support, making countless sacrifices, and contributing silently yet significantly to his remarkable journey. The legacy he leaves behind is, in every sense, a legacy they built together, and Kaku rightfully shares equal credit for all that was achieved.

As we reflect on these deeply personal moments and the collective respect he commanded, it becomes clear that while we mourn his loss, we must also celebrate a life extraordinarily well lived—a life dedicated to education, public service, and the betterment of society. B. T. Kaka's values, ideals, and contributions will continue to guide and inspire countless people for generations to come.

May his noble soul rest in eternal peace. Heartfelt condolences, love, and strength to Deepali, Vaishutai, and Kaku.

Om Shanti.

*****

# विद्यापीठाच्या सुशासनात बी.टी.भाऊंचे योगदान

- डॉ.सुभाष गवई, माजी संपादक, नुटा बुलेटीन, अमरावती

प्रा.बी.टी.भाऊ देशमुख यांनी ३० वर्षे महाराष्ट्राच्या कायदेमंडळात आपलं प्रभुत्व निर्विवादपणे सिद्ध केलेलं, सांसदीय लोकशाही पद्धतीतील सांसदीय आयुधांचा उत्तम वापर करून समाजातल्या, राज्यातील सर्वसामान्यांच्या समस्यांना कसा न्याय मिळवून देता येतो याचे उत्तम उदाहरण त्यांनी महाराष्ट्रातील जनप्रतिनिधींना आपल्या अभ्यासपूर्ण वर्तनातून घालून दिले आहे. बी.टी.भाऊ केवळ राज्यशास्त्र विषयाचे उत्तम प्राध्यापक होते असे नाही तर ते राज्यशास्त्र जगले. भारतीय संविधानावर त्यांची श्रद्धा होती. हे ते अनेकदा बोलून दाखविते बी.टी.भाऊंची विधानपरिषदेतील कारकिर्द उभ्या महाराष्ट्राने बघितली हे जरी खरे असले तरी विधानपरिषदेवर निवडून जाण्यापूर्वी म्हणजे १९८० च्या पूर्वी भाऊंनी नागपूर विद्यापीठाच्या प्राधिकारीणीवर व त्यानंतर १९८३ ते १९९९ पर्यंत अमरावती विद्यापीठाच्या प्रशासनामध्ये पारदर्शकता, शिस्त, नियम आणि कायद्याच्या आधारावर विद्यापीठांचे संचालन करण्यासाठी जे प्रयत्न, परिश्रम घेतले त्याबाबतची माहिती त्यांच्या समकालीन राहिलेल्या सहकाऱ्याशिवाय, नुटा संघटनेतील काही विश्वासार्ह पदाधिकाऱ्यांशिवाय माहीत असणे शक्य नाही. परंतु एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. बी. टी. भाऊ नागपूर विद्यापीठ आणि अमरावती विद्यापीठाच्या प्राधिकारिणीवर असेपर्यंत ज्या पद्धतीने प्रशासनामध्ये सुशासनाची जी सवय लागली होती ती त्यांच्या विद्यापीठाच्या राजकारणातून बाहेर पडल्यानंतर पुढील दहा बारा वर्षात सैल झाली असल्याचे चित्र बघायला मिळते. खरं म्हणजे बी.टी.भाऊंनी राजकारण कमी आणि विद्यापीठांमध्ये शैक्षणिक गुणवत्तावाढी सोबतच,शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांमध्ये संरक्षणासाठी जे प्रयत्न केले ते अधिक आहेत. विद्यापीठाच्या राजकारणात भाऊंचा प्रवेश त्याकाळामध्ये १९६९ च्या नंतरचा कालखंड लक्षात घेतला तर तत्कालीन शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षकांची वेठबिगारी,कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांमध्ये असुरक्षितता या पार्श्वभूमीवर झाला आणि बी. टी.भाऊंनी परिनियम ५३ ची निर्मिती नागपूर विद्यापीठात व पुढे १९८३ नंतर अमरावती विद्यापीठात तो परिनियम जसाच्या तसा लागू केला त्यामुळे दोन्ही विद्यापीठातील प्राध्यापकांच्या नोकऱ्या या सुरक्षित झाल्यात. संस्थाचालकाला वाट्टेल तेव्हा प्राध्यापकांना काढून टाकण्याचा एकाधिकार,मनमानी या परिनियमाने संपुष्टात आली.विद्यापीठाची परवानगी घेतल्याशिवाय केवळ कुलगुरुंची नव्हे तर विद्यापीठाच्या तत्कालीन कार्यकारिणीची सध्याच्या व्यवस्थापक परिषदेची संमती असल्याशिवाय ती देखील बहुमताने कुठल्याही प्राध्यापकाला सहजपणे संस्थाचालकाला काढून टाकता येणे शक्य नाही. प्राध्यापक सुरक्षित झालेत ते केवळ बी.टी.भाऊंच्या कायदेशीर उपाययोजनेने, हे लक्षात घ्यावे लागेल. अतिरिक्त शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी योजना करणाऱ्या राज्यस्तरीय पाच सदस्यीय समितीचे सदस्य म्हणून महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले.

१९६९ नंतर नागपूर विद्यापीठाच्या कामकाजाला जी शिस्त, एक सारखेपणा आला तो त्यावेळी बी.टी. भाऊंच्या नेतृत्वात कार्यकरिणीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्यामुळे. विद्यापीठांच्या प्राधिकारिणीवर तीस वर्षे काम करणाऱ्या भाऊंनी मात्र विद्यापीठाकडून कुठलाही भत्ता घेतला नाही. विद्यापीठाच्या प्रशासनाला जी एक शिस्तबद्ध सवय लागली त्यात प्रत्येक प्राधिकारिणीच्या परिशिष्ट पुस्तकांसाठी, बैठकीच्या विषयपत्रिकेच्या पुस्तिकेसाठी वेगवेगळे रंगाचे मुखपृष्ठ असण्याचे नियम भाऊंनी बनविले उदा. सिनेट सभागृहासाठी गुलाबी रंगाचे बुक, कार्यकारिणी अथवा व्यवस्थापन परिषदेसाठी आकाशी रंग,वित्त व लेखा विभागासाठी पोपटी रंग,विद्वत परिषदेसाठी पिवळा रंग, परीक्षा मंडळासाठी हिरवा रंग अशा प्रकारचे नियोजन करताना विद्यापीठाच्या प्रत्येक विभागाकडून दिल्या जाणारी उत्तरे,परिशिष्टांना पेजला दिलेले नंबर कोड करून देण्यात आले. त्यानुसारच नंबर देण्याची पद्धत फक्त आणि फक्त नागपूर आणि अमरावती विद्यापीठातच बघायला मिळते.ती महाराष्ट्रातील इतर विद्यापीठात ही पद्धत आजही नाही. त्यामुळे कुठल्याही प्राधिकारिणीचे सहपत्र पुस्तक बघतांना त्या पानांवरच्या नंबरने हे परिशिष्ठ,सहपत्र कोणत्या विभागाकडून आलेले आहे हे त्याबाबत अभ्यास असणारा व्यक्तीच सांगू शकतो. सर्वसामान्य व्यक्ती अथवा प्राध्यापकांना सुद्धा त्याचे लगेच आकलन होत नाही ही पद्धत/व्यवस्था लावून विद्यापीठात सुशासन निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम जसे बी.टी.भाऊंनी केले तसेच विद्यापीठात भ्रष्टाचार होऊ नये यासाठी जे परिनियम त्यांनी बनविले त्यात बांधकामाच्या संबंधात निविदा मंजूर करण्यापर्यंतचा अधिकार विद्यापीठाच्या प्राधिकारिणीला असला तरी बांधकाम हे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागानेच करून द्यायचे.त्या बांधकामाच्या आर्थिक व्यवहारात विद्यापीठाचा हस्तक्षेप होणार नाही याची काळजी घेवून तशा प्रकारची कायदेशीर तरतूद बी.टी.भाऊंनी करून ठेवली असली तरी त्या बांधकामाची देखरेख, दर्जा यावर विद्यापीठाच्या प्रशासनाचे नियंत्रण ठेवण्यात आले आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा तो एक उत्तम नमूना आहे. बी.टी. भाऊंसोबत प्राचार्य खर्चे, प्राचार्य प.सि.काणे हे परिनियम, अध्यादेश, नियम बनविण्यामध्ये सातत्याने त्यांच्या सोबत राहिले आहेत. बी.टी.भाऊंनी विद्यापीठ राजकारणातून स्वतःला १९९९ पासून बाजूला केल्यानंतर त्यांच्या हाताखाली,तालमीत तयार झालेल्या सहकाऱ्यांनी ही जबाबदारी स्वीकारली असली तरी त्याचा मूळ पाया भाऊंनी बांधून दिला आहे. एखादा अध्यादेश, परिनियम तयार करण्यासाठी त्याच्या चौकटीचा आदर्श नमूना अध्यादेशाद्वारे तयार करून ठेवण्यात आला आहे. जेणेकरून परिनियमन, अध्यादेशाचे स्वरूप बदलू नये, म्हणून आपण असू किंवा नसू, व्यवस्था कायम राहिली पाहिजे या भावनेतून भविष्याचा वेध घेणारे संघटक बी.टी. भाऊ होते.

नुटा संघटनेच्या कार्यकारी मंडळामध्ये १९९८ पर्यंत संघटनेतल्या ज्येष्ठ अनुभवी सदस्यांनाच संधी मिळत असे. ती संधी एखाद्या प्राध्यापकाच्या वाट्याला येणे ही त्या प्राध्यापकाच्या जीवनातली उपलब्धी मानली जायची. त्याचा अर्थ दोन्ही विद्यापीठात असा लावला जायचा की, बी.टी. भाऊंच्या विश्वासाला तो प्राध्यापक पात्र ठरला. त्यामुळे त्या प्राध्यापकासाठी तो सन्मान असायचा. भविष्याचा वेध घेणाऱ्या बी.टी.भाऊंनी १९९८ मध्ये नुटा संघटनेत नवीन पिढीला प्रतिनिधित्व देण्याचा निर्णय घेतला आणि १९९८ मध्ये प्रथमतः नवीन पिढीचे प्रतिनिधी म्हणून मी व प्रा. सुशील काळमेघ आम्हा दोघांना नुटा संघटनेच्या कार्यकारिणीवर घेण्यात आले. मला कार्यकारिणी सदस्यत्वासोबतच नुटा बुलेटीनचा संपादक होण्याची संधी त्यांनी दिली. नुटा बुलेटीन हा बी.टी.भाऊंचा श्वास होता. त्यामुळे बुलेटीनच्या प्रत्येक शब्दाला तीन-तीनदा तपासून पाहणे, त्यावर चर्चा करणे आणि त्यानंतर तो लेख असेल, एखादा शासनाच्या जी.आर. वरील भाष्य असेल ते फाईनल केल्या जात असे. मी संपादक म्हणून नुटा बुलेटीनचे काम बी.टी. भाऊसोबत जवळपास १७ वर्षे केले. त्या १७ वर्षात नुटा बुलेटीन तीन ते चारदा प्रूफ बघितल्या शिवाय मुद्रणासाठी,प्रकाशनासाठी गेल्याचे मला आठवत नाही. त्यामुळे बी.टी. भाऊ सोबतच मला देखील ते प्रकाशित झालेले बुलेटीन जवळजवळ पाठ झाल्यासारखे असायचे. हीच पद्धत विद्यापीठाच्या कार्यवृत्ताच्या, प्रतिवेदनांच्या बाबतीत, नियम परिनियम, अध्यादेश तयार करतांना सुद्धा हेच सूत्र बी.टी. भाऊनीं कायम ठेवल्याने सार्वजनिक विद्यापीठ कायदे बदलले म्हणजे १९८६ नंतर १९९४ आणि २०१६ चे कायदे आले. त्यातील १९८६ व १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठाचा कायदा बनविण्यात बी.टी. भाऊंचे महत्तम योगदान राहिले आहे. त्यामुळे विशेषतः१९९४ चा विद्यापीठ कायदा जेवढा पारदर्शक, दुरगामी आणि सत्तेचे विकेंद्रीकरण करणारा होता तितका २०१६ चा कायदा नाही हे जाणकारांचे मत आहे.

नागपूर आणि अमरावती विद्यापीठांमध्ये ज्या काही अनेक आदर्श,उत्तम व्यवस्था तयार केल्यात त्यात दीक्षांत समारंभाच्या बाबतीत पदवीदान कार्यक्रमासाठी जी व्यवस्था आहे तितकी पारदर्शक, प्राधिकारीणींवरील ज्येष्ठतेचा शिष्टाचार, परिधान करण्यात येणाऱ्या गाऊन पद्धतीमध्ये गाऊनला लागणारी रिबीन कोणत्या विद्याशाखेला कोणत्या रंगाची, कार्यकारिणी सदस्य अथवा आत्ताच्या व्यवस्थापन परिषदेतील सदस्यांच्या गाऊनला कोणती रिबिन, अधिष्ठाता, कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव आणि त्या दीक्षांत समारंभासाठी आमंत्रित केला गेलेला प्रमुख पाहुणा त्याच्या गाऊनला रिबीनचा रंग कसा राहील हे सर्व सूत्रबद्ध रूपात नियमावली क्रमांक १ of १९९४ ने तयार करण्यात आला असून प्राधिकारिणी वरील सदस्य आणि एकच प्रमुख पाहुणा हा मंचावर बसताना त्याच्या बैठकीचा क्रम,पहिल्या रांगेत किती खुर्च्या, दुसऱ्या रांगेत किती खुर्च्या व तिसऱ्या रांगेत किती खुर्च्या कोण सदस्य बसतील याबाबतचे जे नियम तयार करण्यात आले आहेत त्यामध्ये शासनाचा प्रतिनिधी जरी हजर राहणार असतील तरी त्याबाबतचा निर्णय व्यवस्थापन परिषद घेईल. प्राधिकरिणीच्या सदस्यांव्यतिरिक्त तो गाऊन केवळ जे नियोजित प्रमुख पाहुणे निश्चित करण्यात आले आहेत त्यालाच गाऊन परिधान करता येईल. त्याचप्रमाणे सभास्थळावर जाण्यासाठी जी मिरवणूक निघेल त्यात सर्वात पुढे कोण व सर्वात शेवटी कोण याबाबतची नियमावली अत्यंत तटस्थ व पारदर्शकपणे बी.टी.भाऊंनी तयार केली आणि त्यानुसारच दीक्षांत समारंभाचे आयोजन केल्या जात असे. त्यामुळे विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ, त्यात घातल्या जाणारा काळा गाऊन हा सन्मान मानल्या जात असे. विद्यापीठाच्या दिक्षांत समारंभाला जो एक गौरव प्राप्त झाला आहे, त्यात शिस्त पारदर्शकता दिसून येते त्याचे श्रेय हे बी.टी. भाऊंना द्यावे लागते. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या विकासाच्या दृष्टीने अधिकारी व प्राधिकारिणीच्या सदस्यामध्ये समन्वय राहण्यासाठी विविध विषयाच्या समिती, उप समितीची निर्मिती करून प्रशासन गतिमान करण्याचा पायंडा बी.टी.भाऊंच्या काळातला. अनेक चांगल्या प्रथा, रूढी भाऊंनी कायद्याच्या चौकटीत बसवून विद्यापीठामध्ये रूढ केल्यात त्यातून प्रशासनातील पारदर्शकता तर वाढलीच सोबतच अधिकाऱ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याने विद्यापीठ कामकाजाला गती मिळाली आहे. त्यामुळे त्यांनी तयार केलेले परिनियम, अध्यादेश अद्यापही विद्यापीठ प्रशासनात लागू आहेत. कायम आहेत. हेच बी.टी. भाऊंचे विदर्भातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठीचे योगदान आहे. जो पर्यंत विद्यापीठांचे अस्तित्व कायम आहे तो पर्यंत बी.टी. भाऊ हे आठवणीत कायम राहतील.

# प्रेरणेचे स्त्रोतः गुरुवर्य 'बी.टी.' सर!

- न.मा.जोशी, यवतमाळ, ८८०५९४८९५१

देखा है ज़िंदगी को कुछ इतना क़रीब से
चेहरे तमाम लगने लगे हैं अजीब से।।
———साहिर लुधियानवी

(१) 'नो'अर्थात नाही, या एका शब्दाने एखाद्याचे जीवन आमुलाग्र बदलू शकते किंवा जीवनाची दिशा निश्चित करू शकते ही गोष्ट कदाचित अतिशयोक्तीची सुपरलेटीव्ह डिग्री वाटेल, पण निदान माझ्या बाबतीत हे सत्य आहे. आणि हा संदर्भ आहे प्रा.बी.टी. देशमुख यांच्याबाबत. बुलढाणा जिल्ह्यातील पिंपळगाव काळे लहानशा खेड्यातून उच्च शिक्षणासाठी मी बी.ए. पदवीसाठी अमरावतीला आल्यावर शिवाजी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. अमरावतीला मी नवीन होतो. मला राहण्याची जेवणाची मोफत सोय असलेल्या दानशूर रामप्यारी बाई सिकची वस्तीगृहात प्रवेश मिळाला होता.

(२) कॉलेजच्या पहिल्याच दिवशी पायी चालत पहिल्याच तासाला सकाळी सात वाजता पिरेड कोणत्या खोलीत आहे ते शोधत थोडा उशिरा पोहोचलो. खादीचा पांढरा स्वच्छ कुर्ता पायजमा घातलेले, उंच-पुरे प्राध्यापक शिकवत होते आणि मी म्हणालो 'मे आय कम इन सर'. लगेच उत्तर आले 'नो.. नो'. सर्व मुले जोराने हसली. हा कोण गावंढळ तासाला उशिरा आला म्हणून पहात बसले. मी दाराच्या बाहेर वऱ्हांड्यात बसून पूर्ण लेक्चर ऐकले. मात्र ठरवले की या प्राध्यापकाला रोज प्रश्न विचारून हैराण केल्याशिवाय राहणार नाही. वर्ग सुटल्यावर विद्यार्थ्यांनी सांगितले की, "हे आपले राज्यशास्त्राचे प्रा.बी.टी.देशमुख आहेत. त्यांना एक मिनिटही उशीर चालत नाही." खरोखरच राज्यशास्त्रासारखा रुक्ष विषय शिकवण्याची बी.टी. सरांची हातोटी इतकी जबरदस्त की ४५ मिनिटं कधी संपून जायचे कळत नव्हते. बी.टी. सरांचा राज्यशास्त्र विषयाचा अतिशय दांडगा अभ्यास. मी त्यांना रोज प्रश्न विचारत असे. त्यासाठी घरून खूप अभ्यास करून यायचो. माझ्या एका प्रश्नाचे उत्तर आले नाही म्हणून बी.टी. सरांनी दिवसभर ग्रंथालयात बसून पुस्तकांचे ढिगारे उपसत उत्तर शोधून काढले, असे मला ग्रंथपालांनी सांगितले होते.

(३) शाळेत शिकत असताना इंग्रजी विषयात वार्षिक परीक्षेत दोन प्रश्न हमखास विचारल्या जायचे. एक असायचा, 'इफ आय वेअर ए'....अर्थात मी ....असतो तर, म्हणजे शिक्षक असतो तर, मंत्री असतो तर... डॉक्टर असतो तर.... प्रधान मंत्री असतो तर... अशा स्वरूपाचे! आणि दूसरा 'माय एम इन लाइफ !' म्हणजे माझ्या जीवनाचे ध्येय. दोन्ही प्रश्नांची उत्तरे घोकमपट्टी करून तयार केलेली असायची. वास्तविक पाहता त्या शाळकरी वयात प्रश्नही समजत नव्हता आणि उत्तरही समजत नव्हते. आयुष्यात काय व्हायचे त्याची आम्ही विद्यार्थी मित्र चर्चा करायचो, तेव्हा माझी इच्छा राज्यशास्त्राचा प्राध्यापक झालो पाहिजे ही होती. माझे जिवलग मित्र आर. के. हुशारे आणि गझनफर बेग युसुफ बेग काझी म्हणायचे की, "प्राध्यापक होणे फार कठीण आहे. एम.ए. ला मेरिट यावे लागते", आणि आपण तर सेकंडक्लासही मिळवू शकणार नाही.

(४) 'नुटा' या प्राध्यापकांच्या संघटनेसाठी त्यांनी आयुष्य समर्पित केले. नागपूर आणि अमरावती विद्यापीठाचे एकही प्राधिकरण नव्हते की जिथे बी.टीं.नी काम केले नाही. 'नुटा'च्या माध्यमातूनच त्यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेतही प्रवेश केला. प्रदीर्घ म्हणजे तीस वर्षे विधानपरिषदेची आमदारकी मिळवूनही आपल्या आमदारकीचा कधी दुरुपयोग केला नाही. आमदार कसा असावा, विधानपरिषदेची गरज काय, या प्रश्नांचे उत्तर म्हणजे बी.टी. देशमुख ! त्यांच्या निधनानंतर गेल्या आठ दिवसात बी.टी. देशमुख यांच्या अनंतपैलू व्यक्तिमत्त्वावर वृत्तपत्रातून लेखांचा महापूर आला. बी.टी.देशमुख अजात शत्रू होते अशी चर्चा अंत्ययात्रेच्या वेळी हिंदू स्मशानभूमीत प्रचंड गर्दीने उपस्थित शेकडो लोकांमध्ये चालली होती. मला मात्र अजात शत्रू हा शब्द योग्य वाटत नव्हता. ज्याला शत्रूच नाही तो अजात शत्रू! पण बी.टी. सरांना शत्रू जरी नव्हते तरी शत्रूसारखे समजणारे कट्टर विरोधक जरूर होते. नुटाच्या माध्यमातून विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर जाण्याची संधी मिळाली नाही म्हणून नाराज व संतप्त झालेले अनेक प्राध्यापक बी.टीं.चे कट्टर विरोधक झाल्याचे पाहिले आहे. विधिमंडळाच्या राजकारणातही हा माणूस आपल्या नाकात दम आणतो, म्हणून त्यांना घरी बसवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणारे राजकीय विरोधकही माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत. सार्वजनिक जीवनातील माणसाला विरोध स्वाभाविक गोष्ट आहे. तो असलाही पाहिजे. या विरोधातूनच बी.टीं.च्या विरोधात, पण शत्रू म्हणून नव्हे, दारव्ह्याचे प्राचार्य शा.वा. ठाकरे यांनी विद्यापीठ ग्रामीण विकास मंच नावाची संघटना उभी केली होती. बी.टीं.नी त्यांचा कधी द्वेष केला नाही. आश्चर्य म्हणजे प्राचार्य ठाकरे यांनी पश्चाताप करीत आपली संघटनाच बी.टीं.च्या चरणी लीन करून टाकली होती. विद्यापीठाच्या राजकारणातही बी.टीं.ना विरोधकांची उणीव नव्हती. म्हणूनच अजातशत्रू शब्द त्यांना लागू होत नाही. इथे नमूद करण्यासारखे आहे की, प्रख्यात साहित्यिक नरसिंह चिंतामण केळकर यांनी म्हटले होते की, "अजात शत्रू हा काही चांगला गुण नाही. अजात शत्रू म्हणजे होयबा होय. चपलूसी, लाचारी, हुजरेगिरी, विचारांची धरसोड, निर्णयावर ठाम न राहणे, तत्त्वांसाठी लढण्याची हिंमत नसणे, याचे नाव अजातशत्रू." बी.टीं.मध्ये मध्ये असा एकही गुण नव्हता. उलट तत्त्वांच्या बाबतीत ते अत्यंत कठोर, शिस्तीचे भोक्ते होते. वर म्हटल्याप्रमाणे त्यांच्या एका 'नो'ने मला जीवन विषयक दृष्टी दिली. जगण्याचे बळ दिले. राज्यशास्त्र विषयाची आवड निर्माण केली. वयोमानानुसार स्वेच्छने त्यांनी नुटाचे अध्यक्ष पद सोडले. आता ही धुरा नुटासाठी समर्पित डॉ.प्रवीण रघुवंशी यांच्या समर्थ खांद्यावर आलेली आहे. बी.टी. नंतर नुटाचे काय प्रश्नाचे उत्तर 'रघु' वंशातील 'प्राण जाय पर वचन न जाय' हा वारसा चालवणाऱ्या 'प्रवीण'च्या रूपात मिळाले आहे.

(५) मी अमरावतीला शिवाजी महाविद्यालयात शिकत असतानाच पत्रकार महर्षी बाळासाहेब मराठे यांच्या हिंदुस्थानमध्ये लेख लिहित होतो, त्यामुळे पत्रकार होण्याची इच्छा होती. प्राध्यापक आणि पत्रकार होण्याची पूर्ण न होणारी माझी इच्छा नियतीने मात्र पूर्ण केली याबद्दल जगन्नियंत्याचे खरोखरच ऋण मानतो. प्राध्यापक व्हावे असे वाटण्याचे कारण अमरावतीच्या श्री शिवाजी महाविद्यालयात मला राज्यशास्त्र शिकवणारे प्राध्यापक भाऊराव तुकाराम उपाख्य बी.टी. देशमुख हे होते आणि बाळासाहेब मराठे पत्रकारीतेची प्रेरणा होती. विशेष हे की बी.टी. देशमुख हे बाळासाहेबांचे मानसपुत्र होते.

(६) माझ्या पंचाहत्तरीनिमित्त्य यवतमाळकरांनी पुढाकार घेऊन भव्य सत्कार समारंभ केला होता प्राचार्य डॉ.उदय नवलेकर यांच्या संपादनाखाली दैनिक 'सिंह झेप'चे मालक मनोज जयस्वाल यांनी काढलेल्या विशेषांकासाठी बी.टी. देशमुख यांनी आपली सारी व्यस्तता बाजूला ठेवत वीस मिनिटात माझ्यावर लेख लिहून ई-मेलवर पाठवला होता. अंकाच्या छपाईसाठी आमच्याजवळ केवळ एक तास आहे, असे प्राचार्य डॉ.नावलेकरांनी बी.टी. सरांना सांगितले तेव्हा 'इतक्या घाईत शक्यच नाही' असे न सांगता मला वीस मिनिटे द्या, असे म्हणून शब्द पाळला. याला म्हणतात 'बी.टी'. अर्थात बेस्ट टीचर! क्या बात है!

(७) बी.टीं.च्या अंत्यसंस्कारासाठी मी, माझे विद्यार्थी माजी शिक्षण मंत्री प्राध्यापक वसंत पुरके यांच्या गाडीने महाविद्यालयातील माझे सहकारी विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता प्रा.डॉ.विवेक देशमुख यवतमाळहून अमरावतीला निघालो होतो, तेव्हा प्रवासात भेटींना असलेल्या विरोधकांची चर्चा करीत होतो. प्रा.वसंत पुरके यांनी सांगितले की, "विरोधक असणे चांगली गोष्ट आहे. माणूस जास्त जोमाने काम करतो."

संत तुकारामांनी म्हटले आहे की, "निंदकाचे घर असावे शेजारी, चित्तशुद्धी होय त्याच्यापरी।।" आणि संत कबीर म्हणतात, "निंदक नियरे राखिए, आंगन कुटी छवाय। बिन पानी, साबुन बिना, निर्मल करे सुभाय।।" या ओव्यांप्रमाणेच निंदक आपल्यातील उणिवा स्पष्टपणे दाखवून देतो. मी पुरके सरांना म्हणालो की, ठीक आहे. विरोधक आहेत, पण कृतघ्न? ज्यांना कोणी कुत्रं विचारत नव्हतं त्यांना विधिमंडळ दाखवणारे सुद्धा जेव्हा पैशाच्या लोभापायी साथ सोडून जातात, विरोधात काम करतात तेव्हा होणाऱ्या वेदनांना सुद्धा हेचि फळ काय मम तपाला असे न म्हणता चलता है, म्हणत

जीवन चलने का नाम
चलते रहो सुबह-ओ-शाम
के रस्ता कट जाएगा मितरा
के बादल छट जाएगा मितरा
के दुःख से झुकना ना मितरा
के एक पल रुकना ना मितरा

हे गीत ते गुणगुणत ते वाटचाल करायचे. यालाच म्हणतात धीरोदात्त 'बी.टी.'

(८) सभागृहात वेळेवर येणे, पूर्ण वेळ हजर असणे, सभागृहातील संबंधित विषयांचा, विधेयकांचा प्रचंड अभ्यास करून संसदीय आयुधांचा वापर करण्याच्या कौशल्याने त्यांनी विधान परिषदेत इतिहास घडवला. 'झाले बहु होतील बहु, पण असा आमदार होणे नाही' हे एकच वाक्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन

करण्यास पुरेसे ठरावे. संसदपटू म्हणून त्यांनी मिळविलेल्या लौकिकाची आजपर्यंत कोणीही बरोबरी करू शकला नाही.

कॉमनवेल्थ ऑफ नेशन्सच्या महाराष्ट्र शाखेने बी.टी.देशमुख यांना १९९६ चा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार प्रधान केला, तेव्हा प्रशस्ती पत्रात म्हटले की, प्रा.बी.टी.देशमुख यांनी १९८० मध्ये विधान परिषदेत प्रवेश केल्यापासून परिषदेचे सर्वात उल्लेखनीय सदस्य म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या अभ्यासू वृत्तीचा आणि सभागृहातील युक्त्या कुशलतेने हाताळण्याच्या व वापरण्याच्या दुर्मिळ गुणांमुळे त्यांनी विधानमंडळात स्वतःसाठी एक विशेष स्थान निर्माण केले आहे.

या ऐतिहासिक अभूतपूर्व सन्मानाबद्दल बी.टी.देशमुख गौरव ग्रंथ प्रकाशित करण्याची योजना तयार झाली होती. तत्कालीन शिक्षण मंत्री प्रा.राम मेघे, विधान परिषदेचे अध्यक्ष जयंतराव टिळक, प्राचार्य प.सि.काणे, रा.सु.गवई, डॉ.शरद कळणावत डॉ.रमाकांत कोलते, हरीश प्रा.शंकर सांगळे, प्रा.दिनकर वानखेडे अशा अनेक दिग्गजांनी बी.टीं.वरील लेखाची तयारी केली होती. मात्र बी.टी.देशमुख यांनी गौरव ग्रंथ काढण्यास स्पष्ट नकार दिला होता. यालाच म्हणतात 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती....' याचे उत्तम उदाहरण बी.टी. याच धामधुमीत प्राध्यापक दिनकर वानखेडे यांचा लेख मात्र कुठेतरी प्रसिद्ध होऊन गेला होता. आत्यंतिक प्रेमामुळे बी.टीं.नी मान्यता दिली होती.

(९) बी.टी.देशमुख हे अष्टपैलू नव्हे, तर अनंत पैलू असणारे व्यक्तिमत्त्व होते. संगीत, साहित्य या क्षेत्रांतही मोठमोठ्या दिग्गजांना लाजवेल अशी त्यांची प्रज्ञा होती. यवतमाळात प्रा.दिनकर वानखेडे यांच्या 'खडकावरच्या वाटा' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन बी.टीं.च्या हस्ते होते तेव्हा मराठी साहित्य आणि कविता या विषयावर चार दिवस रात्रंदिन अभ्यास करून त्यांनी केलेले भाषण अनेकांच्या हृदयात आजही कोरल्या गेलेले आहे. या काव्यसंग्रहात बी.टीं.वर 'भाऊ!' ही

# सूर्यास्तः ------ आणि आमचा सूर्य क्षितिजापलीकडे कायमस्वरूपी विसाव्यासाठी निघून गेला

- डॉ.एन.जी.बेलसरे, अमरावती

**प्रा.बी.टी.देशमुख सर यांना विनम्र भावपूर्ण श्रद्धांजली**

प्रा.बी.टी.देशमुख यांच्या निधनाने महाराष्ट्राने, विशेषतः विदर्भाने, आपल्या सर्वाधिक प्रतिष्ठित, विद्वान आणि लोकाभिमुख विधानपरिषद सदस्यांपैकी एकाला गमावले आहे. त्यांच्या जाण्याने एक प्रचंड ज्ञानयोगी, दूरदर्शी नेता आणि समाजहितासाठी आयुष्य अर्पण केलेला कर्मयोगी १९ जून २०२६ रोजी, वयाच्या ८७ व्या वर्षी अनंताच्या प्रवासाला निघून गेला आहे.

भारतातील सर्वाधिक विद्वान राजकारण्यांपैकी एक असलेल्या डॉ.श्रीकांत जिचकार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन करण्यात आलेला 'डॉ.श्रीकांत जिचकार स्मृती ज्ञानयोगी पुरस्कार' जेव्हा प्रा.बी.टी.देशमुख यांना प्रदान करण्यात आला, तेव्हा त्या पुरस्कारालाच एक नवे तेज आणि उंची प्राप्त झाली. आपल्या प्रेरणास्थानांपैकी एक असलेल्या व्यक्तीस हा गौरव प्राप्त होताना पाहून स्वर्गीय डॉ.जिचकार यांना किती समाधान लाभले असते, याची केवळ कल्पनाच करता येते.

प्रा.बी.टी.देशमुख यांचे जीवन म्हणजे विद्वत्ता, नेतृत्व आणि निःस्वार्थ समाजसेवेचा अद्वितीय संगम होय. विद्यार्थी म्हणून ते अत्यंत बुद्धिमान, शिक्षक म्हणून आदर्श, संघटक म्हणून दूरदर्शी आणि विधिमंडळातील सदस्य म्हणून बौद्धिक गहनता व प्रभावी वक्तृत्वाचे मूर्तिमंत प्रतीक होते. त्यांच्या भाषणांनी प्रेरणा दिली, त्यांच्या चर्चांनी प्रबोधन केले आणि त्यांच्या नेतृत्वाने अनेक संस्था घडवल्या.

मात्र त्यांच्या कर्तृत्वापेक्षाही त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक उंच होते. शिस्त, सन्मान, विनम्रता आणि नैतिक धैर्य यांचे ते साक्षात प्रतीक होते. सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनात त्यांनी नेहमीच साधेपणा, संवेदनशीलता आणि तत्त्वनिष्ठा जपली.

महाराष्ट्र विधान परिषदेतील त्यांच्या योगदानाचा स्वतंत्र अभ्यास व्हावा इतके ते मोलाचे होते. तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी विधिमंडळाच्या कामकाजात बौद्धिक परिपक्वता आणि नैतिक स्पष्टता आणली. त्यांचे प्रत्येक हस्तक्षेप सखोल अभ्यास, तल्लख विचार आणि न्यायाविषयीच्या निष्ठेचे प्रतीक होते.

त्यांची पारदर्शकता, नितांत प्रामाणिकता आणि तडजोड न करणारी तत्त्वनिष्ठा यामुळे त्यांना सर्वपक्षीय आदर प्राप्त झाला. खऱ्या अर्थाने कर्मयोगी असलेल्या प्रा.देशमुखांनी कधीही पुरस्कार वा सन्मानाची अपेक्षा केली नाही; परंतु समाजकल्याणासाठी केलेल्या त्यांच्या अथक कार्याची पावती म्हणून ते सन्मान स्वतःहून त्यांच्याकडे आले.

अमरावती जिल्ह्यातील बेलोरा या छोट्याशा गावातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या असामान्य व्यक्तिमत्त्वाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्वतःला घडविले. तत्कालीन किंग एडवर्ड कॉलेज (सध्याचे शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था) येथे शिक्षण घेत असताना त्यांच्यातील नेतृत्वगुण प्रकर्षाने दिसून आले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीसारख्या सामाजिक-राजकीय आंदोलनांत ते अधिकाधिक विकसित झाले.

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे त्यांनी एक आदर्श शिक्षक म्हणून लौकिक प्राप्त केला. शिक्षकांवर कठीण परिस्थिती ओढवली असताना त्यांनी त्यांच्या हक्कांसाठी भक्कमपणे उभे राहून नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या माध्यमातून ऐतिहासिक चळवळीचे नेतृत्व केले आणि शिक्षकांच्या प्रतिष्ठेला नवी उंची प्राप्त करून दिली.

पदवीधर मतदारसंघातून वारंवार निवडून येत त्यांनी निवडणूक नीतिमत्ता आणि विधायक कार्यक्षमतेचे नवे मापदंड निर्माण केले. सत्ताधाऱ्यांकडून मिळणाऱ्या प्रलोभनांना न जुमानता त्यांनी न्यायासाठी सातत्याने संघर्ष केला.

महात्मा गांधी, महात्मा ज्योतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिक्षणमहर्षी व कृषिमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख, वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी सत्य, स्वातंत्र्य आणि नैतिक जबाबदारी यांचा मार्ग कधीही सोडला नाही.

विदर्भातील पाणीटंचाई आणि प्रादेशिक असमतोल यांसारख्या प्रश्नांकडे त्यांनी सातत्याने लक्ष वेधले. "पदवीधरांनाही स्वच्छ पिण्याचे पाणी हवेच" हे त्यांचे विधान त्यांच्या सर्वसमावेशक आणि मानवी दृष्टिकोनाचे प्रतीक होते.

विदर्भ विकास प्रबोधिनीसारख्या उपक्रमांद्वारे त्यांनी वंचित आणि दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी स्वतःला वाहून घेतले. त्यांच्या नैतिक अधिकारामुळे आणि बौद्धिक सामर्थ्यामुळे स्व.जयंतराव टिळक, श्री.शरदचंद्र पवार, श्री.नितीन गडकरी, स्व.डॉ.डी.आर.शेखावत, स्व.आर.एस.गवई आणि स्व.प्रा.राम मेघे यांसारख्या विविध विचारसरणींच्या नेत्यांचाही त्यांना सन्मान आणि पाठिंबा लाभला. सार्वजनिक जीवनातील ही एक दुर्मिळ कामगिरी होती.

चार दशकांहून अधिक काळाच्या त्यांच्या यशस्वी नेतृत्वानंतर नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचे अध्यक्ष म्हणून त्यांच्यासारखा समर्थ उत्तराधिकारी शोधणे हे एक मोठे आव्हान होते. परंतु भाऊंच्या पारखी नजरेत अतिशय निष्ठावान, बुद्धिवान चारित्र्यवान, अभ्यासू युवक भरला त्यांचे नाव प्राध्यापक डॉ.प्रवीण रघुवंशी. डॉ. प्रवीण यांनी संपूर्ण शक्तिनिशी NUTA या संघटनेचा अध्यक्ष म्हणून अवघड शिवधनुष्य पेलले. आदरणीय भाऊंच्या मार्गदर्शनाखाली ६ व्या व ७ व्या आयोगाच्या अंमलबजावणी साठी झालेल्या आंदोलनात दिलेले यशस्वी नेतृत्व व MFUCTO या राज्यस्तरीय प्राध्यापक संघटनेत त्यांची एकमताने झालेली निवड ही डॉ.प्रवीण यांच्या नेतृत्व कौशल्याला मिळालेले प्रशस्तीपत्र ठरले. आदरणीय भाऊंच्या हयातीत डॉ.प्रवीण यांचे रूपाने एक सक्षम उत्तराधिकारी उदयास आला ही बाब आदरणीय भाऊंना फार समाधान देऊन गेली.

२१ जून २०२६ रोजी 'नुटा बुलेटीन'चा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याच्या उंबरठ्यावर आपण उभे असताना, आपण केवळ एका नियतकालिकाचा गौरव करीत नव्हतो, तर विचार, संघर्ष आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा जपणाऱ्या या दूरदर्शी व्यक्तिमत्त्वाला अभिवादन करीत होतो. 'भाऊ' किंवा 'बी.टी.सर' म्हणून प्रेमाने ओळखल्या जाणाऱ्या या महापुरुषांचे जीवन भावी पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील.

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कदाचित कधीही भरून निघणार नाही.

परमेश्वराने त्यांच्या शोकाकुल कुटुंबीयांना, हजारो अनुयायांना आणि असंख्य हितचिंतकांना हे दुःख सहन करण्याचे धैर्य प्रदान करावे आणि दिवंगत पुण्यात्म्यास चिरशांती लाभो, हीच प्रार्थना.

।। ॐ शांती ।।

कविता आहे.

एखाद्या बेलाग बुलंद बुरूजासारखा तू एकटा उभा आहेस,

सारे आसमंत ढासळलेले असताना, तुझे एकमेव अस्तित्त्वच अभय आहे आम्हाला...

भाऊ, तू निघाला होतास तेव्हा लोक म्हणायचे खडकांवर पाऊलवाटा नसतात

पण आज तुझ्या चालण्याने लहान लहान पाऊलवाटांचे झालेले राजमार्ग...

निर्मिती तुझीच असते...

(१०) १९७० पूर्वीचा प्राध्यापकांच्या नोकरीचा काळ म्हणजे व्यवस्थापनाच्या मर्जीत आयुष्य घालवण्याचा, चार चार महिने पगार नसलेला, पूर्ण पगाराचे फक्त स्वप्न पाहात राहण्याचा कालखंड होता. मात्र बी.टी. देशमुख यांच्या नेतृत्वातील तत्कालीन प्राध्यापक सहकार्यांच्या लढ्याने प्राध्यापकांच्या वाळवंटी जीवनात गुलाब बाग फुलविल्या आहेत याची सध्याच्या पिढीतील प्राध्यापकांना कल्पना नसावी. प्राध्यापकांना सेवेत संरक्षण देणारा विद्यापीठ परिनियम ५३ तयार आणि लागू करण्याचे सारे श्रेय बी.टी. सरांना आहे.

(११) असामान्य त्याग आणि प्रचंड विद्यासागर असलेल्या प्राचार्य श्रीकृष्ण दत्तात्रय उपाख्य बाबाजी दाते यांच्या यवतमाळातील कॉलेजमध्ये प्राध्यापकी करतानाच पत्रकारितेची संधी मिळाली. हिंदुस्थान, सिंहझेप, मतदार, तरुण भारत, देशोन्नती नागपूर टाइम्स, हिंदुस्थान समाचार, युगधर्म, लोकसत्ता यांसारख्या दैनिकात वार्ताहर म्हणून आणि मुंबईच्या जनमानसाची शिदोरी मासिकाचा संपादक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पत्रकारितेतील 'दर्पण' सह प्रतिष्ठेचे बहुधा सर्व पुरस्कार आणि सन्मानही प्राप्त झाले. संत रामदासांनी म्हटले आहे की, ज्ञानाची उपासना सातत्याने चालू राहणे हे विकसित समाजाचे लक्षण आहे.

गीतेतही भगवंतांनी ज्ञानाचे महत्त्व सांगितले आहे. "न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते" ज्ञानासारखे दुसरे पवित्र काही नाही. पाश्चात्य देशात विचारांची ज्ञानोपासना सांघिकदृष्ट्या केली जात असे. त्यांना "स्कूल ऑफ थॉट्स" म्हणून ओळखले जाते. त्यातूनच सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, गॅलिलिओ यांच्यासारखे विचारवंत, शास्त्रज्ञ निर्माण झाले. आपल्याकडेही अशीच आध्यात्मज्ञानाची संघटित उपासना पूर्वापार चालत आलेली आहे. भारद्वाज, सत्यकाम, गार्ग्य इ. ऋषींनी एकत्र येऊन पिप्पलाद मुनींचे शिष्यत्व पत्करून त्यांच्याकडून ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतले. समर्थांनी दासबोधामध्ये सद्गुरूची लक्षणे सांगितली आहेत आणि गुरू कसा नसावा, हेही स्पष्ट केले आहे. आजच्या शिक्षणपद्धतीत गुरुकुलची व्यवस्था नाही पण विद्यार्थ्यांचे जीवन घडविणारे, अपवादात्मक का असेनात, खऱ्या अर्थाने गुरु आजही आहेत. बी.टी. देशमुख आणि त्यांच्यासारखेच प्राध्यापक श्री.गो.काशीकर, प.सि.काणे, टी.डी.मुदलियार, रमण, रामाराव, ए.बी.साबळे, मा.ल.व्यवहारे, खामगाव चे जी.एस. कॉलेज मधील मध्ये प्र.ग.सहस्त्रबुद्धे, पी.एन.भागवत, के.एम.मुंशी, प्राध्यापक पंडित असे मला आणखी काही गुरु लाभले आहेत. प्राचीन काळातील ऋषींप्रमाणे आधुनिक काळात सुद्धा तसे काही उत्तम गुरु लाभणे हे आपले हे भाग्य. त्यांचे ऋण हीच आपली संपत्ती. हे ऋण वाढतच जावे ही प्रार्थना. 'थँक्यू बीटी' सर ! विनम्र श्रद्धांजली! (या लेखातील काही मजकुर 'माझे गुरुवर्य': भाग एक. या माझ्या पुस्तकातून प्रकाशकांच्या परवानगीने साभार.)

## *बी.टी.देशमुख हे अमरावतीचेच नव्हे तर महाराष्ट्राचे भूषण*

**- मा.श्री.नितीन गडकरी,** *केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री*

आदरणीय बी.टी.देशमुख यांच्या निधनाची वार्ता, ही आपल्या सगळ्यांनाच धक्का देणारी आहे. ज्या माणसाचा जन्म होतो त्याचा मृत्यू अटळ आहे. पण जेवढं आयुष्य मिळालं त्या आयुष्यामध्ये त्याचं काम, त्याचं व्यक्तित्त्व, त्याचं कार्य आणि कर्तृत्व मात्र नेहमीकरता लक्षात राहतं. बी.टी.देशमुख हे त्यापैकीच एक असं व्यक्तिमत्त्व होतं, की ज्यांनी आपल्या जीवनामध्ये आपल्या कार्याची छाप संपूर्ण विदर्भवासियांच्या मनामध्ये निर्माण केली. विशेषतः प्राध्यापक म्हणून काम करत असताना, 'नुटा' (Nagpur University Teachers' Association) या संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी प्राध्यापकांच्या हक्कांकरिता लढा दिला. आणि त्यातूनच ते विद्यापीठामध्ये एक्झिक्युटिव्ह कौन्सिलला पण होते आणि त्यानंतर ते महाराष्ट्र विधान परिषदेवर ग्रॅज्युएट मतदार संघातून निवडून आले. अनेक वर्ष त्यांचा सहकारी राहण्याचे मला सौभाग्य प्राप्त झाले. विशेषतः त्यांनी विधान मंडळाच्या कार्यामध्ये विदर्भाच्या सिंचनाच्या अनुशेषाकरिता जे कार्य केलं, ते आपण कधीच विसरू शकत नाही. सिंचनाचा अभाव, त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर महाराष्ट्रातल्या सिंचनाच्या सरासरीमध्ये विदर्भ कसा मागे आहे, ते सातत्याने अभ्यासपूर्ण मांडणी करत. पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ या सर्व जिल्ह्यातल्या लोकांना न्याय देण्यासाठी त्यांनी सातत्याने विधानमंडळामध्ये संघर्ष केला.

विद्यापीठाचा जो कायदा आला, त्या कायद्यामध्ये जी समिती तयार झाली होती, त्यामध्ये मी आणि ते दोघही सदस्य होतो. आणि तो कायदा तयार करीत असताना प्राध्यापकांच्या हक्काचं कसं रक्षण होईल, याची सातत्याने त्यांनी काळजी घेतली. अतिशय सुस्वभावी, सुसंस्कृत आणि त्याचबरोबर आपल्या विचारांबद्दलची कटिबद्धता ठेवणारं त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं. आणि याच आधारावर त्यांनी शिक्षक संघटनेत काम करीत असताना राजकीय पक्ष आणि राजकारण यांपासून स्वतःला दूर ठेवलं. त्यांनी आपलं क्षेत्र शैक्षणिक क्षेत्र, विद्यापीठाचे क्षेत्र आणि विशेषतः विदर्भाच्या क्षेत्राचा विकास, त्यातला अनुशेष या विषयावर केंद्रित केलं होतं. अनेक वेळा त्यांनी संघर्ष केला. अनेक वेळा सभागृहातील त्यांच्या तीव्र भावना अजूनही स्मरणात आहेत.

जयंतराव टिळक असतील, रा.सू.गवई साहेब असतील, हे सगळे सभागृहाचे सभापती असताना अनेक वेळा त्यांनी जी भाषणं केली, ती सातत्याने लक्षात ठेवण्यासारखी आहेत. एकदा तर मी विरोधी पक्ष नेता असताना मी आणि बी.टी.नी मिळून अधिवेशन संपल्यावर एक कायदेशीर बाब काढून आम्ही, त्या वेळचे मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना पुन्हा विधानमंडळाचं अधिवेशन घेण्यास भाग पाडलं. नियमाचा अतिशय कठोरपणे त्यांनी अभ्यास केला आणि त्याची अंमलबजावणी कठोरपणे व्हावी, हा त्यांचा आग्रह होता. निस्पृह, निस्वार्थी आणि खऱ्या अर्थाने सामाजिकदृष्ट्या समाजाकरिता आणि ज्या क्षेत्रामध्ये आपण काम करतो त्या क्षेत्राकरिता समर्पित असं त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं.

माझा त्यांचा अतिशय जवळचा संबंध होता. त्यांच्या सत्काराच्या कार्यक्रमाला अमरावतीला येण्याची मला संधी मिळाली. मधल्या काळामध्ये मी अमरावतीला आलो असताना त्यांची प्रकृती स्वास्थ्याची चिंता होती, तेव्हा त्यांना भेटायला त्यांच्या घरीपण गेलो होतो. खरोखर, बी.टी.देशमुख हे अमरावतीचेच नव्हे, विदर्भाचे, महाराष्ट्राचे भूषण होते. अशा एका अतिशय थोर व्यक्तीला, ज्याचं कार्य आपण कधी विसरू शकत नाही, त्यांचं निस्वार्थी आणि समर्पित जीवन आणि विशेषतः विद्यापीठ, शैक्षणिक क्षेत्र आणि शिक्षक यांप्रती त्यांची असणारी कटिबद्धता ही खऱ्या अर्थाने आपल्या सगळ्यांकरिता आदराचा आणि सन्मानाचा विषय होता. मी व्यक्तिगतरित्या त्यांचा अतिशय आदर करीत होतो, माझ्या मनात त्यांच्याबद्दल अतिशय प्रेम होतं. आणि त्यामुळे नेहमीच त्यांच्यासोबत मला जेव्हा जेव्हा भेटण्याची संधी यायची, ते माझ्याकरिता आनंदाचे क्षण होते.

त्यांचा मृत्यू खऱ्या अर्थाने आपल्या सगळ्यांना खूप मोठा धक्का आहे. परंतु जन्म ज्याचा होतो त्याचा मृत्यू अटळ आहे, हा निसर्गाचा नियम आहे त्याला कोणी अपवाद नाही. पण जसं लोकमान्य टिळकांनी सांगितलंय की, "एखाद्या व्यक्तीने आयुष्य किती वर्ष जगला, यापेक्षा तो जीवन जगला कसा हे जास्त महत्त्वाचं आहे," म्हणून बी.टीं.चं आदर्श व्यक्तिमत्त्व भविष्यात अनेक दिवस, अनेक पिढ्यांना अशीच प्रेरणा देत राहील, असा मला विश्वास आहे. व्यक्तिगतरित्या माझ्या अतिशय जवळचे एक ज्येष्ठ मित्र यांना गमावलं, याचं दुःख मला आहे. मी त्यांना खरं म्हणजे आज श्रद्धांजली वाहत असताना, मला त्यांच्या सोबतच्या जुन्या आठवणी पुन्हा उचंबळून आल्या आहेत. विधानमंडळातले अनेक संघर्ष लक्षात येत आहेत, त्यांच्या सहवासात विदर्भाकरिता, शैक्षणिक क्षेत्राकरिता जो जो संघर्ष झाला, तो सगळा इतिहास लक्षात येतोय. परंतु तो इतिहास आता भूतकाळात गेलेला आहे. आज ते आपल्यामध्ये नाहीत आणि त्यामुळे मी त्यांना श्रद्धांजली तर वाहतोच, पण बी.टी.देशमुखांच्या कार्याची, कर्तृत्वाची प्रेरणा भविष्यामधल्या विदर्भातील आपले जे राजकीय नेतृत्त्व आहे, जे आमदार, खासदार आहेत, त्यांनी त्यांचा आदर्श समोर ठेवून त्याप्रमाणे कार्य केलं आणि शेतकरी, शेतमजूर, शिक्षण क्षेत्रातील शिक्षक असतील, विद्यार्थी असतील आणि शैक्षणिक क्षेत्र, याबाबतीत त्यांचे जे विचार होते, त्यांचं पालन केलं, तर खऱ्या अर्थाने हीच त्यांना योग्य श्रद्धांजली होईल. मी माझ्या तर्फे बी.टी.देशमुखांना आणि भारतीय जनता पार्टीतर्फे त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो, आणि परमेश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो, ही ईश्वर चरणी प्रार्थना करतो.

# प्रा.बी.टी.देशमुख : विचार, संघर्ष आणि परिवर्तनाचा तपस्वी

- अजय बळवंत देशमुख, अध्यक्ष, महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघ

काही व्यक्तिमत्त्वे काळाच्या प्रवाहात विलीन होत नाहीत; ती विचारांच्या रूपाने युगानुयुगे समाजाला दिशा देत राहतात. प्रा.बी.टी.देशमुख हे असेच एक असामान्य व्यक्तिमत्त्व होते.

अमरावती जिल्ह्याच्या पावन भूमीने अनेक थोर विभूती घडविल्या आणि समाजाला नवी दिशा देण्याचे ऐतिहासिक कार्य केले. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, समाजसुधारणा, शिक्षण, साहित्य आणि अध्यात्म या सर्वच क्षेत्रांत या भूमीचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे. शिक्षणाची गंगोत्री उभी करणारे डॉ.पंजाबराव देशमुख, स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग चेतवणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, स्वच्छता, शिक्षण आणि मानवसेवेचा संदेश देणारे संत गाडगे बाबा, मराठी गझलांना नवे वैभव प्राप्त करून देणारे सुरेश भट आणि अध्यात्म-तत्त्वज्ञानाचा दीप प्रज्वलित करणारे प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज ही या मातीत जन्मलेली तेजस्वी रत्ने आहेत.

याच महान परंपरेत शिक्षण, शिक्षक चळवळ, सामाजिक बांधिलकी आणि लोकप्रतिनिधित्व या क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा अमिट ठसा उमटविणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा.भाऊराव तुळशीराम देशमुख अर्थात प्रा.बी.टी.देशमुख. अभ्यासू शिक्षक, कुशल संघटक, दूरदृष्टीचे विचारवंत आणि शिक्षकांच्या हक्कांसाठी अखंड संघर्ष करणारे नेतृत्व म्हणून त्यांनी विदर्भासह महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात मानाचे स्थान प्राप्त केले. आपल्या विचारांची प्रामाणिकता, तत्त्वनिष्ठ भूमिका आणि समाजहिताची अखंड तळमळ यांमुळे प्रा.बी.टी.देशमुख यांचे नाव आजही आदराने आणि कृतज्ञतेने घेतले जाते. त्यांच्या कार्याने केवळ शिक्षक चळवळीला दिशा दिली नाही, तर शिक्षण, समाजकारण आणि लोकशाही मूल्यांच्या संवर्धनासाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

विदर्भाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रावर आपल्या कर्तृत्वाचा अमिट ठसा उमटविणारे माजी आमदार, नुटा (NUTA) संघटनेचे प्रमुख शिल्पकार, शिक्षक चळवळीचे प्रखर नेते आणि विदर्भ विकासाचे अभ्यासू पुरस्कर्ते आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख साहेब यांचे निधन म्हणजे एका वैचारिक युगाचा अस्त होय. त्यांचे संपूर्ण जीवन हे संघर्ष, तत्त्वनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि जनसेवेचा प्रेरणादायी प्रवास होते.

प्रा.बी.टी.देशमुख साहेबांनी शिक्षणाकडे केवळ पदवीप्राप्तीचे साधन म्हणून पाहिले नाही, तर सामाजिक परिवर्तनाची सर्वात प्रभावी शक्ती म्हणून त्याची मांडणी केली. विदर्भातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी होणारी परवड थांबावी आणि शिक्षणव्यवस्था स्थानिक गरजांशी सुसंगत व्हावी, यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला.

त्या काळात अमरावती, अकोला, बुलढाणा आणि यवतमाळ या जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामकाजासाठी नागपूर विद्यापीठावर अवलंबून राहावे लागत होते. या अडचणींची जाणीव ठेवून त्यांनी अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेसाठी व्यापक जनचळवळ उभारली. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेचा मार्ग सुकर झाला. विदर्भाच्या शैक्षणिक इतिहासातील हा एक मैलाचा दगड ठरला. पुढे त्यांनी विद्यापीठाच्या प्राधिकरणावर काम करून विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजाला शिस्त लावण्याचे अमूल्य काम केले. आजही त्यांनी लावलेल्या चाकोरीत विद्यापीठाचे कामकाज चालते हे विशेष आहे.

शिक्षक संघटनांच्या इतिहासात प्रा.देशमुख साहेबांचे स्थान अत्यंत मानाचे आणि अढळ आहे. महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक संघटना (NUTA) ही केवळ संघटना नसून शिक्षकांच्या हक्कांसाठी उभारलेली प्रभावी वैचारिक चळवळ आहे. या चळवळीचे प्रमुख शिल्पकार म्हणून त्यांनी शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी अथक संघर्ष केला. संघटनात्मक बांधणी, अभ्यासपूर्ण भूमिका आणि तत्त्वनिष्ठ नेतृत्व या बळावर त्यांनी शिक्षक चळवळीला नवे बळ, नवी दिशा आणि नवी ओळख दिली.

१९८० ते २००९ या सलग तीन दशकांच्या कालावधीत अमरावती पदवीधर मतदारसंघातून पाच वेळा विधान परिषदेवर निवडून येणे ही त्यांच्या जनाधाराची आणि कार्यक्षमतेची सर्वोच्च पावती होती. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी विधान परिषदेत विदर्भाच्या विकास अनुशेषाचा प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडला. सिंचन, शिक्षण, रोजगार, ग्रामीण विकास आणि प्रादेशिक असमतोल यांसारख्या विषयांवर त्यांनी अभ्यासपूर्ण, तथ्याधारित आणि तर्कशुद्ध मांडणी करून शासनाचे लक्ष वेधले. त्यांच्या भाषणांमध्ये आकडेवारी, संदर्भ, अभ्यास आणि दूरदृष्टी यांचा उत्कृष्ट संगम दिसून येत असे. त्यामुळे ते केवळ राजकारणी नव्हते, तर एक विचारवंत धोरणकर्ते म्हणूनही ओळखले जात होते.

विशेषतः विदर्भाच्या सिंचन अनुशेषाचा प्रश्न त्यांनी ज्या सातत्याने आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडला, त्याला तोड नाही. दांडेकर समितीच्या अहवालाचा सखोल अभ्यास करून विदर्भावर झालेल्या सिंचनविषयक अन्यायाची त्यांनी पुराव्यानिशी मांडणी केली. नागपूर हिवाळी अधिवेशनात त्यांनी हा मुद्दा सातत्याने उपस्थित ठेवत शासनावर प्रभावी दबाव निर्माण केला. विदर्भासाठी विशेष निधी, विकास पॅकेज आणि सिंचन प्रकल्पांना चालना मिळवून देण्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली.

केळकर समितीच्या अहवालातून 'अनुशेष' हा शब्द वगळण्यात आल्यानंतरही त्यांनी प्रादेशिक न्यायाचा मुद्दा जिवंत ठेवला. विदर्भाच्या विकासासाठीचा त्यांचा संघर्ष कधीच थांबला नाही. प्रदेशातील शेतकऱ्यांना पाणी, युवकांना संधी आणि विदर्भाला न्याय मिळावा, हा त्यांचा आयुष्यभराचा ध्यास होता. त्यामुळेच त्यांना "विदर्भाच्या सिंचन अनुशेष निर्मूलनाचे जनक" म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना घडविले. वर्गखोल्यांमध्ये दिलेले ज्ञान आणि सार्वजनिक जीवनात दिलेली दिशा यामुळे ते अनेक पिढ्यांचे प्रेरणास्थान ठरले. उत्तम वक्तृत्व, सखोल लेखन, प्रखर वैचारिक भूमिका आणि समाजहिताची निष्ठा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अविभाज्य पैलू होते. विविध पुस्तके, लेख आणि १५ ऑगस्ट १९७७ पासून सातत्याने प्रकाशित होणाऱ्या "नुटा बुलेटीन"च्या माध्यमातून त्यांनी शिक्षक, विद्यार्थी आणि समाजामध्ये वैचारिक जागृती निर्माण केली.

प्रा.बी.टी.देशमुख यांचे जीवन हे मूल्याधिष्ठित राजकारणाचा आदर्श नमुना होते. सत्तेपेक्षा समाजहित, लोकप्रियतेपेक्षा तत्त्वनिष्ठा आणि वैयक्तिक लाभापेक्षा सार्वजनिक कल्याण यांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. त्यामुळेच ते केवळ एका संघटनेचे नेते किंवा एका मतदारसंघाचे प्रतिनिधी राहिले नाहीत, तर संपूर्ण विदर्भाच्या जनमानसातील विश्वासाचे, आदराचे आणि प्रेरणेचे केंद्र बनले.

२१ जून २०२६ रोजी त्यांच्या जिव्हाळ्याच्या नुटा बुलेटीनच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन त्यांच्या उपस्थितीत होणार होते. या कार्यक्रमाच्या नियोजनात ते शेवटपर्यंत तन्मयतेने सहभागी होते. एका हातात पेन्सिल आणि दुसऱ्या हातात नुटा बुलेटीन घेऊन कार्यक्रमाची आखणी करत असतानाच नियतीने त्यांच्यावर काळाचा घाला घातला. हा योगायोग नव्हे, तर त्यांच्या कार्यनिष्ठेचा आणि संघटनेप्रती असलेल्या अपार समर्पणाचा जिवंत पुरावा आहे.

आज स्व.प्रा.बी.टी.देशमुख साहेब आपल्या सोबत नसले तरी त्यांचे विचार, त्यांचा संघर्ष, त्यांची कार्यशैली आणि समाजाप्रती असलेली निष्ठा सदैव आपल्या स्मरणात राहील. शिक्षकांच्या हक्कांसाठी दिलेला लढा, विदर्भाच्या विकासासाठी केलेले अथक प्रयत्न आणि शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी केलेले योगदान यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अजरामर झाले आहे.

"विचारांचा हा दीप विझला असला, तरी त्याने प्रज्ज्वलित केलेल्या असंख्य ज्योती समाजाला प्रकाश देण्याचे काम अखंड करत राहतील, आणि हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल."

***विदर्भाच्या विकासासाठीचा त्यांचा संघर्ष कधीच थांबला नाही. प्रदेशातील शेतकऱ्यांना पाणी, युवकांना संधी आणि विदर्भाला न्याय मिळावा, हा त्यांचा आयुष्यभराचा ध्यास होता. त्यामुळेच त्यांना ''विदर्भाच्या सिंचन अनुशेष निर्मूलनाचे जनक'' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.***

# शिक्षक व शिक्षण क्षेत्राचे तारणहार बी.टी.भाऊ

**- अरविंद देशमुख, प्रांतीय अध्यक्ष विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ**

शिक्षकांची, प्राध्यापकांची, मुख्याध्यापकांची तसेच शिक्षण क्षेत्रातील कोणतीही समस्या असो आपल्या कौशल्याने समस्या सोडवणारे एक नाव डोळ्यासमोर येते ते म्हणजे बी.टी.भाऊ शिक्षण क्षेत्रातील अशी एकही गंभीर समस्या नाही की भाऊंच्या कार्यकाळात त्याकरिता भाऊंनी प्रयत्न केले नाही. सन १९८० पासून सलग पाच वेळा पदवीधर मतदार संघात विधान परिषदेचे अमरावती विभागातून पदवीधर मतदार संघातून सलग पाच वेळा २०१० पर्यंत भाऊंनी प्रतिनिधित्व केले. त्यांचा तो काळ शिक्षण क्षेत्रांसाठी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, विनाअनुदानित तत्त्वावरील शिकृषक यांच्याकरिता कदापिही न विसरणारा काळ आहे. शिक्षकांच्या व शिक्षण क्षेत्रातील अनेक समस्या त्यांनी आपल्या कार्यकाळात मोठ्या कौशल्याने मार्गी लावल्या सभागृहात एक प्रकारचा त्यांचा दरारा होता. त्यामागे त्यांनी जोपासलेली नैतिकता व संघटने विषयीची एकनिष्ठता याचे अधिष्ठान होते. ते नुटा संघटनेचे अनेक वर्ष अध्यक्ष राहिले त्यांनी आपल्या काळात नुटा बुलेटीन सुरू केले त्याला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल नुटाने सुवर्ण महोत्सव आयोजित केला होता. दुर्दैवाने त्यापूर्वीच एक दिवस काळ भाऊंना आपल्या मधून घेऊन गेला. आजही यावर विश्वास बसत नाही.

त्यांनी आपल्या संघटनेबरोबरच शिक्षकांच्या विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेवर तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या संघटनेवर खूप प्रेम केले. या तीनही संघटनेला सोबत घेऊन सभागृहामध्ये शिक्षकांचे अनेक प्रश्न मार्गी लावले. यामध्ये कायम विनाअनुदानित शिक्षकांचा लढा अत्यंत महत्त्वाचा त्यांच्या काळात मार्गी लागला. शासन शिक्षकांवर व शाळांवर खर्च करू शकत नाही. याकरिता कायम विनाअनुदानित शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना परवानगी दिल्या.राज्यामध्ये हजारो नवीन शाळा व कनिष्ठ महाविद्यालय निघाले संस्थाचालकांनी आज उद्या अनुदान येईल म्हणून अनेक शिक्षक, प्राध्यापकांना सेवेत घेतले. परंतु कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी दिल्यामुळे शासन अनुदान द्यायला तयार नव्हते. शिक्षक व कर्मचाऱ्यांची उपासमार होत होती सर्व कर्मचारी वैतागले होते कायम शब्द निघत नव्हता २००९-१० चा तो काळ होता. मुंबई येथे पावसाळी अधिवेशन सुरू होते विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा पदाधिकारी म्हणून कायम विनाअनुदानित शिक्षकांच्या आंदोलनाला भेट देण्यासाठी मी मुंबईला गेलो होतो. तेव्हा अधिवेशनामध्ये बी.टी देशमुख यांनी सभागृहामध्ये कायम शब्द काढण्याबाबत प्रश्न लावला होता. कायम अनुदानित शिक्षक यांच्या आंदोलनाला भेट देऊन आंदोलनाला संबोधित करून मी सभागृहातील प्रेक्षक गॅलरीची पास काढून वरिष्ठ सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीमध्ये तो संवाद ऐकण्यासाठी उपस्थित झालो. तेव्हा मी एक युद्धासारखा प्रसंग सभागृहात अनुभवला शाब्दिक युद्ध, प्रश्न उत्तरांचे युद्ध, वैचारिक युद्ध सुरू झाले. भाऊंची प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली सभागृहामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण उपस्थित होते. भाऊंच्या प्रश्नावर मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण उभे राहिले व म्हणाले शासनाला संस्थाचालकानी स्टॅम्प पेपरवर अनुदान घेणार नाही असे लिहून दिलेले आहे. त्यामुळे अनुदान देण्याची शासनाची जबाबदारी नाही.

बी.टी. उभे राहिले. शिक्षणाची जबाबदारी ही शासनाची आहे. अनेक वर्षापासून शिक्षक व कर्मचारी वेटबिगारीचे जीवन जगत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. शासन आपली जबाबदारी झटकू शकत नाही. त्यामुळे त्यांना वेतन अनुदान दिलेच पाहिजे. बघता बघता भाऊ अतिशय आक्रमक होत गेले. माझ्याकडे अनेक शिक्षकांनी आत्मदहन करण्याच्या परवानगीचे शासनाला पाठवलेल्या पत्रांच्या कॉपी आहेत, त्यांना आपण इच्छास्मरणाची परवानगी देणार आहात का? असा अत्यंत तिक्ष बाण सोडला. सभागृह गंभीर झाले. बी.टी. भाऊंच्या पाठीमागे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेचे सरकार्यवाह तथा तत्कालीन आमदार व्ही.यू.डायगव्हाणे व वसंतराव खोटरे उभे राहिले व त्यांना साथ देत त्यांच्या मागणीला पाठिंबा देत होते. मी अक्षरशा घाबरलो, ते एवढ्या करिता भाऊ अत्यंत आवेशात बोलत होते, हात वारे करीत होते. मला भीती वाटत होती भाऊंना काही होणार तर नाही ना? भाऊंची प्रकृती तर बिघडणार नाही ना? या काळजीपोटी भीती वाटत होती. परंतु बघता बघता सर्व सभागृह भाऊंच्या पाठीमागे उभे राहिले. विरोधी बाकावरचे ज्येष्ठ सदस्य एकनाथराव खडसे भाऊ उभे होते तिथपर्यंत आले. भाऊंची मागणी रास्त होती. सभागृहाची साथ मिळाली. अखेर शासनाला कायम शब्द मागे घेण्याचा शब्द सभागृहातच द्यावा लागला. त्यातही मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला. परंतु भाऊंची कुशाग्र बुद्धी कशी मानणार, लगेच त्यांनी पुढे प्रश्न केला. किती दिवसात कायम शब्द काढणार ते सांगा? तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी सभागृहात उत्तर दिले की हे अधिवेशन संपण्याच्या आत कायम शब्द काढणार.

कायम विनाअनुदानित शिक्षकांचा प्रश्न सुटला व त्यांना अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला, त्यामुळे महाराष्ट्रातील लाखो शिक्षकांचा प्रश्न सुटला. पुढे याचआधारावर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा सुद्धा कायम शब्द काढण्याचा मार्ग मोकळा झाला. या संपूर्ण सभागृहातील प्रश्न उत्तराचा मी स्वतः प्रेक्षक गॅलरीत उपस्थित असल्यामुळे प्रत्यक्ष साक्षीदार आहे व मी ती सभागृहातील भाऊंची चर्चा प्रत्यक्ष पाहून धन्य झालो. व धोरणात्मक प्रश्न कसे सुटतात हे मला तेव्हा कळले. शिक्षकांचे असे अनेक प्रश्न वैद्यकीय प्रतिपूर्ती, रजा प्रवास सवलत, पाचवा वेतन आयोग केंद्राप्रमाणे जसाचा तसा मिळवून घेणे असे कितीतरी प्रश्न मार्गी लावण्यात, बी.टी. भाऊंचा मोठा वाटा आहे. तो काळ असा होता मला आठवते सभागृह सुरू असताना टीव्ही. किंवा रेडिओवरील विधान परिषदेचे समालोचन ऐकण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी हे सायंकाळी टीव्हीवरील समायोजन पाहिल्याशिवाय राहत नसेल व तेव्हा टेलिव्हिजन वर बी.टी. भाऊंनी अमुक प्रश्न विचारला, मंत्र्यांना असे अडचणीत पकडले, शेवटी मंत्राला उत्तर द्यायला भाग पाडले व प्रश्न सोडवून घेतला अशा प्रकारची माहिती मिळत असे. शिक्षण क्षेत्राबरोबरच सिंचनाचा अनुशेष व शेतकऱ्यांचे प्रश्न हा भाऊंचा जिव्हाळ्याचा विषय होता. भाऊ जेव्हा सलग पाच टर्म म्हणजे तीन दशके सभागृहात काम करून सहाव्या टर्म साठी उभे होते, तेव्हा त्यापूर्वी एक दोन वर्षापूर्वी भाऊंनी अमरावती जिल्ह्यामधील अप्पर वर्धा धरणाचे शेतकऱ्यांचे पाणी इतर ठिकाणी वळवू नये व इतर काम असेल तर त्यासाठी दुसरी व्यवस्था करावी असा विचार मांडून शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी मोठे आंदोलन केले. सुरुवातीला जिल्ह्यातील सर्व आमदार त्यांच्या सोबत होते. परंतु हळूहळू वरूनच काय माशी जिंकली देव जाणे, बहुतेक आमदार त्या आंदोलनातून दूर होत गेले, परंतु भाऊंनी शेतकऱ्यांचा प्रश्न सोडला नाही. शेवटपर्यंत लढत राहिले. यातच शासनातील काही तत्कालीन पुढाऱ्यांनी भाऊंना पाठीमागून विरोध केला. मला एका प्रतिष्ठित यवतमाळच्या नेत्यांनी निवडणुकीच्या चार महिने आधी प्रत्यक्ष सांगितले होते की, सभागृहमधील काही पश्चिम महाराष्ट्रातील मोठ्या नेत्यांना भाऊ अडचणीचे वाटतात. त्यामुळे आपण सावध असावे. ही बाब मी प्रत्यक्ष भाऊंना सांगितली. परंतू भाऊ मोठ्या उंचीचे नेते. ते मला म्हणाले अरविंद आपण आपल्या कार्याशी प्रामाणिक राहावे व आपले कार्य करीत रहावे असे उत्तर दिले.

शेवटी निवडणुकीत सभागृहामध्ये भाऊंच्या प्रश्न विचारल्यामुळे अडचणीत येत होते. त्या मोठ्या नेत्यांनी भाऊचा पराजय कसा होईल याकरिता काम केले. भाऊंना याची कल्पना आली होती, परंतु भाऊ आपल्या विचारावर ठाम होते. शेवटी निवडणूक झाली. भाऊंचा पराजय झाला. पराजयानंतर भाऊंनी अमरावती विभागातील संघटनेच्या ३०-४० प्रमुख पदाधिकाऱ्यांची अमरावतीच्या विश्रामगृहात बैठक बोलावली. भाऊंसोबत अनेक वर्षापासून संपर्क असल्यामुळे व तत्कालीन जिल्हा कार्यवाह असल्यामुळे मी सुद्धा यवतमाळ येथील NUTA चे अध्यक्ष सांगळे सर यांच्यासोबत उपस्थित होतो. तेव्हा भाऊंनी स्वतः अंगावर काटा येणार असा किस्सा सांगितला. ते म्हणाले निवडणुकीच्या एक दीड महिना आधी मला मुख्यमंत्री साहेब अशोकराव चव्हाण यांनी चहा घेण्यासाठी बोलावले होते. चहा घेताना त्यांच्या दालनात ते मला म्हणाले, भाऊ तुम्ही आम्हाला सभागृहात हवे आहे. आमचे सरकार आघाडीचे आहे व आमच्या मित्रांना तुम्ही अडचणीचे वाटतात. त्यांचे असे म्हणणे आहे की, तुम्ही फक्त शिक्षणावर बोला शेतकऱ्यांचे प्रश्न, सिंचन हा विषय टाळावा. एवढे बोलता बोलता माझा चहा संपत आला होता. मी कप खाली ठेवता ठेवता माननीय मुख्यमंत्र्यांना एवढेच म्हणालो की, माझ्या जीवनात मी दोनच प्रश्नावर कार्य करीत आहे. एक शिक्षण आणि दुसरे शेतकऱ्यांचे प्रश्न, सिंचनाचे प्रश्न. यापैकी कोणताही विषय मी सोडणार नाही. मी सभागृहात राहिलो काय? न राहिलो काय? मला त्याची चिंता नाही.

सभागृहात पाचटर्म पूर्ण झाल्यानंतर जेव्हा त्यांच्या निरोपाचा कार्यक्रम झाला तेव्हा संपूर्ण सभागृह उभे राहून भाऊंना निरोप देत होते. ते पाहताना एक खंत वाटत होती की काही राजकीय नेत्यांनी एवढ्या मोठ्या उंचीच्या नेत्याला स्वतःच्या स्वार्थापोटी निवडणुकीत विरोध केला. परंतु भाऊ मात्र निवृत्तीनंतरही अत्यंत आनंदी होते.

# शिक्षणक्षेत्र, सामाजिक समस्यांचा जाणकार व राजकीय नैतिकतेचा अभेद्य चिरा काळाच्या पडद्याआड.......

**- डॉ.दिपक तुकाराम तायडे, माजी प्राध्यापक रसायनशास्त्र**

*शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, (स्वायत्त) अमरावती (तत्कालीन व्ही.एम.व्ही. अमरावती)*

लाइम लाईट, प्रसार माध्यमे तद्वतच राजकीय आणि व्यावसायिक मंच या सर्वांच्या पासून स्वतःला हेतू पुरस्सर दूर ठेवणारे श्रद्धेय आदरणीय कैवल्यवासी प्रा.बी.टी.देशमुख सर उर्फ भाऊ होते, म्हणूनच भाऊ नवीन पिढीसाठी अनभिज्ञ राहिलेत.

आजची नवीन पिढी, जे भाऊंना ओळखत नाहीत, ज्यांनी गलेलठ्ठ पैसे भरून भरपूर पगार असलेल्या प्राध्यापकाची नोकरी मिळविली, ज्यांना प्राध्यापकी आणि शिक्षकी पेशातील हा गलेलठ्ठ पगार दिसतो, त्यांना भाऊ समजले नाहीत. आणि जे भाऊंना ओळखतात पण ज्यांनी भाऊंच्या विधायक कार्याला विरोध केला, ज्यांनी भाऊंच्या सोबत राहून भाऊंच्या काड्या केल्यात, भाऊंच्या सोबत राहून भाऊंच्या पाठित खंजीर खुपसला आणि जातीयवादी बदनामी केली अशांना एकांतात खंत व लाज वाटावी म्हणून लेखणी उचलली आणि हा एक अल्पसा लेखन प्रपंच करतो आहे.

कै.प्रा.बी.टी.देशमुख उर्फ भाऊ हे अनेक पैलूंचे धनी होते या बद्दल दुमत नाही. अनेक पैलू मिळून भाऊ नावाच्या व्यक्तीमत्वाचा क्षीराब्धी महासागरावत स्वकर्तृत्वावर विकास झाला होता. त्यातील भाऊंच्या एका पैलूवर मी माझ्या परीने प्रकाश टाकाण्याचा खारीचा प्रयत्न करतो आहे. हा पैलू मी याकरिता निवडला कारण शैक्षणिक सत्र सन १९८७-८८ पासून माझ्या घरात मला आणि माझ्या आप्तेष्टांना जी भाकरी मिळत आहे ती मी स्वीकारलेल्या शिक्षकी पेशामुळे.

सन १९८७-८८ शैक्षणिक सत्रात मी अधिव्याख्याता (लेक्चरर) आताचा सहाय्यक प्राध्यापक म्हणून मोर्शी येथे रूजू झालो, त्यावेळी तिसरा वेतन आयोग (थर्ड पे) होता. बेसिक फक्त ७०० रूपये होते. किती पगार हाती यायचा याचा तुम्हीच विचार करावा.

त्याकाळात संस्थेच्या संचालकांच्या मधील काही संचालक चांगल्या स्वभावाचे समाजकारणी होते तर बहुतांश संचालक हे राजकारणी व जातीयवादी होते. पगार वेळेवर होत नव्हते. आमच्या आधी १५-२० वर्षांच्या अगोदर जे शिक्षकी-प्राध्यापकी पेशात आले होते त्यांनी तर आमच्याही पेक्षा दयनीय आणि विकट परिस्थितीचा सामना केलेला आहे. त्यांना मिळत असलेला अल्पसा आणि वेळेवर न मिळणारा पगार कॉलेज/शाळेमधून व्हायचा आणि प्राध्यापक/शिक्षक पगार घेण्यासाठी प्रबंधक/सुप्रिटेंडेंट/अकाउंटंट समोर लाईनमध्ये उभा राहायचे असे ते विदारक दृश्य होते. पगार देणारा बाबू हा संस्था चालकाचा कमी शिकलेला काडेल नातेवाईक असायचा. असा तो काळ तुमच्या नजरेसमोर येऊ द्या म्हणजेच तुम्हाला बी.टी. भाऊंच्या कार्याची महती कळेल आणि बी.टी. भाऊ नावाच्या सुनामीचे दर्शन होईल.

सांगायचे तात्पर्य येवढेच आहे की, सिनीयर कॉलेज/महाविद्यालयाचा प्राध्यापक आणि माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेचा शिक्षिक यांची आर्थिक परीस्थिती खूप हालाखीची, विकट व दयनीय होती. म्हणूनच या पेशातील लोकांच्या करिता त्याकाळी एक म्हण प्रचलित होती ती म्हणजे, “मागायची नसेल भीक तर मास्तरकी शिक” ही पत आपल्या सर्वांची होती. असा तो काळ होता. त्यावेळी कोणतीही नॅशनलाईज बँक आपल्या पेशातील लोकांना दरवाज्यात सुद्धा उभे करत नव्हते, नॅशनलाईज बँकेचे लोन तर शिक्षकी पेशातील शिक्षक-प्राध्यापकांच्या करिता स्वप्नवत बाब होती. अशा हालाखीच्या काळात श्री.भाऊराव तुळशीराम देशमुख यांनी प्राध्यापकी पेशा स्वीकारला आणि आपल्या पेशाला असलेल्या दलिंदरीच्या पतनाला सुरूवात झाली.

आता भाऊंची थोडक्यात कारकीर्द बघूः अमरावती जिल्ह्यातील चांदुर बाजार जवळच्या बेलोरा खेड्यातून युवा अवस्थेतील नुकतेच मिसरूड फुटलेले उंच, सडपातळ बांध्याचे पण काटक देहयष्टिची श्री.भाऊराव तुळशीराम देशमुख नावाचे युवक अमरावतीला जवळपास ८० वर्षांपूर्वी आलेत. काळाच्या ओघात पुढे ह्याच श्री.भाऊराव तुळशीराम देशमुखांनी प्रामाणिकपणे आणि अभ्यासपूर्वक कार्य करत स्वयंप्रकाशाने महाराष्ट्रातील जनमानसांमध्ये आदराने प्राध्यापक बी.टी.देशमुख उर्फ भाऊ म्हणून नावलौकिक प्राप्त केला.

ज्यावेळी भाऊ अमरावती येथे आलेत त्यावेळी भाऊंची परीस्थिती जेमतेम होती. त्यांना बाकीच्यांच्या प्रमाणे कोणत्याही प्रकारचे कौटुंबिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक वारसा किंवा वलय भाऊंना नव्हते आणि कुणीही गॉड फादर नव्हता. जीवनभर खडतर प्रवास आणि संघर्ष करतच भाऊंनी स्वकर्तृत्वावर स्वतःला सिध्द करून इतिहास रचत स्वतंत्रपणे भाऊ नावाचे पर्व महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात उदयरूपास केले.

भाऊंनी अमरावतीला आल्यावर अमरावती मधूनच प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक हिंदुस्थान वृत्तपत्रामध्ये मुद्रितशोधकाचे काम करत स्वतःच्या कारकीर्दीचा श्री गणेशा केला. नंतर भाऊंनी शिवाजी महाविद्यालय, अमरावतीमध्ये राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून शैक्षणिक क्षेत्रात पहिले पाऊल ठेवले. लवकरच भाऊ राज्यशास्त्र विषयाचे महर्षी, संविधानाचे आणि कायद्याचे गाढे अभ्यासक व जाणकार, चारीत्र्य संपन्न, शिस्तबद्ध उत्कृष्ट प्राध्यापक व नैतिकतेचा महामेरू म्हणून भाऊ सर्व परीचित झाल्याने, भाऊ प्राध्यापकांचा नेता बनून विधानपरिषद मध्ये MLC सदस्य झालेत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये भाऊंचा सिंहांचा वाटा असून त्यावेळी स्व.यशवंतराव चव्हाण सारख्या सह्याद्रीचा सिंह म्हणून भारताच्या राजकारण ज्यांना ओळखले जायचे अशा दिग्गज स्व.यशवंतराव चव्हाण आणि इतर सुसंस्कृत लोकनेत्यांना भाऊंची दखल घेणे भाग पडले.

प्राध्यापक असताना भाऊंनी आपल्या पेशा सोबत कधीच प्रतारणा केली नाही, कधीही तासाला एक मिनिट सुद्धा उशिर केला नाही. राज्यशास्त्र विषयाचे गाढे अभ्यासक, चरीत्र संपन्न, नैतिकवान, अत्यंत शिस्तबद्ध व विद्यार्थी प्रिय प्राध्यापक अशी भाऊंनी स्वतःची ओळख निर्माण केली.

अभ्यासपूर्ण विषय मांडण्याची पद्धत, सचोटी आणि संघटन कौशल्य भाऊंच्या मध्ये असल्याने ते प्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष झालेत आणि नंतर नागपूर विद्यापीठाच्या महत्त्वाच्या अनेक प्राधिकरणांवर यशस्वीपणे कार्य केले. त्यावेळी नागपूर विद्यापीठ होते. नागपूर विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आणि काम वाढल्याने अमरावती विद्यापीठाची निर्मिती झाली. अमरावती विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासामध्ये आणि मॉडेल विद्यापीठ बनविण्यात भाऊंचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे म्हणूनच भाऊ खरे ज्ञानयोगी व कर्मयोगी ठरलेत. भाऊ शिक्षण क्षेत्रात आल्यावर तथा आमदार झालेले असताना त्यांनी शिक्षणक्षेत्रातील कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापकांना सन्मानाचे जगणं प्राप्त करून दिले. रोखठोक, स्पष्टोक्ता, अभ्यासू व कर्मयोगी आमदार म्हणून विधानपरिषदेत भाऊंनी स्वतःचे वर्चस्व, दरारा व दबदबा निर्माण केला म्हणूनच भाऊंना उत्कृष्ट संसदपटू म्हणून सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक क्षेत्राच्या कार्याच्या व्यतिरिक्त भाऊंनी विदर्भाच्या सिंचन अनुशेषाचा प्रचंड अभ्यास केला, शेती आणि सामाजिक भान याकरिता भाऊंचा संघर्ष आणि जगाच्या पोशिंद्या-बद्दलची आत्मियता, तळमळ, कळकळ व कार्य बघून जनसामान्यांनी भाऊंना 'सिंचन अनुशेष निर्मूलन महर्षी' या उपाधीने गौरवान्वित केले. रखडलेल्या अप्पर वर्धा धरणाची निर्मितीचे काम भाऊंच्या अथक परिश्रमामुळेच पूर्णत्वास गेले. त्यामुळे सिंचना सोबतच मोर्शीच्या आजूबाजूचा परीसर आणि अमरावतीकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी भाऊंनी मिटविला.

भाऊ विधानपरिषदेत आमदार असताना स्वतःच्या आमदारकीचा वापर संवैधानिक पद्धतीने करत असत. भाऊंनी सभागृहाची गरीमा जपली. भाऊ सभागृहात लक्षवेधी किंवा प्रश्न मांडत असताना प्रचंड आक्रमक होत असत पण कधीही असंवैधानिक भाषेचा वापर भाऊंनी केलेला नाही आणि कुणावरही वैयक्तिक टीका भाऊंच्या ३० वर्षांच्या आमदारकीच्या कारकिर्दीत आणि वैयक्तिक जीवनात कधीच घडली नाही हेच भाऊंचे थोरपण, नैतिकता आणि घरंदाजपणा दर्शवून जाते. ज्यावेळी भाऊ सभागृहात अभ्यासपूर्ण प्रश्न मांडायचे त्यावेळी सभागृहातील तत्कालीन, सभापती, मुख्यमंत्री, कॅबिनेट मंत्री, आमदार व सेक्रेटरी

मंत्रमुग्ध होऊन सर्व ऐकत असत. मंत्र्यांना व प्रशासनाला सुद्धा भाऊ अभ्यासपूर्वक समस्यांच्या प्रश्नांनी घाम फोडत असत म्हणूनच सर्वांना भाऊंचा धाक वाटत होता. भाऊंनी अशा प्रकारे निस्पृह नैतिक वजन कमावले होते. सभागृहात आणि खाजगी जीवनात सुद्धा भाऊंचा भाषेवरील तोल कधीही सुटला नाही आणि असंवैधानिक भाषेचा वापर भाऊंनी शेवट पर्यंत केला नाही.

भौतिक सुख सुविधांचे भाऊंना कधीही आकर्षण वाटले नाही किंवा कधीही भाऊंनी लाइम लाईटमध्ये राहण्याचा प्रयत्न केला नाही. बऱ्याच योग्य ठिकाणी त्यांना मिळत असलेला आमदार विकास निधी सहजपणे उपलब्ध करून दिला पण कुठेही त्याचा साधा उल्लेखही नाही किंवा वाच्यता केली नाही. त्याचप्रमाणे केलेल्या विकास कामांचे भूमिपूजन वा लोकार्पण समारंभात भाऊ हजर राहिले नाहीत. स्वतःची प्रसिद्धी व्हावी असे भाऊंना कधीही वाटले नाही. असे अजब अवलिया रसायन म्हणजे भाऊ होते. निवडणुकीच्या प्रचारासाठी त्या कार्यक्षेत्रातील मतदार योगदान निधी जमा करून भाऊंचा प्रचार करत. प्रचार करताना कुठेही बडेजाव होत नव्हता. प्रचार करताना भाऊ फक्त आपली भूमिका स्पष्ट करायचे. प्रचाराचे वेळी बाहेरील जेवण नाही. भाऊंपासून प्रत्येकजण आपापल्या घरून दोन्ही वेळेचा डबा सोबत घेऊन प्रचाराकरिता निघायचे. असा तो काळ आम्ही याची देही याची डोळा हे बघितलेला आहे. अशा प्रकारे सातत्याने पाच वेळा भाऊंनी निवडणूक जिंकली. त्याकरिता प्रत्येकाचे समर्पण आहे याची जाण व भान भाऊ ठेवून होते. भाऊंनी वैयक्तिक प्रश्नांना कुठेही थारा न देता सार्वत्रिक हिताचे अनेक प्रश्न विधानपरिषदेमध्ये मांडून ते यशस्वीपणे सोडविण्यासाठी जीवाचे रान केले. ३० वर्षांच्या त्यांच्या आमदारकीच्या काळात त्यांनी स्वतःला व आप्तेष्टांना झगमगाट व लाभापासून सदैव दूर ठेवले होते. आमदार असताना मुंबईला जात असताना कोणत्याही प्रकारचा बडेजाव नाही. सामान्य नागरिकांच्या प्रमाणे स्वतःच्या पैशाने जायचे आणि विधानपरिषद गाजवून आणि वाजवून परत यायचे. बडनेरा रेल्वे स्टेशनवर आल्यावर सिटी बस किंवा ॲटोने घरी यायचे असा हा अजब रसायनाचा साधा देवमाणूस होता. दिनांक १९ जुन २०२६ रोजी भाऊंनी इहलोकीचा शेवटचा श्वास घेतला आणि एक उच्च कोटीचे भाऊ नावाचे पर्व काळाच्या प्रवाहात विलीन झाले.

आता जरा सविस्तर बघू: भाऊ हे उच्च कोटीचे शिक्षक, ज्ञानमहर्षी, मूर्तीमंत गाढे अभ्यासक आणि नैतिकतेचे महामेरू होते. भाऊ अभ्यासू प्राध्यापक, उत्तम संघटक आणि कायदे तज्ज्ञ होते त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक वलय आणि दरारा सर्वांच्यावर तयार झाला होता. प्राध्यापकी पेशात भाऊ असताना अनेक प्राध्यापक भाऊंनी स्वीकारलेल्या प्राध्यापकी पेशातील ढब आणि अभ्यासपूर्ण भाषण ऐकत ऐकतच शैक्षणिक क्षेत्राची बलस्थाने व प्रतिष्ठा समजत होते व सर्व शिकत होते आणि स्वतःला बनवित होते. विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षणक्षेत्र यांची प्रतिष्ठा कशी जोपासावी हे भाऊंच्या कडून बरीच मंडळी शिकलीत. शिक्षक/ प्राध्यापक कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भाऊ होते. शिक्षणक्षेत्रातील शिक्षक आणि प्राध्यापक तत्कालीन परिस्थितीने आणि आर्थिकतेने पीडित आणि ग्रस्त होते त्यामुळेच प्रा.बी.टी.देशमुखांमध्ये सर्वांना प्राध्यापकी पेशातील मसीहा दिसला. मग शिक्षण क्षेत्रातील सर्व मंडळींचे एकसंघ नुटा नावाने संघटन तयार झाले. सर्वांनी मिळून भाऊंना नुटाचे प्रथम संस्थापक अध्यक्ष बनविले. भाऊ प्रथमतः सन १९९६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून गेले. ते अमरावती शिक्षक मतदारसंघ येथून अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आले होते. त्यांचा पहिला कार्यकाळ १९९६ ते २००२ असा होता. त्यानंतर ते याच शिक्षक मतदारसंघातून आणखी चार वेळा निवडून आले आणि एकूण पाच वेळा विधानपरिषद सदस्य (MLC) राहिलेत. त्यांच्या कार्यकाळातच सर्व शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा पगार नियमितपणे नॅशनलाईज बँकेतून व्हायला लागला. त्याचे संपूर्ण श्रेय भाऊंचे आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षणक्षेत्र यांची प्रतिमा व प्रतिष्ठा याकरिता भाऊंनी जीवाचे रान केले, घरावर तुळशीपत्र ठेवून विद्यापीठ ते यू.जी.सी. मध्ये जीवनभर आणि ३० वर्षे आमदार असे पर्यंत विधानपरिषदेत सतत संघर्ष करीत राहिलेले भाऊ होते म्हणूनच येवढ्या चांगल्या प्रकारचा चवथा, पाचवा आणि सहावा वेतन आयोग शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापकांना मिळाला म्हणूनच आपल्या सर्वांना हे सुगीचे दिवस दिसत आहेत. याचे संपूर्ण श्रेय भाऊंचे आहे. हे भाऊंच्या विरोधकांना सुद्धा मान्य करावे लागेल. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते दिनांक १९-६-२०२६ पर्यंत हे विद्यापीठ अधिक सुंदर आणि समाजाभिमुख व्हावे यासाठी भाऊंनी सातत्याने प्रयत्न आणि उपाय केलेत. मागील रेजीम मध्ये मी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ॲकडेमीक काऊन्सिलचा मेंबर होतो. त्यावेळी तत्कालीन कुलगुरू डॉ.मालखेडे सर यांनी आमच्या रेजीमच्या शेवटच्या मिटिंगच्या वेळी स्नेह भोजनाचे आयोजन केले होते आणि प्रत्येकांनी आपले मत व्यक्त केले त्यावेळी संपूर्ण जीवनभर नुटा विरोधक राहिलेले प्रा.डॉ.दिनेश सूर्यवंशी यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची प्रगती आणि वाटचाल यावर मत नोंदवताना असे म्हटले होते की, "भाऊंनी विद्यापीठाच्या जडणघडण, प्रगतीमध्ये सिंहांचा वाटा आहे, भाऊ उच्चकोटीचे शिक्षणतज्ज्ञ व प्राध्यापकांचे भाग्यविधाते आहेत यात दुमत नाही पण राजकारणात विरोध करावा लागला याची खंत सुद्धा याच सभागृहात व्यक्त करतो." सॅल्युट टू यू प्रा.दिनेश सूर्यवंशी!!! समोर विरोध करणारे खरंच चांगले असतात पण सोबत राहून सर्व प्राधिकरणावर काम करून पाठित खंजीर खुपसणारे भयंकर पाताळयंत्री असतात.

भाऊ ज्यावेळी विधानपरिषदेत आपले अभ्यासपूर्ण मत मांडायचे त्यावेळी सभागृहातील राजकारणी मंत्रमुग्ध होऊन सर्व ऐकत असत, म्हणूनच त्याकाळात राजकारणातील धुरंधर मा.शरदचंद्र पवार आणि त्यांच्याच प्रमाणे इतर मातब्बर राजकारणी यांनी त्यांच्या त्यांच्या पक्षात भाऊंनी यावे याकरिता अनेक प्रस्ताव व आमिषे भाऊंना देण्याचा प्रयत्न केला पण निश्चयाचा महामेरू व स्व-स्वार्थासाठी कधीही आपल्या मतदारांचा विश्वासघात करायचा नाही यावर अढळ राहून सर्वच आमिषे नाकारणारे अभेद्य राजकारणी प्राध्यापक भाऊच होते. हे इथे प्रकर्षाने नमूद करणे आवश्यक आणि गरजेचे आहे. तत्कालीन सर्व धुरीण राज्यकर्त्यांसोबत भाऊंचे अत्यंत स्नेहाचे संबंध होते, पण भाऊंनी साधी एखादी शाळाही स्वतः करिता किंवा आप्तेष्टांच्या करिता मंजूर करून घेतली नाही, हेच भाऊंचे थोरपण सांगून जाते. कोणत्याही प्रकारच्या आमिषांना बळी न पडता नैतिकता आणि प्रामाणिकता जोपासणारे सच्चे देशभक्त भाऊ होते. आज भारतीय राजकीय वातावरण अत्यंत दर्जाहीन झाले आहे, त्याची सुरुवात भाऊंच्या सहाव्या विधानसभा निवडणुकीत आम्ही अनुभवले आहे. त्याकाळात पिण्याचे पाणी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी जे सिंभोरा-मोर्शी येथे सिंभोरा धरण बांधल्या गेले त्यातील पाणी सोफीयाला पॉवर स्टेशन करिता नाही म्हणून सोफीया प्रकल्पाला भाऊंनी कडाडून विरोध केला, आंदोलन केले आणि शेवट पर्यंत भाऊ मॅनेज झाले नाही पण भाऊंच्या सोबत असलेले सर्व पिसाळांची औलाद भाऊंना मध्येच सोडून गेलेत. भाऊ पुन्हा निवडून आलेत तर प्रकल्पाला विरोध होईल आणि प्रकल्प पूर्ण होणार नाही ह्या भीतीमुळे भाऊ निवडणूक हरले पाहिजे म्हणून तत्कालीन राजकारणी आणि उद्योजकांनी साम, दाम, दंड, भेद या समस्त तत्त्वांचा उपयोग केला आणि विशेष म्हणजे त्यांना मदत केली ती म्हणजे आमच्याच शिक्षणक्षेत्रातील पिसाळांची औलाद व फक्त स्वहित जपणारी जमातीने ह्या सर्व बाबी भाऊंच्या पराभवासाठी कारणीभूत ठरल्यात. राजकारण येवढ्या खालच्या थराला नेल्या गेले की प्रचारात देशमुख-पाटील हा वाद सुद्धा घुसविल्या गेला. ज्यामुळे भाऊ खूप व्यथित झाले आणि भाऊंचा पराभव झाला. भाऊंनी तो पराभव हसत हसत मान्य केला, पण मॅन, मनी आणि मसल हे सूत्र कधीही मान्य केले नाही आणि राजकीय संन्यास स्वीकारला असे निश्चयाचे महामेरू निष्कलंक आणि चारीत्र्य संपन्न आमदार औषधाला मिळणे सुद्धा दुर्मिळच आहे. आज प्रकर्षाने भाऊंच्या प्रमाणे आमदार स्व.एन.डी.पाटील, आमदार कॉ. भाई मंगळे, खासदार कॉ. सुदाम काका अशा निस्पृह राजकारण्यांची आठवण येते. यातील प्रत्येकाचे कार्यक्षेत्र अलग अलग आहे पण भाऊ मला ह्या तिघांच्या तुलनेत सरस वाटता कारण भाऊंनी अनेक कार्यक्षेत्रात कामे केलीत आणि सोफीया प्रकल्प सोडून प्रत्येक क्षेत्रात भाऊंनी यश खेचून आणले त्यामागील कारण म्हणजे भाऊंचा शुद्ध हेतू आणि निर्हेतूक, निर्भेळ प्रयत्न व कामांच्या पूर्ततेसाठी आवश्यक अशी तपश्चर्या होय. संपूर्ण अभ्यास आणि जीवतोड होमवर्क करूनच भाऊ विधानपरिषदेच्या सभागृहात उतरत असत.

सर्वसामान्यांनी नेहमीच भाऊंच्या विषयी एक बिनबुडाची ओरड आणि भाऊंच्या वर आरोप केला; तो म्हणजे भाऊंनी नुसते प्राध्यापकांच्या करीताच कार्य करून त्यांचे हित जोपासले. त्यांना मी सांगू इच्छितो की, शिक्षकांचा आमदार सभागृहात असताना त्यांना सर्वतोपरी भाऊंनी मदत केली आणि कर्मचाऱ्यांनी स्वीकारलेले प्राधिकरण व त्यासाठीची असलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार संविधानिक पद्धतीने पगार यात भाऊंचा काय दोष होता. इथे मी हे पण नमूद करतो की, शेती व शेतकरी यांचे प्रश्न, विदर्भातचा अनुशेष भरून काढण्यासाठी भाऊंचा राजकीय आयुधांचा पुरेपुर वापर करत महाराष्ट्र राज्य सरकारला वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यास भाग पाडले म्हणूनच वैधानिक विकास मंडळाचे जनक म्हणून भाऊंना ओळखल्या जाते. वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून करोडो रुपयांची विकासात्मक कामे भाऊंनी करून घेतली, त्यापैकी एकही रुपयाचे कमीशन भाऊंनी घेतले नाही किंवा कुणाला घेऊ दिले नाही आणि आपल्या कोणत्याही जवळच्या माणसाला एखादा ठेका देण्याचा प्रयत्न सुद्धा केला नाही!. एवढी नैतिक शक्ती जोपासणारे फक्त भाऊच होते. नैतिकता ठेवून सभागृहात बसणारा अभ्यासू संसदपटू, निष्कलंक व चारित्र्य संपन्न आमदार, सिंचन अनुशेष निर्मूलनाचे महर्षी, हाऊस मध्ये मंत्र्यांनी दिलेला शब्द त्यांना पाळण्यासाठी भाग पाडणारे वन मॅन आर्मी अजातशत्रू

राजकारणी भाऊच होते. आज अमरावती, यवतमाळ, पांढरकवडा, देऊळगाव राजा आदी अनेक शहरांना जो पाणीपुरवठा होतो त्यासाठी भाऊंनी किती कष्ट घेतले हे नजरेआड करता येणार नाही. कारण अप्पर वर्धा प्रकल्पातून मोर्शी आजूबाजूचा परिसर आणि अमरावती करांच्या पाण्याचा प्रश्न सोडविणारे भाऊच आहेत आणि पश्चिम विदर्भातील शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची सोय करणारे भाऊच आहेत. शेती, शेतकरी, आरोग्य व प्रदुषण या कारणांमुळे भाऊंनी सोफीया प्रकल्पाला शेवटपर्यंत विरोध केला त्यावेळी भाऊंच्या सोबत असलेले बाकीचे आमदार तथा खासदार मधेच साम, दाम, दंड, भेद याला घाबरून व मलिदा खाऊन भाऊंना आंदोलनात एकटेच सोडून निघून गेलेत (आताच्या घडीला तर भारताच्या राजकारणात त्याचा महापूर आला आहे.) आणि भाऊ सोफिया प्रकरण आणि सोबत असलेल्या पिसाळाच्या औलादिंमुळे भाऊ राजकारण पराभूत झाले. भविष्यात सोफीया प्रकल्पाचे दुष्परिणाम, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि शेती सिंचनाचा अनुशेष दिवसेंदिवस कसा वाढत जाईल हे पश्चिम विदर्भातील येणारी नवीन पिढी नक्कीच बघणार आहे..........!!! वरील सर्व कामे प्राध्यापकांच्या साठी नसून सर्वांच्या करिता आहेत. शेतकरी व शेती यांच्या न्यायासाठी कधीच तडजोड न करणारे नैतिकतेचे महामेरू, महाराष्ट्रप्रेमी आणि देशप्रेमी भाऊ आहेत.

भाऊंच्या बाबतीत पुन्हा आरोप केला जातो तो म्हणजे माझे वैयक्तिक काम केले नाही, मला नुटाचे तिकीट दिले नाही, भाऊंनी भेदभाव केला वगैरे वगैरे.........

हे १०० टक्के सत्य आहे की, भाऊंनी एकही वैयक्तिक काम केले नाही. कुणाच्या नोकरी करीता किंवा कुणाला कामाचे टेंडर मिळावे म्हणून कुठेही शब्द टाकला नाही. कुणाला शाळा/कॉलेज मिळून देण्यासाठी प्रयत्न केले नाही. कुणाची बदली रद्द करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत, पण एखाद्याच्या वैयक्तिक कामातून सर्वांचे भले होत असेल तर ते काम भाऊंनी केलेले आहे. जसे की उदाहरणार्थ प्रा.किशोर फुलेनी पहिली नोकरी सोडली आणि प्राध्यापक म्हणून रूजू झालेत. नवीन पदावर प्रा.किशोर फुले सन २००५ नंतर रूजू झाले. अंशदान योजना सन २००५ पासून सुरू झालेली होती. त्यामुळे सुरुवातीला मिळत असलेल्या पेन्शन योजनेचा लाभ फुलेंना नवीन नोकरीमध्ये मिळणार नव्हता. हा प्रश्न नुसता फुले करिता मर्यादित नसून विविध प्रकारच्या कार्यक्षेत्रात नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत होता आणि त्यांच्या वर अन्याय होणार असा तो शासन निर्णय होता. हे जेंव्हा भाऊंच्या लक्षात आले आणि ही समस्या फक्त किशोर फुलेंचीच नसून प्रत्येक विभागात ही समस्या उद्भवणार आहे, म्हणून भाऊंनी हा प्रश्न विधानपरिषदेत मांडून त्यावर मार्ग काढण्यासाठी सरकारला बाध्य करून भाग पाडले. त्याचाच परिपाक म्हणून २००५ मध्ये शासनाला एक शासन परीपत्रक काढावे लागले आणि नंतर पुन्हा शुद्धिपत्रक काढण्यात आले, ज्यामुळे जुन्या नोकरीमध्ये ज्यांना पेन्शन मिळत होते आणि त्यांनी जर नवीन पदावर सन २००५ नंतर जरी नियुक्ती स्वीकारली तरी अगोदरच्या नोकरीची सेवा विचारात घेऊन ती नवीन सेवेला जोडून नवीन पदावर सुद्धा त्या कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू राहते. हे भाऊंचे आमदारकीच्या कारकिर्दीत नोकरदारांच्या करिताचे योगदान आहे अशा सार्वजनिक हितासाठी भाऊंनी स्वतःच्या आमदारकीच्या कारकीर्दीचा पुरेपूर उपयोग केला. हे काम जरी वरवर वैयक्तिकपणे प्रा.किशोर फुलेंचे दिसत असले तरी ते वैयक्तिक नव्हते तर फुले फक्त निमित्त असून प्रत्येक विभागातील कर्मचाऱ्यांना Maharshtra Civil services (1982) पेन्शन हा एक हक्क आहे आणि तो मिळवून देण्यासाठी भाऊंनी प्रयत्न केलेत. दुसरे उदाहरण द्यायचे झाल्यास शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रमाणे ज्या ज्या प्राधिकरणाला शासन अनुदान (ग्रँड) देते अशा संस्था, शाळा, कॉलेजेस, आश्रम शाळा यातील नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आणि शिक्षक प्राध्यापक यांना सुरुवातीला पेन्शन योजना लागू नव्हती ती मिळण्यासाठी नुटा संघटनेने म्हणजेच भाऊ आणि सहकारी मित्रांनी हाय कोर्टात याचिका दाखल केली आणि हाय कोर्टात जिंकल्यानंतर शासन सुप्रीम कोर्टात गेले पण तिथेही भाऊंच्या अभ्यासपूर्ण पिटीशन दाखल करण्यासाठी आवश्यक त्या संदर्भामुळे प्राध्यापकच विजयी ठरले आणि शासनाला शेवटी दिनांक १२-ऑगस्ट-१९९९ मध्ये शासन निर्णय निर्गमित करावा लागला ज्यामुळे सर्वांना पेन्शन योजना लागू झाली. असे कितीतरी उदाहरणे आणि दाखले भाऊंच्या कामाविषयी देण्यात येतील. हे केलेले काम फक्त प्राध्यापकांच्या पुरते मर्यादित नाही. जर प्रत्येक प्राधिकरण आणि विभागासाठी आमदार निवडल्या जातात तर प्रत्येक काम भाऊंनीच करावे याचे आत्मनिरीक्षण व आत्मपरीक्षण अशांनी करणे आवश्यक व गरजेचे आहे.

भाऊंच्यावर दुसरा आरोप केला जातो तो म्हणजे भाऊंनी उत्तराधिकारी तयार केला नाही? आणि भाऊ जातीयवाद करतात !!!??? त्यावर मला हेच सांगायचे आहे की बोट धरून उत्तराधिकारी तयार केल्या जात नसतात. एक म्हण इथे नमूद कराविशी वाटते, "घातल्या पाण्याने गंगा वाहत नसते" भाऊंच्या सोबत राहून बरेच उत्तराधिकारी तयार झालेत पण त्यांच्यात काही ना काही तरी सूक्ष्म अयब राहिलेत ते भाऊंच्या चाणाक्ष नजरेतून सुटले नाहीत. या सर्व कलंदर धुरंधरांना ज्यांनी बघितलेले आहे आणि त्यांचा इतिहास बघूनही जर कोणी म्हणत असेल की भाऊंनी उत्तराधिकारी तयार केला नाही तर त्यांचा मला राग येत नाही तर त्यांच्या लकवा मारलेल्या बुद्धीची कीव करावीशी वाटते की बुद्धीने किती अपंग आणि पैदल आहे हा सद्-ग्रहस्त. पुन्हा एक मुद्दा असा येतो की भाऊ जातीयवादी आहेत !!! त्यावर मी असे म्हणेल की हा तर मुर्खपणाचा कळसच आहे. भाऊ जातीयवादी नसून रत्नपारखी होते, म्हणूनच नुटा मधील ज्येष्ठांना डावलून जो सर्व प्राध्यापकांना आपल्यासोबत घेऊन जाणारा, अभ्यासू, निस्वार्थी, कुठेही तडजोड न करणारा, निडर, नॉट मॅनेजेबल उत्तराधिकारी म्हणून भाऊंनी डॉ.प्रवीण रघुवंशी यांच्यात बघून त्यांना स्वतः नंतर नुटाच्या अध्यक्षपदी बसून सर्व सुत्रे त्यांना दिलीत, यात कुठे आला जातीयवाद !!!???. डॉ प्रवीण रघुवंशींच्या अध्यक्ष बनण्याने काही मंडळी नाराज झाली, नुटा सोडून गेली, पण भाऊंच्या तालमीत तयार झालेले डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी यशस्वीपणे पुनश्च नुटा संघटनेची वज्रमूठ बांधली. अशा कितीतरी प्रसंगांवरून भाऊ जातीयवादी नव्हे तर रत्नपारखी होते हेच दिसून येते. डॉ.प्रवीण रघुवंशी नुटाचे अध्यक्ष झाल्यानंतर कधीच डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी घेतलेल्या निर्णयांमध्ये हेरफेर किंवा लुडबुड भाऊंनी केली नाही. तेवढा विश्वास आपल्या उत्तराधिकाऱ्यावर असणे यातच प्रा.प्रवीण रघुवंशी यांची महती समजते. भाऊ स्थितप्रज्ञ होते.

भाऊंच्या बाबतीत लिहण्यासाठी लेखणी उचलली तर कोणत्या ठिकाणाहून सुरूवात करावी हे लेखनीला सुद्धा कळत नाही. लेखणी सैरावैरा उधळते कारण भाऊंना शब्दांच्या कोणत्याही चौकटीत लेखणी बसुच शकत नाही शब्द थिटे पडतात असे उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे धनी भाऊ होते.

अशा सर्वगुणसंपन्न भाऊंचा इहलोकीची अखेरचा श्वास सुध्दा समाधानाने घेतला गेला. कारण भाऊ नावाचे व्यक्तिमत्त्व येवढे पवित्र आणि स्फटिकावत होते की, अंतिम घटकेला त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाही किंवा कुणालाही भाऊंचा त्रास झाला नाही. दिनांक १९-जुन-२०२६ रोजी नियमित दिनचर्येत नुसार भाऊंनी स्विमिंग केले, व्यवस्थित न्याहरी (नाश्ता), जेवण, वाचन, दिवसभराचे रुटिन वर्क केले, संध्याकाळी ५.३० पर्यंत डॉ.प्रवीण रघुवंशी सोबत २१ तारखेला होऊ घातलेल्या कार्यक्रमाबद्दल चर्चा केली. नंतर रूटिन वर्क, संध्याकाळी जेवण करून ७.३० वाजेपर्यंत खुर्चीवर वाचन केले. जवळपास आठ वाजता भाऊ आराम करण्यासाठी पलंगावर लेटलेत. त्याच सुमारास श्री.मिलिंद भाऊ चिमोटे भाऊंना भेटायला यायचे त्यांचाही तो नित्यक्रमच होता. दरवाज्यात येत असताना फोन केलेत, भाऊंनी उचलले नाहीत म्हणून आत जाऊन बघतात तर भाऊ इहलोकीचा प्रवास संपवून शांत झाले होते.

भाऊंच्या बाबतीतील दुःखदायक घटना लगेच माहीत झाल्याबरोबरच डोळ्यांच्या समोर एक-दिड महिन्यांच्या अगोदरचा नागपूरचा प्रसंग स्मृती पटलावरून सरकला तो असाः डॉ प्रशांत जगताप यांच्या विवेका हॉस्पिटलमध्ये रूटिन चेक अप करता भाऊ आले असताना भाऊंच्या तालमीत तयार झालेले भाऊंचे सैनिक श्री.मिलिंद भाऊ चिमोटे आणि डॉ.प्रवीण रघुवंशी सोबत होते. डॉ.प्रवीण रघुवंशींचा मला फोन आला भाऊ दवाखान्यात आहेत, भाऊंना भेटायला मी गेलो असता माय-पणाने आम्हा समस्त कुटुंबीयांची प्रेमाने, आपुलकीने आणि आत्मीयतेने विचारपूस करणारे आधारवड भाऊच होते.

साधी राहणी उच्च विचारसरणी, तत्त्वनिष्ठ, तत्त्वांच विद्यापीठ, खरे ज्ञानयोगी, हाडामासाचा विद्यार्थीप्रिय शिक्षक-प्राध्यापक भाऊंच्या मध्ये ठासून ठासून भरलेला होता. निष्ठा, प्रामाणिकपणा आणि नैतिकतेचे ब्रँड म्हणजेच बी.टी. भाऊ होते.......

इथेच आपल्या विचारांच्यापुढे, निस्पृह कार्यांच्यापुढे, नैतिकतेच्यापुढे आम्ही नतमस्तक होतो, तिथेच कर आमुचे जुळती! त्रिवार मानाचा मुजरा!

लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारे हात निर्ढावत असताना आपण मात्र आता आमच्यात राहणार नाहीत ही कल्पनाही फार क्लेशदायक आणि सत्य आहे.

कुणाचा विठ्ठल तर कुणाचा दत्तात्रय, कुणाचा भाऊ तर कुणाचा आधारवड आणि नुटा संघटनेचा अजातशत्रू सर्वांना पोरका करून गेला.

आदरणीय कैवल्यवासी बी.टी.भाऊ आपले कार्य व विचारास त्रिवार वंदन, विनम्र अभिवादन व आदरांजली अर्पण करतो.

भाऊ अखेरचा दंडवत!

# ज्ञानयोगी, शिक्षकांचे भीष्मपितामह आणि विदर्भ विकासाचे दीपस्तंभ : मा.प्रा.बी.टी.देशमुख

**- प्रा.डॉ.प्रशांत विघे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख**
**भारतीय महाविद्यालय, अमरावती मो. ९३२६८७७७४९**

महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एक तेजस्वी पर्व आज संपले आहे. शिक्षण क्षेत्रातील भीष्मपितामह, शिक्षकांचे लाडके नेते, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेचे (NUTA) शिल्पकार, विदर्भाच्या विकासासाठी आयुष्यभर झटणारे अभ्यासू लोकप्रतिनिधी आणि माजी आमदार मा. प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक महान विचारवंत, समाजधुरीण आणि मूल्यनिष्ठ नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक व्यक्ती हरपलेली नाही, तर ज्ञान, शिस्त, संघर्ष, प्रामाणिकपणा आणि लोकहिताची एक समृद्ध परंपराच काळाच्या पडद्याआड गेली आहे.

प्रा.बी.टी.भाऊ उर्फ भाऊराव तुळशीराम देशमुख यांचे संपूर्ण आयुष्य शिक्षण, समाजकारण आणि जनसेवेला समर्पित होते. शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी, कर्मचारी, पदवीधर आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी आयुष्यभर सातत्याने संघर्ष केला. सार्वजनिक जीवनात अभ्यास, नैतिकता आणि लोकहित यांची सांगड कशी घालावी, याचा त्यांनी आदर्श महाराष्ट्रासमोर ठेवला.

अमरावती जिल्ह्यातील बेलोरा या छोट्याशा गावातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या थोर व्यक्तिमत्त्वाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. विद्यार्थी जीवनापासूनच त्यांच्यात नेतृत्वाची बीजे होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यानंतर श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना घडविले.

शिक्षकांवरील अन्यायाविरुद्ध त्यांनी नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना (NUTA) उभी केली आणि तिला केवळ आंदोलन करणारी संघटना न ठेवता अभ्यास, प्रबोधन, विधायक संघर्ष आणि वैचारिक नेतृत्वाचे प्रभावी व्यासपीठ बनविले. शिक्षक चळवळीला त्यांनी वैचारिक अधिष्ठान दिले आणि संघटनात्मक शिस्तीचा नवा आदर्श निर्माण केला.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते विकासापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांचे मोलाचे योगदान राहिले. विद्यापीठ प्रशासन, शिक्षकांचे प्रश्न, शैक्षणिक गुणवत्ता आणि उच्च शिक्षणातील धोरणात्मक बदल यांवर त्यांनी अभ्यासपूर्ण भूमिका घेतली.

अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघातून सलग पाच वेळा विधान परिषदेवर निवडून येणे ही त्यांच्या लोकविश्वासाची मोठी पावती होती. विधान परिषदेतील त्यांचे कार्य स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरावा इतके प्रभावी होते. त्यांनी विचारलेला प्रत्येक प्रश्न सखोल अध्ययन, तथ्यपूर्ण माहिती, कायदेशीर तरतुदी आणि सामाजिक बांधिलकीवर आधारित असे. शासन आणि प्रशासनालाही त्यांच्या मुद्द्यांची दखल घ्यावी लागत असे. त्यामुळेच ते अभ्यासू, प्रभावी आणि जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून सर्वपक्षीय आदरास पात्र ठरले.

त्यांच्या कार्यशैलीतील सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे शिस्त. वेळेचे काटेकोर पालन, नियोजनबद्ध कामकाज, साधेपणा, पारदर्शकता, नैतिक धैर्य आणि तडजोड न करणारी प्रामाणिकता यामुळे त्यांनी असंख्य कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली. त्यांनी जे सांगितले ते प्रथम स्वतःच्या आचरणातून जगून दाखविले.

विदर्भाच्या विकासासाठी त्यांनी केलेले योगदान विशेष उल्लेखनीय आहे. अमरावती शहरासाठी अप्पर वर्धा धरणातून पाणीपुरवठा योजना साकार करण्यात त्यांनी घेतलेले प्रयत्न इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदले जातील. अनेक दशकांच्या पाणीटंचाईतून अमरावतीला मुक्त करणाऱ्या या योजनेमुळे अनेकांनी त्यांना आधुनिक "भगिरथ" म्हणून गौरविले.

पाणी, शेती, जलव्यवस्थापन, प्रादेशिक अनुशेष, ग्रामीण विकास, शिक्षण, कर्मचारी प्रश्न आणि विद्यापीठ प्रशासन अशा विविध विषयांवर त्यांनी सातत्याने अभ्यासपूर्ण भूमिका मांडल्या. कोणत्याही विषयावर मत व्यक्त करण्यापूर्वी त्याचा सखोल अभ्यास करणे ही त्यांची कार्यपद्धती होती. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक भूमिकेला विश्वासार्हता लाभली.

विशेषतः जुनी पेन्शन योजनेच्या लढ्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिले. जुनी पेन्शन हा केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक सुरक्षेचा प्रश्न आहे, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. विविध बुलेटिन, विशेषांक आणि संशोधनपर लेखांच्या माध्यमातून त्यांनी या विषयाची वस्तुस्थिती समाजासमोर मांडली. २०२४ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी प्रत्येक लोकप्रतिनिधीपर्यंत या प्रश्नाची वस्तुनिष्ठ मांडणी पोहोचावी यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. कर्मचारी संघटनांमध्ये व्यापक एकजूट निर्माण व्हावी, हा त्यांचा दृढ विश्वास होता.

त्यांचे राजकारण व्यक्तिपूजेचे नव्हते; ते विचार, मूल्ये आणि विकासकेंद्रित होते. म्हणूनच विविध विचारसरणीतील नेत्यांनी त्यांचा सन्मान केला. स्व.जयंतराव टिळक, मा. शरदचंद्र पवार, मा. नितीन गडकरी, स्व.आर.एस.गवई, स्व.अण्णासाहेब वैद्य, स्व.बाळासाहेब कुळकर्णी, प्रभाकरराव वैद्य, स्वर्गीय प्राचार्य डॉ.शंकरराव सांगळे आणि स्व.प्रा.राम मेघे, प्राचार्य डॉ.रावसाहेब ठाकरे यांच्यासह अनेक दिग्गज व्यक्तीशी त्यांचे स्नेहपूर्ण आणि सन्मानाचे संबंध होते.

महात्मा गांधी, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कृषीमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर गाढ प्रभाव होता. सत्य, समता, सामाजिक न्याय आणि नैतिक जबाबदारी या मूल्यांशी त्यांनी आयुष्यभर निष्ठा राखली.

प्रा.बी.टी.देशमुख यांच्या बौद्धिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना प्रदान करण्यात आलेला डॉ.श्रीकांत जिचकार स्मृती ज्ञानयोगी पुरस्कार हा त्यांच्या विद्वत्तेचा आणि समाजकार्यासाठीच्या समर्पणाचा योग्य सन्मान होता. त्या पुरस्कारामुळेच पुरस्काराची प्रतिष्ठा अधिक उंचावली, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

२१ जून २०२६ रोजी नुटा बुलेटिनच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा योग येणार होता. मात्र नियतीने तो क्षण त्यांच्या अनुपस्थितीत अनुभवण्याची वेळ आणली. पन्नास वर्षे विचार, संघर्ष, सामाजिक बांधिलकी आणि प्रबोधनाचा वारसा जपणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाचा गौरव त्यांच्या हयातीत व्हावा, ही अनेकांची इच्छा अपुरी राहिली.

प्रा.बी.टी.देशमुख हे खऱ्या अर्थाने ज्ञानयोगी, कर्मयोगी आणि समाजऋषी होते. त्यांनी आपल्या जीवनातून सिद्ध केले की ज्ञान, विवेक, नैतिकता आणि निःस्वार्थ सेवा यांच्या बळावर समाजपरिवर्तन घडवून आणता येते. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे अशक्य आहे; परंतु त्यांनी निर्माण केलेला वैचारिक वारसा, त्यांनी जपलेली मूल्ये आणि त्यांनी दाखविलेला संघर्षाचा मार्ग पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

परमेश्वर त्यांच्या दुःखी कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना, हजारो विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, अनुयायांना आणि हितचिंतकांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो आणि या महान ज्ञानयोग्यास चिरशांती लाभो, हीच विनम्र प्रार्थना.

मा.प्रा.बी.टी.देशमुख साहेबांना विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली.

***प्रा.बी.टी.भाऊ उर्फ भाऊराव तुळशीराम देशमुख यांचे संपूर्ण आयुष्य शिक्षण, समाजकारण आणि जनसेवेला समर्पित होते. शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी, कर्मचारी, पदवीधर आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी आयुष्यभर सातत्याने संघर्ष केला. सार्वजनिक जीवनात अभ्यास, नैतिकता आणि लोकहित यांची सांगड कशी घालावी, याचा त्यांनी आदर्श महाराष्ट्रासमोर ठेवला.***

# बी.टी. नावाची दंतकथा

**- अविनाश दुधे, अमरावती**

*(लेखक 'मीडिया वॉच' दिवाळी अंक, पब्लिकेशन व वेब पोर्टलचे संपादक आहेत) ८८८८७४४७९६*

बी.टी. नावाची दंतकथा!

बी.टीं.चा दिवस भल्या पहाटे सुरु व्हायचा. ऋतू कुठलाही असू द्या, धो धो पाऊस किंवा कडाक्याची थंडीतही अमरावतीच्या जगप्रसिद्ध श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण तलावात भल्या पहाटे ४ वाजता बी.टी. उडी घेत. हा त्यांचा दिनक्रम कधीही चुकत नसे, मुंबई व नागपुरात विधिमंडळ अधिवेशना दरम्यान ते तेथील तलावात पोहत असे. कितीही महत्त्वाचे काम असो, त्यांच्या पोहण्यात खंड नसे. मुलींच्या लग्नाच्या दिवशीही ते पोहायला गेलेच आणि अगदी परवा १९ तारखेला ते जग सोडून सोडून गेले, त्यादिवशीही सकाळी ते पोहून आलेच. अनेक विषयातील ही शिस्त, नियमितता, वक्तशीरपणा आणि जगण्यावरची अव्यभिचारी निष्ठा बीटींना एकमेवाद्वितीय ठरवून गेला.

बी.टी. गेल्याची बातमी समजली आणि दुसऱ्याच क्षणाला 'एक पर्व संपले! एका दंतकथेची अखेर!' अशी प्रतिक्रिया मनात उमटली. एखादी व्यक्ती, स्थळ, घटना किंवा परंपरेबाबत वर्षानुवर्षे किंवा अनेक पिढ्यांत काही कथा सांगितल्या जातात त्याला दंतकथा म्हणतात. बी.टी. नावाचा माणसाबाबत अशा अनेक कथा सांगितल्या जातात. आयुष्याची ८७ वर्ष जी जीवनमूल्य घेऊन हा माणूस जगला त्यामुळे हयातीतच ते दंतकथेचा विषय ठरले होते.

बी.टी. जिवंत असताना आणि आता ते गेल्यानंतरही वेगवेगळ्या क्षेत्रातील लहानथोर माणसं त्यांच्याबाबत एवढ्या कथा सांगताहेत की ही अशीही हाडामासाची माणसं असतात, हे समजून विस्मयचकित व्हायला होतं. बी.टीं.च्या संपूर्ण आयुष्याचा पट पाहिला की जीवनाकडे पाहण्याची आणि जीवन जगण्याची त्यांची एक ठाम भूमिका होती, हे लक्षात येतं. मूल्यांप्रती असलेली बांधिलकी, तत्त्वनिष्ठ जीवनपद्धती, साधेपणा आणि पारदर्शक पद्धतीनेच बी.टी. संपूर्ण आयुष्य जगलेत.

गेले दोन दिवस अनेक मान्यवर, संपादक, पत्रकार, बी.टीं.चे सहकारी त्यांच्या जगण्यातील शेकडो सत्यकथा सांगताहेत, लिहिताहेत, भरभरून बोलताहेत. बी.टी. स्वतःबद्दल क्वचितच बोलत मात्र बी.टीं.चे सार्वजनिक जीवन, त्यांची संसदीय कारकीर्द म्हणजे 'खुली किताब' होती. 'नुटा बुलेटीन' मध्ये त्यांनी आपल्या आयुष्याचा संपूर्ण लेखाजोगा लिहून ठेवलाय. त्यामुळे स्वतःबद्दल काही सांगा, आत्मचरित्र लिहायला हवं, असा आग्रह केला की, आत्मचरित्र लिहावं असं विशेष काही केलं नाही, मात्र जे काही जगलोय ते नुटा बुलेटिनमध्ये आहे, असे ते विनम्रपणे सांगत.

कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या पोटी जन्म झाला असल्याने अभाव त्यांनी प्रारंभीपासूनच अनुभवला. कधी गप्पांच्या ओघात डॉ.पंजाबराव देशमुखांनी सुरु केलेल्या श्रद्धानंद हॉस्टेलमध्ये राहून घेतलेलं शिक्षण, गाडगेबाबांची भेट, हॉस्टेलच्या पोरांना ताट, वाट्या घेऊन देण्यासाठी गाडगेबाबांसोबत टांग्याने अमरावतीच्या बाजारात जाण्याचा प्रसंग, गाडगेबाबांची ऐकलेली अनेक कीर्तनं, महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थी नेता म्हणून झालेली यशवंतराव चव्हाणांची भेट, त्यांनी केलेलं भाषणाचं कौतुक, पुढे साक्षात डॉ.पंजाबराव देशमुखांनी शिवाजी महाविद्यालयात बीटींनी अध्यापक म्हणून जॉईन व्हावं म्हणून पाठवलेली चिट्ठी, या त्यांच्या मर्मबंधातील अनमोल ठेवी होत्या.

सुरुवातीच्या दिवसात बी.टीं.च्या वाट्याला आलेलं आयुष्य आणि सभोवतालच्या परिस्थितीने आयुष्यात नेमकं काय करायला हवं, ही त्यांची दिशा निश्चित झाली. विदर्भाच्या कोरडवाहू शेतकऱ्यांचे अभावग्रस्त जीवन, निरक्षरता, दारिद्र्य याचा त्यांच्या मनावर एवढा खोलवर परिणाम झाला की पुढे आयुष्यभर पाणी, सिंचन, अनुशेष आणि शिक्षण या विषयांकडे त्यांनी संपूर्ण लक्ष केंद्रित केले. विधानपरिषद सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर संसदीय आयुध आणि घटनात्मक तरतुदींच्या जोरावर एका मागास भागाचे चित्र कसे बदलवता येते, मस्तवाल सत्तारूढ नेत्यांना कसे सरळ करता येते, हे बी.टीं.नी दाखवून दिले.

विदर्भ व मराठवाड्यासारख्या मागास भागाच्या अनुशेष पूर्ततेसाठी त्यांनी घेतलेली जीवापाड मेहनतीची इतिहासात नोंद होईल. घटनेतील ३७१ (२) या कलमाद्वारे राज्यपालांना त्यांच्या अधिकाराची आठवण करून देणे आणि त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून वैधानिक विकास महामंडळ, मागास भागातील सिंचन प्रकल्प, पाणी पुरवठा योजना आणि इतरही विषयातील अनुशेष पूर्ततेसाठी बी.टी. सातत्याने ३० वर्ष झगडत राहिले. त्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील दिग्गज आणि बलवान नेत्यांसोबतची विधिमंडळातील लढाई ही महाराष्ट्र विधिमंडळाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहावी अशी कहाणी आहे.

बी.टीं.ना महाराष्ट्र उत्तम संसदपटू म्हणून ओळखतात पण बी.टीं.च्या व्यक्तिमत्त्वाचे इतरही अनेक मनोवेधक पैलू होते. ते जेवढे उत्कृष्ट संसदपटू तेवढेच उत्कृष्ट शिक्षक होते. बीटी प्राध्यापक म्हणून अतिशय ताकतीचे होते. त्यांनी तेव्हा लिहिलेली पुस्तके अनेक वर्षेपर्यंत अमरावती -नागपूर विद्यापीठात शिकवली जात. कुठल्याही विषयात हात टाकला की बी.टी. त्याच्या मुळापर्यंत जात. सर्वांगाने तो विषय समजून घेत. अध्यापक म्हणून आपल्या कारकिर्दीत वर्गावर जाताना त्यांनी कधीही एक मिनिट उशीर केला नाही आणि वर्ग कधीही वेळेअगोदर संपविला नाही. हा वक्तशीरपणा त्यांनी आयुष्यभर जपला. कुठल्याही कार्यक्रमस्थळी बीटी ठरलेल्या वेळेच्या पाच मिनिट हजर राहत. बी.टी. आले की आयोजकांचा बीपी वाढत असे. बी.टी. टाईमपास करत आहे, असे दृश्य त्यांच्या आयुष्यात कधीही दिसले नसे. संपूर्ण दिवसाची आखणी आणि वेळापत्रक त्यांचे ठरलेले असे. २०१० च्या पराभवानंतर बी.टीं.ची संसदीय कारकीर्द संपली. मात्र अखेरच्या क्षणापर्यंत लेखन, वाचन, व्यासंगात ते व्यग्र असत. म्हणूनच 'ज्ञानतपस्वी', 'ज्ञानयोगी' या शब्दांनी त्यांचा गौरव होत असे. ५० वर्षातील नुटा बुलेटिनच्या अंकांचे अवलोकन केले तर बी.टीं.चा शेकडो विषयातील अफाट आवाका लक्षात येतो.

त्यांच्या साधेपणाबद्दल खूप सांगितलं जात, पण त्यांना त्यात काहीही विशेष वाटत नव्हतं. प्रवीण बर्दापूरकर या ज्येष्ठ संपादकांनी व रघुनाथ पांडे या पत्रकार मित्राने त्याबाबत सविस्तर लिहिलंय. 'लोकमत' मध्ये असताना माझा सहकारी असलेला गणेश वासनिक परवा सांगत होता. मुंबईचे अधिवेशन आटोपून बीटी बडनेराला आले म्हणजे स्टेशनबाहेर पडल्यावर ते सिटी बसची वाट पाहत उभे असायचे. बसला उशीर असल्यास तेव्हा ऑटो चालक असलेला गणेश व अन्य ऑटोचालक त्यांना घरी सोडून देण्यासाठी आग्रह करायचे. बीटी त्यांच्यासोबत गेले की संपूर्ण भाडे ते आवर्जून द्यायचे. आजच्या नेत्यांच्या महागड्या गाड्या आणि त्यांची बेमुर्वतखोरपणा, माज पाहिला की बीटींचा बस, ट्रेन, सिटी बस, दुचाकीवरील प्रवास हा दुसऱ्या ग्रहावरील माणूस होता, हे सांगणारा आहे.

साधनशुचितेबाबत बी.टी. कमालीचे आग्रही असत, ध्येय गाठण्यासाठी वापरलेले मार्ग आणि त्या साधनांची निर्मळता, प्रामाणिकता याकडे त्यांचे बारीक लक्ष असे. निवडणुकीदरम्यान जेव्हा ते प्रचाराला निघत तेव्हा त्यांच्यासोबत केवळ एक वाहन असायचे. त्यातील इंधन वर्गणीतून भरले जायचे. प्रचारासाठी जाणारे सगळे कार्यकर्ते घरातून शिदोरी, डब्बा घेऊन येत असत. वाटेत एखाद्या शेतात ठेरेदार सावली असणारे झाड दिसले की तिथे आपापले डब्बे उघडून सामूहिक भोजन व्हायचं. सभाही अगदी साधी असायची. कुठल्या तरी शाळा - महाविद्यालयाच्या सभागृहात सभा व्हायची. बीटी प्राध्यापकांच्या ज्या 'नुटा' संघटनेचे अनेक वर्ष अध्यक्ष होते, त्यांचा कारभारही बीटींच्या शिस्तीमुळे सामूहिक वर्गणीतून आणि कमालीच्या साधेपणाने चालायचा.

आर्थिक व्यवहाराबाबत ते कमालीचे पारदर्शक होते. २००४ मध्ये, पुढे २०१० च्या निवडणुकीत त्यांनी आपला संपूर्ण वैयक्तिक जमाखर्च लोकांसमोर मांडला. विधानपरिषदेचा सदस्य म्हणून मिळणारे मानधन, वेगवेगळ्या समितीवर सदस्य म्हणून मिळालेला भत्ता, शेतीतून मिळणारे उत्पन्न... अगदी एखाद्या गोष्टीतून शंभर रुपये जरी मिळाले असतील तर तेही त्यांनी जाहीर केले. सोबतीला खर्च कुठे, कोणत्या कामासाठी झाला याचेही विवरण दिले. आमदार निधीतून कुठली कामे झालीत, त्यासाठी किती खर्च आला, हा सगळा लेखाजोगा त्यांनी प्रसिद्ध केला. लोकप्रतिनिधी असलेल्या माणसाने आपला व्यवहार हा पारदर्शकच ठेवला पाहिजे यासाठी ते आग्रही होते.

बी.टीं.चा दिवस भल्या पहाटे सुरु व्हायचा. ऋतू कुठलाही असू द्या, धो धो पाऊस किंवा कडाक्याची थंडीतही अमरावतीच्या जगप्रसिद्ध श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण तलावात भल्या पहाटे ४ वाजता बी.टी. उडी घेत. हा त्यांचा दिनक्रम कधीही चुकत नसे, मुंबई व नागपुरात विधिमंडळ अधिवेशना दरम्यान ते तेथील तलावात पोहत असे. कितीही महत्त्वाचे काम असो, त्यांच्या पोहण्यात खंड नसे. मुलींच्या लग्नाच्या दिवशीही ते पोहायला गेलेच आणि अगदी परवा १९ तारखेला ते जग सोडून सोडून गेले, त्यादिवशीही सकाळी ते पोहून आलेच. अनेक विषयातील ही शिस्त, नियमितता, वक्तशीरपणा आणि जगण्यावरची अव्यभिचारी निष्ठा बी.टीं.ना एकमेवाद्वितीय ठरवून गेला.

बी.टीं.च्या अशा कथा सांगायच्या किती? बी.टी. देशमुख कोणाबद्दल वावगं बोलताहेत, गॉसिप करताहेत, असं दृश्य कधीच दिसायचं नाही. आपलं जे काही म्हणणे आहे त्याविषयातील समग्र नियम, कायदे आणि तरतुदींचा अभ्यास करून ते मांडायचे, "अभ्यासोनी प्रगटावे" हा त्यांचा शिरस्ता होता. वैयक्तिक गप्पातही ते लूज कधीच बोलत नसत. पत्रकारांनी एखाद्या विषयात प्रतिक्रिया वा माहिती मागितली तर ते फोनवर देत नसत. त्याला घरी बोलावत. त्याला व्यवस्थित समजावून सांगत आणि ते जे काही सांगत ते वाचून दाखवयाला सांगत. सार्वजनिक जीवनातील कोणत्याही मनुष्याने जाहीर भाषण, लेखन, प्रतिक्रिया देताना प्रत्येक शब्दाबाबत सजग असलं पाहिजे, आपण जे बोलतोय, तेच छापून आलं पाहिजे यासाठी ते कमालीचे आग्रही असत.

२००९- २०१० चे वर्ष. अमरावतीत इंडिया बुलच्या औष्णिक विद्युत प्रकल्पाविरुद्ध प्रचंड वातावरण तापलेले. शेतकऱ्यांच्या हक्काचे सिंचनाचे पाणी या प्रकल्पाला देण्याचा निर्णय झाल्याने बीटींनी त्याविरोधात मोहीम उघडली. सरकार प्रकल्पाच्या पाठीशी. मुख्यमंत्री विलासराव देशमुख, नंतर मुख्यमंत्री झालेले अशोक चव्हाण उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री सारे इंडिया बुलच्या साथीला. अपवाद वगळता अमरावती जिल्हातील लोकप्रतिनिधीही विकले गेलेले. अशा परिस्थितीत बी.टी. आपल्या काही सहकाऱ्यांसोबत सर्वोच्च न्यायालयापर्यंत ही लढाई लढले. या दरम्यान गुरुकुंज मोझरीत तीव्र आंदोलन झाले होते. लाठीचार्ज व गोळीबारही झाला. पुढेही ठिकठिकाणी तीव्र आंदोलन झालेत. पण या दरम्यान सरकार व प्रकल्पाची तरफदारी करणारे मंत्री व आमदारांविरुद्ध बी.टी. एक शब्दही कधी वावगे बोलले नाही. टीकाटिपणी केली नाही.

तो त्यांचा स्वभावच नव्हता. जे काही करायचं ते कायद्याने, नियमाने, घटनेतील तरतुदींचा आधार घेऊन अशीच त्यांची कायम भूमिका होती. सर्वोच्च न्यायालयाने सरकारची तळी उचलली. बी.टी., शेतकरी, प्रकल्पग्रस्त ती लढाई हरलेत. पुढे २०१० मध्ये बीटींना विधानपरिषदेच्या निवडणुकीतही हरविण्यात आले. (निवडणूक निकालानंतर त्यावेळचे विजयी उमेदवार डॉ.रणजित पाटील हे सर्वात आधी बीटींचा आशीर्वाद घेण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी आले होते) पण या सगळ्या गदारोळातही कुठलीही टीकाटिपणी न करता त्यांनी शांतपणे सगळं स्वीकारलं आणि आपल्या कामात झोकून दिलं.

बी.टीं.च्या अशा खूप साऱ्या चित्तरकथा आहेत. विधिमंडळाच्या बाहेर वेगवेगळ्या कार्यक्रमात बीटींना ऐकणे म्हणजे मेजवानी असे. खूप साऱ्या कथा, किस्से, संदर्भ आणि विनोदाची भरमार त्यांच्या भाषणात असे. शहरातील संगीत, नाट्य, सांस्कृतिक कार्यक्रमात एक श्रोता म्हणून बी.टी. अनेकदा यायचेत. संगीत नाटक हा त्यांच्या आवडीचा विषय होता. बी.टीं.ना बोलतं करण्यात जर एखाद्याला यश आले तर सार्वजनिक जीवनात काम करताना येणाऱ्या गमती-जमती त्यांच्या तोंडून ऐकण्यात रंगत यायची. वाचन आणि निसर्ग हेही त्यांच्या आवडीचे विषय. सकाळी सगळी वर्तमानपत्र व्यवस्थित वाचून त्यातील त्यांना आवश्यक संदर्भ असलेल्या बातम्या ते जपून ठेवायचेत. त्यांच्या घरात लौकिक सुखोपभोगाच्या गोष्टी दिसायच्या नाहीत. दिसायचे ते पुस्तकं, संदर्भग्रंथ, गेल्या ५०-६० वर्षातील वर्तमानपत्रांचे गठ्ठे, नुटा बुलेटिनचे अंक ... तिच त्यांची संपत्ती होती.

# *दंतकथा वाटावी अशी ६८ वर्षांची गुरु-शिष्य परंपराः प्रा.प.सि.काणे आणि 'भाऊराव' बी.टी.देशमुख*

**- डॉ.मंजुषा वाठ-झगडे, अमरावती**

"माझ्या आधी कसा रे गेलास भाऊराव..." एका शब्दाने सुन्न झालेले.......... अंत्यदर्शन.....मूल्यांचा अस्त!

काही प्रसंग काळाच्या छातीवर असे कोरले जातात की, तिथून मानवी मूल्यांची नवी व्याख्या जन्माला येते. नुकताच अमरावतीने आणि पर्यायाने संपूर्ण महाराष्ट्राने एक अत्यंत वेदनादायी, पण तितकाच अथांग मानवी नातेसंबंधांचा प्रसंग अनुभवला.

विदर्भाच्या हक्कासाठी विधिमंडळात तब्बल ३० वर्षे डरकाळी फोडणारे, 'सिंचन अनुशेष निर्मूलनाचे महर्षी' आणि 'खरे ज्ञानयोगी' माजी आमदार आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सरांचे नुकतेच निधन झाले. संपूर्ण वातावरण शोकाकुल होते, डोळ्यात अश्रू होते. पण या गर्दीत एक असा प्रसंग घडला, ज्याने तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येक संवेदनशील मनाला पिळवटून टाकले आणि उपस्थितांचे डोळे पाणावले.

एका गुरूची आर्त हाक...

व्ही.एम.व्ही. कॉलेजचे माजी प्राचार्य, आदरणीय प्रा.प.सि.काणे सर आपल्या लाडक्या शिष्याच्या, म्हणजेच बी.टी. सरांच्या अंतिम दर्शनासाठी आले होते. वय वर्षे नव्वदी पार केलेले काणे सर जेव्हा पार्थिवाजवळ पोहोचले, तेव्हा ६८ वर्षांचा प्रदीर्घ ऋणानुबंध एका क्षणात त्यांच्या डोळ्यांसमोरून सरकून गेला असावा.

अत्यंत भावूक होऊन, थरथरत्या आवाजात त्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडलेः

"माझ्या आधी कसा रे गेलास भाऊराव...?"

हे शब्द केवळ एका मित्राचे नव्हते, तर एका अशा गुरूचे होते ज्याने आपल्या शिष्याची उंची स्वतःपेक्षाही मोठी झालेली आनंदाने आणि अभिमानाने पाहिली होती. या एकाच वाक्याने संपूर्ण वातावरण अत्यंत धीरगंभीर आणि सुन्न होऊन गेले.

"मंजुषा, भाऊराव माझ्यामुळे नाही गं, मी भाऊरावमुळे आहे... जे काही आहे, ज्या काही नावाने मी ओळखला जातो, ते फक्त भाऊरावमुळे!"

आजच्या या अत्यंत व्यावसायिक, स्वार्थी आणि 'मी'पणाच्या अहंकारात जगणाऱ्या जगात असे उद्‌गार ऐकायला मिळणे ही एक दुर्मिळ घटना आहे. केवढं हे मोठं मन! स्वतः गुरु असून, शिष्याविषयी एवढी कृतज्ञता आणि त्याची महती मानणारा गुरु आजच्या जगात शोधूनही सापडणार नाही. ज्या माणसाने स्वतः शेकडो विद्यार्थी घडवले, तो गुरु आपल्या शिष्याला आपल्या अस्तित्वाचे श्रेय देतो, तेव्हा ती गुरु-शिष्याची परंपरा एका अलौकिक शिखरावर पोहोचलेली असते. बी.टी.देशमुख सरांना हक्काने 'भाऊराव' म्हणणारे आई-वडिलांनंतर कदाचित काणे सर हे या पृथ्वीतलावरील एकमेव व्यक्ती असावेत.

हा प्रसंग पाहताना सहज मनात आले आजची पिढी ज्या गतीने नात्यांमधील ओलावा गमावून बसत आहे, ते पाहता आगामी पिढ्यांना ही कथा दंतकथा वाटेल का? बी.टी. सरांच्या घरासमोर माझे घर आहे, परंतु सरांच्या घरावर कुठेही माजी आमदार असा उल्लेख असलेली पाटी नाही तरीही कॉलनीवासी मात्र आपला पत्ता आमदार बी.टी. देशमुख यांचे घरासमोर असाच लिहितात. पाटी नसतानाही केवळ नावाने व्यक्तीला ओळखले जाणे हल्ली दुरापास्त झाले आहे.

काणे सरांसारखी प्रतिष्ठित, संस्थेचे प्राचार्य राहिलेले, मुलगा नागपूर विद्यापीठाचा कुलगुरू राहिलेला तरीही अत्यंत साधी राहणी आणि जमिनीवर पाय असलेली माणसं बोटावर मोजण्या इतकी उरली.

त्याच क्षणी व्हीलचेअरवरून, नीट उभे राहता येत नसताना बी.टीं.ना भेटायला आलेले प्रा.दि.व्यं. जहागीरदार यांना बघून देखील काणे सरांनी आपल्या सहकाऱ्याच्या तोंडावरून हात फिरवत म्हटले तब्येतीला जप बाबा.

अशी हाडामासाची, तत्त्वावर जगणारी आणि मूल्यांसाठी एकमेकांवर जीवापाड प्रेम करणारी माणसं या पृथ्वीवर कधी काळी अस्तित्वात होती, यावर कदाचित पुढच्या पिढीचा विश्वासही बसणार नाही.

ज्याप्रमाणे बी.टी. सरांनी शिक्षकांच्या हक्कांसाठी आणि विदर्भाच्या पाणी अनुशेष याकरिता आयुष्यभर संघर्ष केला, तो जितका दैदीप्यमान होता, तितकाच त्यांचा हा गुरु-शिष्याचा ऋणानुबंधही एक आदर्श वस्तुपाठ आहे.

बी.टी. सरांचे जाणे केवळ एका लोकप्रतिनिधीची किंवा शिक्षणतज्ज्ञाची 'एक्झिट' नाही, तर ती एका मूल्याधिष्ठित कालखंडाची समाप्ती आहे. आणि काणे सरांच्या डोळ्यांतील ते अश्रू त्या संपूर्ण कालखंडाचे प्रतिनिधित्व करत होते. त्यामुळे त्यांचे जाणे एका कालखंडाची समाप्ती आहे.

व्ही.एम.व्ही. च्या शतक पूर्ती सोहळ्यादरम्यान आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यामध्ये संस्थेच्या माजी विद्यार्थी म्हणून बी.टी. सरांना जीवनगौरव पुरस्कार काणे सरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. त्याचे साक्षीदार आम्हाला होता आले.

एवढ्या मोठ्या मनाचा गुरु आणि तितकाच तत्त्वनिष्ठ शिष्य यांचे हे नाते आम्हा सर्वांना आणि शिक्षण क्षेत्रातील घटकांना जन्मभर प्रेरणा देत राहील. या 'तत्त्वांच्या विद्यापीठाला' आणि या अथांग गुरु-शिष्याच्या नात्याला कोटी कोटी प्रणाम!

# बी.टीं.च्या सहवासात

## - किशोर देशपांडे, अमरावती

२००९ साली मला एकदा प्रभाकरराव वैद्य यांचा फोन आला. नांदगाव पेठ मधील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रातील जागेत सोफिया नावाची कंपनी औष्णिक विद्युत प्रकल्प सुरु करणार आहे आणि त्यासाठी महाराष्ट्र शासनाने त्या कंपनीला अप्पर वर्धा धरणातून पाणी द्यावयाचे ठरविले आहे; त्यामुळे हजारो एकर शेतजमीन सिंचनापासून वंचित राहील. त्याकरिता विदर्भ अनुशेष निर्मुलन समितीच्या वतीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करता येईल का, याबाबत मी बी.टी.देशमुख व सोमेश्वर पुसतकर यांचेसोबत नागपूर ला जाऊन कृष्णरावांशी चर्चा करावी, असे प्रभाकररावांनी मला सुचविले.

कृष्णराव देशपांडे हे माझे ज्येष्ठ बंधू उच्च न्यायालयातील सिनियर ॲडव्होकेट होते. लगेच सोमेश्वर पुसतकर मला येऊन भेटले व कृष्णरावांना फोन करून आम्ही त्यांची वेळ घेतली आणि बी.टी.देशमुख सरांसोबत नागपूरला गेलो. तोपावेतो माझी बी.टी. सरांशी नुसती तोंडओळख होती. सोमेश्वर पुसतकर यांचे मी फक्त नाव ऐकले वाचले होते. राजकारणी मंडळींपासून मी जरा दूरच राहत असे. बी.टी. सरांचे कार्य आणि विद्‌वत्ता तरुणपणापासून माझ्या ऐकण्यात होती. पण प्रत्यक्ष भेट व प्रवास एकत्र होईल असे कधीही वाटले नव्हते. नागपूरच्या त्या प्रवासातही मी त्यांच्यासोबत थोडा संकोचानेच व जुजबी बोलत होतो. कृष्णरावांकडे एकूण चर्चा झाल्यानंतर हायकोर्टात पीआयएल करावी असे ठरले. निघता निघता कृष्णरावांनी मला याचिकेचा मसुदा करायला सांगितले. मसुदा तयार करताना बी.टी. सरांसोबत अनेकदा बसावे लागले. त्यांच्या तोंडून फाजल अली कमिशन, नागपूर करार, घटना दुरुस्ती, कलम ३७१(२) नुसार राष्ट्रपती व राज्यपालांना महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या मागास भागांसाठी विकास मंडळे स्थापन करण्याचे मिळालेले अधिकार, सिंचन अधिनियम, केंद्र व राज्ये यांची जलनीती, अप्परवर्धा धरणाचा इतिहास इत्यादी भरपूर माहिती मिळत गेली. ही सर्व माहिती थोडक्यात आपल्या याचिकेत यावी, असा त्यांचा आग्रह होता.

बी. टी. सर हे शालेय जीवनापासूनच संयुक्त महाराष्ट्राचे कट्टर समर्थक होते. वेगळ्या विदर्भाची मागणी त्यांना मान्य नव्हती. सर्व मराठी भाषिकांचे एकच राज्य असावे ही संयुक्त महाराष्ट्र समितीची मागणी त्यांना योग्य वाटायची. शिवाय महाराष्ट्रात राहिल्यानेच विदर्भाचा विकास होईल असेही त्यांचे मत कायम होते. आमच्या गप्पांमध्ये त्यांनी असे कारण सांगितले की, मुंबई सह महाराष्ट्र झाला तर मुंबई शहरातून व आसपासच्या परिसरातून मिळणारा महसूल हा राज्याच्या इतर भागांच्या तुलनेत खूप जास्त असल्यामुळे राज्याच्या महसुलाचे न्याय्य व संतुलित वाटप करताना शासनाला विदर्भ मराठवाड्याकडे तो वळविणे भाग पडेल. परंतु वेगळा विदर्भ झाल्यास महसूल निर्मिती विशेष होणार नाही आणि त्यामुळे विदर्भाचा विकासही खुंटून राहील. संविधानाच्या ३७१(२) कलमातील तरतुदींवर विदर्भातील नेत्यांनी अधिक भर द्यावा आणि वेगळे विकास मंडळ पदरात पाडून घेऊन विकासाचा असमतोल दूर करण्यासाठी संघर्ष करावा, ही त्यांची भूमिका होती. या भूमिकेला धरूनच त्यांचा विधीमंडळात आणि न्यायपालिकेत देखील संघर्ष सुरू होता. सोफिया (नंतरचे बदलेले नाव 'इंडिया बुल') प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाने विकलेल्या अप्पर वर्धा धरणातील पाण्यामुळे विदर्भातील सिंचनाचा अनुशेष आणखी वाढणार, ही बाब लक्षात घेऊनच त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करायचे ठरविले होते.

सोफिया प्रकरणापूर्वी बी.टी. सरांशी माझा प्रत्यक्ष संपर्क नव्हता. नुटाच्या व विद्यापीठाच्या काही प्रकरणांमध्ये मी त्यापूर्वी अभिप्राय दिले होते आणि एखादा दावा देखील चालविला होता. पण बी.टी. सर मला तेव्हा म्हणाले की तुमचे ड्राफ्टिंग मी वाचले आहे आणि आपली वेव्हलेंग्थ जुळू शकते. त्यांनी ती हिम्मत दिल्यामुळे मी त्यांनी सुचविलेले मुद्दे घेऊन याचिका तयार केली. ती त्यांना आवडली. पुढे हाय कोर्टात सुनावणीच्या वेळी सोमेश्वर आणि बी.टी. सर मला प्रत्येक तारखेला नागपूरला नेऊ लागले. त्या जाण्या-येण्याच्या प्रवासात आमच्या खूप गप्पा व्हायच्या. त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, शिक्षण, बाळासाहेब मराठे यांच्या सोबत आलेला संबंध, दैनिक हिंदुस्थानमध्ये त्यांनी केलेले काम, नंतरची प्राध्यापकी, नुटा या प्राध्यापकांच्या संघटनेची स्थापना आणि विधानपरिषदेची पहिली निवडणूक— असा सर्व इतिहास मी आणि सोमेश्वर त्यांना युक्तीने प्रश्न विचारून हळू हळू समजून घेत गेलो.

पुढे आमची याचिका एकाएकी व आम्हाला पूर्वसूचना न देता मुंबई उच्च न्यायालयाच्या तत्कालीन मुख्य न्यायमूर्तींनी नागपूरहून मुंबईला मागवून घेतली आणि पुढे ती अनेक महिने रखडत राहिली. त्यामुळे आम्हा तिघांच्या मुंबईला देखील अनेक चकरा झाल्या. कधी कधी आमच्या सोबत मुंबई हायकोर्टात आमदार वीरेंद्र जगताप व बच्चूभाऊ कडू हे देखील असायचे. सोमेश्वर पुसतकर हे एक कुशल आयोजक होते. प्रत्येक प्रवासात बी.टी. भाऊंना, कृष्णरावांना व मला काय आवडते याची नोंद मनात ठेऊन सोमेश्वर तशी योजना करायचे. बी.टी. सरांना जुन्या काळातील मराठी संगीत नाटकांची खूप आवड होती. तसे त्यांनी आमच्या गप्पांमध्ये एक-दोन वेळा सांगितले होते. 'संगीत सौभद्र' या नाटकाचा ते विशेष उल्लेख करायचे. एकदा मी त्याच नाटकातील 'लग्नाला जातो मी' या पदावरून पु.लं. नी लिहिलेला एक किस्सा सरांना ऐकवला. हे पद गाणारा नट इतके वेळा ही एकच ओळ वेगवेगळ्या प्रकारे गात राहिला की, पिटातल्या एका प्रेक्षकाने ओरडून सांगितले, 'अरे बाबा, आतापर्यंत त्या सुभद्रेचं लग्न होऊन तिला मुलबाळही झाले असेल'. हे ऐकून बी.टी. खळखळून हसले आणि त्यांनी पु.लं. ना दाद दिली. मुंबईच्या मुक्कामात एकदा पेपर वाचताना सोमेश्वरला त्याच नाटकाची जाहिरात दिसली. परंतु तो प्रयोग कोणत्यातरी उपनगरात होणार होता. आणि आम्ही मुंबईच्या दक्षिण टोकाजवळ आमदार निवासात होतो. तरीही कोर्टाचे काम आटोपल्यावर सोमेश्वर जिद्दीने बी.टी.सरांना संगीत सौभद्रचा तो प्रयोग दाखवायला घेऊन गेले आणि सर त्यामुळे आनंदीत झाले.

अशाच गप्पांमध्ये एकदा मी आणि सोमेश्वरने सरांना त्यांच्याविषयीची अनेकांची एक तक्रार ऐकविली. साधारणतः मुंबईतल्या आमदार निवासांचा उपयोग हा संबंधित आमदारांच्या मतदार संघातील परिचित लोकांना उतरण्यासाठी सर्रास होत असतो. परंतु बी.टी. सर कोणत्याही कार्यकर्त्याला अथवा मतदाराला आमदार निवासातील त्यांच्या खोलीत उतरू देत नसत, अशी ती तक्रार होती. ते ऐकून सर आम्हाला हुतात्मा चौकाजवळील आमदार निवासातील त्यांच्या खोलीत घेऊन गेले. तो दोन खोल्यांचा एक ब्लॉक होता. पैकी एका खोलीत कागदपत्रांचे ढिगारे आणि पुस्तके होती. दुसरी खोली सर स्वतः वापरत होते. त्यांनी आम्हाला सांगितले की, विधी मंडळाचे अधिवेशन सुरु झाल्यानंतर दर आठवड्याच्या कामकाजाची विषयपत्रिका, तारांकित प्रश्न व त्यांची उत्तरे आणि इतर संबंधित दस्तऐवजांचा गठ्ठा प्रत्येक आमदाराला पुरविण्यात येतो. ते सर्व कागदपत्र बारकाईने वाचणे, टिपणे काढणे, पूरक प्रश्नांची तयारी करणे इत्यादी कामे त्यांना अधिवेशन काळात करावी लागतात. त्यामुळे त्यांना खोलीत शांतता व एकांताची गरज असते. आमदारांच्या अभ्यासासाठी एवढी मोठी साधनसामुग्री पुरविली जाते, हे आम्हाला माहीतच नव्हते.

बी.टी. सरांना चांगले-चुंगले (अर्थात फक्त शाकाहारी) खाण्याची आवड होती. याचे भान राखून मुंबईच्या प्रत्येक प्रवासात सोमेश्वर मूर्तिजापूर स्टेशनवर कुठूनतरी आम्हा तिघांसाठी डबा मागवत असे. त्यातील जेवण उत्कृष्ट असायचे. एकदा मुंबईला हायकोर्टातील काम आटोपल्यावर सोमेश्वर याच भागातील ओळखीच्या दोन-तीन लोकांशी गप्पा मारत रेंगाळले होते. आम्हाला जेवायला जायचे होते. परंतु त्यांच्या गप्पा लगेच थांबतील अशी लक्षणे दिसत नव्हती. बी.टी. सरांनी माझा हात दाबून इशारा केला आणि आम्ही दोघेच झप-झप चालत त्या मंडळींपासून दूर झालो. सर मला जवळच्या एका प्रसिद्ध उपहारगृहात घेऊन गेले. तिथे बसल्यावर त्यांच्या सांगण्यावरून मी सोमेश्वर यांना फोन करून आम्ही दोघे काही कामाने बाहेर गेलो आहोत आणि सोबतच्या मंडळींसोबत सोमेश्वरने जेवून घ्यावे असा निरोप कळविला. जेवण झाल्यावर सरांनी डेबिट कार्डने पेमेंट केले आणि मग खुलासा केला की, त्यांचे हे डेबिट कार्ड नवीन असून त्यांना ते टेस्ट करायचे होते.

अपेक्षेप्रमाणेच सोफिया प्रकरणाचा निकाल मुंबईला आमच्या विरुद्ध लागला. दिल्लीला सुप्रीम कोर्टात केलेले अपील देखील पहिल्या सुनावणीतच फेटाळण्यात आले. परंतु एक फायदा या संघर्षाचा झाला. केंद्र शासनाची तसेच राज्यशासनाचीही पाणी वाटपासंबंधी जलनीती (Water Policy) ठरलेली असते. त्यात प्राधान्यक्रम दिले आहेत. केंद्र शासनाच्या जलनीतीनुसार पहिली प्राथमिकता पिण्याचे पाणी, नंतर सिंचन व तिसरा क्रमांक उद्योगक्षेत्र असा आहे. मात्र महाराष्ट्राच्या जलनीतीनुसार पिण्याच्या पाण्यानंतर उद्योग व तिसऱ्या क्रमांकावर सिंचन असा प्राधान्यक्रम होता. ही बाब आमच्या वकिलांनी (अर्थात बी.टी.सरांनी सुचविल्यानुसार) हायकोर्टाच्या निदर्शनास आणून दिली होती. नंतर या मुद्यावर विधी मंडळात देखील तत्कालीन विरोधी पक्षांनी आवाज उठविला आणि महाराष्ट्र शासनाला केंद्र शासनाप्रमाणेच पिण्याच्या पाण्यानंतर प्रथम सिंचन व तिसऱ्या क्रमांकावर उद्योग असा बदल राज्य जलनीती मध्ये करणे भाग पडले.

बी.टी. सरांवर गाडगे बाबांचा खूप प्रभाव होता. त्यांनी एका नागपूरच्या प्रवासात आम्हाला गाडगे बाबांच्या संपूर्ण कीर्तनाची हुबेहूब नक्कल करून दाखविली. त्यांच्या लहानपणी आसपासच्या पंचक्रोशीत गाडगे बाबांचे कीर्तन कोण्या गावात होणार अशी बातमी मिळाली की, सर तिथे जाऊन ते कीर्तन

ऐकून घेत. त्यांचे धाकटे बंधू एम.टी. नानासाहेब देखील गाडगे बाबांची भूमिका सुंदर साकारतात.

मुलांना लहानपणापासून मातृभाषेत शिक्षण द्यावे की इंग्रजीत, या मुद्द्यावर माझे सरांशी मतभेद होते. मातृभाषेतील शिक्षणामुळे कोणत्याही भाषेचे व्याकरण समजणे सोपे जाते आणि विषयाचे आकलन देखील चांगले होते असे माझे मत आहे. परंतु बी.टी. सरांच्या मते इंग्रजी हीच ज्ञानभाषा असल्यामुळे त्या भाषेतून अगदी बालपणापासून शिक्षण मिळणे योग्य ठरते. वास्तविक सरांचे शालेय शिक्षण मराठीतच झाले होते. परंतु पुढे इंग्रजीवर देखील त्यांनी प्रभुत्व मिळविले. पण तरीही अस्खलित इंग्रजीत सहजपणे संभाषण करणे मराठी मध्यमवाल्यांना जड जाते, असे त्यांना वाटत असे. खरं म्हणजे मराठी भाषेवर संस्कृतचा जो पगडा आधी होता, त्यामुळे त्या भाषेतील शिक्षण हे मातृभाषेतील असल्याची भावना बहुजन व दलित समाजातील विद्यार्थ्यांमध्ये रुजणे कठीण होते. त्यामुळे देखील या दोन्ही वर्गातील पालकांची ओढ इंग्रजी माध्यमाकडे असणे स्वाभाविक वाटते. उदा. Land Revenue Code ला मराठीत पूर्वी भू राजस्व संहिता असे म्हणायचे. परंतु पुढे बहुदा बहुजन समाजातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे नामकरण बदलून जमीन महसूल अधिनियम असे सुटसुटीत नाव दिले. बहुसंख्य मुलांना समजेल अशी मराठी विकसित होणे आवश्यक वाटते.

विधान परिषदेची निवडणूक आणि सोफिया प्रकरणाचा विपरीत निकाल या घटनांनी बी.टी सरांना फारसे विचलित केले नाही. ते नुटा बुलेटीनच्या कामात पूर्वी प्रमाणेच सक्रिय राहिले. रोज पहाटे पोहणे हा छंद त्यांनी अखेरच्या दिवसापर्यंत जपला. त्यांची एक प्रदीर्घ मुलाखत घेऊन Podcast करावा अशी अविनाश दुधे आणि प्रदीप देशपांडे या अनुभवी पत्रकारांची खूप इच्छा होती. एकदा ते दोघे आणि मी सरांना बाहेर जेवायला घेऊन गेलो आणि जेवता जेवता हा विषय दुधेंनी काढला. बी.टी. सर नाही म्हणाले नाहीत. परंतु मुलाखतीपूर्वी काही तयारी करावी, प्रश्न काढावे असे त्यांनी सुचविले. दुर्दैवाने त्यानंतर सरांची प्रकृती खालावत गेली आणि मुलाखत राहून गेली.

तरुणपणी मी ज्या युवक संघटनांमध्ये राहून काही सामाजिक काम केले, त्या संघटनांना संसदीय राजकारणाचा काहीसा तिटकाराच होता. त्यामुळे आम्ही राजकीय पुढारी, प्रशासकीय अधिकारी यांच्या पासून दूर राहत होतो. मात्र बी.टी. सरांच्या सहवासात राहून पुढे २००९ ते २०१२ या दरम्यान मला एक उत्कृष्ट संसदपटू कसा असू शकतो आणि संसदीय राजकारणातूनही किती गोष्टी साध्य करता येतात, याची उशिरा उकल झाली. तेव्हापासून मला सातत्याने असे वाटत राहिले की न्यायाधीश, शासकीय अधिकारी यांची नेमणूक झाल्यानंतर त्यांच्यासाठी काही महिने प्रशिक्षण अनिवार्य असते; तसेच अनिवार्य प्रशिक्षण लोकप्रतिनिधींचे देखील निवडणुकीनंतर व्हायला हवे आणि महाराष्ट्रात जर असे प्रशिक्षण देणारी संस्था सुरू झाली तर तिचे आजीवन संचालक पद प्रा.बी.टी.देशमुख यांनाच मिळावे.

दुर्दैवाने तसे घडणे नव्हते !

# *एका युगप्रवर्तक कर्माचा प्रवास*

**- प्रा.डॉ.जागृती व्यास त्रिवेदी**

"जातस्य हि ध्रुवो मृत्युः", जन्माला आलेल्या प्रत्येकाला मृत्यू अटळ आहे, हे भगवद्गीतेचे सत्य आपण कितीही वेळा ऐकले, वाचले किंवा इतरांना सांगितले, तरी जेव्हा एखादी व्यक्ती आपल्याला कायमची सोडून जाते, तेव्हा मनाला होणाऱ्या वेदनांवर कोणतेही तत्त्वज्ञान फुंकर घालू शकत नाही. आणि ती व्यक्ती आपल्या जिव्हाळ्याची, आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग असलेली असेल, तर त्या दुःखाला शब्दही अपुरे पडतात.

पण समाजात काही व्यक्ती अशा जन्माला येतात की त्यांच्या जाण्याने केवळ एक कुटुंब किंवा काही मित्रच शोकाकुल होत नाहीत; संपूर्ण समाजाच्या मनात एक हळहळ दाटून येते. आश्चर्य म्हणजे त्या व्यक्तीला आपण कधी भेटलेलोही नसतो, त्यांच्याशी प्रत्यक्ष परिचयही नसतो, तरी त्यांच्या निधनाची बातमी मनाला अस्वस्थ करून जाते. का बरं असं होतं?

याचे उत्तर एकच आहे, त्यांचे कर्म आणि त्यांचे कर्तृत्व.

जेव्हा एखाद्या व्यक्तीचे कर्म स्वतःच्या स्वार्थाच्या सीमारेषा ओलांडून समाजाच्या कल्याणासाठी वाहिले जाते, जेव्हा तिचे कर्तृत्व हजारो-लाखो लोकांच्या आयुष्यात आशेचा किरण बनते, जेव्हा ती स्वतःचे संपूर्ण आयुष्य इतरांच्या सुखासाठी, न्यायासाठी आणि उन्नतीसाठी अर्पण करते, तेव्हा तिच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एका तेजस्वी वलयाची निर्मिती होते. त्या वलयाचा विस्तार इतका व्यापक असतो की त्यामध्ये आपणही नकळत सामावून जातो. त्यांच्या निस्वार्थ कर्माची फळे आपणही कधीतरी, कुठेतरी चाखत असतो. आपल्या आयुष्यातील अनेक प्रश्न सहज सुटत असतात, अनेक संधी उपलब्ध होत असतात, अनेक पिढ्यांचे भविष्य उजळत असते. ते किती आयुष्यांना जगण्याचे कारण देऊन जातात!

म्हणूनच त्या व्यक्तीबद्दल आपल्या मनात कृतज्ञतेचा एक निःशब्द झरा अखंड वाहत राहतो. आणि म्हणूनच, अशी व्यक्ती निघून जाते तेव्हा मनाला वाटते, "अजून थोडं थांबायला हवं होतं..."

खरंच, आयुष्य कसं जगावं याचं याहून मोठं उदाहरण कोणतं असू शकतं? स्वतःच्या उत्कर्षापुरता विचार न करता, "माझ्यामुळे अनेकांचे जीवन अधिक सुंदर, अधिक सन्मानाचे आणि अधिक समृद्ध कसे होईल?" हा विचार ज्याच्या मनात जन्म घेतो, तो खऱ्या अर्थाने योगी असतो. परंतु केवळ विचार करून थांबणे सोपे असते; त्या विचारांची अखेरच्या श्वासापर्यंत कृतीत अंमलबजावणी करणे, हेच खरे तप असते. कुसुमाग्रज म्हणतात, "अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा!"

या ओळींना आपल्या जीवनाने सत्य ठरवणारी काही व्यक्तिमत्त्वे आपल्या समाजात जन्माला येतात. काळ त्यांच्या देहाला जिंकतो; पण त्यांच्या ध्येयाला नाही. म्हणूनच म्हटले आहे, "कालाय तस्मै नमः."

परंतु काळाचीही एक मर्यादा असते. तो देह हिरावून घेऊ शकतो; कर्म नाही. तो श्वास थांबवू शकतो; कीर्ती नाही. तो आयुष्य संपवू शकतो; प्रेरणा नाही. ज्यांनी स्वतःसाठी नव्हे, तर इतरांसाठी जगण्याचा संकल्प केला, ज्यांनी आपल्या कर्माने लाखो जीवनांना स्पर्श केला, त्यांना मृत्यू कधीच संपवू शकत नाही. ते प्रत्येक कृतज्ञ मनात, प्रत्येक प्रेरणादायी विचारात आणि प्रत्येक चांगल्या कृतीत पुन्हा पुन्हा जन्म घेत राहतात.कदाचित म्हणूनच अशा व्यक्तींच्या निधनाला 'अंत' म्हणता येत नाही. तो एका देहाचा विराम असतो; पण एका विचाराचा, एका मूल्याचा आणि एका युगप्रवर्तक कर्माचा अखंड प्रवास सुरूच राहतो. काळाच्या प्रवाहात न हरवता, एक अजरामर अध्याय बनून राहणे, हेच त्यांच्या अमरत्वाचे सार असते.

अशाच अमरत्वाला स्पर्श करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे आदरणीय शिक्षक मतदार आमदार प्रा.डॉ.बी.टी.देशमुख. त्यांनी आयुष्यभर केवळ अध्यापन केले नाही, तर शिक्षणालाच आपल्या जीवनसाधनेचे रूप दिले. वर्गखोलीतील शिक्षकापासून ते विधानपरिषदेतील अभ्यासू लोकप्रतिनिधीपर्यंतचा त्यांचा प्रवास हा पदांचा नव्हे, तर मूल्यांचा प्रवास होता. शिक्षक हा समाजाचा शिल्पकार आहे, या विश्वासाला त्यांनी आपल्या प्रत्येक कृतीने प्रतिष्ठा मिळवून दिली. सार्वजनिक जीवनात त्यांनी कधी लोकप्रियतेचा मार्ग स्वीकारला नाही; त्यांनी नेहमीच लोकहिताचा मार्ग निवडला. म्हणूनच शिक्षक, प्राध्यापक, पदवीधर, विद्यार्थी किंवा सर्वसामान्य नागरिक, ज्यांच्या प्रश्नांना आवाज नव्हता, त्या प्रत्येकासाठी ते निःसंकोचपणे उभे राहिले. विधानपरिषदेत त्यांची उपस्थिती म्हणजे अभ्यास, तर्क, संयम आणि नैतिकतेचा एक दुर्मीळ संगम मानला जात असे. त्यांच्या शब्दांना वजन होते, कारण त्या शब्दांमागे स्वार्थ नव्हता; होता तो केवळ समाजहिताचा ध्यास.

विदर्भाच्या विकासाचा प्रश्न असो, शिक्षणव्यवस्थेतील विसंगती असो किंवा शिक्षकांच्या न्याय्य हक्कांची लढाई, प्रत्येक विषयाकडे त्यांनी केवळ प्रशासकीय प्रश्न म्हणून पाहिले नाही. त्यामागे उभ्या असलेल्या माणसांचे जीवन त्यांनी पाहिले. म्हणूनच त्यांच्या संघर्षात आक्रस्ताळेपणा नव्हता; त्यात अभ्यास होता, सातत्य होते आणि लोककल्याणाविषयीची नितांत आस्था होती.आज त्यांच्या देहाचा अंत झाला असला, तरी त्यांनी जपलेली मूल्ये, त्यांनी रुजवलेली वैचारिक परंपरा आणि त्यांनी घडवलेला समाजविश्वास अजूनही जिवंत आहे. काही माणसे आपल्या आयुष्याची वर्षे मोजत नाहीत; ती आपल्या कर्माने काळालाच अर्थ देतात. प्रा.डॉ.बी.टी.देशमुख हे त्यांपैकीच एक होते. त्यांनी सत्ता मिळवली नाही; त्यांनी माणसे जोडली.त्यांच्या कर्तृत्वाला वंदन करताना समर्थ रामदासस्वामींचे शब्द मनात सहज उमटतात,

"देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी ।

मना सज्जना हेचि क्रिया धरावी ।।"

खरोखरच, काही व्यक्ती काळाच्या ओघात विरून जात नाहीत; त्या काळालाच दिशा देऊन जातात. त्या आपल्या विचारांत, आपल्या संस्कारांत आणि समाजाच्या सामूहिक स्मृतीत चिरंतन जिवंत राहतात. प्रा.डॉ.बी.टी.देशमुख यांचे जीवन हे अशाच युगप्रवर्तक कर्मयोगाचे तेजस्वी उदाहरण म्हणून अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

# जोवर 'पाणी' तोवर 'बी.टी.'

- रघुनाथ पांडे

सोप्पं असतं मोठं होणं;
पण मोठं होऊन सोप्पं राहणं खूप कठीण असतं.
त्यांना कधीच का वाटलं नसावं,
आमदार आहोतच तर मंत्री व्हावं?
राज्यपाल वगैरे वगैरे..

३० वर्षे आमदार. विधानपरिषद सदस्य.
पदवीधरांचं प्रतिनिधित्व.
काही आयुष्यांचा जन्मच 'होमकुंड' असतो.
समिधा आणि समाधान.!

इतक्या प्रदीर्घ सक्रिय राजकीय मुशाफिरीत बी.टी. सर कधीच कुणा पक्षाचे वाटले, भासले, ठरले नाहीत. हे कोणत्या राज्यशास्त्राचे इंगित असावे?

आपण आमदार आहोत, म्हणून महाविद्यालयाला दांडी मारू शकतो. आपण आमदार आहोत म्हणून वर्ग घेतला नाही तरी चालतं.... असा अनाठायी अभिनिवेश न बाळगता राज्यशास्त्र विषय सर्व विद्यार्थ्यांना नियमित शिकविणारे, बी.टी. सर.

खरेच, असे कसे जमू शकते?

आमदार म्हणून मुदत संपताच, मुंबईतील मॅजेस्टिक आमदार निवासाचा कक्ष तात्काळ सोडणारे, बी.टी. सर!

खरेच, असे कसे जमू शकते?

विदर्भाचा बुलंद आवाज, असा घोष न करता महाराष्ट्रवादी राहून विदर्भासाठी संसदीय आयुधांचा पूर्ण ताकदीने वापर करणारे. विदर्भावरील अन्यायावरून, एका दमदार अर्थमंत्र्याला थेट सभागृहात आव्हान देणारा - द्रष्टा !

झुंज कितीही चिवट असो, भावनेने नव्हे तर कागदानेच लढली पाहिजे, अशी तर्कशुद्ध मांडणी असणारे - संशोधक !

तारुण्यालाही मोहिनी पाडावी इतकी कुशल दिनचर्या असणारे व्यक्तीत्व...!

अनुशेष हा शब्द समजायला अवघड. कल्पना करा, कृतीत किती किचकट असेल? पण तो जनसामान्यांना कळू शकेल. त्यांच्या जगण्याशी त्या शब्दाचे घट्ट नाते असेल. बिलगून असेल. इतका तो सरांनी त्यांच्या वर्तनातून, सामाजिक भूमिकेतून सहजसोपा केला. हाच शब्द मग रोजगार, पाणी, रस्ते, दवाखाने, सिंचनासाठी 'हत्यार' झाला. हेच हत्यार नंतर सर्वसामान्यांच्या जगण्याचे साधन झाले. म्हणूनच, बी.टी. सर महाराष्ट्राचे भूगर्भ आणि बहिर्भुचिंतन झाले.

त्यामुळेच, पाणी हा शब्द जोवर, तोवर बी.टी. सर हा ताळेबंद पक्का आहे.

म्हणूनच,

'बी.टी.'सरांना आठवावे, कारण?

थंडी कितीही असू द्या, दररोज सकाळी पाचच्या ठोक्याला त्यांची सूर स्वीमिंगपूलमध्ये पडायची; दिवस तिथूनच सुरू व्हायचा.

तीक्ष्ण स्मरणशक्ती, लख्ख नेतृत्वक्षमता, नेटका व्यवहार व स्वच्छ चारित्र्याच्या भांडवलावर हा 'जलमहर्षी' या राजकारणाचा केंद्रबिंदू होता.

त्या तीस वर्षांत त्यांनाही पक्षप्रवेशाची आमंत्रणे नक्कीच मिळाली असणार, पण हा माणूस कायम अपक्ष राहिला..लढला.. टिकला आणि दीपस्तंभ ठरला.!

राजकारणातील बावनकशी शुद्धता म्हणजे सरांचे आयुष्य!

विदर्भ अनुशेषांच्या मुद्यावर प्रा.बी.टी.देशमुख, नितीनजी गडकरी, देवेंद्रजी फडणवीस यांनी विधिमंडळात एकत्रित लढाई लढली. विदर्भातील काही आमदारांची त्यांनी मोटही बांधली. या प्रयत्नांचे चांगले बदल विदर्भावर दिसून आले. सिंचन त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. त्यासाठी त्यांचा जिवाच्या आकांताने झालेला संघर्ष आठवतो. मागील पंचवीस - तीस वर्षांत विदर्भातील असा एकही सिंचन प्रकल्प नाही, ज्यात बी.टी.सरांचा सहभाग नसेल. याच हिरिरीने त्यांनी शिक्षक, विद्यार्थी व प्राध्यापकांच्या समस्यांचे ढिगारे उपसले. तडजोड हा राजकारणाचा स्थायीभाव असला तरी बी.टी.सरांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

राजकारणात बी.टी. सरांसारखे जगायला शिकले पाहिजे. पण ते शक्य नाही! म्हणूनच, केवळ 'राजकीय बी.टी.' आठवून उपयोगाचेही नाही.

आमदारकी गेल्यानंतर पुढच्या आठवडाभरात मुंबईच्या मॅजेस्टिक आमदार निवासातील खोली त्यांनी सोडली. असे बी.टी. आठवतील का?

निवडणूक आयोगाची खर्चाबाबतची कठोर बंधने नसतानाही त्यांनी तीस वर्षांपासून लोकांसाठी निवडणूक व्यवहार चोख व खुला ठेवला. तो त्यांच्या संघटनेच्या 'नुटा बुलेटिन' या विशेषांकात प्रत्येक निवडणुकीनंतर छापलाही. हेही बी.टी. आठवले पाहिजेत!

ते राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. प्राध्यापकपदाच्या नोकरीतून अधिकृतरीत्या निवृत्त होईपर्यंत ते कॉलेजात जाऊन नियमितपणे शिकवत असत.

सरांची ही कर्तव्यदक्षताही आठवली पाहिजे.

बी.टी.सरांचे आणखी काय आठवावे?

पाण्याचा तुटवडा व त्याहीपेक्षा भूगर्भातील जल उपश्याने अमरावती विभागाचा हा भाग बोडका दिसू लागला, तेव्हा रा.सू.गवई व सुदामकाका देशमुख या दोन नेत्यांसह त्यांनी जलसाक्षरतेची मोहीम राबविली. त्यामुळेच 'जलमहर्षी' म्हणावे इतके महाप्रचंड काम ते करू शकले.

पश्चिम विदर्भातील कोरड्याठाक धरणांमध्ये पाणी आणले व अपूर्ण मोठी-छोटी धरणे त्यांनी पूर्णत्वास नेली, यासाठी त्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांशी दोन हात केले. म्हणूनही बी.टी. आठवले पाहिजेत!

विधिमंडळाचे कामकाज सारेच पाहतो. सभापतीपुढील हौद्यात उतरून आंदोलन करण्याची रीत हल्ली दिसून येते. याच सभागृहात बी.टी. सर तीस वर्षे सदस्य होते. ते एकदाही वेलमध्ये उतरले नाहीत! नेमून दिलेल्या आसनावरूनच त्यांनी प्रश्न सोडविले.

म्हणूनही बी.टी. सर आठवले पाहिजेत !

आणखी बी.टी. सर आठवावेत.. कायम.

ते उत्तम पत्रकार होते. पट्टीचे मुद्रितशोधक होते. कुशल प्रिंटर होते. शिकत असताना त्यांनी अमरावतीच्या हिंदुस्थान वर्तमानपत्रात पत्रकारिता केली. स्वतः मजकूर टाईप केला, तपासला आणि त्याचे वितरणही केले.

पुढे नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना विस्तारताना त्यांनी नुटा बुलेटीन नावाचे नियतकालिक काढले. त्यातून शिक्षकांचे प्रबोधन, सरकारी शिक्षण स्थिती आणि निवडणुका यावर लक्ष केंद्रित केले.

पत्रकार म्हणून मला हेही बी.टी. सर आठवतात.

आणि हो, कुष्ठरुग्णांना सामाजिक, आर्थिक बळ मिळावे म्हणून अमरावतीच्या तपोवनात डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांच्यासोबत व नंतरही लक्ष देणारे बी.टी. सर आठवावे.

सर, तुम्ही गेले. खूप वाईट वाटले.

आदरांजली...!

***पश्चिम विदर्भातील कोरड्याठाक धरणांमध्ये पाणी आणले व अपूर्ण मोठी-छोटी धरणे त्यांनी पूर्णत्वास नेली, यासाठी त्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांशी दोन हात केले. म्हणूनही बी.टी. आठवले पाहिजेत!***

# आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली

- डॉ.शशांक हेडा, एम.डी. डॅलस, टेक्सास

अत्यंत आदराने आणि वैयक्तिक दुःखाने मी आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख यांना ही श्रद्धांजली अर्पण करीत आहे. त्यांना वैयक्तिकरीत्या ओळखण्याचे मला भाग्य लाभले आणि पुढे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक खंबीर नेता, दूरदर्शी विचारवंत, संस्था उभारणारे व्यक्तिमत्त्व आणि मूल्याधिष्ठित सार्वजनिक जीवन जगणारे नेते मला अधिकाधिक जाणवू लागले.

प्रा.देशमुख हे केवळ पदामुळे नेते नव्हते; ते स्वभावाने, चारित्र्याने आणि आचरणाने नेते होते. विचारांची स्पष्टता, तत्त्वांप्रती अढळ निष्ठा, संघटनात्मक शिस्त, असामान्य परिश्रम, आणि त्याचबरोबर दुर्मिळ साधेपणा व विनम्रता - या सर्वांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सुंदर संगम होता. आजच्या काळात नेतृत्वाचे मोजमाप प्रामुख्याने प्रसिद्धी, प्रभाव किंवा सत्तेच्या आधारे केले जाते; परंतु प्रा.देशमुख यांनी नेतृत्वाचा एक वेगळाच आणि अधिक उंच आदर्श समोर ठेवला - नीतीमूल्यांवर, सार्वजनिक जबाबदारीवर, बौद्धिक काटेकोरपणावर आणि आपल्या लोकांप्रती असलेल्या निष्ठेवर आधारलेले नेतृत्व.

### दूरदृष्टी, मूल्ये आणि शिस्त यांचे नेतृत्व

आधुनिक व्यवस्थापनशास्त्राच्या नामांकित संस्थांमध्ये ज्या नेतृत्वगुणांचे शिक्षण दिले जाते, त्यापैकी अनेक गुण प्रा.देशमुख यांच्या अंगी स्वाभाविकपणे होते; आणि ते त्यांनी आयुष्यभर सातत्याने आचरणात आणले. त्यांच्या नेतृत्वात कार्यसिद्धीची क्षमता, विषयांचा सखोल अभ्यास, परिणाम आणि परिणामांच्या परिणामांची जाण, वेळेचे नियोजन, इतरांच्या वेळेचा आदर, संघर्षनिवारण, संघटनात्मक स्पष्टता आणि जबाबदारीची खोल जाणीव दिसून येत असे.

आधुनिक तंत्रज्ञानाची साधने नसतानाही त्यांनी विविध प्रश्नांची, मुद्यांची आणि कामांची विलक्षण शिस्तबद्ध नोंद व मांडणी ठेवली होती. त्यांच्या कार्यालयीन शिस्तीत, दस्तऐवजीकरणाच्या पद्धतीत आणि प्रत्येक विषयाचा नेमका मागोवा ठेवण्याच्या क्षमतेत जबाबदारी आणि व्यवस्था यांचे उत्तम प्रशिक्षण दिसत असे.

परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत उठून दिसणारी गोष्ट म्हणजे त्यांची नैतिक ताकद. सत्तास्थानातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मिळू शकणाऱ्या कोणत्याही भौतिक किंवा अभौतिक लाभाचा त्यांना कधीही मोह झाला नाही. सार्वजनिक जीवनातील नेहमीच्या प्रलोभनांपासून ते अलिप्त राहिले. नीती, मूल्ये आणि आपल्या सामाजिक-राजकीय पायाशी असलेली त्यांची बांधिलकी प्रसंगानुरूप नव्हती; ती अखंड, सातत्यपूर्ण, दृढ आणि त्यांच्या अंतःकरणात खोलवर रुजलेली होती.

### सामाजिक कार्य ही व्यावसायिक जबाबदारी

प्रा.देशमुख यांच्यासाठी सामाजिक कार्य म्हणजे दानधर्म, प्रतिमानिर्मिती किंवा अधूनमधून केलेला सार्वजनिक सहभाग नव्हता. ते त्यांच्या दृष्टीने एक व्यावसायिक आणि नैतिक जबाबदारी होती. नेतृत्व म्हणजे लोकांप्रती, संस्थांप्रती, समाजाप्रती आणि भविष्याप्रती असलेले उत्तरदायित्व - यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

ते कृती करण्यापूर्वी विषयाचा सखोल अभ्यास करीत. ते केवळ तात्कालिक समस्या समजून घेत नसत, तर त्या समस्येचे पुढील परिणामही विचारात घेत. त्यांच्या दृष्टिकोनात आदर्शवाद आणि व्यवहारज्ञान यांचा सुंदर समतोल होता. सामाजिक बदलाबद्दल ते केवळ बोलत नसत; बदल टिकाऊ व्हावा यासाठी आवश्यक असलेली संघटनात्मक, बौद्धिक आणि व्यावहारिक पायाभरणी ते संयमाने करीत.

### खऱ्या अर्थाने लोकांचे नेते

प्रा.देशमुख हे खऱ्या अर्थाने लोकांचे नेते होते. ते आपल्या मुळांशी आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांशी खोलवर जोडलेले राहिले. सार्वजनिक प्रतिष्ठेमुळे सामान्य मानवी नात्यांमध्ये अंतर निर्माण होऊ देण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता.

व्यक्ती म्हणूनही ते अत्यंत उल्लेखनीय होते. त्यांनी मौल्यवान वैयक्तिक नाती जपली. मित्र हे त्यांच्या आयुष्यात कायम मित्रच राहिले. नाती ही व्यवहाराची साधने नव्हती. निष्ठा, आत्मीयता आणि वैयक्तिक सन्मान त्यांच्या स्वभावाचा भाग होते. नात्यांना सन्मानाने आणि सातत्याने जपण्याची ही क्षमता त्यांच्या आयुष्यातील शांत पण अत्यंत प्रभावी शक्ती होती.

### ग्रामीण नवकल्पना आणि शाश्वततेतील प्रारंभीची दूरदृष्टी

प्रा. देशमुख यांच्याबद्दलच्या माझ्या सर्वात जुन्या वैयक्तिक आठवणींपैकी एक आठवण १९७८-७९ च्या अमरावतीतील आहे. माझे वडील प्रा.ब्रिजमोहन हेडा आणि प्रा.देशमुख हे आमच्या शहरात गोबर गॅस प्रकल्पाची संकल्पना मांडणाऱ्यांपैकी अग्रणी होते. त्या काळात ही कल्पना लोकप्रिय किंवा फॅशनेबल नव्हती. परंतु त्यामध्ये दूरदृष्टी, वैज्ञानिक जिज्ञासा आणि ग्रामीण शाश्वततेप्रती खोल बांधिलकी होती.

त्या प्रणालीची काटेकोर रचना आणि तिचे केलेले सुयोग्य अनुकूलन खरोखर प्रशंसनीय होते. अशा प्रकारच्या यंत्रणा अनेकदा काही वर्षांत निकामी होत असताना, आमच्या घरी बसवलेली गोबर गॅस यंत्रणा स्थापनेनंतर वीस वर्षांहून अधिक काळ गॅस निर्माण करीत राहिली. हे यश अपघाती नव्हते. त्यामागे विचारपूर्वक केलेली रचना, शिस्तबद्ध अंमलबजावणी आणि स्थानिक परिस्थितीचे व्यावहारिक आकलन होते.

### शेती आणि जलव्यवस्थापनातील दूरदर्शी विचारवंत

मी अधूनमधून वडिलांसोबत त्यांच्या घरी जात असे. तेव्हा त्यांच्या सभोवती कापूस, शेती आणि इतर कृषीविषयक चर्चा व साहित्य दिसत असे, हे आजही आठवते. शेती, जमीन, पाणी आणि ग्रामीण व्यवस्था हे त्यांच्या दृष्टीने केवळ धोरणात्मक किंवा पुस्तकातील विषय नव्हते; ते त्यांच्या जगण्याचा भाग होते.

आज जलव्यवस्थापन हा सार्वजनिक चर्चेचा केंद्रबिंदू झाला आहे. परंतु प्रा.देशमुख हे आपल्या काळाच्या खूप पुढे होते. विदर्भात, विशेषतः पश्चिम विदर्भात, जलपरिसंस्थेची रचना आणि बळकटीकरण याबद्दल गंभीरपणे विचार करणाऱ्या अग्रणी दूरदर्शी व्यक्तींमध्ये त्यांचा समावेश होतो. त्यांच्या विचारांत दीर्घकालीन दृष्टी होती - अशा काळात, जेव्हा अनेकांचे लक्ष केवळ तात्कालिक गरजांकडे केंद्रित होते.

### राजकीय प्रामाणिकता आणि आपल्या पायाशी निष्ठा

प्रा.देशमुख यांचे राजकीय जीवन सोयीवर नव्हे, तर ठाम श्रद्धा आणि तत्त्वनिष्ठेवर आधारलेले होते. त्यांना सर्व राजकीय वर्तुळांत आदर होता. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या विधानमंडळी पदांसाठी काही नामांकित समकालीन राजकीय नेत्यांनी त्यांना आमंत्रित केले होते. परंतु त्या मार्गावर जाण्यासाठी त्यांच्या वैचारिक मुळांशी तडजोड करावी लागली असती किंवा आपल्या सामाजिक पायापासून दूर जावे लागले असते; म्हणून त्यांनी तो मार्ग स्वीकारला नाही.

त्यांना हे पूर्णपणे समजत होते की त्यांचा जनाधार धर्मनिरपेक्ष, तत्त्वनिष्ठ आणि कोणत्याही मोठ्या राजकीय गटाशी आंधळेपणाने जोडलेला नव्हता. त्यांची निष्ठा सत्तेसाठी नव्हती; ती त्यांना घडवणाऱ्या लोकांशी, मूल्यांशी आणि मुळांशी होती. ही नैतिक स्पष्टता त्यांना संधीप्रमाणे वाहवत जाणाऱ्यांपासून वेगळे ठरवत होती.

### NUTA आणि लोकशाही संस्थेची उभारणी

NUTA च्या माध्यमातून प्रा. देशमुख यांनी दिलेले संघटनात्मक योगदान त्यांच्या वारशातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. माझे वडील प्रा.ब्रिजमोहन हेडा, प्रा.बारहाते, प्रा.कालनावत आणि एका संपूर्ण पिढीतील समर्पित नेत्यांसोबत ते ज्या NUTA मध्ये वाढले आणि नेतृत्व करू लागले, ती संस्था भारतासारख्या लोकशाही देशातील संघटनात्मक जीवनाचे एक आदर्श उदाहरण ठरली.

NUTA ची सुरुवातीपासूनची उभारणी आणि पुढे एका भव्य संस्थेमध्ये झालेली वाढ पाहण्याची संधी मला मिळाली. NUTA ही केवळ एक संघटना नव्हती; ती एक जिवंत लोकशाही संस्था होती. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशाला अनेक आवाज, अनेक रचना, अनेक नेते आणि सहभागाचे अनेक स्तर असलेला बहुस्तरीय लोकशाही पट का आवश्यक आहे, हे NUTA ने दाखवून दिले. या सर्वांना लोकशाही मूल्ये आणि सामूहिक ध्येय यांनी एकत्र बांधून ठेवले होते.

NUTA ची वाढ ही प्रा. देशमुख यांनी आयुष्यभर जपलेल्या तत्त्वांचे प्रतिबिंब होती - हुकूमशाहीशिवाय शिस्त, अहंकाराशिवाय ठाम श्रद्धा, फुटीरतेशिवाय वाद-संवाद, आणि वैयक्तिक लोभाशिवाय नेतृत्व.

### पिढ्यांपिढ्या नेतृत्व घडवणारे प्रतिबिंब

प्रा.बी.टी.देशमुख यांसारखे दूरदर्शी नेते केवळ आपल्या काळापुरते मर्यादित राहत नाहीत. त्यांनी विदर्भातील प्राध्यापक वर्गाचे प्रश्न मांडले, त्यांचे संघटन केले, त्यांच्या हक्कांसाठी लढा दिला आणि अध्यापन क्षेत्राला बौद्धिक व संघटनात्मक बळ दिले; परंतु त्यांचे कार्य यापेक्षाही अधिक व्यापक होते.

त्यांनी एक असा आदर्श निर्माण केला, ज्याने न बोलता, न गाजावाजा

करता, एका संपूर्ण पिढीतील नेत्यांना प्रभावित केले. त्यांच्या विचारांची, आचरणाची आणि नेतृत्वशैलीची छाया अनेकांवर पडली. हे प्रभावाचे कार्य उघड घोषणांमधून नव्हते; ते त्यांच्या जगण्यातून, निर्णयातून, शिस्तीतून, मूल्यनिष्ठ भूमिकेतून आणि लोकांशी असलेल्या त्यांच्या नात्यांतून घडले.

अशा नेत्यांचे खरे योगदान त्यांच्या पदांमध्ये किंवा तात्कालिक यशातच नसते; ते त्यांनी निर्माण केलेल्या "प्रतिबिंबात" असते. त्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब पुढील पिढ्यांच्या विचारांत, संघटनात्मक संस्कारांत आणि सार्वजनिक जीवनातील नैतिक अपेक्षांत दिसते. प्रा. देशमुख यांनी असेच प्रतिबिंब निर्माण केले - शांत, सखोल, टिकाऊ आणि पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देणारे.

**चिरंतन धडे देणारे आयुष्य**

प्रा.बी.टी.देशमुख आपल्यामागे केवळ आठवणी ठेवून गेले नाहीत. त्यांनी तत्त्वनिष्ठ नेतृत्वाचा आदर्श आपल्यासमोर ठेवला. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की सार्वजनिक कार्य मूल्यांवर आधारलेले असले पाहिजे; संस्था संयम आणि शिस्तीने उभाराव्या लागतात; सत्तेने कधीही ध्येय भ्रष्ट करू नये; बौद्धिक स्पष्टतेला नैतिक धैर्याची जोड असली पाहिजे; आणि साधेपणा ही कमजोरी नसून एक मोठी ताकद आहे.

ज्यांनी त्यांना वैयक्तिकरीत्या ओळखले, त्यांच्यासाठी ते आत्मीय, निष्ठावान आणि अत्यंत मानवी होते. ज्यांनी त्यांना नेता म्हणून पाहिले, त्यांच्यासाठी ते तत्त्वनिष्ठ, दूरदर्शी आणि अविरत परिश्रम करणारे होते. संस्था अभ्यासणाऱ्यांसाठी ते लोकशाही संघटनाबांधणीचे एक अभ्यासपूर्ण उदाहरण राहतील. आणि सार्वजनिक जीवनावर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी ते कायम स्मरण करून देतील की नेतृत्वाचे खरे मोजमाप पदांनी होत नाही; तर ज्या मूल्यांचा त्याग करण्यास एखादी व्यक्ती नकार देते, त्यातून होते.

त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो. नैतिक नेतृत्व, लोकशाही संघटनाबांधणी, सामाजिक जबाबदारी आणि तत्त्वनिष्ठ सेवाभावावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना त्यांचा वारसा सतत प्रेरणा देत राहो.

भावपूर्ण श्रद्धांजलीसह.

# आदरणीय प्रा.बी.टी.भाऊ... विधानपरिषदेतील दृढनिश्चयी भगीरथ !

**- निलेश मदाने, जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

*मा. सभापती महोदयांचे जनसंपर्क अधिकारी, संचालक वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र*

विधानपरिषद या ज्येष्ठांच्या सभागृहात पदवीधर मतदार संघातून सलग पाच वेळा म्हणजे सन १९८० ते सन २०१० पर्यंत असे तीस वर्ष सदस्य म्हणून अतुलनीय योगदान दिलेले आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सर यांचे निधन म्हणजे एका भगीरथाच्या अविरत संघर्षपर्वाची अखेर आहे. ते महाराष्ट्र विधानपरिषदेचे १९ ते २४ जुलै, १९९८ अल्पकाळ अस्थायी सभापती (Pro-tem Chairman) होते. सन १९८० ते १९८६ विदर्भ पदवीधर मतदारसंघ आणि त्यानंतर अमरावती पदवीधर मतदारसंघ ही त्यांची ओळख कायम राहिली. क्रिकेटच्या परिभाषेत सांगायचे झाले तर आक्रमक क्षेत्ररक्षण व्यूहरचनेत फलंदाजाच्या अगदी समोर "फॉरवर्ड शॉर्टलेग" ची जागा असते. फलंदाज कितीही निष्णात असला तरी तो येथील चपळ क्षेत्ररक्षकामुळे मनोवैज्ञानिक दबावाखाली येतोच येतो... बी.टी.भाऊंचे विधानपरिषदेमधील आसन म्हणजे मंत्र्यांच्या दृष्टीने अगदी फॉरवर्ड शॉर्टलेगच ! बी.टी.भाऊ, सुरेश पाटील, प.म.पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे या मंडळींनी भल्या भल्या मंत्र्यांना या फॉरवर्ड शॉर्टलेग वरुन लोकहिताच्या प्रश्नांसाठी जेरीस आणले, अनुकूल उत्तर-आश्वासन पदरात पाडून घेतले. आक्रमक विरोधी पक्षनेते श्री.नितीनजी गडकरी, श्री.पांडुरंग फुंडकर यांची साथ देखील महत्त्वाची ठरायची. सभागृह दणाणून सोडणे म्हणजे काय, याचा प्रत्यय त्यावेळी वार्ताहर गॅलरीने अगदी जवळून घेतला आहे.

दांडेकर समितीचा अहवाल, विदर्भातील विकासाचा अनुशेष, तो दूर व्हावा यासाठी तातडीने काय काय उपाय योजना करायला हव्यात, वैधानिक विकास महामंडळ स्थापनेची आवश्यकता, अमरावतीचा पाणी प्रश्न, शिक्षकांचे प्रश्न आणि ते सोडविण्यासाठी आवश्यक असलेली संघटना बांधणी, शेतकरी आत्महत्या अशा साऱ्या गोष्टींसाठी बी.टी.भाऊंनी विधानपरिषद सदस्यत्वाच्या माध्यमातून केलेला संघर्ष विलक्षण आहे. या संघर्षाचे स्वरुप अनेकदा विकासाच्या वाटेवरील सधन-समृध्द पश्चिम महाराष्ट्र विरुद्ध अनुशेषग्रस्त विदर्भ अशा वळणावर गेल्याचे सभागृहाने अनुभवले. सन १९९९ ते २००८ या कालावधीत ज्येष्ठ नेते श्री.जयंत पाटील हे राज्याचे वित्तमंत्री होते. या काळात सभागृहात बी.टी.भाऊंनी सर्व उपलब्ध संसदीय आयुधांचा पर्याप्त वापर करीत वेळ प्रसंगी शासनाला धारेवर धरत अनुशेष निवारणार्थ संसाधनाच्या समन्यायी वाटपासाठी दिलेला लढा ऐतिहासिक ठरावा असाच आहे. सभापती महोदय, मंत्री महोदय असं कसं सांगताहेत... अशी हरकत घेत पुढे अतिशय आक्रमकपणे ते आपले मुद्दे मांडत. एका प्रसंगी नागपूर अधिवेशन काळात वित्तमंत्री श्री.जयंत पाटील यांच्याशी त्यांची सभागृहात चकमक झडली. दुसऱ्या दिवशी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना नागपूरच्या रूग्णालयात दाखल व्हावे लागले. वित्तमंत्री श्री. जयंत पाटील साहेब तातडीने त्यांची विचारपूस करण्यासाठी रूग्णालयात पोहचले. टोकाचे मतभेद असले तरी मनभेद नसावेत, महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकीय परंपरेचे हे महत्त्वाचे उदाहरण.

विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह सर्व राज्यांमध्ये नाही. या सभागृहाला काळाच्या ओघात वरिष्ठ सभागृह, ज्येष्ठांचे सभागृह, विद्वतजनांचे सभागृह, पुनर्विलोकन सभागृह (Revising Chamber) ही नामाभिदाने प्राप्त झालेली आहेत. ही नामाभिदाने किती यथार्थ आहेत त्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे बी.टी.भाऊ. सिंचनासह विदर्भाच्या अनुशेषासंदर्भात आवाज उठवत असतांना त्यांनी सुचविलेल्या उपाययोजना पुढील काळासाठीचे यथायोग्य दिशादर्शक देखील आहेत.

बी.टी.भाऊंच्या विनियोजन विधेयक शिफारशीमुळे अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च-एप्रिल २००३ दरम्यान घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला होता. त्यामुळे अधिवेशनाचे सूप वाजल्यावर पुन्हा विधानसभेचे एक दिवसाचे अधिवेशन बोलवावे लागले. विनियोजन विधेयक विधानसभेने संमत करुन विधानपरिषदेकडे विचारार्थ पाठविले. विधानपरिषदेकडे ते आल्यावर बी.टी.भाऊंनी त्यास अनुशेषाच्या संदर्भात शिफारस केली आणि ती विधानपरिषद सभागृहाने संमत केली. त्यामुळे या शिफारशीसह हे विधेयक पुन्हा विधानसभेकडे पाठविण्यात आले, मात्र अधिवेशनाचा अखेरचा दिवस असल्याने शिफारशीसह विनियोजन विधेयक विधानसभेला प्राप्त झाले त्यावेळी विधानसभेचे अधिवेशनाचे कामकाज संस्थगित झाले होते. विनियोजन विधेयक शिफारशीसह मंजूर होण्यासाठी विधानसभेचे एक दिवसाचे अधिवेशन दिनांक ०८ मे, २००३ रोजी पुन्हा बोलवावे लागले होते. महाराष्ट्र विधिमंडळाच्या वाटचालीतील बी.टी.भाऊंशी जोडला गेलेला हा प्रसंग वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा (CPA MAHARASHTRA BRANCH) ही देशातील पहिली शाखा आहे. सन्माननीय सदस्यांसाठी तसेच राज्यशास्त्र व लोकप्रशासन शाखेच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संसदीय अभ्यासवर्ग, परदेश अभ्यास दौरे आणि विविध प्रबोधनात्मक उपक्रम विधानमंडळातील या संस्थेद्वारे राबविले जातात. राज्यशास्त्राचे प्राध्यापक असलेल्या बी.टी.भाऊंचे सीपीएशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. नागपूर अधिवेशन काळात सीपीए अभ्यासवर्गामध्ये दुपारच्या अनौपचारिक सत्रात बी.टी.भाऊंचा विद्यार्थ्यांबरोबर होणारा संवाद म्हणजे चिरंतन प्रेरक अनुभूती होय. सरकारकडून सीपीएला अनुदानापोटी प्राप्त झालेला फंड संस्थेचा खर्च भागविण्यासाठी मुदत ठेवीमध्ये गुंतविण्यात आला होता, काही तांत्रिक बाबी आणि महालेखाकारांची भूमिका यामुळे हा निधी परत जाण्याची शक्यता होती. यासंदर्भात तत्कालीन सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांनी सीपीए कार्यकारिणीची बैठक महालेखाकार, वित्त सचिवांसह बोलावली. प्रा.श्री.बी.टी.देशमुख सरांनी आपले सर्व कौशल्य आणि अनुभव पणाला लाऊन बिनतोड युक्तीवाद करत हा निधी परत जाण्यापासून रोखला, ज्या ठेवीच्या व्याजावर पुढे सीपीए लंडन मुख्यालय शुल्क, आशयिा विभाग शुल्क आणि अभ्यास वर्गासारख्या विविध उपक्रमांचा खर्च भागविण्यात आला...

तपस्वी जीवनशैली, अढळ तत्वनिष्ठा, अविरत सेवाभाव यांचा मापदंड मागे ठेवत आदरणीय बी.टी.भाऊ या आचार्याने शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६ च्या रात्री निजधामाकडे प्रस्थान ठेवले. मुख्यमंत्री महोदयांनी शोकभावना व्यक्त करतांना एक पर्व संपले... असे म्हंटले ते अगदी खरे आहे.

देखणी ती जीवने जी तृप्तीची तीर्थोदके

चांदणे ज्यातून फाके शुभ्र पाऱ्यासारखे...

कविवर्य बा.भ.बोरकर यांच्या या काव्यपंक्ती बी.टी.भाऊंचे स्मरण करतांना डोळ्यासमोर येतात. अस्वस्थ वर्तमानाच्या संदर्भात अशा दृढनिश्चयी भगीरथाचे आपल्यात नसणे वेदनादायी आहे. आम्हां राज्यशास्त्र विद्यार्थ्यांना सॉक्रेटिस - प्लेटो - रिस्टॉटल शिकविणारे प्रा.बी.टी.देशमुख सर "तत्त्वज्ञ राजा"च्या भूमिकेत मात्र आमच्या हृदयात सदैव विराजमान राहतील...

# पुन्हा बी टी.होणे फार कठीण !!!

- प्राचार्य डॉ.अरविंद देशमुख, अमरावती

अमरावती पदवीधर मतदार संघाचे माजी आमदार आदरणीय बी.टी.भाऊ देशमुख यांचे परवा निधन झाले. त्यांचे एकंदर वय तसेच गेल्या काही दिवसांपासून त्यांना होत असलेला प्रकृतीचा त्रास व त्यांच्या तब्येतीतील चढ-उतार बघता ही घटना एकदम अनपेक्षित जरी नसली तरी त्यांच्या कायमस्वरूपी जाण्याचा सर्वांनाच प्रचंड धक्का बसला व तीव्र दुःख झाले. त्यांच्या मृत्यूने सर्वत्र शोककळा निर्माण झाली. त्यांची एकंदर नियमित दिनचर्या, वक्तशीरपणा, रोज सकाळी न चुकता पोहणे, उंच व मजबूत शरीरयष्टी तसेच सुदृढ मनोवस्था पाहता त्यांनी अजून काही काळ जगणे सहज शक्य आहे, असे एकंदर प्रत्येकाला अगदी मनापासून वाटत होते. पण शेवटी "मॅन प्रपोझेस व गॉड डिस्पोझेस" म्हणतात याचा अत्यंत दुःखद प्रत्यय आला.

आज पासून अगदी ८० वर्षांपूर्वी भाऊंनी बेलोरा सारखे आपले अत्यंत छोटे खेडे सोडले व अमरावतीत आले. त्यावेळेला त्यांच्या सोबत सर्व प्रकारची प्रतिकूलता व अत्यंत गरिबी होती. कुठल्याही प्रकारची राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना भाऊंचा एकंदर जीवन प्रवास अत्यंत दैदिप्यमान व प्रचंड प्रेरणादायी ठरला. अमरावतीचे प्रसिद्ध व लोकप्रिय दै. हिंदुस्थानमध्ये स्वातंत्र्य संग्राम सेनानी कै.बाळासाहेब मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली भाऊंनी मुद्रितशोधकापासून आपल्या 'करिअरला' सुरुवात केली. तो त्यांचा प्रवास पत्रकार, प्राध्यापक, प्राध्यापकांचा नेता, आमदार इथपासून संपूर्ण समाजाच्या कायमस्वरूपी आदरास प्राप्त होणे इथपर्यंत जाऊन पोहोचला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये भाऊंनी ते बालवयात दिलेले भाषण तत्कालीन सर्व मान्यवर नेत्यांच्या कौतुकास पात्र ठरले. तसाच प्रत्यय पुन्हा ते विदर्भ महाविद्यालय विद्यार्थी संघाचे अध्यक्ष असताना आला.

स्व.यशवंतराव चव्हाणांसारख्या अत्यंत सुसंस्कृत लोकनेत्याचे मन त्यांनी त्यावेळेस आपल्या अत्यंत स्पष्ट व रोखठोक भाषणाने कायमस्वरूपी जिंकून टाकले. श्री.शिवाजी महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करत असतांना कधी ते चुकूनही महाविद्यालय किंवा आपल्या तासाला उशिरा गेले नाहीत. ते अत्यंत विद्यार्थी प्रिय प्राध्यापक तर ठरलेच परंतु राज्यशास्त्र या विषयातील भारतीय संविधानावरील त्यांचे लेखन पदवी स्तरावर राज्यशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता 'गीता' ठरावी, या तोडीचे झाले. राज्यशास्त्राचे प्राध्यापक विदर्भ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आदरणीय प.सि.काणे सर हे भाऊंचे महाविद्यालयीन जीवनातील गुरु!!! परंतु काणे सरांनी सदैव अत्यंत अभिमानाने व कौतुकाने आपल्या विद्यार्थ्याविषयी सांगावं की, "मी जो काही आहे तो 'भाऊराव' मुळे!!!" हा काणे सरांसारख्या अत्यंत विद्याव्यासंगी व उच्च व्यक्तिमत्त्वाचा मोठेपणा तर आहेच. परंतु त्याचबरोबर आदरणीय भाऊंचेही श्रेष्ठत्व यात अधोरेखांकित झाल्याशिवाय राहत नाही. किंबहुना पू.माऊलींच्याच शब्दात म्हणावयाचे झाल्यास 'येथ अलंकारिले कवणकवणे' याप्रमाणे कोण कोणामुळे अधिक शोभून दिसतो हे ठरवणे अत्यंत कठीण आहे. अशी ही अलौकिक व अद्वितीय गुरु शिष्याची जोडी आपणास बघावयास मिळाली, हे आपले भाग्य आहे.

पुढे भाऊ प्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष झाले, विद्यापीठातील अनेक पदे त्यांनी भूषवली. विद्यापीठ निर्मितीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला. ते आमदार झालेत, उत्कृष्ट संसदपटू म्हणून सन्मानित झाले, खरे ज्ञानयोगी ठरलेत. शिक्षक, प्राध्यापकांना सन्मानाचे जगणं प्राप्त करून दिल्यानंतर त्यांनी विदर्भाच्या सिंचन अनुशेषाचा प्रचंड अभ्यास केला व याबाबतीतील त्यांची तळमळ, कळकळ व कार्य पाहून लोक विद्यापीठाने त्यांना 'सिंचन अनुशेष निर्मूलन महर्षी' या उपाधीने गौरवान्वित केले. अप्पर वर्धा धरणाची निर्मिती व त्या माध्यमातून सिंचना सोबतच अत्यंत गोड पाणी अतिशय सुलभपणे बारमाही त्यांनी अमरावतीकरांच्या दारापर्यंत कायमस्वरूपी पोहोचवले आणि ते 'भगीरथ' या उपाधीला प्राप्त झाले. आणि 'जोवर पाणी तोवर बीटी' ही म्हण रूढ झाली. म्हणूनच परवा या भगीरथाच्या स्वर्गारोहणाने अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणवल्या. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' किंवा तुकोबारायांनी म्हटल्याप्रमाणे 'तुका म्हणे एका मरणेची सरे! उत्तमचि उरे कीर्ती मागे!!' या संतोक्तीचा मूर्तिमंत आविष्कार आदरणीय भाऊंच्या जीवनात दिसला. त्यांची राहणी अत्यंत साधी होती. अतिशय स्वच्छ खादीचा पांढराशुभ्र पायजामा व बंगालीशर्ट हा त्यांचा आजन्म पोषाख होता. सार्वजनिक जीवनात सातत्याने वावरत असताना, पद, प्रतिष्ठा सर्व काही असताना आपल्या पांढऱ्या शुभ्र पोशाखाप्रमाणेच धुतलेल्या तांदुळाला देखील म्लान वाटावं, असं त्यांनी आपले स्वच्छ चारित्र्य शेवटपर्यंत अबाधित ठेवले. ही साधी गोष्ट नाही.

जवळपास नऊ दशकांच्या त्यांच्या जीवनात मायक्रोस्कोप मधून बघितल्यावरही असा कोणताही डाग त्यांच्या जीवनात त्यांच्या विरोधकांनाही सापडू नये, ही साधी गोष्ट नाही आणि म्हणूनच विरोधकांच्याही आदराला ते पात्र ठरलेत. शिक्षक, प्राध्यापकांचे सार्वत्रिक प्रश्न, शिक्षण क्षेत्रातील प्रश्न, विदर्भाचा सिंचनातील अनुशेषाचा प्रश्न व अप्पर वर्धा धरण या एवढ्या क्षेत्रातील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ते 'फोकस्ड' जगले. त्यासाठी त्यांनी आपला विधानपरिषदेतील आमदार पदाचा वापर अत्यंत संवैधानिक पद्धतीने जितक्या जोमदार व जोरदार पद्धतीने केला, तसा वापर नजीकच्या काळात खचितच कोणी करू शकेल. ते सभागृहामध्ये प्रचंड आक्रमक झाले. प्रशासन व मंत्र्यांना देखील त्यांचा धाक वाटत असेल. हे नैतिक वजन त्यांनी कमावले. परंतु कधी त्यांचा भाषेवरील तोल सुटला नाही.

सवंग लोकप्रियतेचे त्यांना कधी आकर्षण वाटले नाही. अनेक योग्य ठिकाणी त्यांनी आपला आमदार विकास निधी सहज दिला परंतु आपल्याच विकास कामांचे आपण भूमिपूजन करावे व आपल्या नावाचा फलक लावावा, असं त्यांना चुकूनही वाटलं नाही. वर्तमान काळातील एकंदर याबाबतीतील परिस्थिती पाहता ही बाब कल्पनेच्या पलीकडची आहे. आणि हेच बीटींचे वेगळेपण व बीटी नावाचे रसायन आहे. त्यांनी निवडणुकीच्या प्रचारासाठी मतदारांकडूनच योगदान निधी प्राप्त केला व त्यातूनच प्रचार केला व सातत्याने पाच वेळा निवडणूक जिंकली. हा त्यांचा विक्रम कदाचित कोणालाही मोडता येणार नाही. त्याकरिता समर्पण लागतं. त्या समर्पणाचं नाव होतं 'बी.टी.देशमुख'!!! हे त्यांनी सिद्ध केलं होतं. त्यांनी वैयक्तिक प्रश्नांना कधीही एंटरटेन केले नाही. परंतु या तीस वर्षाच्या आपल्या आमदारकीच्या काळात त्यांनी सार्वत्रिक हिताचे अनेक प्रश्न विधानपरिषदेमध्ये मांडले. आणि ते केवळ मांडून थांबले नाहीत. तर त्या प्रश्नांची त्यांनी यशस्वी सोडवणूक करून दाखवली आणि म्हणून 'आदर्श जनप्रतिनिधीचे रोल मॉडेल' म्हणून त्यांचा सदैव आदराने उल्लेख करता येईल, अशा पद्धतीचे त्यांचे हे कार्य आहे.

त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्द व झगमगटापासून तसेच या क्षेत्राच्या लाभापासून सदैव आपल्या कुटुंबाला कोसो दूर ठेवले व त्यांच्या कुटुंबियांनी देखील याबाबत कधी लोभ ठेवला नाही. ही बाब सध्याच्या काळातील एकंदर राजकीय कल्चर पाहता अतिशय अपवादात्मक आहे. म्हणूनच अनेक चांगल्या बाबतीत बी.टी. देशमुख कायम एकमेव ठरलेत व भविष्यात पुन्हा असा 'बीटी होणे' फार कठीण आहे, ही जनभावना निर्माण झाली. त्यांनी मूल्याधिष्ठित राजकारण केले. राजनीति मध्ये नीती सांभाळून राजकारण करता येते, हे प्रत्यक्ष सिद्ध करून दाखवले. ते मंत्री, खासदार, कुलगुरू सहज होऊ शकले असते. स्वतःची एखादी मोठी शिक्षण संस्था काढू शकले असते व स्वतःच्या कुटुंबियांची कायमस्वरूपी सोय करून ठेवू शकले असते किंवा आपल्या राजकीय कारकिर्दीचा वापर करून एखाद्या मोठ्या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होऊ शकले असते, पण हा मोह त्यांना आयुष्यात कधी झाला नाही.

ज्या एका कामाशी आणि क्षेत्राशी त्यांनी कमिटमेंट स्वीकारली. तीच कमिटमेंट त्यांनी आयुष्यभर अगदी कायमस्वरूपी जाण्याच्या शेवटच्या दिवशी पर्यंत किंबहुना अंतिम श्वासापर्यंत पाळली. त्या अर्थाने ते मृत्युंजयी ठरले. आपल्या वैयक्तिक जीवनातील अत्यंत कडक स्वयंशिस्त त्यांनी सार्वजनिक जीवनातही सांभाळली आणि आयुष्यातील अंतिमक्षणापर्यंत तिचा भंग होऊ दिला नाही, एका विलक्षण कर्मयोग्याचेच हे लक्षण आहे.

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी म्हटले आहे की, तत्त्ववादी माणसे राजकारणात येत नाहीत, आली तर टिकत नाहीत, टिकली तरी यशस्वी होत नाहीत आणि यदाकदाचित यशस्वी झालीत तर मग त्यांची तत्त्वे टिकत नाहीत पण बीटी भाऊ याला अपवाद ठरलेत. ते आपली मूल्ये घेऊन राजकारणात आलेत, यशस्वी झालेत. प्रचंड सामाजिक व सार्वत्रिक हिताचे कार्य त्यांनी केले. पण आपल्या मूल्यांशी कधीही तडजोड केली नाही. म्हणून आता त्यांच्या जाण्याने अशा मूल्याधिष्ठित राजकारणाचा अस्त झाल्याची चिंता सुज्ञसमाजमनाला भेडसावत आहे. त्याकरिता समाजमन अस्वस्थ आहे. त्यामुळेच बीटींच्या जाण्याचे दुःख सर्वांनाच अतिशय जास्त आहे. बीटी होणं व बीटी म्हणून कायम राहणं कठीण आहे. ते त्यांना जमलं. ते सर्वांनाच जमेल असं नाही पण किमान काही मूल्ये ठेवून प्रत्येकाला आपापल्या क्षेत्रात कार्य करणे शक्य आहे आणि तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

# शिक्षण क्षेत्रातील भीष्मपितामह, शिक्षक चळवळीचे आधारस्तंभ, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि जननेते आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सर यांना विनम्र अभिवादन

- प्रा.डी.एस.चव्हाण
अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ.

माजी आमदार, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक, शिक्षक चळवळीचे खंदे नेतृत्व, नुटा (NUTA), MFUCTO व AIFUCTO चे आधारस्तंभ, असंख्य शिक्षक-प्राध्यापकांचे मार्गदर्शक आणि शिक्षण, समाजकारण तसेच जनहिताच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर झटणारे आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सर यांच्या निधनाची बातमी संपूर्ण महाराष्ट्रासाठी, विशेषतः विदर्भातील शिक्षण क्षेत्रासाठी अत्यंत दुःखद आणि वेदनादायी आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक व्यक्ती हरपलेली नाही, तर एक विचार, एक चळवळ, एक संघर्षशील नेतृत्व आणि शिक्षण क्षेत्रातील एक युगच संपल्याची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख सर हे नाव म्हणजे संघर्ष, अभ्यास, प्रामाणिकपणा, निष्ठा आणि समाजहितासाठीच्या अविरत लढ्याचे प्रतीक होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात शिक्षण क्षेत्रातील शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. अन्यायाविरुद्ध लढणे, दुर्लक्षितांच्या हक्कांसाठी आवाज उठवणे आणि शासन-प्रशासनापुढे अभ्यासपूर्ण मांडणी करून न्याय मिळवून देणे, ही त्यांची जीवनशैली होती.

त्यांचा प्रवास हा एका सामान्य प्राध्यापकापासून राज्याच्या विधिमंडळात प्रभावी आमदार म्हणून पोहोचण्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास होता. या प्रवासामध्ये त्यांनी कधीही पद, प्रतिष्ठा किंवा सत्तेचा मोह बाळगला नाही. त्यांच्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट होती ती म्हणजे समाजहित, शिक्षकांचे प्रश्न आणि शिक्षण क्षेत्राची उन्नती. त्यांनी मिळवलेली प्रत्येक जबाबदारी ही स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठी उपयोगात आणली.

राज्यशास्त्र विषयाचे ते गाढे अभ्यासक होते. त्यांच्या व्यासंगाची व्याप्ती अफाट होती. कोणत्याही विषयावर बोलताना त्यांचा अभ्यास, तथ्यांची अचूक मांडणी आणि प्रश्नांच्या मुळाशी जाण्याची क्षमता पाहून श्रोते भारावून जात. विधानपरिषदेमध्ये त्यांनी केलेली भाषणे आजही अभ्यासकांसाठी आणि लोकप्रतिनिधींसाठी आदर्श मानली जातात. त्यांच्या प्रत्येक भाषणामागे सखोल अभ्यास, सामाजिक बांधिलकी आणि जनतेच्या प्रश्नांविषयीची प्रामाणिक तळमळ दिसून येत असे.

अमरावती पदवीधर मतदारसंघाचे ५ वेळा (३० वर्षे) प्रतिनिधित्व करताना त्यांनी लाखो शिक्षक, प्राध्यापक आणि पदवीधर मतदारांच्या अपेक्षांना न्याय दिला. शिक्षकांच्या सेवाशर्ती, वेतन, निवृत्तीवेतन, पदोन्नती, अनुदान, महाविद्यालयीन विकास, विद्यापीठीय प्रश्न आणि शैक्षणिक धोरणे यांसारख्या अनेक विषयांवर त्यांनी सातत्याने प्रभावी भूमिका मांडली. शिक्षकांच्या प्रश्नांवर शासनाला धारेवर धरणारे आणि त्याचवेळी सकारात्मक उपाय सुचवणारे नेते म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली होती.

नुटा (NUTA) या शिक्षक संघटनेच्या माध्यमातून त्यांनी हजारो शिक्षकांना संघटित केले. शिक्षकांचा आत्मसन्मान, त्यांच्या न्याय्य मागण्या आणि शिक्षण व्यवस्थेतील गुणवत्ता यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. अनेक शिक्षकांच्या जीवनात त्यांनी आशेचा किरण निर्माण केला. अनेकांना न्याय मिळवून दिला. अनेकांच्या समस्यांचे निराकरण केले. म्हणूनच शिक्षक समाज त्यांना केवळ नेता म्हणून नव्हे तर कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य आणि मार्गदर्शक म्हणून पाहत होता.

प्रा.बी.टी.देशमुख सर यांचे नेतृत्व हे केवळ संघटनात्मक नव्हते, तर ते वैचारिक नेतृत्व होते. त्यांनी संघर्षाला नेहमी अभ्यासाची जोड दिली. भावनिक घोषणांपेक्षा तथ्याधारित भूमिका मांडण्यावर त्यांचा भर असे. कोणत्याही विषयावर निर्णय घेण्यापूर्वी त्याचा सखोल अभ्यास करणे, विविध बाजू समजून घेणे आणि त्यानंतर ठाम भूमिका घेणे, ही त्यांची कार्यपद्धती होती. त्यामुळे त्यांच्या मतांना शासन, प्रशासन आणि समाजामध्ये विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

विदर्भाच्या विकासाच्या प्रश्नावर त्यांनी आयुष्यभर सातत्याने आवाज उठविला. विदर्भातील सिंचनाचा अनुशेष, पिण्याच्या पाण्याची समस्या, शेतीविषयक अडचणी, शिक्षणाच्या संधींची कमतरता आणि विकासातील विषमता यांसारख्या विषयांवर त्यांनी प्रभावीपणे लढा दिला. विदर्भाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेला संघर्ष आजही प्रेरणादायी मानला जातो. शासन स्तरावर न्याय न मिळाल्यास न्यायालयीन मार्ग स्वीकारण्याची त्यांची तयारी हे त्यांच्या संघर्षशील वृत्तीचे उत्तम उदाहरण होते.

अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते त्याच्या विकासापर्यंत अनेक महत्त्वाच्या प्रश्नांमध्ये आ.भाऊंचे योगदान राहिले. उच्च शिक्षणाच्या विस्तारासाठी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणाली निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या विचारावर त्यांचा दृढ विश्वास होता.

आ.भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी! मोठी पदे भूषवूनही त्यांनी कधीही अहंकार जवळ येऊ दिला नाही. प्रत्येक व्यक्तीशी आत्मीयतेने संवाद साधणे, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदतीचा हात देणे आणि तरुणांना योग्य दिशा दाखवणे, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यामुळे त्यांच्याविषयी सर्व स्तरांमध्ये आदर आणि प्रेमाची भावना होती.

असंख्य शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना भाऊंनी घडविले. अनेकांना त्यांनी प्रेरणा दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेकांनी आपले आयुष्य आणि कार्यक्षेत्र अधिक अर्थपूर्ण बनविले. आज त्यांच्या जाण्याने हजारो शिष्य, सहकारी आणि हितचिंतक स्वतःला पोरके समजत आहेत.

आ.भाऊंच्या निधनानंतर अनेक मान्यवरांनी व्यक्त केलेल्या भावना त्यांच्या कार्याची व्याप्ती दर्शवितात. त्यांना शिक्षक चळवळीचा आधारवड, शिक्षण क्षेत्रातील भीष्मपितामह, संघर्षशील नेता, अभ्यासू आमदार, लोकनेता आणि समाजहितासाठी आयुष्य समर्पित करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून गौरविण्यात आले. हे गौरवोद्‌गार त्यांच्या कार्याचे खरे मूल्यमापन आहेत.

आज आपण आ.भाऊंना श्रद्धांजली अर्पण करत असताना त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे. शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी, शिक्षकांच्या सन्मानासाठी, विद्यार्थ्यांच्या भविष्याकरिता आणि समाजातील वंचित घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी ज्या मूल्यांचा पुरस्कार केला, ती मूल्ये जपणे हीच त्यांच्याप्रती खरी श्रद्धांजली ठरेल.

प्रा.बी.टी.देशमुख सर यांचे संपूर्ण आयुष्य हे एका तपस्व्याचे आयुष्य होते. त्यांनी पदासाठी नव्हे तर ध्येयासाठी काम केले. सत्तेसाठी नव्हे तर समाजासाठी संघर्ष केला. स्वतःच्या फायद्यापेक्षा सार्वजनिक हिताला प्राधान्य दिले. म्हणूनच ते आज आपल्या सोबत नसले तरी त्यांचे विचार, त्यांचे कार्य, त्यांची संघर्षशील वृत्ती आणि त्यांनी निर्माण केलेली प्रेरणा सदैव जिवंत राहील.

आ.भाऊंच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे. परंतु त्यांनी दिलेली मूल्ये, त्यांनी घालून दिलेला आदर्श आणि त्यांनी उभारलेली संघर्षाची परंपरा येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत राहील. त्यांचे स्मरण म्हणजे केवळ एका व्यक्तीचे स्मरण नाही, तर एका महान विचाराचे, एका चळवळीचे आणि एका युगपुरुषाचे स्मरण आहे.

या अत्यंत दुःखद प्रसंगी आ.भाऊंच्या कुटुंबीयांच्या, मित्रपरिवाराच्या, सहकाऱ्यांच्या, विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात संपूर्ण महाराष्ट्राच नव्हे तर देशातील शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्वच सहभागी आहेत.

निसर्ग आ.भाऊंच्या पवित्र आत्म्यास चिरशांती प्रदान करो आणि त्यांच्या परिवारास हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच निसर्गचरणी प्रार्थना.

आदरणीय प्रा.बी.टी.भाऊ देशमुख सर यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली...!

# मूल्यनिष्ठ व तात्त्विक विचाराचे अधिष्ठान आदरणीय बी.टी.देशमुख सर

**- डॉ राजेश मिरगे,** *श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती*

आजकाल तत्त्व व मूल्यांची होळी करून राजकारण, समाजकारणाची आसुरी चळवळ पाहून मन निराशेच्या गर्तेत खोल जात असतानाच "भाऊंच्या" अचानक एक्झिटमुळे समाजमन प्रचंड अस्वस्थ आहे. अगदी कालपरवा पर्यंत शेवटच्या क्षणापर्यंत महाराष्ट्रातील व विशेषतः विदर्भातील सामाजिक, शैक्षणिक, रोजगाराभिमुख प्रश्नांकरिता लढाई सुरू असतानाच भाऊंचे असे निघून जाणे सर्वांना धक्कादायक आहे. त्यांनी उभारलेल्या विधायक व समाजमनाला न्याय देणाऱ्या चळवळीला पुढे नेण्याचे मोठे आव्हान आहे.

भाऊ! गेल्या सात दशकांपासून सर्वसामान्य वंचित माणसाचा लढा लढणारे आपण लढवय्ये आहात. शिक्षक, पदवीधर, विद्यार्थी, शेतकरी शेतमजूर यांच्या न्यायपूर्ण प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आपण आपले आयुष्य समर्पित केले. या लढ्यात अनेकदा रस्त्यावर येऊन संघर्ष सुद्धा केला. जलसिंचन, बेरोजगारी, विदर्भाचा अनुशेष, विद्यापीठ व उच्च शिक्षणाच्या संदर्भातले गंभीर प्रश्न, प्राध्यापक-शिक्षकांचे प्रश्न, पदवीधरांचे प्रश्न, जुन्या पेन्शनचा हक्क पूर्ण लढा या प्रश्नांना न्याय देण्यासाठी आपला संघर्ष सास्मरणीय आहे. प्रत्येक समस्या-अडचणीचे मूळ स्वरूप काय आहे? आपण काय केले पाहिजे? शासन आणि समाजाची काय भूमिका असावी याची अभ्यासपूर्ण मांडणी व चळवळ कार्यकर्त्यांना सतत प्रेरणा देणारी होती. विदर्भातील जलसिंचन, शिक्षण व आरोग्य, पायाभूत सुविधा, रोजगार  याबाबत आपली लढाई दीर्घकाळ चालली. यासाठी आपल्या अभ्यासपूर्ण विश्लेषणाचा चळवळीला महत्त्वपूर्ण फायदा झाला. विदर्भ हा नैसर्गिक ससाधनांनी समृद्ध प्रदेश असूनही विकासाच्या अनेक निकषावर मागे राहिला. सिंचनाची अत्यल्प सुविधा, उद्योगधंद्याचा अभाव, अपुरी सोई सुविधा आणि रोजगाराच्या मर्यादित संधी ह्या उणिवा होत्या. नागपूर कराराच्या नुसार विदर्भाला न्याय निधी मिळावा आणि प्रादेशिक असमतोल दूर व्हावा यात आपली प्रमुख भूमिका होती. यासाठी भाऊंनी विधानपरिषदेत व विविध सार्वजनिक मंचावर सातत्याने आवाज उठवला. भाऊंनी केवळ समस्या मांडल्या नाही तर त्यावर विधायक उपयुक्त उपाय सुचवले.

विदर्भासाठी स्वतंत्र विकास आराखडा, शेती व सिंचनासाठी विशेष निधी, शिक्षणाचा विस्तार आणि ग्रामीण विकासाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. मोर्चा, आंदोलन व सोबतच संसदीय आयुधांचा आपण प्रभावी व पूरक वापर केला, सरकारला धारेवर धरले. आपल्या या प्रयत्नामुळे विदर्भात जलसिंचनाचे अनेक प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यात आले . विशेषतः अमरावतीकरांसाठी "पाणीदार गाव" ही संकल्पना खऱ्या अर्थानं आपल्या अथक परिश्रमामुळे परिपूर्ण झाली. आज "अप्परवर्धा धरण" त्याची साक्ष देते आहे. सर्वसामान्य माणसांच्या पिण्याच्या पाण्याचे प्रश्न तर आपण सोडवले पण त्यासोबतच शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळाले, शेती हिरवी झाली, त्याचे जीवन समृद्ध होण्यात आपला महत्त्वाचा वाटा आहे. विद्यापीठ शिक्षण हे खऱ्या अर्थानं गुणवत्तापूर्ण असावे व त्यातून विद्यार्थ्यांचे करिअर, ध्येयनिष्ठा पूर्ण व्हावी व त्यातून एक उत्तम समाज होण्याचे स्वप्न साकारण्यासाठी आपण सातत्याने महाराष्ट्रभर विद्यापीठाला गुणवत्तापूर्ण प्रतिष्ठा मिळवण्यासाठी प्रयत्न केले. विद्यापीठीय कायदा व पारदर्शी प्रशासनामुळे शिक्षक, विद्यार्थी, समाज यांच्या उपयोग व्हावा यासाठी अथक परिश्रम आपण घेतले. आपल्या प्रयत्नामुळे उच्च शिक्षणात प्रभावी अंमल झाला. त्यामुळे अनेक पिढ्या उच्च शिक्षण घेऊन उत्तम समाज उभारणीचा महत्त्वाचा वाटा उचलत आहेत, यासाठी आपण कायम स्मरणात आहात.

भाऊ! आपण शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी त्यांचे प्रश्न हे सातत्याने घेऊन लढले. त्यांना न्याय दिला पण त्यासोबतच शिक्षण आणि गुणवत्ता, अध्यापन याबाबत आपण कधीच तडजोड केली नाही. त्यासाठीचा आपला तात्त्विक, मूल्यनिष्ठ विचारांचा व आचारशीलतेचा आग्रह हा आज प्रत्येक शिक्षकाला दिशा दिग्दर्शक करणारा आहे. विद्यार्थी आणि शिक्षक हे नाते समृद्ध होण्यासाठी त्याने ज्ञानसंपन्न झाले पाहिजे हा आपला आग्रह आम्हाला प्रेरणादायी आहे. एकविसाव्या शतकातल्या पिढीला ज्ञानाचे महत्त्व व त्यासाठी वाचन संस्कृती अभ्यास याबाबतची प्रेरणा आपल्या व्यक्तिमत्त्वातून आपण दिली. श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे राज्यशास्त्राचे अध्यापन करीत असताना शेकडो विद्यार्थ्यांची गुणवत्ता पूर्ण पिढी घडवण्याचे आपले परिश्रम व कौशल्य आम्हा शिक्षकांना प्रेरित करते. शिक्षकांच्या शैक्षणिक गुणवत्ते सोबत त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला आपण वाचा फोडली. विशेषतः नेट-सेटग्रस्त प्राध्यापकांच्या प्रश्न असो त्याच्या सेवाशर्ती, त्याची पदोन्नती बाबतीमध्ये न्याय अशी नियमावली, विद्यापीठ कायदा याचा आपण सातत्याने पाठपुरावा करून त्याला न्याय दिला. त्यासाठी आपण आपल्या दीर्घ संसदीय कारकीर्दीत आपण संसदीय आयुध यांचा वापर करीत सत्ताधारी व्यवस्थेला धारेवर धरले. विधान परिषदेत किंवा विधानसभेत आपले प्रश्न असले म्हणजे मुख्यमंत्री व संबंधित खात्याचे मंत्री सुद्धा अभ्यास केल्याशिवाय बोलू शकत नव्हते. एवढा प्रचंड अभ्यासाचा शासनावर आपला प्रभाव होता. आपल्या अभ्यासपूर्ण विश्लेषणामुळे शासनाने स्वतःचे अनेक अध्यादेश दुरुस्त केले हे येथे उल्लेखनीय ठरते. आपले वक्तृत्व अभ्यासपूर्ण, कायद्याच्या चौकटीतले, संविधानिक स्वरूपाचे होते. अनेकदा त्यात मिश्किल भाव व व्यंगात्मक शैलीतून विधानसभा असो वा सार्वजनिक सभा जिंकण्याचे कौशल्य अत्यंत प्रभावी असल्याने कायम स्मरणात राहील.

आपल्या दीर्घकाळ अशा सार्वजनिक जीवनात राजकारण, समाजकारणात व्यक्तिगत प्रश्नांना कधीच स्थान दिले नाही. सातत्याने सामूहिक प्रश्नांना न्याय देण्यासाठी आपली लढाई होती. म्हणूनच एका कार्यक्रमात तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख म्हणाले होते की मुख्यमंत्री म्हणून माझ्याकडे दिवसभरात येणारे लोक हे आपले वैयक्तिक प्रश्न घेऊन येतात. पण मात्र आदरणीय बी.टी. देशमुख एकमेव असे नेते आहेत. हे सर्वसामान्य लोकांच्या सामूहिक प्रश्नांना न्याय देण्यासाठी माझ्याकडे सातत्याने येणारे आहेत त्याबद्दल मी त्यांचा गौरव करतो. आजच्या वर्तमान स्थितीत सामाजिक, शैक्षणिक प्रश्नांच्या बाबतीत फारसा आवाज कानावर येत नाही. प्रत्येक व्यक्ती हा स्वकेंद्रित झाल्याने स्वार्थी बनला आहे. अशा या पार्श्वभूमीवर सामाजिक तळमळ असणाऱ्या या नेत्याची पुढील भविष्यात उणीव भासेल.

भाऊ! आपण स्वतः पुढाकार घेऊन प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी यांच्या जुन्या पेन्शनच्या संदर्भात संघटने कडून सतत पाठपुरावा करून लढा उभारला. त्याच लढ्याचा एक भाग म्हणून आपण संघटने द्वारे १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या प्राध्यापकांच्या जुन्या पेन्शन लाभ मिळावा यासाठी माननीय उच्च न्यायालय नागपूर खंडपीठात २८ प्राध्यापकांनी दाखल केलेल्या याचीकेला संघटनेचे पाठबळ मिळाले. संघटनेने दिलेले हे लढण्यासाठी हत्तीचे सामर्थ्य व कणखर बौद्धिक बळ मिळाल्याने दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी माननीय उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने ऐतिहासिक असा जुन्या पेन्शनचा निकाल २८ प्राध्यापकांना बहाल केल्याने हा लढा यशस्वी झाला. या लढ्याचे खऱ्या अर्थाने शिलेदार म्हणून भाऊ आपला उल्लेख केला तर अगदी सार्थ ठरेल. भाऊ! या निर्णयामुळे हजारो शिक्षक प्राध्यापक, कर्मचाऱ्यांच्या जीवनाचे कल्याण होणार आहे. जुन्या पेन्शनच्या सर्व समावेशक लढायासाठी यातून प्रचंड बळ मिळाले आहे हे निश्चित.

NUTA संघटनेचे मुखपत्र NUTA बुलेटिन चा सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम २१ जून २०२६ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या डॉ.के.जी.देशमुख सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता त्या संदर्भात भव्य आयोजन करण्यात आले होते. आपली भेट व मार्गदर्शन या कार्यक्रमात होणार असल्याची माहिती प्राध्यापक, शिक्षक कर्मचाऱ्यांना समजली होती. सर्व उत्सुक होते की भाऊ या कार्यक्रमात आपल्याला भेटतील आपल्याशी बोलतील संवाद साधतील, चळवळीला बळकटी आणणारा हा क्षण या कार्यक्रमात असेल, आम्ही सर्व उत्साही होतो. NUTA माध्यमातून NUTA बुलेटीन गेल्या पाच दशकापासून संपूर्ण भारतातल्या विद्यापीठ, उच्च शिक्षण क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करणारे मासिक होते. यात प्रकाशित होणारे विविध लेख, अध्यादेश त्यांचे विश्लेषण प्राध्यापक शिक्षकांच्या ज्ञानात भर टाकणारे व त्याला दृष्टी देणारे होते. या बुलेटिनचा सुवर्ण महोत्सव कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत आपला कुठेही उल्लेख नव्हता. मग आम्हाला कळले की आपण या कार्यक्रमात येण्यासाठी होकार दिला. पण मात्र आयोजक समितीला सांगितले की, माझे नाव पत्रिकेत कुठेही टाकू नका पण मी मात्र येईल, आपल्याशी संवाद साधेल त्या अर्थाने आम्ही सुद्धा मनोमन आपल्या संवादासाठी उत्सुक होतो आणि दुर्दैवाने अचानक या दीर्घ अशा चळवळीतला हा प्राण अचानक आमच्यातून निघून जावा, यासारखा धक्का चळवळीतल्या कार्यकर्त्यांना दुसरा कोणताही नाही.

भाऊ! आपण गेल्या सहा दशकांपासून सार्वजनिक जीवनात एखाद्या तपस्वी, संत ऋषिमुनी प्रमाणे तत्त्व, मूल्यांच्या चौकटीत केलेलं कार्य या कृत्रिम प्रज्ञा असणाऱ्या या आभासी जगात आपल्या अनुभवनिष्ठ, ज्ञाननिष्ठ व चळवळनिष्ठ असणाऱ्या कार्याला सातत्याने स्मरणात ठेवून पुढील काळात भविष्याची वाटचाल कार्यकर्त्यांनी चालावी अशी सार्थ अपेक्षा व्यक्त करीत आपल्याला लाखो कार्यकर्त्यांकडून भावपूर्ण आदरांजली!

# दिव्यत्वाची जेथं प्रचिती....

- डॉ.किशोर फुले, अमरावती (९४२३१२४६०८)

भाऊंच्या दुःखद निधनानंतर भाऊंचा सहवास लाभलेले संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रथम जनसंपर्क अधिकारी तथा श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील सेवानिवृत्त प्रा.डॉ.किशोर फुले यांनी भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू, त्यांच्या आठवणी विशद करणारे सलग अकरा लेखांक दै. हिंदुस्थान, अमरावती या वृत्तपत्रात प्रसिद्ध केले. या लेखांकांमधून विविध दृष्टिकोनातून दिसणारे भाऊ नव्या पिढीला कळावे म्हणून 'दिव्यत्वाची जेथं प्रचिती' हे अकरा लेखांक येथे प्रसिद्ध करीत आहोत. - संपादक

### *दिव्यत्वाची जेथ प्रचिती*
### *भाग - १*

माणसं आपोआप घडत नाहीत की ती झाडालाही लागत नाहीत. ती प्रभावशाली व्यक्तींच्या सान्निध्यात, प्रभावळीत, संस्कारात घडतात आणि स्वतःला घडवतातही. त्याला तप आणि तपश्चर्या लागते. मृगधारा चोचित घेण्यासाठी चातकाची आर्तता त्यात असावी लागते. प्रा.बी.टी.देशमुखांचं, भाऊंचं व्यक्तिमत्त्व या तपश्चर्येतून घडलं होतं. आयुष्यातील एक एक मंगल क्षण त्यांनी चातकाच्या आर्ततेतून स्वतःत रूजविला.

आपण वटवृक्ष पाहिला, त्याच्या विस्तीर्ण सावलीत विसावलो पण त्याचे रूजणे, रूजण्याच्या वेदना आपल्या गावीही नव्हत्या. वटवृक्षाला शाश्वत वृक्ष म्हणतात. शाश्वतपण येण्यासाठी रूजण्याच्या वेदनेला सामोरं जावं लागतं. वटवृक्षाच्या बिजाला रूजण्यासाठी काळ्या कातळाशी जो संघर्ष करावा लागतो ना तो शाश्वत असतो म्हणून वटवृक्षही शाश्वत होतो. बोरी - बाभळी सारख्या वटवृक्षांच्या रांगा कुठेही रूजलेल्या आपण बघत नाही. वटवृक्षाचे बीजही जमिनीची पोत तपासते आणि जमीनही वटवृक्षाच्या बीजाला जाणून असते.

जमिनीचे अस्तर भेदून वटवृक्ष विस्तारतो. त्याच्या पारंब्या विस्तारतात. महावृक्ष होतो. बादलीभर पाण्यासाठी तो तरसत नाही. पाषाणाला भेदून पाणी शोषून घेतो. आपल्या भव्यतेच्या जाहिरातीही वटवृक्षाला लावाव्या लागत नाहीत आणि सावलीचे भाडेही तो कुणाकडून वसुल करीत नाही. आपले शाश्वतपण हीच खरी शक्ती आहे हे तो जाणून असतो. त्याच्या डेरेदार सावलीत अनेकजण विसावतात, मूळ धरतात. काही मुळांवर घावही घालतात. काही खोडांवर व्रणही उमटवतात. काही नखांनी नावही गोंदवतात. वटवृक्षाला त्याचे फारसे काही नसते . सावली मिळते म्हणून सावलीत विसावलेले किंवा वटवृक्षाला दुरून लांबी- रुंदीच्या फुटपट्टीत मोजणारे जाणतातच असं नाही?. ज्याचा- त्याचा वकूब असतो.

बेलोऱ्यात जुनं दत्त मंदिर आहे. भाऊंचं श्रद्धास्थान?. बेलोऱ्याच्या एका बाजूला तुकडोजींची यावली आहे तर दुसऱ्या बाजूला प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराजांचं माधान. कर्मयोगी गाडगेबाबांची नागरवाडी शेजारीच आहे. ज्या परिसरात एका जन्मांध संतानं डोंगराएवढ्या ग्रंथाची रचना केली, राष्ट्रसंतांच्या अद्वितीय खंजिरीचे नाद ज्या परिसरात प्रतिध्वनीत झाले, कर्मयोगी गाडगेबाबांच्या लोकोत्तर कीर्तनाचे अजरामर शब्द ज्याकाळात आसमंतात घुमले, वीर वामनरावदादा जोशींसारख्या महान स्वातंत्र्य योद्ध्याने ज्या जिल्ह्यात आपल्या त्यागाचा मानदंड उभा केला, महान कुष्ठसेवक डॉ.दाजीसाहेब पटवर्धन या सेवाव्रतीचे मानव मंदिर, तपोवन ज्या मातीत उभे झाले, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी नांगर धरणाऱ्या कृषीवलांच्या हातात जिथे लेखणी दिली, वृत्तपत्र हे सतीचं वाण आहे, समाजाचं देणं आहे या विचाराने जिथे स्वतंत्र 'हिंदुस्थान' नंतर स्वातंत्र्य सेनानी बाळासाहेब मराठे यांनी दै. हिंदुस्थान सुरू केले, सुदामकाका देशमुखांसारखा निस्पृह लोकप्रतिनिधी जिथे झुंजला, दादासाहेब गवईंसारखे मुत्सद्दी आणि अभ्यासू संसदपटू ज्या पूर्णामायच्या काठावर घडले, विदर्भ महाविद्यालयाच्या विस्तीर्ण परिसरात विद्वानांची मांदियाळी जेव्हा निर्माण झाली तिथे प्राचार्य प. सि. काणेंसारख्या गुरूंचा हात डोक्यावर घेऊन भाऊराव तुळशीराम देशमुख हे स्वयंप्रकाशित व्यक्तिमत्त्व आकाराला आले. महान डेरेदार शाश्वत वटवृक्षांची मांदियाळीच ज्या भूमीत होती त्याच भूमीने आपल्या भूगर्भातून प्रा. बी. टी. देशमुख नावाचा डेरेदार वटवृक्ष समाजाच्या ओंजळीत घातला.

### *भाग - २*

परिस्थिती माणसाला सर्व काही शिकवते. अभावाच्या मुशीतूनच समृद्धीचा मार्ग प्रशस्त होतो. फक्त परिस्थितीला साद देणारी दृष्टी आणि परिस्थितीवर मात करण्याची शक्ती त्या त्या व्यक्तीला कमवावी लागते. परिस्थितीला शरण जायचे की परिस्थितीवर स्वार व्हायचे हा ज्याच्या - त्याच्या कौशल्याचा भाग असतो. उपजत बुद्धिमत्तेने आणि अंगभूत कौशल्याने बी.टी.भाऊ परिस्थितीवर स्वार झाले.

बेलोऱ्यात सहा एकर कोरडवाहू शेती वाहणारे वडील, तुळशीरामजी आणि घरातील रिकाम्या डब्यांची पर्वा न करता भरल्या अंतःकरणाने संसार करणारी संस्कारक्षम आई, विठाबाई भाऊंचा वारसा होता. सहा भाऊ, दोन बहिणी आणि बराच गोतावळा घरात होता. घर दत्त संप्रदायाचे. दरवर्षी दत्ताची पोथी वाचून उपासना करणारे. दत्ताची भक्ती असली तरी दत्ताची भौतिक कृपा नव्हती. परिस्थिती इतकी वाईट की दत्त जयंतीच्या सप्ताहात दत्ताची पोथी वाचायला विकत घेण्याचीही स्थिती नव्हती. गावातल्या संपन्न घरातून दरवर्षी पोथी आणून ती वाचल्या जात असे. भाऊ हे पाहत असत. चौथ्या वर्गातल्या भाऊंनी दत्त जयंतीसाठी लागणारा दत्त जन्माचा अध्याय आपल्या सुवाच्य अक्षरात लिहून काढला. पोथीची निकड पूर्ण केली. गावातल्या बेसिक स्कूलमध्ये हुशार विद्यार्थी म्हणून स्थान प्राप्त केले.

भाऊंचे मोठे मामा वैकुंठराव देशमुख गांधीवादी होते. त्यांच्या पत्नी निर्मलाताईही गांधी संप्रदायातल्या. दोघेही स्वातंत्र्यसंग्राम सैनिक. बहिणीची मुलं हुशार आहेत पण परिस्थिती नाही म्हणून बी.टी. आणि आर.टी. या दोन्ही भावंडांना त्यांनी वर्धेला शिक्षणासाठी नेले. स्वातंत्र्यानंतर ते शिक्षण विभागात अधिकारी झाले. भाऊंचा स्वभाव चळवळ्या. चौकटीत न बसणारा. ती चौकट मोडून ते अमरावतीला आले, शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये दाखल झाले आणि चळवळीत सक्रिय झाले. या चुणचुणित मुलाचे गुण यशवंतराव खापर्डे यांनी हेरले. गरिबी समजून घेतली आणि बाळासाहेबांच्या दैनिक हिंदुस्थानमध्ये दाखल केले. श्री. बाळासाहेब मराठे स्वतः स्वातंत्र्यसैनिक असल्याने आणि त्यांनीही गरिबीचे चटके सहन केल्याने गरीब, होतकरू, चळवळ्या मुलांना आश्रय द्यायचे. दैनिक हिंदुस्थान हे अशा चळवळ्या होतकरू मुलांचे आश्रयस्थान होते. भाऊ जांबुवंतराव धोटे, दादासाहेब गवई, सुरेश भट, उद्धव शेळके याच परिवारातले. भाऊही त्यात जोडल्या गेले.

दैनिक हिंदुस्थान मध्ये झाडपोस करण्यापासून तो खिळे जुळवण्यापर्यंत पडेल ती कामे भाऊंनी केली. बातमीचे खिळे जुळवता जुळवता त्यांनी आयुष्य बांधले . आप्पांची भाषा, काम करण्याची पद्धती, श्रमप्रतिष्ठा, मूल्यनिष्ठा त्या

**माणसं आपोआप घडत नाहीत की ती झाडालाही लागत नाहीत. ती प्रभावशाली व्यक्तींच्या सान्निध्यात, प्रभावळीत, संस्कारात घडतात आणि स्वतःला घडवतातही. त्याला तप आणि तपश्चर्या लागते. मृगधारा चोचित घेण्यासाठी चातकाची आर्तता त्यात असावी लागते. प्रा.बी.टी.देशमुखांचं, भाऊंचं व्यक्तिमत्त्व या तपश्चर्येतून घडलं होतं. आयुष्यातील एक एक मंगल क्षण त्यांनी चातकाच्या आर्ततेतून स्वतःत रूजविला.**

प्रभावळीत आत्मसात केली. भाऊंच्या ओठावर संस्कृत श्लोक रेंगाळत ना ते आप्पांच्या आणि काणेसरांच्या सहवासामुळे. भाऊसाहेबांच्या श्रद्धानंद वस्तीगृहात ते राहिले. हातावर भाकरी खाल्ली पण विद्येची कास सोडली नाही. गाडगेबाबांनी दिलेल्या ताटात जेवण्याचे भाग्य त्यांना लाभले आणि त्या अन्नाला आयुष्यभर ते जागले.

सकाळी कॉलेज, संध्याकाळी हिंदुस्थान सांभाळणाऱ्या भाऊंनी विद्यार्थी चळवळीचे नेतृत्वही केले. हे नेतृत्व झुंडशाहीवर नव्हे, तर वैचारिक अधिष्ठानावर, मूल्यनिष्ठेवर तेव्हाही उभे होते. पोटात अन्नाचा कणही कधी नसे. एक वेळ जेवण तर शिरस्ताच होता. रिकाम्या पोटी राहणाऱ्या तरुण भाऊंना पोट भरण्यासाठी अपात्र दान घेण्याची दुर्बुद्धी त्याही वेळी झाली नाही. आई-वडिलांच्या, थोरामोठ्यांच्या संस्काराशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. गरिबी सहन केली पण उधारीची श्रीमंती अंगावर कधी चढवली नाही. भाऊ केवळ निवडून आल्यावर, आमदार झाल्यावर भाऊ नव्हते तर ते जन्मजात भाऊ होते. वटवृक्ष रूजतात ना ते असे!

### *भाग - ३*

१९६४ साली परतवाड्याला भाऊंच्या बहिणीचे लग्न होते. सर्व मंडळी लगीनघाईत होती. त्याच दिवशी नागपूर विद्यापीठाच्या एम.ए. राज्यशास्त्र परीक्षेचा निकाल घोषित झाला. भाऊ गुणवत्ता यादीत आले. मंगलक्षणी मंगल बातमी आली. भाऊंच्या मित्रांनी भाऊंना खांद्यावर घेऊन जल्लोष केला. त्याकाळात सरकारी नोकरीची दालनं भाऊंना खुली होती पण डॉ.भाऊसाहेब देशमुख यांना दिलेला शब्द पाळण्यासाठी, समाजऋण फेडण्यासाठी बीटीभाऊंनी श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची नोकरी स्वीकारली. दरमहा पगाराची शाश्वती असलेली नोकरी नाकारून दरमहा पगाराची शाश्वती नसलेली खाजगी महाविद्यालयातील प्राध्यापकी त्यांनी पत्करली. भाऊंची गुणवत्ता गुणपत्रिकेतील चौकटी पुरती मर्यादित नव्हती. ती मनमस्तिष्कात रूजली होती. घरातील परिस्थिती बेताची असतांना एका महापुरुषाच्या ज्ञानयज्ञात त्यांनी आपली समिधा टाकली.

श्री शिवाजी महाविद्यालयात डॉ.पंजाबराव देशमुखांनी गुणवंतांची मांदियाळीच लावली होती. डॉ.ज्वालाप्रसाद, डॉ.कोतवाल, डॉ.जी.टी.देशपांडे, प्रो.अत्तरदे, प्रा.मा.ल.व्यवहारे, प्रा.मनोहर कवीश्वर, प्रो.नायर, प्रा.एन.सी.देशमुख, प्रो.रामा राव, प्रा.आर.जी. तट्टे याच मांदियाळीत शोभावे असे राज्यशास्त्राचे प्रा.बी.टी.देशमुख शिवाजी महाविद्यालयाला मिळाले. तासिकेच्या ठोक्याला वर्गात जाणे आणि तासिका संपल्याचा ठोका होताच वर्गातून बाहेर पडणे हा त्यांचा शिरस्ता होता. त्यांचा वक्तशीरपणा, त्यांची प्रतिपादन शैली, अभ्यास, विद्यार्थ्यांविषयी असलेला जिव्हाळा यामुळे ते लवकरच विद्यार्थ्यांच्या गळ्यातील ताईत बनले. याचा नुकताच मला अनुभव आला. बी.टी. सरांच्या दुःखद निधनानंतर दैनिक हिंदुस्थान मधील माझा लेख वाचून त्यांचे विद्यार्थी राहिलेले सुप्रसिद्ध पत्रकार प्रा.न.मा.जोशी यांनी प्रतिक्रिया देण्यासाठी मला फोन केला. ते म्हणाले, “सर आमचे बी.टी.सर तुम्ही पुन्हा आमच्यासमोर उभे केले. डोळे पाणावले. त्यांचे वर्गातील शिकवणे, त्यांचे व्यक्तिमत्त्व आजही आमच्या हृदयात घर करून बसले आहे.” एखाद्या शिक्षकाचे शिकवणे व त्याचे व्यक्तिमत्त्व विद्यार्थ्यांनी इतकी वर्ष मनात साठवून ठेवणे यापेक्षा शिक्षकाला खरा पुरस्कार कोणता असू शकतो?

महान तत्त्वचिंतक डॉ.भाऊसाहेब कोलते तेव्हा नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू होते. ते बी.टी. सरांना एका भेटीत म्हणाले, “अरे तुम्ही राज्यशास्त्राची इंग्रजीतील जाडजाड पुस्तकं विद्यार्थ्यांना शिकवता. ती पुस्तकं तुम्ही मराठीत का लिहित नाही? विद्यार्थ्यांचे भले होईल.” त्यांचे हे शब्द प्रमाण मानून बी.टी.सरांनी राज्यशास्त्राची पुस्तकं मराठीत लिहिली. “भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन” हा अभ्यास पूर्ण ग्रंथ त्यांनी सिद्ध केला. याशिवाय “भारतीय शासन व्यवस्था” हे महत्त्वपूर्ण पुस्तकही त्यांनी लिहिले. राज्यशास्त्रातील सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, आर्य चाणक्य यांची वचनच्या वचनं बी.टी. सरांना मुखोद्गत होती. छात्रसंघाच्या निवडणुका तेव्हा खूप गाजायच्या. भाऊ छात्रसंघ निवडणुकीचे अनेक वर्ष प्रभारी प्राध्यापक होते. अनेक बाक्या प्रसंगात त्यांनी कौशल्याने वाद मिटविले.

आमदार बी.टी. देशमुख जसे महाराष्ट्रने स्मरणात ठेवले तसे शिक्षक बीटीसर त्यांच्या विद्यार्थ्यांनी अजूनही मनाच्या कुपीत जपून ठेवले आहेत. शिक्षकाचे वर्तन, त्याचा पेहराव, त्याचे वागणे-बोलणे, विद्यार्थ्यांविषयी त्याची आस्था, व्यवसायनिष्ठा, विद्वत्ता अत्यंत मोलाची असते. विशेषतः त्याचा आचारधर्म अधिक महत्त्वाचा असतो. या आचारधर्मामुळेच जुन्या काळातील पांढऱ्या धोतरातील व काळ्या कोटातील गावोगावचे ‘भाऊसाहेब’ चिरकाल लोकांच्या स्मरणात राहिले. पांढऱ्या शर्टपायजाम्यातील बीटीसरही शिक्षकधर्माचं पालनकरून आजही विद्यार्थ्यांच्या मनात घर करून आहेत. गावोगावचे भाऊसाहेब आणि शिवाजीतील बीटीसर शिक्षकी पेशातील मूल्य आहेत.

### *भाग - ४*

श्री शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापक असणाऱ्या भाऊंना विवाहाची स्थळं येऊ लागली. भाऊ दूरदृष्टीचे. आपल्या जोडीदाराचेही नियोजन त्यांनी अत्यंत दूरदृष्टीने केले. आपली सहधर्मचारिणी ही नोकरीपेशातील नको, ती गृहिणी असावी ही त्यांची धारणा. आपल्याला सार्वजनिक जीवनातून उसंत मिळणार नाही; तेव्हा संसाराचा गाडा तोलून धरणारी सहधर्मचारिणीच योग्य राहील ही त्यामागील दूरदृष्टी. त्यातही कृतज्ञता भाव. आपल्या गरीब कुटुंबाला मामा पुंडलिकराव घोम यांची मोलाची मदत झाल्याची उपकार भावना त्यांच्या अंतःकरणात होती. मामाच्या प्रती कृतज्ञताभाव कसा व्यक्त करता येईल? या विचाराने त्यांनी मामाची मधली मुलगी, सुशीला यांच्याशी विवाहगाठ बांधण्याचे ठरविले. ३० एप्रिल, १९६८ रोजी अमरावतीच्या उजंबावाडीत भाऊंचा मामेबहीण, कु. सुशीला पुंडलिकराव घोम यांच्याशी पारंपरिक पद्धतीने विवाह झाला.

वादळाशी आयुष्याच्या नीरगाठी बांधणे सोपे नसते. सुशीलाताईंनी हे आव्हान स्वीकारले. त्या सौ. सुशीला भाऊराव देशमुख झाल्या. भाऊंच्या आवडीनिवडी फार. त्याही त्यांनी पूर्ण केल्या. भाऊंचा टाईमटेबल पक्का. तोही त्यांनी सांभाळाला. भाऊंकडे येणाऱ्या जाणाऱ्यांची गर्दी फार पण त्यांचीही बडदास्त त्यांनी ठेवली. भाऊ आमदार होते पण घरात नोकर -चाकर नव्हते. सौ.सुशीलाताईच सर्व भूमिका करायच्या. भाऊंकडे आलेल्या लोकांसाठी पाणी आणणे, खायला करणे, चहा करणे आणि रिकाम्या प्लेट, कपबश्या घेऊन जाणे हे सर्वांनी पाहिले, अनुभवले आहे.

श्रीमती सुशीलाताई भाऊंच्या खाजगी सचिवही होत्या हे फारसे कोणाला माहित नाही. भाऊंची कागदपत्रं सांभाळणं, त्याचं फायलिंग करणं, पत्रव्यवहार सांभाळणं, पत्रावर इन्वर्ड-आऊटवर्ड नंबर टाकणं, भाऊंच्या कामाची वृत्तपत्रातील कात्रणं काढणं, त्याची फाईल बनविणं, शनिवार- रविवारी भाऊ आले की त्यांना ती दाखवणं, भाऊंची अधिवेशनाची बॅग भरणं, मुक्कामाचे दिवस पाहून कपडे तयार करणं, प्रसंगी इस्त्री करणं, निरनिराळे पेन काढून ठेवणं, त्यांची खोली नीटनेटकी लावून ठेवणं, भाऊंनी फाईल मागितल्यावर ती काढून देणं, भाऊंची लायब्ररी लावणं, भाऊंना पुढच्या आठवड्यात लागणारी पुस्तकं भाऊंच्या टेबलवर काढून ठेवणं शिवाय रांधा वाढा-उष्टी काढा, किराणा, भाजीपाला पहा ही गृहिणीची कामं तर पाचवीलाच पुरलेली. कधीही कुरबुर नाही की विलंब नाही.

भाऊ उत्तम संसदपटू होते, वक्ते, लेखक होते, नेते होते ही गोष्ट खरी आहे. पण या संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या पाठीशी ही सक्षम, समर्पित सहधर्मचारिणी उभी होती, तिने प्रकृती अस्वास्थ्यातही आपले दुखणे बाजूला ठेवून धर्माचरण पूर्ण केले हे विसरता येत नाही. गमतीने भाऊंची आई, विठाबाई भाऊंना म्हणायच्या “माया भावाची पोरगी होती म्हणून तुयासोबत टिकली.” माणिकराव- भरतराव हे दीर म्हणतात “अशी बाई आम्ही पाहिलीच नाही. चार माणसांचं काम एकटी करते.” भाऊंची निवड किती सार्थ होती याची यावरून कल्पना येते आणि

**भाऊ उत्तम संसदपटू होते, वक्ते, लेखक होते, नेते होते ही गोष्ट खरी आहे. पण या संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या पाठीशी ही सक्षम, समर्पित सहधर्मचारिणी उभी होती, तिने प्रकृती अस्वास्थ्यातही आपले दुखणे बाजूला ठेवून धर्माचरण पूर्ण केले हे विसरता येत नाही.**

त्यांची दूरदृष्टीही जाणवते.

*भाग - ५*

खाजगी आयुष्यातही एखादी व्यक्ती किती काटेकोर राहू शकते याचा वस्तुपाठही बीटीभाऊंनी घालून दिला. पहाटे चारला उठणे म्हणजे उठणे. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात पहाटे पोहायला जाणे म्हणजे जाणे. मुंबई मुक्कामातही याला खंड नव्हता. सिटीबसने जाऊन गिरगाव चौपाटीवरील मफतलालच्या जलतरण तलावावर भाऊ पोहायला जात. शेवटी त्यांनी आपल्या जवळच्या शेतावरच स्विमिंग टँक तयार केला. ९ मार्च, १९९६ ला त्यांची मोठी मुलगी, डॉ.वैशालीचे लग्न होते. भाऊ सकाळी पोहायला गेले. डॉक्टरांनी मनाई करूनही अखेरच्या दिवशीही ते पोहून आले? जेवणाच्या वेळा ठरलेल्या. घरी कार्यक्रम असला तरी पाहुण्यांसाठी थांबणे वगैरे त्यांच्या कोषात नव्हते. आपल्या वेळेत जेवून घेऊन ते पाहुण्यांना सामोरे जात. त्यात राजी-नाराजी वगैरे शूद्र गोष्टी होत्या.

लोकांना दिलेली वेळ पाळणे आणि दुसऱ्याने दिलेली वेळ काटेकोर पाळणे हा त्यांचा शिरस्ता आयुष्यभर होता. बी.टी. पाच मिनिटं कार्यक्रमाला किंवा सभेला उशिरा आले असे कधी घडले नाही. घड्याळ त्यांनी केवळ हातावर नाही बांधले; आयुष्य घड्याळाच्या काट्याला बांधले. त्यामुळेच प्राप्त आयुष्यात त्या - त्या वेळी ती- ती  गोष्ट तडीला नेली. माणसाला सुगीचे दिवस आले की

# आपल्यातून चालते बोलते भाऊ कायमचे दूर गेले

- **प्रा.डॉ.किशोर बुटले**, *अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ*

प्रा.बी.टी.देशमुख (भाऊ) यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न, विदर्भाचा अनुशेष, राजकीय जीवनाला दिलेले नवे आदर्श आणि उच्च शिक्षणाला दिलेले नवे आयाम सदैव स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने राजकीय क्षेत्रातील एक अनुभवी, विद्वान असे व्यक्तिमत्त्व हरपले आहे. आदरणीय बी.टी.भाऊ (देशमुख) महाराष्ट्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व होते. व्यासंगी शिक्षक, विधान परिषदेत तीस वर्षे प्रदीर्घ काळ आमदार, वक्ता आणि कर्ते सुधारक होते. किती विद्यार्थी, प्राध्यापक, नेते भाऊंनी घडविले याचा अंदाजही लावता येणार नाही. काही महाभाग त्यांना सोडून गेले याचीही गणती नाही. सोडून गेले त्यांच्याबद्दल अजिबात बोलू नये, याचे आदर्श संस्कार भाऊंनीच आम्हाला दिले. कारण मानवी जीवन सुखी आणि संपन्न व्हावे, यासाठी कायद्याने आणि संविधानाने दिलेल्या चौकटीत राहून संसदीय आयुधाचा वापर करून मार्ग काढावा अशी त्यांची शिकवण. इतकी त्यांची अपार आणि निस्सीम श्रद्धा. इंग्रजी विषयावर चांगली पकड सोबत मराठीवरही उत्तम पकड. त्यांचा आवाज शालीन आणि अभ्यास दांडगा त्यामुळे त्यांची आदरयुक्त भीती कोणत्याही राजकारणी व्यक्ती आणि प्राध्यापकाच्या मनात कायम होती. ही आदराची भीती खरे म्हणजे आमची प्रेरणा होती.

भाऊंच्या सोबत माझ्या सर्वात जास्त भेटी प्राचार्य सांगळे सर सोबत असताना झाल्या. त्यासुद्धा त्यांच्या घरी. नंतर वाढदिवस किंवा शिक्षक दिनानिमित्त भाऊंच्या घरी जाणे येणे सुरू होते. घरी कोणी नसतानाही पाणी देण्यापासून तर मला काहीतरी गोड देण्याची त्यांची धडपड या वयातही प्रेरणा देणारी होती. खरे म्हणजे त्यांचे दिसणे आणि असणे आम्हा प्राध्यापक मंडळींना मोठे बळ आणि ऊर्जा देणारे होते. हे काही वेगळे सांगायची गरज नाही. भेट झाली की भाऊ नेहमी पाठीवर हात ठेवत असत आणि सतत माझे कौतुक करत असत. माझ्या जीवनावर आजपर्यंत त्यांच्या ओल्या पापणीचा सजग पहारा होता. त्यांचा 'नुटा' संघटनेसाठी असणारा त्याग शब्दात न सांगता येण्यासारखा आहे. त्यांच्या निधनाच्या तिसऱ्या दिवशी 'नुटा बुलेटिन'चा सुवर्ण महोत्सवी भव्य सोहळा अमरावती मध्ये आयोजित करण्यात आला होता. त्यात त्यांचे भाषण ऐकण्यासाठी आम्ही सर्व उत्सुक होतो. ते खूप महत्त्वाचे असे बोलणार होते. पण नियतीने डाव साधला. खरे म्हणजे त्यांच्या त्यागी आणि निस्वार्थी संस्काराने अनेक पिढ्या घडल्या. मला तर महाविद्यालयीन जीवनामध्येच त्यांच्यापासून खूप प्रेरणा मिळाली. किंबहूना त्यांच्याकडे पाहूनच मला चळवळ, शिक्षण आणि संस्कार मिळत गेले. अस्सल आणि प्रखर चळवळीचा गुण त्यांच्यापासूनच मी घेतला. अमरावती, पुणे ते दिल्लीपासूनच्या अनेक आंदोलनात त्यांच्यासोबत भाग घेण्याचे भाग्य मला लाभले.

बी.टी. भाऊ आयुष्यभर कायम धावपळ करत होते. मनातून आलेले कागदावर लिहीत होते. साधी राहणी, उच्च विचार सोबत पांढऱ्या शुभ्र खादीचा स्वीकार यामुळे भाऊंचे व्यक्तिमत्त्व उजळून गेले होते. 'नुटा' संघटनेवर भाऊंनी पुत्रवत प्रेम केले होते. 'नुटा' संघटनेसाठी खूप धडपड-दगदग त्यांनी आयुष्यभर नाही तर शेवटच्या क्षणापर्यंत केली. हीच निस्सीम प्रेमाची पावती होती. आज भाऊ आपल्यात नाहीत ही मोठी खंत प्रत्येकाच्या मनात राहणार आहे. प्राध्यापकांचे चांगले संघटन करण्यामध्ये भाऊंना चांगले यश आले. खरे म्हणजे आदरणीय भाऊंनी शेतकरी आणि विदर्भ  यांच्यासाठी फार मोठा त्याग केला, संघर्ष केला, त्यांना प्रगतीचा मार्ग दाखविला. शेतकरी आणि विदर्भ  बी.टी. भाऊंना समजू शकला असता तर त्यांचे चांगले संघटन उभे राहिले असते; विदर्भाचा वर्तमान आणि  भविष्यकाळ  वेगळा  दिसला असता. खूप मोठे कार्य भाऊंनी या क्षेत्रात केले आहे. या महान मानवतेच्या कार्यास आणि मानवतेच्या पुजाऱ्यास आपण सर्वांनी सलाम केला पाहिजे. भाऊंचे विचार शेतकरी आणि विदर्भाने घेतले असते, तर आज विदर्भ पश्चिम महाराष्ट्राच्या समोर राहिला असता. ज्या आत्महत्याचे सरन रोज विदर्भात रचल्या जात आहे, त्या आत्महत्या दिसल्या नसत्या, यात शंका नाही. कायम पश्चिम महाराष्ट्राने आपल्याला जी सापत्न वागणूक दिली, सिंचनाच्या आणि इतरही अनुशेषासह विदर्भासोबत जी लबाडी केली, ती भाऊंनी पुराव्यासह सत्ताधारी आणि जनता यांच्या लक्षात आणून दिली. दुर्दैव असे की, भाऊंच्या या परिश्रमाला फळ आले नाही. उलट कळस म्हणजे आदरणीय बी.टी.भाऊंना विधान परिषदेमध्ये पराभव पहावा लागला, तेही पदवीधरांकडून...

धन्य ते पदवीधर, धन्य ते वऱ्हाडातील लोक...

यात आपलेही कपाळकरंटे महाभाग काही कमी नव्हते. असे म्हटल्या जाते जटायुचे अपयश हे रावणाच्या यशापेक्षाही मोठे आहे. हे आपण कायम लक्षात ठेवले पाहिजेत. हो एक सांगायचे राहून गेले. आदरणीय भाऊ म्हणायचे "वऱ्हाड म्हणजे वर्धा आणि पैनगंगा या दोन नद्यांमधील प्रदेश आणि विदर्भ म्हणजे वैनगंगा आणि पैनगंगा मधील प्रदेश. समजले की नाही! की पुन्हा सांगू... नाही, काही लोकांना पुनःपुन्हा समजून सांगावे लागते म्हणून म्हणत आहे." भाऊंची अशी अमोघ वक्तृत्व शैली, त्यात भर घालणारा राज्यशास्त्र असा विषय म्हणजे दुधात केशर. या भाऊंच्या अमोघ वक्तृत्व शैलीने संपूर्ण महाराष्ट्र चाळीस पन्नास वर्षे मोहित झाला. त्याला तोड नाही. विधानपरिषदेमध्ये तर तीस वर्षे ही अमोघ वक्तृत्वाची तोफ धडधड करत होती. महाराष्ट्राच्या जनतेवरील अन्याय, विदर्भावरील अन्याय, शेतकरी, कामकरी, कष्टकरी यांच्यावरील अन्याय भाऊ सतत मांडत राहिले.

भाऊ विधानपरिषदेमधून बाहेर गेले, तेव्हापासून तर विधानपरिषद आत्मा हरवून बसली. असे धाडसाचे विधान मी जर केले तर ते अयोग्य होणार नाही. आजच्या विधानपरिषदेच्या प्रचारांनी तर भाऊंना वीट आला होता. आज रोजी तर ती लक्ष्मीच्या हातात जाऊन बसली. सरस्वती बाहेर निघाली. काय ताकद असती जर आज भाऊ आमदार असते तर. गुवाहटी, सुरत आणि जयपूरवाल्याचा कसा गेम ओके केला असता. यांचा मूळ चेहरा कोणता आहे, हे जनतेसमोर व महाराष्ट्रासमोर आणला असता. भाऊंनी असे लोकशाहीला भांडवलशाही समोर नाचू दिले नसते. सर्व आमदार आणि सर्व पक्ष यांना पुरून उरणारा एक अपक्ष आमदार. अशी तीस वर्षे ख्यातीप्राप्त आमदार म्हणून त्यांची ओळख होती. आज ज्याप्रकारे लोकशाहीची थट्टा आणि हत्या होत आहे, जर भाऊ सदनात असते तर, अशी लोकशाहीची विटंबना त्यांनी होऊ दिली नसती. भाऊ विधानपरिषदेत नसल्याची मोठी किंमत महाराष्ट्राने मोजली. तशी ती विदर्भतील शेतकरी, कामकरी, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी यांनी मोजली आहे. भाऊंची ही शैक्षणिक, सामाजिक, राजकीय चळवळ, समाजहीत आणि जनकल्याणाची धडपड शेतकरी, कामकरी, कर्मचारी यांच्याप्रती असणारी तळमळ ही मानवतेची त्यांची ज्योत आजच्या काळात तेवत ठेवणे अत्यंत गरजेचे आहे, नव्हे ते प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्यातून चालते बोलते भाऊ कायमचे दूर गेले तेही अगदी शांतपणे. शेवटी भाऊंना श्रद्धांजली अर्पण करतो. यासाठीही मनाची तयारी नाही. कारण त्यांनी केलेले काम हे जिवंत आहे आणि राहील. त्यांच्या पवित्र कार्यास नमस्कार करतो.

गरिबीच्या दिवसांचे विस्मरण होते. सामान्य माणसाचे हात थोडे वर गेले तरी ते आभाळाला टेकतात आणि पायाखालची जमीन विस्मृतीत जाते. भाऊ नेहमीच जमिनीवर राहिले. आपल्या गरिबीची, खेड्यातल्या दिवसांची, तिथल्या माणसांची, भावंडांची, नातेवाईकांची आणि पडत्या काळात ज्यांनी ज्यांनी आधार दिला त्या सर्वाप्रती त्यांच्या अंतःकरणात सदैव कृतज्ञता असे. प्रसंगी ते बोलूनही दाखवत आणि वेळ आल्यावर त्या व्यक्तीसाठी झटतही.

"आपल्या मामांनी, श्री.पुंडलिकराव घोम यांनी आपल्या कुटुंबाला आधार दिला नसता तर आम्ही भावंड इथपर्यंत पोहोचलो नसतो" ही भावना त्यांच्या अंतःकरणा सदैव असे. श्रीमती सुशीलाताईंशी विवाह करून कृतज्ञताभावाने त्यांनी ते नाते अधिक घट्ट केले. प्राध्यापक झाल्यावर डॉ.भाऊसाहेब कोलते यांच्या सूचनेप्रमाणे भाऊंनी मराठीत "भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन" हे पुस्तक लिहिले. खूप अभ्यासपूर्ण पुस्तक आहे. नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाला होते. हा वैचारिक ग्रंथ त्यांनी कोणाला अर्पण केला असेल? राज्यशास्त्राच्या तत्त्वचिंतकाला? विद्वानाला? आपल्या गुरूला? आई-वडिलांना? नाही! आठ भावंडांच्या मागे जो मामा आधार म्हणून सदैव उभा राहिला त्या मामाला, श्री पुंडलिकराव घोम यांना.

"माझ्या शैक्षणिक प्रगतीवर ज्यांनी पितृवत प्रेम केले,

ते माझे मामा श्री पुंडलिकराव काशिराव पाटील ह्यांना सादर अर्पण."

ही या पुस्तकाची अर्पण पत्रिका आहे.

बेलोऱ्याच्या बेसिक स्कूलमध्ये भाऊंच्या हस्ताक्षराला वळण देणारे आगरकर गुरुजी असोत की, वर्धेच्या मॉडेल हायस्कूलमधील पवार गुरुजी असोत की, वर्धेहून भाऊंची टीसी काढून आणणारे आणि शिवाजी मराठा हायस्कूल मध्ये, तट्ट्याच्या शाळेत भाऊंचे नाव दाखल करणारे टाकोडे भाऊसाहेब असोत की, विदर्भ महाविद्यालयातील गुरुवर्य प्राचार्य प.सि.काणे असोत या गुरुजनांप्रती भाऊराव देशमुख या मेधावी विद्यार्थ्यांच्या मनात अखेरपर्यंत ओतप्रोत आदर भरला होता. कर्मयोगी गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख या समाज शिक्षकांच्या चरणाशी बी.टी. देशमुख हा शिक्षक सदैव लीन होता. श्री शिवाजी मराठा हायस्कूलचे हे शताब्दी वर्ष आहे. या शाळेला त्याकाळात तट्ट्याची शाळा म्हणून हिणवल्या जात असे. या तट्ट्याच्या शाळेने तटबंदीचं सामर्थ्य प्राप्त करणारे बी.टी.देशमुख घडविले.

माणसं आपोआप मोठी होत नाहीत. मोठेपणाची बीजं तिच्या अंतरंगात रूजलेली असतात.

## *भाग - ६*

"इये शारदेचिये चंद्रकळे,
माजी अमृतकण कोवळे,
ते वेचिती मनेमवाळे,
चकोरतलगे." (श्री ज्ञानेश्वरी)

ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वर माऊली ईश्वर जाणण्यासाठी अंतःकरणाचा हळुवारपणा कसा हवा हे विशद करताना वरील ओळी उदधृत करतात. शरद ऋतूतील अत्यंत शितल चांदणे अगदी अमृतकणांसारखे कोवळे चातकाची पिलं ज्या मृदु अंतःकरणानं हळुवार प्राशन करतात तसं थोर व्यक्तींचं व्यक्तिमत्त्व, त्यांचा जीवनसंदेश आपण समजून घेतला पाहिजे. त्यासाठी अंतःकरणाचा ओलावा, त्यातील हळुवारपणा आवश्यक असतो. मनाची मृदुता आवश्यक असते. बीटी समजून घेतानांही ही हळुवारता, मृदुता, विशालता अंतःकरणात असावी लागते.

आपल्या कार्यासिद्धीसाठी अत्यंत कर्तव्यकठोर असणारे भाऊ आयुष्यातील अनेक कोपऱ्यात शरदाच्या चांदण्यासारखे शांत, शीतल, मृदू झाले आहेत. अविनाश देशमुख भाऊंचे सहाय्यक म्हणून काम पाहायचे. अनेक वर्षांपासून ते त्यांचे सहकारी होते. भाऊ आमदार झाल्यावर त्यांनी अविनाशला आपला स्वीय साहाय्यक म्हणून नेमले. त्यामागे उद्देश हा की त्यांनाही पाहिजे तसे सहकार्य होईल आणि अविनाशलाही आर्थिक मदत होईल. अविनाश देशमुख यांनी केवळ साहाय्यक म्हणून नव्हे तर कुटुंबातील व्यक्ती म्हणून भाऊंना अखेरच्या दिवसापर्यंत साथ दिली. आमदाराला मिळणारे स्वीय साहाय्यकाचे पूर्ण वेतन (कुठलाही कट न ठेवता) भाऊ अविनाशला देत.

भाऊ समजून घ्यायचे असतील तर या एकाच उदाहरणातून समजून घेता येतील. भाऊंची दूरदृष्टी बघा. त्यांनी विचार केला, आपण आमदार आहोत तोपर्यंत अविनाशचे वेतन सुरू राहील. अविनाशचे पुढे काय? त्याला पेन्शन नाही की भविष्य निर्वाह निधी नाही. भाऊंनी काय करावे? किती आमदारांनी हे केले? श्रीमंतीच्या अंबारीत झुलणाऱ्या किती लब्ध प्रतिष्ठितांनी हे केले? भाऊंच्या अंतःकरणाचा हा हळवा कोपरा आपल्या सहकाऱ्याच्या भविष्याचा विचार करणारा आपण समजून घेतला तर भाऊ समजून घेता येतील. आमदार बीटींना समजून घ्यायला लोकांना खूप उशीर झाला. तिथे व्यक्ती म्हणून भाऊ समजून घेतांना अंतःकरणाच्या तळाला जावे लागेल. चकोराच्या पिलासारखे मृदू, हळुवार व्हावे लागेल.

भाऊंनी त्याकाळात जवळपास पंचवीस -तीस वर्षांपूर्वी स्वतः एक प्लॉट विकत घेऊन ठेवला. भाऊंची आमदारकी गेली तशी अविनाशची नोकरी. आज लाखो रुपये त्या प्लॉटची किंमत झाली. तो प्लॉट भविष्यनिर्वाह निधीची सोय म्हणून अविनाशच्या नावावर भाऊंनी करून दिला. इतकेच नव्हे तर अविनाश व त्याच्या एग्रीकल्चरची पदवी घेतलेल्या मुलाला आपले शेत उदरनिर्वाहासाठी व शेतीतले प्रयोग करण्यासाठी तसेच वाहायला दिले. बीटी समजून घ्यायचे असतील तर उच्च विद्याविभूषित प्राध्यापकांच्या मुखातून नाही, राजकारण्यांच्या व्यावहारिक दृष्टीकोनातून नाही, तर अविनाश देशमुख यांच्या डोळ्यातून समजून घेतले पाहिजे.

## *भाग- ७*

उदरनिर्वाह आणि मुलांच्या शिक्षणासाठी देशमुख कुटुंब बेलोऱ्यातून अमरावतीला स्थानांतरित झालं. भाऊंचे एक भाऊ, रघुनाथराव (आरटी) पोलीस खात्यात नोकरीला लागले होते. पाकिस्तानात स्थलांतरित झालेल्या मुस्लिम कुटुंबांची घरं सरकारनं अधिग्रहित केली होती. त्यातून पोलीस खात्याच्याही वाट्याला काही घरं आली. त्यातलं एक घर नमुन्यात होतं. आरटींना ते पोलीस क्वॉर्टर म्हणून मिळालं. अगदी ऐसपैस घर. त्यामुळे बृहद देशमुख कुटुंब तिथे स्थिरावलं. येणाऱ्या -जाणाऱ्यांचा सतत राबता असे. बेलोऱ्याचा लास्टटाईम चुकला की बेलोरेकर गांधी चौकातून थेट नमुन्यात. शिवाय दहा म्हशींचा पसाराही होता. ते उदरनिर्वाहाचे साधन होते.

विस्तारित कुटुंबाची निकड ओळखून भाऊ मालटेकडी जवळील विदर्भ हाऊसिंग कॉलनीत राहायला गेले. ते प्राध्यापक होते त्यामुळे कोणाला खिशाची अडचण सांगणेही मुश्किल. पगाराची नियमितता नव्हती. संसाराच्या कितीही आदर्श कल्पना असल्या, तरी रोज जेवावेच लागतं. कौटुंबिक गरजांसाठी पैसा लागतोच लागतो. भाऊंचा संसार सुरू झाला होता. देशमुखीही जपायची आणि प्राध्यापकीही. त्याकाळात भाऊंनी घेतलेला निर्णय कदाचित आज लोकांना आश्चर्यकारक वाटेल. त्या काळात एचफोर बियाणं नावारूपाला आलं होतं. त्यांचं शेतकऱ्यांना आकर्षण होतं. व्यापारी भेसळ करून शेतकऱ्यांना फसवत आणि गल्ला भरत. भाऊंनी हे हेरलं. भाऊंचं आज जिथं घर आहे तिथं विमवी परिसरात, शहराच्या बाहेर भाऊंनी चाराणे फुटाने प्लॉट विकत घेतला आणि इतरांचे प्लॉट भाड्याने घेतले. या प्लॉटवर एचफोर बियाणे तयार केलं.

भाऊंचे एचफोर बियाणे एकदम अस्सल असे. शेतकऱ्यांना त्याची प्रचिती आली, विश्वास बसला. बियाण्यांसाठी शेतकऱ्यांच्या रांगा लागत. पुढच्या वर्षीचं बुकिंग यावर्षी होत असे. बुकिंग मधला नंबर कोणाच्या वशिल्याने चुकत नसे. महाबीजने हे बियाणे प्रमाणित केलं होतं. प्रत्येकाला भाऊ त्याच्या पावत्या देत. हिशोब चोख ठेवत. आज आपल्याला आश्चर्य वाटेल पण २०१० च्या निवडणुकीत त्यांचा निवडणूक विशेषांक त्यांनी तयार केला. त्यांच्यासोबत त्यांच्या पायाशी बसून काम करण्याची संधी मला तेव्हा प्राप्त झाली; हे मी माझे भाग्य समजतो . संपत्तीच्या वृद्धीचा हिशेब त्यात मांडला होता. त्यात एचफोर बियाण्याच्या मिळकतीचाही समावेश होता. भाऊंनी पावत्यांचा गठ्ठा आणला आणि पावत्यांची बेरीज करायला त्या मला दिल्या. मी अचंबीतच झालो. ऐंशीच्या दशकातल्या पावत्या २०१० साली? मी भाऊंना म्हटले, "भाऊ हे तुम्ही अजून जपून ठेवले?" ते म्हणाले, "ज्याच्यामुळे आपले राहते घर झाले त्या घरात या पावत्या ठेवायला जागा किती लागते? संपत्तीचा हिशेब द्यायला आज त्या कामी पडल्या नं!" व्यक्तीच्या आयुष्याचं नियोजन कसं असावं ? ते कसं करावं ? याचा धडा म्हणजे भाऊंचे जीवन.

विदर्भ महाविद्यालयानंतर जंगल वाटावं असा तो परिसर तेव्हा होता. शहरात प्लॉट घ्यायची स्थिती नव्हती. म्हणून शहराबाहेर जंगलात राहायला भाऊ गेले. १९७४-७५ चा तो काळ होता. घर बांधायला कर्ज देण्यासाठी तेव्हा बँका फोन करत नसत. त्यांचे उंबरठे झिजवावे लागत. हिंदफिन नावाची तेव्हा एक वित्तीय संस्था होती. राजकमल चौकात पालेकर बेकरीच्या वर त्या संस्थेचे ऑफिस होते. श्री.अण्णाजी वैद्य तिथे मॅनेजर होते व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते मोठे पदाधिकारी होती. मा.गो. वैद्य यांचे ते लहान भाऊ. भाऊंनी हिंदफिनमधून तारणावर कर्ज घेतलं, घर बांधलं. मी तेव्हा श्रीकृष्ण पेठेत रहाटगांवकरांच्या वाड्यात संस्कार केंद्र चालवायचो. महाविद्यालयाच्या उंबरठ्यावरच होतो. अण्णाजी वैद्यांशी माझा परिचय होता. एक दिवस मी अण्णाजींना भेटायला हिंदफिनमधे गेलो. तिथे पांढऱ्या शुभ्र शर्ट - पायजाम्यतील, भारदस्त व्यक्तिमत्त्वाची, हातात ब्राऊन कलरची चामड्याची बॅग घेतलेली एक व्यक्ती बसली होती. त्यांचे बोलणे

झाले ते निघून गेले. अण्णाजींनी मला पुढे बोलावले. ते म्हणाले, “तू या माणसाला ओळखतो का?” मी “नाही” म्हटले. मला अमरावतीत राहून राजकमल चौकही माहित नाही अशा अविर्भावात त्यांनी माझ्याकडे पाहिले. अण्णाजी म्हणाले, “अरे हे प्रा.बी.टी.देशमुख आहेत. खूप मोठा माणूस आहे. इतका काटेकोर माणूस मी आयुष्यात पाहिला नाही.” बीटी भाऊंची त्यादिवशी अप्रत्यक्ष ओळख झाली. प्रत्यक्ष संबंध आल्यावर त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत तो कायम होता आणि नंतरही राहील.

भाऊ जायच्या पाच-सहा दिवस अगोदर मी, डॉ.बी.आर.वाघमारे, डॉ.पी.एस.नारखेडे दुपारी साडेअकरा ते दोन वाजेपर्यंत, अडीच तास भाऊंच्या घरी भाऊंचे शब्द कानात प्राण ओतून ऐकत होतो. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनापासून तर विद्यमान राजकारणापर्यंत अनेक विषयांवर चर्चा झाली. आमची ती अखेरची भेट. ही भेट झाली, भाऊंना ऐकता आलं आमचं ते परमभाग्यच म्हटलं पाहिजे. इहलोकात देवदर्शन वारंवार कुठं होतं?

### *भाग - ८*

“न हि ज्ञानेन सदृश्यं पवित्रमिह विद्यते।”

भगवद्‌गीतेच्या चौथ्या अध्यायातील हा श्लोक ज्ञान या शाश्वत सत्याचे महत्त्व अधोरेखित करतो. ज्ञानासारखे पवित्र दुसरे काही नाही. ज्ञानासारखी दुसरी शक्ती नाही. शालेय वयापासूनच बी.टी.भाऊंना या शक्तीची जाणीव झाली असावी. बेलो-याच्या बेसिक स्कूलमधेच तुळशीरामजी-विठाबाईच्या भाऊरावने आपली चमक दाखवली होती. वर्धेचे मॉडेल हायस्कूल असो की अमरावतीचे शिवाजी मराठा हायस्कूल असो भाऊंची बौद्धिक प्रतिभा सर्व गुरुजींनी ओळखली होती. मुलगा सामान्य नाही हे त्यांनी जाणले होते. नववीतला मुलगा समाज जीवनातील महत्त्वाच्या, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सामील होतो, हजारोंच्या सभेत खणखणीत भाषण करतो, हिंदुस्थानमधे नोकरीही पत्करतो पण गरिबी आहे म्हणून आपली ज्ञानलालसा सोडत नाही हे कशाचे लक्षण आहे?

भाऊंनी आयुष्यभर ज्ञानाची कास धरली. ज्ञानासारखे पवित्र काहीच नाही आणि ज्ञानाएवढी शक्तीही नाही हे वचन प्रत्यक्षात त्यांनी उतरविले. महादेव गोविंद रानडे वक्तृत्व स्पर्धा ही महाराष्ट्रात अत्यंत प्रतिष्ठेची स्पर्धा मानली जाते. भाऊ वक्तृत्व कलेचे उपासक होते. विदर्भ महाविद्यालयाचे विद्यार्थी म्हणून त्यांनी या स्पर्धेत प्रतिनिधित्व केले व पारितोषिकही पटकावले. प्राचार्य प.सि. काणे हे प्रभारी प्राध्यापक होते. त्यांनी सांगितले, रानडे वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थी म्हणून भाऊरावचे भाषण झाले. ते अत्यंत अभ्यासपूर्ण होते. भाऊरावांची मांडणी, वक्तृत्व बघून मला तेव्हाच वाटले हा असामान्य विद्यार्थी आहे.

विदर्भ महाविद्यालयात भाऊंना प्रारंभी ऍडमिशन मिळाली नव्हती. ‘ऍडमिशन फुल्ल झाल्या’ असे कॉलेजने सांगितले होते. श्री.बाळासाहेब मराठ्यांना हे कळले. ते भाऊंना प्राचार्य शब्दे यांच्याकडे घेऊन गेले. प्राचार्य शब्दे यांना बाळासाहेब म्हणाले, “तुम्ही या हुशार विद्यार्थ्याला ऍडमिशन देत नाही तर कोणाला देता? हा मुलगा तुमच्या कॉलेजला बक्षीसं मिळवून देईल. नावलौकिक वाढवेल. मी गॅरंटी देतो!” भाऊंची ऍडमिशन झाली. आपल्या प्रेस मध्ये काम करणाऱ्या मुलाची बुद्धिमत्ता, गुणवत्ता, ज्ञानलालसा चाणाक्ष बाळासाहेबांनी ओळखली होती. विदर्भ महाविद्यालयाला त्यांनी अनेक बक्षीसं मिळवून दिली. बाळासाहेबांचा शब्द खरा केला. सर्वात चिरंतन बक्षीस म्हणजे या विद्यार्थ्याने आपल्या महाविद्यालयाला चार विषयात पदव्युत्तर वर्ग मिळवून दिले. मला वाटतं महाराष्ट्रातच नव्हे तर एखादवेळी भारतातही हे अनोखे उदाहरण म्हटले पाहिजे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात तासंतास बसून त्यांनी अध्ययन केले आणि मुख्य म्हणजे ज्ञानसंपन्न व्यक्तीच्या चरणाशी लीन झाले. ‘विद्या विनयेन शोभते’ ती अशी.

विद्यार्थीदशेपासूनच अनेक ग्रंथांचे वाचन, प्राध्यापक झाल्यावर लेखन आणि प्राप्त केलेल्या ज्ञानाचे उपयोजन ही भाऊंची फार मोठी खासियत आहे. त्यांनी केवळ ग्रंथ वाचले नाहीत, ते पचवले. प्रसंगी आपल्या प्रतिभेने नवीन ग्रंथांचे लेखन केले. पण सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे प्राप्त केलेल्या ज्ञानाचे उपयोजन केले हे अत्यंत कठीण असते. भाऊ चळवळीत नसते, लोकप्रतिनिधी झाले नसते तर राज्यशास्त्राचे भारतातील महान विद्वान, भाष्यकार म्हणून ओळखल्या गेले असते. वैयक्तिक लाभ आणि प्रसिद्धीपेक्षा त्यांनी समाजहिताला प्राधान्य दिले. भाऊंशी चर्चा करताना जाणवत असे की अगदी भरतमुनीच्या नाट्यशास्त्रापासून तर पंडित विष्णू दिगंबर पलुस्करांच्या संगीतशास्त्रापर्यंत त्यांना रुची आहे. कला, साहित्य, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण, इतिहास, राज्यशास्त्र, वक्तृत्वशास्त्र, सभाशास्त्र, मुद्रणशास्त्र, शासन व्यवहार पद्धती, जलव्यवस्थापन अशा विविध विषयांचे त्यांचे सखोल वाचन, चिंतन, मनन होते. त्या त्या विषयातील सूक्ष्म बारकाव्यांसह ते बोलत, लिहत. इंग्रजी, मराठी भाषेवर तर त्यांचे प्रभुत्व होते.

आमदार म्हणून विधिमंडळाच्या कामकाजात इतके व्यस्त असतानांही त्यांनी आपली ज्ञानलालसा सोडली नाही हे विशेष! विधिमंडळ ग्रंथालयाचे तत्कालीन ग्रंथपाल बा.बा. वाघमारे भाऊंच्या अभ्यासू वृत्तीबद्दल माझ्याजवळ अनेकदा बोलले आहेत. ज्ञानतपस्वी भाऊंचे वैयक्तिक ग्रंथालय याची साक्ष आहे. घराचे दोन मजले या ज्ञानोपासकाने ग्रंथालयासाठी समर्पित केले. त्यांच्या ग्रंथालयात जवळपास साडेतीन हजार ग्रंथ आहेत. त्यांच्या ग्रंथालयाची रचना, त्याची मांडणी ही बघण्यासारखी आहे. कोणताही संदर्भ लागला तर दोन मिनिटात भाऊ ते पुस्तक किंवा फाईल काढत. ज्ञान आणि गुणवत्तेला पराजित करणे कठीण असते. व्यक्तीचा राजकीय पराभव निवडणुकीत होऊ शकतो. भाऊंचाही झाला. ज्ञानसंपन्न व गुणवान भाऊ अजुनही अपराजित आहेत.

### *भाग - ९*

१९२५ साली नागपूर विद्यापीठाची स्थापना झाली. स्वातंत्र्यपूर्वकाळात स्थापन झालेल्या या विद्यापीठाचा नावलौकिक मोठा होता. अनेक ज्ञानतपस्वींनी येथे अध्यापन केले आणि अनेक विद्वान या विद्यापीठाने भारताला दिले. विशेष म्हणजे ज्यावेळेस स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना साहेबांची मर्जी खपा होईल म्हणून इतर विद्यापीठे प्रवेश नाकारत होती त्यावेळी नागपूर विद्यापीठाने या स्वातंत्र्ययोद्ध्यांना सामावून घेतले. देशाचे माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव त्यातलेच. प्राध्यापक झाल्यावर भाऊ नागपूर विद्यापीठ व्यवस्थेत सक्रिय झाले. अभ्यास मंडळे, विद्या शाखा, विद्वत परिषद, अधिसभा, कार्यकारी परिषद अशा विविध प्राधिकरणांवर त्यांनी कार्य केले. भाऊंनी मिरवण्यासाठी कोणतीच पद घेतली नाहीत. प्राप्तपदांवर त्यांनी आपली नाममुद्रा उमटविली.

नागपूर विद्यापीठात विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हिताचे त्यांनी अनेक निर्णय मान्य करून घेतले. शिक्षण क्षेत्राची गरिमा जाईल असा एकही निर्णय त्यांच्या कारकिर्दीत झाला नाही. महाविद्यालयीन शिक्षकांना त्याकाळात सेवा शाश्वती नव्हती. खाजगी व्यवस्थापन मनमानी करत. शिक्षकांना सेवाशाश्वती देणारा परिनियम ५३ तयार करण्यात आला. या परिनियमानुसार विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही शिक्षकाला काढता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली. भाऊंचा यात मोलाचा वाटा आहे. प्राध्यापकांसाठी हे संरक्षण कवचच बनले.

१ मे, १९८३ साली अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. शासन नियुक्त पहिल्या कार्यकारी परिषदेवर भाऊ होते. प्रा.राम मेघे त्यावेळी शिक्षण मंत्री होते. डॉ.के.जी. देशमुख विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. प्राचार्य प.सि.काणे, प्राचार्य आर.एन.खर्चे, डॉ.देविसिंहजी शेखावत, पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, प्राचार्य डॅडी देशमुख, प्राचार्य राम शेवाळकर अशी शिक्षण क्षेत्रातील नामवंत मंडळी विद्यापीठाच्या प्राधिकरणांवर होती. श्रीकृष्ण चौबे पहिले कुलसचिव होते. विदर्भ महाविद्यालयाच्या परिसरात विद्यापीठ होते. अमरावती विद्यापीठासाठी जागा अधिग्रहित करण्यापासून तो विद्यापीठाची उभारणी करण्यापर्यंत भाऊंचा त्यात महत्त्वाचा वाटा राहिला. विद्यापीठाचा सुंदर परिसर आज आपल्याला दिसतो त्यामागे या सर्व लोकांचे श्रम आहेत. भाऊ विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर होते ते विधिमंडळातही होते. त्यामुळे शासनाचे सहकार्य मिळाले. भाऊंनी या नव्या विद्यापीठाचा नावलौकिक वाढविण्यासाठी अनेक उत्तम पायंडे पाडले. विद्यापीठाचे नियम, परिनियम, अध्यादेश तयार केले. विद्यापीठ प्राधिकरणीच्या सभांची कार्यपद्धती, सभांची सूचना, पत्रे, सहपत्रे, ती पाठविण्याची पद्धती, कार्यपुर्ती अहवाल अशा अनेक महत्त्वपूर्ण कार्यपद्धती निर्माण करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यामुळे कामाला शिस्त लागली.

मुख्य म्हणजे विद्यापीठा कामकाजाचे संगणकीकरण करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. परीक्षा विभाग, वित्त विभाग येथील संगणकीकृत व्यवस्था बघायला

***भाऊंनी आयुष्यभर ज्ञानाची कास धरली. ज्ञानासारखे पवित्र काहीच नाही आणि ज्ञानाएवढी शक्तीही नाही हे वचन प्रत्यक्षात त्यांनी उतरविले.***

महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांचे अधिकारी येत. परीक्षेतील गैरव्यवहार रोखण्यासाठी तयार करण्यात आलेला अध्यादेश आणि त्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात भाऊंचा पुढाकार होता. त्यामुळे ही पद्धती फुल प्रूफ झाली. कुलगुरूंनी पदभार स्वीकारताना अनुसरावयाची कार्यपद्धती, त्यांनी निश्चित केली. विद्यापीठ दीक्षांत समारंभ नेटका व सुनियोजित पद्धतीनेच व्हावा असा त्यांचा कटाक्ष असे. हे मुद्दाम सांगितले पाहिजे की भाऊंसारखी, काणेसरांसारखी माणसं दीक्षांत समारंभाच्या रंगीत तालमीच्या सभेत ओळंओळ म्हणून बघत. त्यामुळे त्याकाळात दीक्षांत मंडपात अधिष्ठात्यांची शोभा होत नसे. विद्यापीठाला आर्थिक शिस्त लावण्यासाठी व कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी लेखा संहिता (अकाउंटस् कोड) संपूर्ण महाराष्ट्रात अमरावती विद्यापीठाने सर्वप्रथम तयार केली. त्यासाठी भाऊंचा आग्रह होता. केंद्रीय मूल्यांकन पद्धती लागू झाल्यावर केंद्रीय मूल्यांकनाची स्वतंत्र व्यवस्था झाली पाहिजे म्हणून स्वतंत्र परीक्षा भवनाची निर्मिती महाराष्ट्र सर्वप्रथम अमरावती विद्यापीठात झाली. भाऊंनी विधिमंडळात त्यासाठी आवाज उठविला होता. तासंतास बसून त्यांनी व्यवस्था निर्मितीसाठी परिश्रम घेतले. या कामकाजाचे कधी एक रुपयाही परिश्रमिक (भत्ता) घेतला नाही.

महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षकांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी १९६३ साली नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ (नुटा) या संघटनेची स्थापना झाली. भाऊ शिक्षक म्हणून या संघटनेत सक्रिय झाले. १९७२ साली ते नुटाचे अध्यक्ष झाले. अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यावर भाऊंनी नुटा संघटनेत प्राण भरला. संघटना मजबूत बांधली. मुख्य म्हणजे संघटनेला लढवय्या चेहरा -मोहरा दिला. भाऊ राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. राज्यशास्त्राचे महान भाष्यकार प्रो. हेरॉल्ड लास्की यांचे एक वचन आहे.

"When argument seizes to be strength the strength becomes an argument"

युक्तीवादाची सारी साधनं जेव्हा निष्प्रभ होतात तेव्हा शक्ती हाच सर्वश्रेष्ठ युक्ती ठरतो. त्यांनी जनशक्ती उभी केली. लोकशाहीत लोकशक्तीचे महत्त्व अनन्यसाधारण असते. महाविद्यालयीन शिक्षकांना तेव्हा वेठबिगारासारखी वागणूक होती. सेवाशाश्वती नाही, नियमित वेतन नाही, पेन्शन वगैरे तर दूरच. भाऊंनी शक्ती हाच युक्तिवाद शासनाला दाखवला. संप, बहिष्कार, मोर्चे, घोषणा, घेराव सुरू झाले. भाऊंचे दमदार नेतृत्व आणि संघटनेची शक्ती यामुळे सरकार जागे झाले. या लढ्याचे यश म्हणून महाविद्यालय शिक्षकांना पहिल्यांदा १९७९ साली सॅलरी पेमेंट स्कीम लागू झाली. महाराष्ट्र शासन शिक्षकांचे पगार करू लागले. त्यानंतर राज्यातील सर्व विद्यापीठातील शिक्षकांना ही योजना लागू झाली. नवीन शैक्षणिक आकृतीबंधानुसार शिक्षकांची सेवेत समायोजन भाऊंच्या प्रयत्नांनी झाले. महाविद्यालय, विद्यापीठ शिक्षकांच्या जीवनात हे आमुलाग्र परिवर्तन आणून त्यांना आत्मसन्मान देण्याचे काम भाऊंनी केले.

भाऊंची दूरदृष्टी, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि नियोजन त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसते. त्याचे हे उदाहरण आहे. २५ जून, १९७५ ला आणीबाणी घोषित झाली. हा संवेदनशील काळ होता. प्रसारमाध्यमांवर निर्बंध होते. राज्यस्तरावरील एमफुक्टोचे नेते प्रा.किशोर ठेकेदत्त आणि प्रा.एकनाथ मांजरेकर यांना मिसा खाली अटक झाली होती. या पार्श्वभूमीवर संघटनेचा विचार रुजविण्यासाठी व तो पुढे देण्यासाठी १९७६ साली नुटा बुलेटिनचा प्रारंभ झाला. भाऊंच्या नेतृत्वात निघणारे नुटा बुलेटीन मूकनायकांची प्रखर वाणी झाले. त्याला आता पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याचे श्रेय निःसंशय प्रा.बी.टी.देशमुख या अभ्यासू नेत्याला आहे.

विद्यापीठ राजकारणातील साध्या साध्या पद प्रतिष्ठेसाठी विचलित होणाऱ्या प्राध्यापक समुदायाला एकच उदाहरण सांगतो. मी तेव्हा पत्रकारितेत होतो. सुदामकाका देशमुख तेव्हा खापर्डे बगीच्यात ॲड. ब्रम्हंकडे राहत . मी त्यांना भेटायला गेलो. माझे काम झाले. ते म्हणाले, “माझ्यासोबत चलतो का? एक काम आहे?” त्यादिवशी दै.तरुण भारत मधे एका वरिष्ठ प्राचार्यांचा लेख प्रसिद्ध झाला होता. त्यात बी.टीं.वर टीका होती. तोंडावर विधान परिषदेची निवडणूक होती. माझ्या दुचाकीवर बसून सुदामकाका मला त्या व्यक्तीकडे घेऊन गेले. सुदामकाकांची ती व्यक्ति मित्र होती. सुदामकाका त्यांना त्या लेखाचा संदर्भ देत म्हणाले, “अरे तुम्ही प्राध्यापकांनी तुमच्या कातड्याचे जोडे जरी बी.टी.ला घातलेना तरी त्याचे उपकार फिटणार नाही.”

लढवय्या नेत्यांची लढाई श्रमिकांनी अनेक वर्षे स्मरणात ठेवली आहे. प्राध्यापकांना विस्मरण होण्याचे काय कारण आहे?

### *भाग - १०*

विदर्भ पदवीधर मतदारसंघातून १९८० साली भाऊ विधान परिषदेवर निवडून आले. तेव्हा विदर्भ पदवीधरमधून दोन प्रतिनिधी निवडल्या जात. प्रा.बी.टी. देशमुख व श्री. मोतीरामजी लहाने निवडून आले. दादा देशकर पराभूत झाले. त्यानंतर अमरावती पदवीधर मतदारसंघ झाला आणि भाऊ सलग पाच वेळा विधान परिषदेवर निवडून आले.

भाऊ राज्यशास्त्र कोळून प्याले होते. मुत्सद्दी होते, राजकारणी होते, डावपेच खेळायचे पण साधन शूचिता पाळायचे. आपल्याला निवडून यायचे असेल तर काँग्रेस उमेदवार नसणे आणि काँग्रेसचा पाठिंबा मिळणे आवश्यक आहे; हे गणित ते जाणून होते. त्यांनी मुत्सद्दीपणा दाखवून तत्कालीन केंद्रीय मंत्री श्री. वसंतराव साठे यांना परिस्थिती समजावून सांगितली. भाऊंविरोधात अखेरपर्यंत काँग्रेसचा उमेदवार नव्हता व काँग्रेसचा पाठिंबा मात्र त्यांना मिळाला त्याचे श्रेय श्री. वसंतराव साठे यांना जाते. प्राचार्य प.सि.काणेसर व श्रीमती उषाताई परांजपे याची साक्ष आहेत.

१९८० ते २०१० सलग तीस वर्षं भाऊ विधान परिषदेत होते. ३६५ गुणीला ३० केले तर दहा हजार नऊशे पन्नास दिवस होतात. आयुष्यातील दहा हजार नऊशे पन्नास दिवस हा लोकप्रतिनिधी जनकल्याणाचा ध्यास घेऊन सभागृहात लढत होता. आमदारकी त्यांनी भोगली नाही, तर आपली वैयक्तिक इच्छा -आकांक्षा, नातेवाईक, निवांतपणा, आयुष्यातील मौजमजा त्यागली.

संसदीय संहितेनुसार प्रामाणिकपणा, जनतेची सेवा, उत्तरदायित्व, सर्वसमावेशक दृष्टिकोन, दूरदृष्टी, अभ्यासूपणा, संवेदनशीलता, कायद्याचा आदर, संवादकौशल्य, निर्णयक्षमता, स्वच्छ चारित्र्य ही अकरा गुणवैशिष्ट्ये आदर्श लोकप्रतिनिधीची सांगितली आहेत. पदवीधर मतदारसंघातील माझा उमेदवार म्हणून प्रा.बी.टी.देशमुख यांच्या नावासमोर मी पाच वेळा प्रथम क्रमांक लिहिला. मला याचा अभिमान आहे. आदर्श लोकप्रतिनिधीची अकराही गुणवैशिष्ट्ये माझ्या लोकप्रतिनिधीच्या व्यक्तिमत्त्वात ठासून भरली होती.

सरकारी कामावर नियंत्रण, प्रशासनाला जाब विचारणे, सभागृहात जनहितार्थ प्रश्न मांडणे आणि जनहित साधणे यासाठी राज्यघटनेने विहित नियमांनी लोकप्रतिनिधींना दिलेली साधने म्हणजे संसदीय आयुधे. प्रश्नोत्तराचा तास, तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, अल्पसूचना, शून्य प्रहर, लक्षवेधी सूचना, स्थगन प्रस्ताव, अविश्वास प्रस्ताव, निंदा प्रस्ताव, अर्थसंकल्पीय चर्चा, मागण्यांवरील चर्चा, कपात प्रस्ताव ही संसदीय आयुधं आहेत. आपल्या तीस वर्षाच्या प्रदीर्घ संसदीय कारकीर्दीत ही सर्व आयुधं प्रा.बी.टी. देशमुख या लोकप्रतिनिधीने सव्यसाचीपणे हाताळली. या आयुधांचा उपयोग करून अपक्ष निवडून येणारा हा एकटा लोकप्रतिनिधी जनकल्याणार्थ सिंहासारखा लढला. आता समूहच्या समूह दहशतीत आहेत. निधी मिळत नाही म्हणून त्यांनी निष्ठा विकायला काढल्या आहेत.

महाराष्ट्राचा मंगल कलश आला. १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मराठी भाषिकांचे विदर्भ, मराठवाडा, कोकणसह एक राज्य निर्माण झाले. सत्तेतील मोठे भाऊ विश्वासानं आपलं बोट धरणाऱ्या विदर्भ, मराठवाड्यासारख्या प्रदेशाकडे जिव्हाळ्यानं लहान भाऊ म्हणून पाहतील, निधीचं समन्यायी वाटप करतील असं ठरलं होतं. मोठ्या भावानं लहान भावाचं बोट तर सोडलंच पण त्याच्या हातातलं चॉकलेटही हिसकलं. सत्तेत प्रभाव असलेल्या पश्चिम महाराष्ट्राच्या नेतृत्वानं विदर्भाच्या निधीवर दरोडा घालण्याचं सत्र सुरू केलं. या दरोडेखोरिला आपल्या सजगतेनं, अभ्यासानं, निर्भीडतेनं, लगाम लावणारा लोकप्रतिनिधी म्हणजे प्रा.बी.टी. देशमुख.

समन्यायी वाटप तत्त्वानुसार जेवढा निधी एखाद्या प्रदेशाला मिळायला हवा तेवढा न मिळणं म्हणजे अनुशेष. सत्यशोधन समितीच्या आकडेवारीनुसार ३० जुन, १९८२ रोजी अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर या जिल्ह्यांचा जलसिंचन अनुशेष ५१३.४१ कोटी रुपये होता. बारा वर्षात ३० जुन, १९९४ रोजी हा अनुशेष ४२६० कोटी रुपये झाला. मोठ्या भावाने लहान भावाचं फक्त चॉकलेटच हिसकलं नाही, तर त्याच्या पुढ्यातलं ताटही ओढून घेतलं आणि त्याचे कपडेही काढून घेतले. या दुष्प्रवृत्तीविरुद्ध प्राणपणाने लढणारे जाबाज आमदार प्रा.बी.टी. देशमुख होते. ‘महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष- क्ष किरण परीक्षा’ हा ग्रंथच त्यांनी त्यावर प्रसिद्ध केला. पश्चिम महाराष्ट्रातील नेता चार इंची पाईपनं शेताला भळभळ पाणी देत आहे आणि विदर्भातील नेता अर्धा इंची पाईपने थेंब थेंब पाणी काढत आहे हे पुस्तकाचं मुखपृष्ठ बरंच काही सांगून जातं.

त्यांच्या नेतृत्वाखालील नुटा या संघटनेने आपल्या व्यावसायिक समस्यांसाठी भाऊंच्या नेतृत्वात संघर्ष केलाच पण समाजाभिमुख होऊन भाऊंच्या नेतृत्वात जलसिंचन अनुशेष विशेषांकही काढले. जलसिंचन अनुशेषावर ग्रंथ काढला. निधी दिला, पत्रकं वाटली, प्राध्यापक कार्यकर्तेही झाले. ही दृष्टी भाऊंनी दिली.

अमरावती शहर पिण्याच्या पाण्यासाठी तरसत होते. अमरावतीकर बोअरचं

पाणी पीत होते. दोन दोनशे फूट खोल बोअर गेल्या होत्या. श्री.बाळासाहेब मराठे यांची प्रेरणा, सुदामकाका देशमुख, दादासाहेब गवई, डॉ.देवीसिंह शेखावत या व इतर लोकप्रतिनिधींची साथ घेऊन घागर मोर्च्यासह अप्पर वर्धातून अमरावतीला पिण्याचे पाणी मिळावे म्हणून भाऊंनी आंदोलन उभारले. विधिमंडळात आणि रस्त्यावरसुद्धा! दहा टक्के लोक वर्गणीचा प्रश्न दादासाहेब गवईंची मदत घेऊन मार्गी लावला. अमरावतीच्या नळांना शुद्ध पाणी आले. बीटींनी काय केले? असा प्रश्न करणाऱ्या कपाळकरंट्यांनी आपल्या आप्तस्वकीयाला अखेरचे शुद्ध पाणी पाजतांना एकदा पेल्यात डोकावून बघावे. बीटी दिसतील.

राज्यशास्त्र आणि सभाशास्त्र यात भाऊ पारंगत होते. अनुशेषाच्या प्रश्नावर विधिमंडळाचे एक दिवसाचे संस्थगीत अधिवेशन पुन्हा घेण्यासाठी त्यांनी सरकारला भाग पाडले. विधिमंडळ इतिहासात घटनात्मक पेचप्रसंग उभा झाला. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी श्री. दादासाहेब गवई यांच्या माध्यमातून बीटीभाऊंना सांगून पाहिले. 'विदर्भाच्या प्रश्नावर एकदा भूमिका घेतली आहे. आता माघार घेणे म्हणजे जनतेशी द्रोह होईल.' असे भाऊंनी त्यांना सांगितले. ८ मार्च, २००३ रोजी अनुशेषाच्या प्रश्नासाठी विधिमंडळाचे एक दिवसाचे अधिवेशन बोलविण्याचा इतिहास घडविणारे प्रा.बी.टी. देशमुख आहेत.

१९९६ साली राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा 'पहिला उत्कृष्ट संसदपटू' हा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला. ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती पहिला पुरस्कारही त्यांना ससन्मान दिला गेला. पुरस्कार त्यांच्यासाठी सामान्य होते. जनकल्याणाचा घेतलेला वसा पूर्ण करणे आणि जनतेचे प्रश्न सोडवून त्यांना सुगीचे दिवस आणणे हाच त्यांच्यासाठी मोठा पुरस्कार होता.

बाजार बसव्यांच्या कळपात गुलाल उधळणारा समाज सीतेची अग्निपरीक्षा घ्यायला नेहमीच आतुर असतो. आपले कपडे, आपलं अंग कोणत्या स्पर्शानं बरबटलं आहे याची त्यांना खंतही नसते आणि विषादही. त्यांच्या अंतःकरणात राम नसतोच मुळी. सीतेचा त्याग तर त्यांच्यापासून कोसो दूर असतो.

### *भाग - ११*

भाऊ गेले... पाहता पाहता तेरा दिवसही उलटून गेले. दिवस जातात पण माणूस अंतःकरणात रुतून बसतो.

लोकमान्य टिळक गेल्यावर कवीवर्य भा.रा. तांबे यांनी एक अजरामर काव्य लिहिले. टिळकांच्या अंतःकरणातून. लताबाईंनी ते शब्द अमर केले.

"जन पळभर म्हणतील, 'हाय हाय!'  
मी जातां राहील कार्य काय?  
सूर्य तळपतील, चंद्र झळकतील;  
तारे अपुला क्रम आचरतील,  
असेच वारे पुढे वाहतील,  
होईल काही का अंतराय?"

जगराहाटीच्या दृष्टीने ते खरेच आहे. सूर्य उगवायचा थोडाच राहील. तो नित्यक्रमाने प्रकाश देईलच.

कोणाच्याच जाण्याने कोणाचेच काही अडत नाही. हे मात्र खरं की शेवटी हाडामासाची माणसंच माणसं घडवतात. समाजाची वीण घट्ट करणारी माणसंच असतात. ही वीण ज्यांनी घट्ट केली ती गेल्यावरच त्यांच्या हाताचे कसब कळते. वीण सैल होऊ न देण्याची जबाबदारी आपली असते.

कवी अनिल यांच्या ओळी स्मरल्या.

"सारेच दीप कसे मंदावले आता  
ज्योती विझू विझू झाल्या  
की झड घालून प्राण द्यावा पतंगाने  
असे कुठेच तेज नाही!"

भाऊ गेले. एक तेजोवलय लुप्त झालं.

नागपूर अधिवेशनाची वेळ. भाऊंची प्रकृती बरी नव्हती. सभागृहात जाण्यास डॉक्टरांनी मनाई केली. दुसऱ्या दिवशी विदर्भाच्या प्रश्नावर चर्चा होती. श्री जयंत पाटील अर्थमंत्री होते. अनुदान वाटपावरून त्यांच्याशी खडाजंगी झाली. प्रश्न मांडला. भाऊ विधिमंडळ परिसरातच कोसळले.

एक वरिष्ठ मंत्री सभापती जयंतराव टिळकांना म्हणाले, "सभापती महोदय, बी.टी. देशमुख मोठमोठ्याने बोलतात. रागावल्यासारखे सांगतात." सभापती म्हणाले, "ते रागवत नाहीत. त्यांची तळमळ आहे. त्यात व्यक्तिगत द्वेष नाही."

विधिमंडळात भाऊंचा दबदबा होता.

प्रस्थापित नेतृत्वाविरुद्ध भूमिका घेतांना भाऊंना पुढची निवडणूक, आमदारकी आठवली नसेल का? ते अव्यवहारीच म्हटले पाहिजे. वऱ्हाड ही सोन्याची 'कऱ्हाड' ही पुस्तकातली म्हण खरी करण्यासाठी, शेतकऱ्यांच्या शेतात पाणी येण्यासाठी कोरडवाहू शेतकऱ्याचा मुलगा अखेरपर्यंत झुंजला. आचार्य प्र.के. अत्रे यांच्यानंतर असे झुंजार, अभ्यासू लोकप्रतिनिधी विरळेच असतील.

भाऊंच्या आईची प्रकृती सिरीयस होती. दुसऱ्या दिवशी सभागृहात लक्षवेधी होती. आईला भेटून ते रात्री मुंबईला गेले. इकडे आई गेली.

१९ डिसेंबर, १९९७. भाऊंची लहान मुलगी, दीपाचं लग्न होतं. हळद लावून मुलगी बसलेली. आदल्या दिवशी सिमंतपूजन. भाऊ नागपूर अधिवेशनात . सभापती जयंतराव टिळक म्हणाले, "बीटी तुमच्या मुलीच्या लग्नाची पत्रिका माझ्या टेबलवर आहे. उद्या लग्न आहे. तुम्ही केव्हा जाणार आहात?"

लोकप्रतिनिधित्वाची कसोटी यापेक्षा वेगळी कोणती असते?

२०१० नंतर असा प्रतिध्वनी विधिमंडळात घुमला?

असे हाडामासाचे लोकप्रतिनिधी होते हे पुढील पिढ्यांना कदाचित खरेही वाटणार नाही.

राजकीय क्षितिजावर भांगेची शेती बहरत असतांना देवालयातील तुळशी वृंदावनं जपणं, पूजणं समाजस्वास्थ्यासाठी आवश्यक असतं.

प्राचार्य राम शेवाळकर यांच्याकडे एकदा भाऊ, मी आणि डॉ पी.एस. नारखेडे गेलो. नानासाहेबांनी आम्हाला त्यांच्या अभ्यासिकेत नेले. पुस्तके दाखवली. मुलगा आशुतोष व सूनबाई सौ. मनीषा यांना बोलावले. नानासाहेब म्हणाले, "हे प्रा.बी.टी.देशमुख आहेत. पाहून घ्या!" त्यांना म्हणायचे होते; डोळ्यात साठवून घ्या! दोघांनीही आदरपूर्वक नमस्कार केला. भाऊ सरस्वतीपुत्र होते. सरस्वतीच्या प्रतिमेतील सारी प्रतीकं त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रतिबिंबित झाली होती.

भाऊ रुबाबात जगले. अदबीनं वागले. आत्मसन्मानासाठी कधी तडजोड नाही. रुबाबात गेलेही. कर्मयोग्यासारखे !

पहाटेपासून नित्यक्रम पूर्ण केला. ठरलेल्यावेळी संध्याकाळी वहिनींच्या हातचे जेवले. ठरल्यावेळी खोलीत गेले. पेन्सिल, नुटाबुलेटिनचा अंक घेतला. तपासता तपासता डोळे मिटले.

महान विदुषी दुर्गा भागवतांचं एक वचन आहे. त्या लिहितात -

"माणसं तशी चांगली असतात. समाज विसरभोळा असतो." समाजाचं हे विसरभोळेपण भावी काळातील सुदामकाका, बी.टी. देशमुखांसारख्या नेतृत्वाच्या अंकुरण्याची बीजं करपून टाकतं; हे मात्र खरं !

***१९९६ साली राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा 'पहिला उत्कृष्ट संसदपटू' हा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला. ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती पहिला पुरस्कारही त्यांना ससन्मान दिला गेला. पुरस्कार त्यांच्यासाठी सामान्य होते. जनकल्याणाचा घेतलेला वसा पूर्ण करणे आणि जनतेचे प्रश्न सोडवून त्यांना सुगीचे दिवस आणणे हाच त्यांच्यासाठी मोठा पुरस्कार होता.***

# भाऊंना
# समर्पित !

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr.Mahendra V. Mete, 38, Ganediwal Layout, Camp, Amravati-444602. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade, 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 25.08.2026) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.07.2026**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,........................................................................

...........................................................................

...........................................................................

...........................................................................